# भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील लघुचित्रे : एक अध्ययन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
साहित्य आणि ललितकला विद्याशाखांतर्गत
भारतीयविद्या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता
सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक
अंजली राजेश भामरे

मार्गदर्शक
डॉ. श्रीकांत प्रधान

फेब्रुवारी २०२०

श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केन्द्र

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

सौ. अंजली रा. भामरे यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून 'भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील लघुचित्रे : एक अध्ययन' हा विषय घेऊन पीएच.डी. साठीचे संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. त्यांनी केलेले हे काम त्यांचे स्वत:चे असून त्या कामासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ स्त्रोतांचा योग्यरितीने निर्देश प्रबंधात करण्यात आला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग त्यांनी अन्यत्र्य कोठेही आणि कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

डॉ. श्रीकांत प्रधान
(प्रबंध मार्गदर्शक)

# प्रतिज्ञापत्र

मी, सौ. अंजली रा. भामरे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, डॉ. श्रीकांत प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली 'भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील लघुचित्रे : एक अध्ययन' या शीर्षकानूसार विद्यावाचस्पती या पदवीसाठी काम केलेले आहे. हा संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठास विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीकरिता सादर करण्यात येत आहे.

प्रस्तुत संशोधन कार्य माझे स्वत:चे आहे. यात समाविष्ट करण्यात आलेले संशोधन हे मी स्वत: केलेले असून माझे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत प्रधान व इतर तज्ञ मार्गदर्शक व निवड संदर्भ साहित्य यांच्या मदतीनेच संशोधन कार्य पूर्ण करण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रबंध आजपर्यंत कोणत्याही पदवीसाठी किंवा पदविकेसाठी कोणत्याही विद्यापीठाच्या परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

फेब्रुवारी : २०२०

सौ. अंजली रा. भामरे

# ऋणनिर्देश

माझ्या पीएच.डी. च्या संशोधनाकरिता अनेक जणांचे बहुमूल्य मार्गदर्शन व मदत झाली त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानते.

माझ्या संशोधन प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत प्रधान यांनी केलेल्या बहुमूल्य मार्गदर्शनामुळेच माझे हे संशोधनपूर्ण झाले. त्यांच्या कलेच्या क्षेत्रातील समृद्ध व्यासंगाचा व मार्गदर्शनाचा मला पावलो पावली उपयोग झाला आणि संशोधनाची पुढील दिशा आपोआप मिळत गेली. त्यासाठी मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

कै. प्रा. म. श्री. माटे सरांनी वेळोवेळी केलेले अमूल्य मार्गदर्शन व त्यांनी दिलेले प्रेमळ प्रोत्साहन, यांचे ऋण फेडणे केवळ अशक्य आहे. त्यांच्या या ऋणातच राहणे मी पसंत करेन. माझा संशोधन प्रबंध सादर करीत असताना त्यांची उणीव नक्कीच भासत आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या भारतीय विद्या विभागाचे माजी विभागप्रमुख आदरणीय कै. डॉ. श्रीपाद भट तसेच आदरणीय डॉ. सुभाष पवार सर, डॉ. अलका खाडे, डॉ. विक्रम कुलकर्णी या सर्वांनी माझ्या संशोधनकाळात वारंवार दिलेल्या प्रोत्साहन व अमूल्य सहकार्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. या शिवाय विद्यापीठाच्या भारतीय विद्या विभागातील डॉ. अंबरीश खरे सर, डॉ. मंजिरी भालेराव मॅडम आणि पीएच.डी विभागाने वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

भारत इतिहास  संशोधक मंडळाचे चिटणीस डॉ. श्री.मा.भावे सरांची मी ऋणी आहे. तसेच मंडळाच्या ग्रंथालयाच्या बागाईतकर मॅडम आणि संस्थेचे सर्व सहायक कर्मचारी यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीसाठी मी त्यांची आभारी आहे. मंडळाने त्यांच्या संग्रहातील दुर्मीळ चित्रांचे छायाचित्रण करण्यास व त्यांचा माझ्या प्रबंधात वापर करण्यास परवानगी दिली, या बद्दल मी मंडळाची शतशः ऋणी आहे. या सर्व चित्रांचे उत्तम छायाचित्रण करून दिल्याबद्दल सुमित जाधव, शेखर आणि परीक्षित यांचे मनापासून आभार.

फारसी तज्ञ श्री. गो.त्र्यं. कुलकर्णी, श्री. राजेंद्र जोशी आणि श्री.निखिल परांजपे आणि डेक्कन कॉलेजचे पर्शियनचे प्राध्यापक श्री. मोहम्मद सादिक बाघफलकी या सर्वांनी त्यांच्या व्यस्त

दिनक्रमातूनही वेळात वेळ काढून मला फारसी वाचनासाठी बहुमूल्य मदत केली. तसेच सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका सौ. अंजली मालकर यांनी रागमाला चित्रांसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. यासाठी मी या सर्वांची ऋणी आहे. तसेच मोडी वाचनासाठी श्री. मंदार लवाटे व सौ. भास्वती सोमण यांचीही मदत झाली.

सातारा येथील 'श्री छत्रपत्रती शिवाजी महाराज संग्रहालय' येथील प्रमुख सौ. हेमा द्रविड, 'श्री भवानी चित्र संग्रहालय व ग्रंथालय', औंध– जि. सातारा येथील श्री. श्रेयस जगताप यांनी या संग्रहालयांच्या भेटी दरम्यान केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. पुणे येथील पु. ना. गाडगीळ चे श्री. अजित गाडगीळ यांच्याकडील समृद्ध संग्रह मला पाहाण्यास व त्यांतील चित्रांच्या प्रतिमा उपलब्ध करून दिल्याबद्दल मी श्री.अजित गाडगीळ व श्री.विक्रम मराठे यांचे मनापासून आभार मानते.

प्रबंधाच्या टायपिंगच्या कामासाठी श्री.देशमुख, त्यांचे सहकारी तसेच श्री.सुजय अडसूळ यांनी मला सर्वप्रकारे मदत केली. माझ्या मैत्रिणी सोनाली व गीता यांनी अगदी कमी वेळात मला टायपिंग व चित्रांच्या एडिटिंगसाठी बहुमूल्य मदत केली. याशिवाय सौ. शुभांगी भागवत यांनी अगदी कमी वेळात proof reading करून दिले. यासाठी या सर्वांचे खूप खूप आभार.

सगळ्यात शेवटी, पण तेवढेच महत्त्वाचे म्हणजे माझे आई–वडील, पती, चिरंजीव, परिवारातील सर्व सदस्य आणि मित्र–मैत्रिणी यांच्या सहकार्याशिवाय आणि प्रोत्साहनाशिवाय माझा हा संशोधन प्रबंध पूर्णत्वास जाणे केवळ अशक्य होते. तसेच या संशोधनाकरिता अनेकांची मला प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या मदत झाली. त्यामुळे या सर्वांचे मी मनापासून ऋणनिर्देश मानते.

**- सौ. अंजली भामरे**

# अनुक्रमणिका


| | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | i |
| | प्रतिज्ञापत्र | ii |
| | ऋणनिर्देश | iii-iv |
| | अनुक्रमणिका | v-vi |
| | प्रबंधाचे गृहीतक | vii |
| | | |
| | **प्रकरण १ले** | |
| | **संशोधन विषयाची ओळख** | १ – १९ |
| १.१ | भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे या संस्थेचा संक्षिप्त आढावा | १ – ५ |
| १.२ | संशोधनाचे महत्त्व | ५–५ |
| १.३ | उद्दिष्टे | ६–६ |
| १.४ | संशोधनाची मर्यादा | ६–६ |
| १.५ | भारतीय लघुचित्रकलेचा संक्षिप्त आढावा | ६–१९ |
| | | |
| | **प्रकरण २रे** | |
| | **संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा** | २० – २३ |
| | | |
| | **प्रकरण ३ रे** | |
| | **संशोधनाची कार्यपद्धती** | २४–३३ |
| ३.१ | प्राथमिक साधने | २५–२५ |
| ३.२ | वर्गीकरण व त्यासाठी वापरली गेलेली पद्धती | २५–२७ |
| ३.३ | चित्र क्रमांक व आकृती क्रमांक यांची पद्धती | २७–२७ |
| ३.४ | विश्लेषण | २७–३२ |
| ३.५ | चित्रविषय आणि चित्रांतील व्यक्तिरेखा यांचा अभ्यास | ३२–३४ |
| | | |
| | **प्रकरण ४ थे** | |
| | **माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन** | |
| **४.१** | **भाइसं मंडळ चित्र प्रकार** | ३६–४३ |
| **४.२** | **भाइसं मंडळ चित्र वर्गीकरण** | |

| | | |
|---|---|---|
| ४.२ अ) | चित्रविषय | ४४–७६ |
| ४.२ ब) | चित्रे (तुर्को–पर्शियन, मुघल, दख्खनी व इतर) | ७७–८९ |
| ४.२ क) | चित्र तंत्र | ९०–९६ |
| | | |
| **४.३** | **भाइसं मंडळ चित्रे अभ्यास व विश्लेषण** | |
| ४.३ अ) | चित्रविषय | ९७–२२८ |
| ४.३ ब) | चित्रे (तुर्को–पर्शियन, मुघल, दख्खनी व इतर) | २२९–२५१ |
| ४.३ क) | चित्र तंत्र | २५२–२६२ |
| ४.३ ड) | चित्रांवरील फारसी वाचन | २६३–२७७ |
| | | |
| | **प्रकरण ५ वे** | |
| | **संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारसी** | २७८–२९७ |
| | | |
| | भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील चित्रांची संदर्भ सूची | २९८–३१३ |
| | चित्रे | --- |
| | परिशिष्टे | ३१४–३२३ |
| | भाइसं मंडळाची अद्ययावत सूची | ३२४–३६० |

# प्रबंधाचे गृहीतक

'भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे' या नामवंत संस्थेमध्ये असलेल्या दुर्मीळ चित्रांचा संग्रह हा साधारण १७व्या ते १९व्या शतकांतील आहे. या चित्रांना ऐतिहासिक महत्त्व असल्याने त्यांचा कोणत्याही संशोधन कार्याकरिता अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. यासाठी या चित्रांचे वर्गीकरण, विषय ओळख व कालखंड यांचा अभ्यास होणे आवश्यकच आहे. अशी अभ्यासपूर्ण माहिती उपलब्ध असल्यास चित्र समजण्यास मदत होते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनातून नवीन माहिती वा एखादी ऐतिहासिक व्यक्तिरेखा समोर येते का ते पहाणे. जमल्यास या चित्रांचे चित्रकार कोण होते, याचा शोध घेणे इत्यादी कामे या संशोधनाने होत आहेत.

## प्रकरण १

# संशोधन विषयाची ओळख

## १.१ 'भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे' या संस्थेचा संक्षिप्त आढावा.

'भारत इतिहास संशोधक मंडळ' ही पुण्यातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील एक नावाजलेली संस्था आहे. इतिहासाच्या अभ्यासकांसाठी एक मोठे व भव्य दालनच जणू येथे खुले आहे. 'भारत इतिहास संशोधक मंडळा' मध्ये इतिहासाच्या अभ्यासाची अनेक साधने वा ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह आहे. या संस्थेची स्थापना प्रसिद्ध इतिहास संशोधक, इतिहासाचार्य विश्वाथ काशिनाथ राजवाडे व श्रीमंत खंडेराव (तात्यासाहेब) मेहेंदळे यांच्या संयुक्त प्रयत्नांनी शके १८३२, आषाढ शु.१- म्हणजेच इ.स. ७ जुलै १९१० रोजी झाली.

भारतामध्ये असंख्य संग्रहालये आहेत, यातील काही संग्रहालये ही खासगी, काही स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी आणि नंतर राज्य सरकारांनी विकसित केलेली आहेत. त्यांचे विषयही वेगवेगळे आहेत. या सगळ्या संग्रहालयांत आपले वेगळेपण जपणारे एक संग्रहालय म्हणजे पुणे येथील 'भारत इतिहास संशोधक मंडळ' हे होय. तत्कालीन अनेक इतिहास संशोधक व इतिहास प्रेमींनी एकत्र येऊन ही संस्था स्थापन केलेली आहे. या सर्वांनी स्वत: भारतभर फिरून अनेक दुर्मीळ व प्राचीन वस्तू, प्रसंगी मागणी करून वा जमेल तसे पदरमोड करून संग्रहित केल्या आहेत. शिवाय अनेक दानशूर देणगीदारांनी स्वत: होऊन आपल्याकडील ऐतिहासिक ठेवा मंडळाला जतन करण्यासाठी देऊ केला आणि 'भाइसं मंडळा' चा संग्रह समृद्ध होत गेला.

'भाइसं मंडळा' च्या इ.स.१९२२ च्या पाक्षिक सभेत तेव्हाचे मंडळाचे उपाध्यक्ष श्री. चिंतामण विनायक वैद्य त्यांच्या भाषणात ते म्हणतात की, *"आपल्या देशाचा मागील इतिहास साधार आणि खरा शोधून काढणे हे हल्ली प्रत्येक सुधारलेल्या देशांतील विद्वान आणि देशाभिमानी लोकांचे*

*कर्तव्य आहे. ज्या देशास मागील इतिहास नाही, त्यास पुढील प्रगतीही नाही असे म्हणण्यास हरकत नाही."* (वैद्य १९२२: ६३) .

अनेक संशोधकांची परंपरा असलेल्या भारत इतिहास संशोधक मंडळात इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या गोष्टींचे- जसे ऐतिहासिक दस्तऐवज, असंख्य मोडी व फारसी कागदपत्रे, ऐतिहासिक पत्रे, बादशाहांची फर्मान, दुर्मीळ पुस्तके, हस्तलिखिते, सचित्र पोथ्या, नाणी, शस्त्रे इत्यादींच्या बरोबरीने एक महत्त्वाचा संग्रह म्हणजे भारतीय लघुचित्रांचा संग्रह. या सर्व गोष्टींचा संग्रह संस्थेतील तत्कालीन लोकांनी, अभ्यासकांनी मोठ्या परिश्रमाने जतन केलेला आहे.

असं म्हणतात की इतिहासातील प्रत्येक वस्तू त्या त्या काळाची कथा सांगत असते. हे आतापर्यंत केल्या गेलेल्या ऐतिहासिक दस्ताऐवजांच्या अभ्यासांवरून आपण सांगू शकतो. त्या त्या काळी काय काय घडामोडी घडल्या, त्यावेळच्या चालीरीती, परंपरा, समाजरचना, वेशभूषा, केशभूषा, दागिने आदींची कल्पना आपणांस त्यांवरून येते. त्यावरून अनेक प्राचीन वस्तूंत चित्रे सुद्धा रूप–आकारानेत्या त्या काळची संस्कृती, समाजरचना, अभिरुची, तसेच ऐतिहासिक गोष्टींचे प्रत्यक्ष दर्शन घडवितात असे म्हणता येईल. त्यामुळे या चित्रांचे इतिहासाच्या इतर साधनांइतकेच महत्त्व आहे. *"ऐतिहासिक लेख हे जसे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत, त्याचप्रमाणे ऐतिहासिक चित्रेही फार महत्त्वाची आहेत. "* असे श्रीमंत रा. रा. बाबासाहेब घोरपडे (इचलकरंजी), यांनी इ.स.१९२२ च्या पाक्षिक सभेतील आपल्या भाषणात नमूद केले होते. (घोरपडे १९२२: ७१).

'भाइसं' मंडळाच्या संग्रहातील लघुचित्रे हा एक मोठा संग्रह आहे. या संग्रहात सुमारे १३०० लघुचित्रे आहेत. ही चित्रे साधारणत: १७व्या शतकापासून ते २०व्या शतकापर्यंतची आहेत. ही चित्रे विविध भारतीय लघुचित्र शैलींतील असून, त्यांत काही दुर्मीळ विषयांची चित्रे देखील आहेत. ही चित्रे कोण्या एका व्यक्तीने गोळा केलेली नाहीत तर ही चित्रे जमविण्याच्या कामात निरनिराळ्या संशोधकांनी सर्व प्रकारे मेहनत घेतलेली आहे असे म्हणता येईल. यांमध्ये महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, पांडुरंग न. पटवर्धन, आबा चांदोरकर, गणेश हरी खरे, तात्यासाहेब मेहेंदळे, नानासाहेब खाजगीवाले

आणि मुख्यत: मंडळाचे तत्कालीनी चिटणीस सरदार आबासाहेब मुजुमदार यांनी देखील विशेष मेहनत घेतली आहे. चित्रांच्या संग्रहाचे मुख्य श्रेय त्यांनाच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या व्यतिरिक्त अनेक लोकांनी, सरदार घराण्यांनी आपल्या खाजगी संग्रहातील अनेक चित्रे मंडळास कायम स्वरूपी देणगी दाखल दिलेली असल्याने, त्यांचे एक वेगळेच महत्त्व आहे. देणगी देणाऱ्यांच्या घराण्यांच्या वाडवडिलांनी ती दिल्ली, आग्रा, राजस्थान, हैद्राबाद अशा अनेक ठिकाणांहून संग्रहित केलेली असल्याने मंडळाच्या चित्रसंग्रहाला एक सर्वसमावेशक महत्त्व प्राप्त झाले आहे.

अशा या चित्रांचा; 'भाइंस' मंडळातील समृद्ध चित्र संग्रहाचा इथे थोडक्यात परिचय घेणे क्रमप्राप्त ठरेल.

**'भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील लघुचित्र संग्रह'**

सध्या १३०० दुर्मीळ लघुचित्रांचा संग्रह 'भारत इतिहास संशोधक मंडळा' मध्ये उपलब्ध आहे. ही चित्रे पर्शियन, मुघल, पहाडी, राजस्थानी आणि दख्खनी या प्रमुख चित्रशैलींमध्ये विभागलेली आहेत. तसेच या लघुचित्रांव्यतिरिक्त मंडळाच्या संग्रहात दुर्मीळ काचचित्रांचा संग्रह देखील आहे. या काचचित्रांत व्यक्ति चित्रे, देवी-देवतांची तसेच सजावटी साठीची चित्रे सुद्धा दिसतात.

विशेष म्हणजे मंडळाच्या चित्रसंग्रहात अनेक ऐतिहासिक व्यक्तिचित्रांचा देखील महत्त्वाचा संग्रह आहे. प्रस्तुत चित्रसंग्रहात अनेक ऐतिहासिक व्यक्तिचित्रे असून त्यात स्त्री-पुरूषांची चित्र, समुहातील व्यक्ति चित्रे अशा प्रकारांत वर्गीकरण करता येईल अशी चित्रे आहेत. याशिवाय दैनंदिन जीवनावरील चित्रे, रागमाला चित्रे, ताल चित्रे, बारामास चित्रे, भागवत पुराणावर आधारित चित्रे, तसेच वाराणसीच्या घाटाची वैशिष्ट्यपूर्ण आणि दुर्मीळ अशी छिद्र चित्रे आहेत.

या ऐतिहासिक व्यक्तिचित्रांत अनेक इतिहास प्रसिद्ध व्यक्तींची दुर्मीळ चित्रे आहेत. उदा. अकबर बादशहा, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब, बहादूरशहा, दाराशिकोह, बिरबल, तानसेन अशा अनेक

व्यक्तींची चित्रे या संग्रहात पाहायला मिळतात. दख्खनी चित्रांमध्ये मराठा, विजापूरच्या प्रमुख व्यक्तींची चित्रे आपणास पाहावयास मिळतात. त्यांत आली आदिलशहा, सुलतान महम्मद, चांदबिबी आणि अफजल खान यांची चित्रे आहेत. तर नंतरच्या मराठा काळातील अनेक इतिहास प्रसिद्ध व्यक्तींची चित्रे देखील संग्रहित केलेली आहेत. उदा. छत्रपती शाहू महाराज, छत्रपती प्रतापसिंह महाराज, पहिले बाजीराव पेशवे, माधवराव पेशवे, सवाई माधवराव, रघुनाथराव, दुसरे बाजीराव, नाना फडणीस, हरिपंत फडके, महादजी शिंदे, सरदार पिलाजी जाधवराव इत्यादी. याशिवाय इतर व्यक्तिचित्रे आहेतच. त्यांचा नव्याने परिचय पुढच्या प्रकरणांत दिलेला आहे.

याशिवाय अजून एक ऐतिहासिक अद्वितीय असा चित्रांचा संग्रह येथे आहे; तो म्हणजे १६ व्या शतकातील अहमदनगरच्या सुलतानाच्या काळात तयार झालेला काव्यसंग्रह - 'तारीफ-ई-हुसेन शाह बादशाह-इ-दखन' आणि त्यातील दुर्मीळ चित्रांचा संग्रह. ही चित्रे सुरुवातीच्या सल्तनत कालखंडातील अगदी प्रारंभीच्या दख्खनी कलेची साक्ष देतात. 'भारत इतिहास संशोधक मंडळा'ने या 'तारीफ-ई-हुसेन शाह बादशाह–इ–दखन' व त्यातील दुर्मीळ दख्खनी चित्रांवर आधारित पुस्तक प्रसिद्ध केलेले आहे. (Kulkarni, Mate 1987)

या व्यतिरिक्त या संग्रहात राजस्थानी व इतर शैलींतील चित्रे आपण पाहू शकतो. जसे- पहाडी, कांग्रा, बसौली, किशनगढ इत्यादि. तसेच 'भारत इतिहास संशोधक मंडळा' तील संग्रहात नायिकांची चित्रे, शिकारीची चित्रे, प्राण्यांची चित्रे, दरबारी चित्रे, शृंगाररदृश्ये तसेच झरोका चित्रे अशा वेगवेगळ्या विषयांवरील चित्रे देखील आहेत.

पाश्चात्य छपाई तंत्रातून तयार झालेली प्रारंभिक छापीलचित्रे हा वेगळ्या चित्रांचा संग्रह 'भाइसं' मंडळामध्ये आहे. मंडळातील चित्रसंग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेली जैन तीर्थंकरांची चित्रे होय. या २४ जैन तीर्थंकरांची दुर्मीळ चित्रे संग्रहीत झालेली आहेत.

अशा प्रकारे 'भारत इतिहास संशोधक मंडळ' संग्रहात अनेक शैली, विषय अशा वैविध्यपूर्ण चित्रांचा संग्रह आहे. पुढील प्रकरणांतअशा या वैविध्यपूर्ण चित्रसंग्रहांचा, तसेच त्यातील

अपरिचित चित्रांचा अभ्यास करणे सोपे जावे म्हणून या दुर्मीळ संग्रहातील सर्व चित्रांचे विषय, शैली यांनुसार त्यांचे साधारणपणे १६ प्रकारांत वर्गीकरण केले आहे. या सर्व चित्रांचा विस्तृतपणे विश्लेषण व अभ्यास प्रकरण ४.३ मध्ये करण्यात आलेला आहे.

## १.२. संशोधनाचे महत्त्व

भारत इतिहास संशोधक मंडळातील ही सर्व चित्रे इतिहास, कला, सामाजिक शास्त्र इ. च्या अभ्यासकांसाठी महत्त्वाची आहेत. तसेच ही लघुचित्रे त्यांची शैली, विषय व तंत्र इ. दृष्टींनीही महत्त्वाची असून साधारणत: १७व्या ते २० व्या शतकांतील ही चित्रे असल्यानेही त्यांचे महत्त्व आहे.

'भाइसं' मंडळाने संग्रहित केलेल्या या दुर्मीळ चित्रसंग्रहाचा प्राथमिक अभ्यास आणि वर्गवारी प्रसिद्ध इतिहास संशोधक ग. ह. खरे यांनी केलेली आहे. ग.ह.खरे यांना मध्ययुगातील चित्रांच्या पर्शियन, मुघल, राजपूत, पहाडी व दख्खनी अशा चित्रशैलींची चांगली ओळख व अभ्यास होता. त्यांवरून त्यांनी मंडळ संग्रहातील चित्रांची वर्गवारी करून त्यांना १ ते १३०० असे क्रमांक देऊन त्यांची प्रथम सूची करून त्या चित्रांची विषयानुरूप विभागणी केलेली होती. या सूची आणि विषयानुरूप विभागणीत नंतर आवश्यक त्या दुरुस्त्या प्रा. म. श्री. माटे यांनी केलेल्या आहेत आणि हा संग्रह जतन झाला असल्याने या संग्रहाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते

वरील सर्व चित्रांची विस्तृत नोंद ठेवणे, त्यांची ओळख आणि त्यांचा अभ्यास यासाठी या सर्व लघुचित्रांचे त्यांच्या विषयांनुसार, वैशिष्ट्य व कालखंडांनुसार वर्गीकरण करणे आवश्यक ठरते. जेणे करून या चित्रांचा अभ्यास करणे तसेच चित्रांची ओळख करणे इत्यादी गोष्टी देखील महत्त्वाच्या ठरतात.

## १.३ उद्दिष्टे

आतापर्यंत मंडळ संग्रहातील काही मोजक्याच चित्रांवरील लेख; मंडळाची त्रैमासिके व इतर पुस्तकांमधून प्रसिद्ध झालेले आहेत. तसेच यातील काही चित्रांवरील पुस्तके मंडळाकडून प्रकाशित झालेली आहेतच. परंतु या व्यतिरिक्त संग्रहातील अनेक उपलब्ध संपूर्ण चित्रांचे वर्गीकरण, त्यांची ओळख आणि अभ्यास होणे गरजेचे आहे.

## १.४. संशोधनाची मर्यादा

'भारत इतिहास संशोधक मंडळ', पुणे येथील संग्रहातील सर्व लघुचित्रांचा एकत्रित अभ्यास आतापर्यंत झालेला नाही. यातील काही चित्रे शैलीच्या दृष्टीने वगळी आहेत. त्यामुळे अशा चित्रांचा वेगळ्याने विचार करावा लागतो. या बाबतीत काही कला, शैलींच्या मर्यादा दिसतात. तसेच त्यातील काही चित्रांची पुनरावृत्ती होताना दिसते. अशी चित्रे बाजूला करणे सहज शक्य नाही. यातील काही चित्रे ओळखली गेलेली आहेत आणि त्यांतील काही चित्रांचा अभ्यास झालेला आहे. त्यामुळे या चित्रांचा नव्याने अभ्यास करता येणे शक्य असले तरी तांत्रिक बाबींच्या मर्यादा आहेतच. इथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या मर्यादा आहेत.

यासाठी सगळ्याच चित्रांवर प्रस्तुत संशोधक  काम करीत नसून संग्रहातील ज्या अनेक चित्रांची ओळख झालेली नाही; अशा चित्रांचा अभ्यास या प्रबंधात करण्यात आला आहे अर्थात; या चित्र संग्रहाच्या संदर्भात मर्यादा म्हणाव्यात असे काही दिसून येत नाही.

## १.५. भारतीय लघुचित्रकलेचा संक्षिप्त आढावा

आजपर्यंत मध्ययुगीन लघुचित्रकलेवर आधारित परिचयात्मक व समीक्षणात्मक असे बरेच लेखन झालेले आहे. त्यामध्ये भारतीय लघुचित्रशैलीतील सर्वच शैलींवर विस्तृतपणे विवेचन करण्यात आलेले आहे. या सर्वांचा आधार घेऊन या प्रकरणात लघुचित्रशैलीचा धावता आढावा घेतलेला आहे.

भारतात अजिंठ्याची संपन्न भित्तीचित्रकला ते नंतर हस्तलिखित पोथीचित्रे – कागदावरील स्वतंत्र अशी लघुचित्रे असा चित्रकलेचा प्रवास आपणास दिसून येतो. सुरुवातीची गुजरात शैली किंवा पश्चिम भारतातील जैन चित्रशैली मानली जाते. सुरुवातीच्या काळात ताडपत्रांवरील हस्तलिखित ग्रंथांमध्ये जैन चित्रशैलीत चित्रकाम झाले. तसेच समकालीन ग्रंथांच्या सुशोभनासाठी चित्रांची निर्मिती झाली हे सर्वश्रुत आहेच. पूर्वेकडील पाल-चित्रशैली, नंतर मोगल वंशाच्या आगमनानंतर त्यांच्याबरोबर आलेली पर्शियन कला व स्थानिक कला - या दोन स्वतंत्र कला परंपरा; तंत्र, शैली यांच्या संगमातून पुन्हा स्वतंत्रपणे निर्माण झालेली मुघल लघुचित्रकला, त्यापुढे राजपूत चित्रकला, पहाडी चित्रकला, दक्षिणेत दख्खनी - विजापूर, गोवळकोंडा, हैद्राबाद व मराठा चित्रकला असे अभ्यासकांनी केलेले कलेचे विविध टप्पे आपणास दिसून येतात.

१६ व्या शतकात पर्शियन आणि भारतीय चित्रशैलीच्या मिश्रणाने वैशिष्ट्यपूर्ण असलेली मुघलचित्र शैली विकसित होण्यास अकबर व जहांगीर अशा बादशाहांचा उदार आश्रय लाभला. अकबराच्या काळात उदयाला आलेली ही शैली जहांगीरच्या काळात पूर्णपणे बहरली. मुघल बादशहा शहाजहान नंतर अगदी एकोणिसाव्या शतकापर्यंत दिल्ली, अवध, लखनऊ आणि आजूबाजूच्या क्षेत्रांत प्रथम मुघलशैलीतून प्रेरणा घेत चित्रकाम केले गेले. मात्र त्यानंतर ही शैली स्थानिक चित्रशैलीत बदलत गेली. अकबर काळात सचित्र करण्यात आलेले अन्वर सुहेली, तुतीनामा, रज्मनामा, अकबर नामा अशा अनेक सचित्र हस्तलिखित ग्रंथांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. अकबर कालीन चित्रकाम हे कथनात्मक व वर्णनात्मक असल्याचे दिसून येते, त्यांमुळे चित्रातून आकृतींची गर्दी दिसून येते. सुरुवातीच्या या मुघल कलेतील चित्र संयोजन व रंगांवर पर्शियन कलेचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. याच बरोबरीने अकबराने स्वत:ची, स्वत:च्या शहजाद्यांची, अमीर उमरावांची व्यक्तिचित्रे पण काढून घेतली. जहांगीर काळात 'नीमकलम' हे ही एक चित्रकामाचे तंत्र, ज्यात नंतर शहाजहान काळातही भरपूर चित्रकाम झाले. (Daljeet 1999: Pl.no.50: 63). या चित्रतंत्र पद्धतीत चित्राच्या पृष्ठभागावर

तपकिरी रंगाचे पातळ लेपन (Wash) देऊन, त्यावर चित्राची आकृती रेखांकीत करून त्यांना सोन्याच्या रंगाच्या सहाय्याने उठाव दिला जात असे. (माटे, चव्हाण २००२ : १५०)

अकबराचा पुत्र जहांगीर याचा काळ हा मुघलकलेचा सुवर्णकाळ मानला जातो. या काळात मुघलचित्रकलेचा उत्कर्ष झाल्याचे दिसते. अकबरकालीन चित्रांतील आधीचा पर्शियन प्रभाव जाऊन भारतीय परंपरेशी अधिक जवळीक साधणारी स्वतंत्र अशी शैली साकार झाली, त्यास मुघल शैली हे नाव मिळाले. ही कला वास्तववादाशी अधिक जवळीक साधणारी होती. अकबरकालीन हस्तलिखित ग्रंथांच्या चित्रणा ऐवजी निरनिराळ्या विषयांवरील स्वतंत्र चित्रे काढून घेणे व त्यांचे चित्रसंग्रह- म्हणजेच 'मुरक्के' बनविले जाऊ लागले. या चित्रांत फुलं–झाडे आणि पशू-पक्ष्यांशिवाय इतर चित्रे तर होतीच शिवाय व्यक्तिचित्रे, दरबारी व्यक्तींची स्वतंत्र चित्रे, दरबाराची चित्रे, समूह चित्रे, सुफी साधू-संतांची चित्रे अशा विविध विषयांवर चित्रकाम झालेले दिसते. पुढील काळात चित्रांतील आकृत्यांची गर्दी कमी होत गेली. तसेच चित्रातील पर्शियन प्रभावाची रंगसंगती कमी होऊन सौम्य, मंद व आल्हाददायक रंगसंगतीचा वापर होऊ लागला. चित्रांभोवती अलंकारिक चौकटी, म्हणजे हशिया यांच्यात पाने-फुले, पक्षी यांची सजावट होऊ लागली. या काळात दरबारी येणाऱ्या विदेशी चित्रकारांबरोबर भारतीय चित्रकारांचा संबंध येऊ लागला, त्या अनुषंगाने काही प्रमाणात पाश्चिमात्य चित्रकलेचा संबंधही आला. व्यक्तीचित्रणामध्ये तर त्या त्या व्यक्तीच्या बाह्यरूपाबरोबरच त्याच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब दर्शविण्यात जहांगीर कालीन चित्रकार तरबेज होते. अबुलहसन, मन्सूर, गोवर्धन, बिशनदास आदी चित्रकार जहांगीरच्या दरबारी होते. काही चित्रे तर फक्त काळ्या रंगाच्या शाईने रेखाटली जात असत. या चित्र पद्धतीला 'स्याह कलम' असे म्हटले जाई. अनेक व्यक्तिचित्रांमध्ये या पद्धतीचा उपयोग केलेला दिसून येतो. (माटे, चव्हाण २००२:१९०)

शहाजहानच्या काळात राजेशाही डामडौल, भपका, विलास, वैभव, रसिकता याचे प्रतिबिंब दिसून येते. त्याच्या काळात दर्जेदार व्यक्तिचित्रे निर्माण झाली. बादशहा, दरबारी मंडळी, अमीर उमराव

यांची स्वतंत्र तसेच समूह चित्रे निर्माण झाली. त्याच्या दरबारी चित्रकारांचा हुबेहूब व्यक्तिचित्रे काढण्यात हातखंडा होता. तसेच शिकारीची चित्रे, ज़नानखान्यातील चित्रे, झरोका चित्रे, विलासात रमलेल्या, मद्याचा, संगीताचा आस्वाद घेणाऱ्या, आतषबाजी करणाऱ्या राजस्त्रिया, शाही युगुलांची प्रणयदृश्ये अशा विषयांवर चित्रकाम केलेले दिसते. शहाजहानच्या वास्तूकलेवरील अधिक प्रेमामुळे मात्र चित्रकलेला हवे तसे प्रोत्साहन मिळालेले दिसत नाही. त्यामुळे चित्रकलेत नवीन विषयांवर काम न होता, त्याच त्याच प्रकारचे काम होऊ लागले व कलेमध्ये एक प्रकारचे साचलेपण येऊ लागले आणि औरंगजेबाचा काळ सोडला, तर पुन्हा पुढील मुघल बादशाहांनी ही परंपरा कायम ठेवली व कमी-जास्त प्रमाणात चित्र निर्मिती होत राहिली. मात्र पूर्वी सारखा दर्जा मात्र या काळातील चित्रांमधून फारसा दिसून येत नाही, असे मत प्रा. म. श्री माटे यांनी आपल्या 'मध्ययुगीन कलाभारती' या पुस्तकात मांडले आहे.

याच काळात समकालीन असलेली कला म्हणजे राजपूत चित्रकला होय. राजस्थानात राजपूत शैलीचा स्वतंत्र पणे विकास झालेला दिसतो. नंतर पुढील काळात या शैलीची अनेक उपकेंद्रे निर्माण झाली – उदा. जयपूर, जोधपूर, मेवाड, बुंदी, कोटा इत्यादी. या भागात तत्कालीन प्रसिद्ध संतांच्या रचना, कृष्ण भक्तीने युक्त अशी काव्यं, साहित्य, रामायण-महाभारत, भागवत पुराण, गीत-गोविंद, इ. प्रसिध्द साहित्यांवर आधारित असलेली चित्रनिर्मिती झालेली दिसून येते. तर शास्त्रीय संगीतावर आधारित राग व त्यांच्या रागिण्या यांची **'रागमाला चित्रे'** चितारली गेली. रागमाला किंवा संगीत अशा चित्रविषयांवर आधारित चित्रांच्या लोकप्रियतेमुळे नंतर वेगवेगळ्या शैलींतही रागमाला चित्रे तयार झाली.

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात मुघल व राजस्थानी दरबारातील अनेक चित्रकार पहाडी प्रदेशांतील दरबारांत आश्रयास गेले. तेथे या चित्रकारांनी मिळून जी स्वतंत्र चित्रशैली निर्माण केली, तिला पहाडी चित्रशैली असे संबोधिले जाते. या कलेचे आश्रयदाते हे हिंदू राजे असल्यामुळे त्यांचे चित्रविषय हे हिंदूच राहिले. रामायण-महाभारत, शिवपुराण, राग-रागिण्या, नायिकाभेद, बारामास आणि

व्यक्तिचित्रे **इत्यादी** विषयांवर चित्रनिर्मिती झाली. या चित्रशैलींना स्थानिक प्रदेशांची नावे मिळाली. उदा. कांग्रा, बसौली, कुलु इत्यादी. या चित्रांतुन प्रामुख्याने स्त्रियांचे आलेखन भावपूर्ण व काव्यात्मक केलेले दिसून येते. परंतु सादृश्य सुंदर निसर्ग चित्रण, शिवाय पशुपक्षी, वृक्ष, वेली, विजा, वादळ इ. चा विषयानुरूप प्रतीकात्मकतेने केलेला वापर, तसेच हर्ष, शोक, भय यांची अनुभूती दर्शविण्यासाठी निसर्गातील सर्व तत्वांचा सुंदर मिलाफ साधण्यात पहाडी चित्रकार कुशल होते या शैलींत कांग्रा शैली ही नंतरच्या चित्रकलेची उन्नत अवस्था म्हणता येईल.

दक्षिण भारतात अर्थात **'दख्खन'** मधील बहामनी सल्तनतीच्या विभाजनानंतर ज्या पाच पातशाह्या निर्माण झाल्या; त्यांतील अहमदनगर, विजापूर व गोवळकोंडा ही तीन सल्तनती राज्ये; दख्खनी कलमाची तीन मुख्य केंद्रे बनली. १६व्या शतकाचा उत्तरार्ध व १७व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंतच्या काळात इथली कला तिच्या संपन्न व वैशिष्ट्यपूर्ण शैलीने भरभराटीस आली. या काळात बहरलेल्या कलेला दख्खनमधील पूर्वार्धातील कला असे म्हटले जाते; मुघलांनी दख्खन काबीज केल्यानंतर ही कला संपुष्ठत आली. तर नंतरच्या १८व्या-१९व्या शतकातील उत्तरार्धातील कलेमध्ये हैद्राबाद आणि तिच्या उपशैलीच्या रूपात वानपर्थी, गढवाल, शोरापूर किंवा सुरपूर, कुरनूल (कडप्पा) आदी ठिकाणी ती स्थानिक नावाने नावारूपाला आली. (Mittal 1963:58)

सुरुवातीच्या दख्खनी शैलीच्या चित्रांत पर्शियन शैलीचा प्रभाव प्रामुख्याने जाणवतो (Daljeet 1999:102). यात तांत्रिक सफाईदारपणा, चित्रांचे संयोजन, त्यातील भौमितिक आकार, उष्ण रंगसंगती यावरही पर्शियन शैलीचा प्रभाव दिसतो. नंतर हळूहळू दख्खनी कलेमध्ये स्थानिक चित्रशैली विशेषत: विजयनगर, आंध्र आदी प्रदेशांतील चित्र तत्त्वांचाही समावेश होत दख्खनी चित्रांच्या शैलीकडे प्रवास झालेला दिसून येतो. यात दख्खनी चित्रकारांनी उष्ण, सतेज अशा रंगसंगतीचा उपयोग केल्याचे दिसते. यात काही चित्रांतून एकाच रंगात (monochromatic) चित्रे सुद्धा काढली गेली आहेत. दख्खनी चित्रांतील रंगसंगती ही उत्तरेकडील मुघल चित्रकलेतील रंगसंगतीपेक्षा वेगळी, म्हणजे जास्त उजळ व गडद रंगांची होती. शिवाय आकृतींचे रेखांकन हे जोरकस, ठसठशीत होते. या सर्व तत्वांच्या

समावेशाने, प्रभावी चित्र संयोजन आणि तीव्र व उष्ण रंगसंगती यामुळे दख्खनी चित्रांमध्ये एक प्रकारचे प्रसन्न, स्वप्नवत, अद्भुतरम्य वातावरण निर्माण होते. ते काही वेळा मुघल चित्रांमधूनही दिसत नाही. (Welch 1963: 10).

दख्खनमधील मुसलमानी राज्यं ही दिल्लीच्या मुसलमानी सल्तनतींपासून स्वतंत्र होती. त्यामुळे त्यांचे राजकीय स्वातंत्र्य व सांस्कृतिक स्वातंत्र्य टिकून होते. म्हणूनच सुरुवातीच्या काळातील दख्खनी कला ही स्वतंत्रपणे विकसित पावली व समकालीन मुघल कलेहून काहीशी वेगळी राहिली असे म्हणता येईल.

१७ व्या शतकाच्या मध्यास दख्खन प्रदेशावर मुघलांची सत्ता आल्यानंतर तेथील चित्रकलेवरही याचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. अर्थात उत्तरकालीन दख्खनी चित्रांवर मुघल चित्रांतील वास्तव दर्शनाचा, विशेषत: व्यक्तिचित्रणावर या शैलीचा स्पष्टपणे प्रभाव दिसून येतो. तसेच गोवा, कोकणपट्टी येथील पोर्तुगीज वसाहती तसेच डच, युरोपियन व्यापारी यांचा राजकीय संबंधांत दख्खनमध्ये बराच राबता होता. यांत अनेक कलाकार, धर्मप्रसारकही होते. त्यांच्या संपर्कामुळे पाश्चात्य कलेच्या काही तत्वांचा दख्खनी कलेत समावेश होत गेला, असे काही संशोधक मानतात. यात चित्रकामात दिसणारा यथार्थदर्शनाचा प्रयत्न (perspective) ही गोष्ट पाश्चात्य प्रभावामुळे आलेली दिसते. (Welch 1963:10). अशाप्रकारे निरनिराळ्या शैलींच्या तत्त्वांचा समावेश होऊनही दख्खनी चित्रकामातील चित्रसंयोजन, रंगसंगती व वेशभूषा यावरील स्थानिक प्रभावांमुळे दख्खनी कलमाने स्वत:चे असे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

दख्खनी कलेचे अहमदनगर हे एक महत्त्वाचे केंद्र होते. तेथील चित्रकाम हे सर्वांत जुने मानण्यात येते. यात सुलतानांची काही उत्तम व्यक्तिचित्रे तयार झाली. या चित्रांचा. एक महत्त्वाचा सचित्र ग्रंथ म्हणजे 'तारिफ-इ-हुसैनशाह बादशाह इ दकन'. या हस्तलिखित सचित्र ग्रंथात एकूण १४ चित्रे आहेत. दुर्दैवाने या संग्रहातील केवळ १२ चित्रे उपलब्ध आहेत. या चित्रांत हिंदू चित्रपरंपरा व मुसलमानी चित्रपरंपरा ह्या दोन्हींचा समावेश केला गेला आहे विशेष म्हणजे 'रागमाला' वर आधारित

काही चित्रे प्रथमत: अहमदनगर मध्ये तयार झाली असावीत असे म्हणता येते. या सचित्र ग्रंथात राग 'हिंडोल' चे चित्र आहे हे विशेष, असे मत प्रा. म. श्री. माटे यांनी 'मध्ययुगीन कलाभारती' या पुस्तकातील दख्खनी चित्रकला या प्रकरणात आपले मत मांडले आहे. दख्खनी कलेचे दुसरे महत्त्वाचे केंद्र म्हणजे विजापूर. येथील आदिलशाही सुलतान हे मोठे विद्याप्रेमी व कला-कौशल्याचे भोक्ते होते. त्यांच्यामध्ये प्रामुख्याने सुलतान आली आदिलशाह-१ ला व त्याचा पुतण्या इब्राहीम आदिलशाह-२ रा हे कलेचे प्रमुख आश्रयदाते होते असे दिसते. सुलतान आली आदिलशाह-१ च्या काळात 'नुजुम-उल-उलुम' या ग्रहताऱ्यांची माहिती देणाऱ्या ग्रंथाची निर्मिती झाली, ज्यात ८७६ चित्रे चितारली गेली. सुलतान इब्राहीम आदिलशाह-२ रा हा पण चित्र, साहित्य आदि कलांचा आश्रयदाता होता. तो स्वत: कवी, संगीतकार आणि चित्रकार होता. (Daljeet 1999:104). तो सरस्वतीचा उपासक होता. त्याच्याच काळात विजापूर हे दख्खन मधील महत्त्वाचे केंद्र बनले व तेथील चित्रकला बहरत गेली. याच्या काळातच काही महत्वाच्या लघुचित्रांची निर्मिती झाल्याचे दिसते. बहिरी ससाणा हातात घेऊन घोडेस्वारी करतानाचा सुलतान, किंवा जंगलात शिकारीसाठी वा फेरफटका मारणारा सुलतान असे आणि इतर काही विषय याच्या काळात चित्रित झालेले दिसतात. इब्राहीम आदिलशहा २रा या सुलतानाच्या काळातील व्यक्तिचित्रे चित्रकलेच्या अनुषंगाने दर्जेदार असल्यचे जाणवते. या बादशाहाला सुफी तत्त्वज्ञानात देखील मोठी रुची असल्याने या विषयावर आधारित चित्रे देखील चितारली गेल्याचे दिसते. या चित्रांत देखील तत्त्वज्ञानी, त्यांच्या सांगिती-चर्चा, योगी-योगिनी इ. वरही अनेक चित्रे काढली गेली.

१६व्या शतकातील विजापूर शैलीतील चित्रकलेमध्ये स्थानिक दक्षिण भारतीय कला व समकालीन साफाविद-पर्शियन दरबारी चित्रपरंपरा यांचा मिलाफ झालेला दिसून येतो. विशेषकरून स्त्री-चित्रणामध्ये लेपाक्षीच्या भित्तीचित्रांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. (खाडे २०१४:७८). १७व्या शतकाच्या सुरुवातीस मुघलांच्या अधिपत्यानंतर येथील चित्रकामावर मुघल शैलीचा प्रभाव असल्याचे दिसून येते. विजापूरच्या उत्तरकालीन चित्रकामात विषयांबरोबरीने त्यांच्या संयोजन, रंगसंगती

यामध्येही मुघल चित्रकामाचा प्रभाव दिसून येतो. व्यक्तिचित्रणाची परंपरा तशीच चालू राहिली, परंतु ती आता मुघलशैलीप्रमाणे एकचश्म पद्धतीने दाखविली जाऊलागली. तसेच उष्ण, तेजस्वी रंगांच्या ऐवजी सौम्य व आल्हाददायक रंग वापरले जाऊ लागले.

दख्खन मधील गोवळकोंडा हे तिसरे महत्त्वाचे केंद्र होते. येथील चित्रकलेवर सुरुवातीस इराणी व स्थानिक दख्खनी कला व नंतरच्या काळात मुघल शैलीचा प्रभाव दिसून येतो. येथील महत्त्वाचा बादशहा, म्हणजे सुलतान अब्दुल्ला कुली कुतुबशाहा, याच्या काळात गोवळकोंडा चित्रकलेचा उत्कर्ष झाला. याच्या काळात गोवळकोंडा येथील कलेत इराणी शैलीचा प्रभाव कमी झालेला दिसतो. फळांनी लगडलेले आम्रवृक्ष, त्यावर बागडणारे खार, पोपट व दक्षिणेतील निसर्गसौंदर्याचे मनोहारी दर्शन आपल्याला या चित्रांतून दिसते. (Daljeet 1999:109)

गोवळकोंडा चित्रांतील कल्पना  रम्यता, जोमदारपणा व नाट्यमय वातावरण निर्मिती अशी दृश्यात्मकता जाणवत राहते. निळसर-जांभळा, गुलाबी, लाल रंग खास गोवळकोंडा चित्रांचे लक्षण आहे. आकाशासाठी विरोधी रंगसंगतीचा वापर- म्हणजेच निळ्या आकाशात केशरी रंगांचे ढग व त्यांना सोनेरी किनारी हे खास गोवळकोंडा चित्रशैलीचे वैशिष्ट्य समजले जाते. (Daljeet 1999:109). १७व्या शतकात मुघल अधिपत्यामुळे येथील चित्रकारांनी मुघल कलेतील तंत्र, विषय स्वीकारले. या काळात सुलतानांची व्यक्तिचित्रे मोठ्या प्रमाणात चित्रित झाल्याचे दिसते.

उत्तरार्धातील दख्खनी चित्रकलेमध्ये हैद्राबाद येथील निज़ाम आसफ ज़ाहच्या काळात देखील चित्रनिर्मिती झाली. पूर्वार्धातील दख्खनी चित्रांपेक्षा या काळातील चित्रांचे विषय काहीसे  वेगळे म्हणता येतील. पूर्वीच्या सुल्तान, त्यांची  दरबारी दृश्यं, यांच्या बरोबरीने आता त्यांची मुले, सरदार, साधू, दरवेशी, स्त्रिया, रागमालेची चित्रे यांचे चित्रण मोठ्या प्रमाणावर झाले. पुढे निझामाच्या वंशाजांनीही चित्रकलेला प्रोत्साहन दिले. (माटे, चव्हाण २००२: १८८)

हैदराबादच्या चित्रकामात मोठ्या प्रमाणावर व्यक्तिचित्रांची निर्मिती झाली. तसेच दरबार दृश्ये, संत, दरवेशी, ज़नानखान्यांची दृश्ये असे विषय चित्रित केले गेले. १८व्या शतकाच्या काळात दख्खनी

चित्रकारांनी स्त्रिया व दरबारी स्त्रियांची चित्रे काढली. ज्यांमध्ये हुक्का पिणारी स्त्री, मदिरापान करणारी स्त्री, गच्चीवर संगीताचा आस्वाद घेणारी राजस्त्री, निरनिराळ्या खेळात दंग असणारी राजस्त्री, प्रियकराची वाट पाहणारी, हलकेच आळस देणारी, प्रेम विव्हल झालेली ललना, स्नानगृहातील स्त्री अशा विविध अवस्थांतील स्त्रियांचे चित्रण केलेले आहे. नायिकेच्या जवळ वा चित्रात एखादे पाळीव मांजर वा कुत्रे असणे हे दख्खनी कलेची प्राथमिक ओळख वा खास वैशिष्ट्य म्हणता येइल असे साफ्रानी या संशोधकाचे म्हणणे आहे. (Safrani 1992:60). या चित्रांत योगिनींची पण चित्रे दिसतात. याशिवाय या चित्रांतून महालातील दृश्यांत, महालातील वैभव खूप तपशीलात दाखविले जात असे. ज़नानखान्यातील बेगम व तिच्या बरोबरीने दासी अथवा सख्यांचे चित्रण हेही हैद्राबादी चित्रकलेचे वैशिष्ट्य समजले जाते. याशिवाय हैदराबादच्या चित्रकामात राग-रागीणींची अतिशय उत्कृष्ट दर्जाची चित्रे तयार झाली.

हैद्राबाद आणि गोवळकोंडाच्या चित्रकलेवर मुघलशैलीचा दाट प्रभाव दिसून येतो. या चित्रांतील आकृती या काहीशा उंच वाटल्या तरी प्रमाणबद्ध दिसतात. रंगसंगती चमकदार व आकर्षक आहे. चित्रातील आकृती एखाद्या सुंदर निसर्ग दृश्याच्या पार्श्वभूमीवर चित्रित केलेल्या पण दिसतात. चित्रातील निसर्गात नानाप्रकारची झाडे, त्यात पिकलेल्या आंब्यांनी लगडलेले आम्रवृक्ष, नारळीची, चाफ्याची झाडे, त्यांवर खार, पोपट, मोर आदी पक्ष्यांची हजेरी दाखविलेली असते. (Ashraf 1963: 42)

महाराष्ट्रातही चित्रकलेची समृद्धी होती, हे उपलब्ध पुराव्यांवरून सिद्ध होते. अजिंठ्याच्या चित्रांनंतर १६व्या -१७व्या शतकापर्यंत मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली चित्रे उपलब्ध होत नाहीत, पण तत्कालीन मराठी साहित्यांतून आलेल्या चित्रकलेच्या उल्लेखांवरून त्यांच्या अस्तित्वाचा पुरावा मिळतो. १८व्या शतकांत महाराष्ट्रात मराठा काळात चित्रकलेचे वेगळे नमुने मिळतात. या काळातील चित्रांकनात खास मराठी म्हणता येईल अशी चित्रशैली निर्माण झाली. (माटे, चव्हाण २००२:१९४). ज्यामध्ये स्त्री-पुरुषांची चेहेरेपट्टी, शरीरयष्टी व त्यांची वस्त्रे - नऊवारी साडी, धोतर व पगडी अशीमराठी खास पद्धतीची आहेत, तर पृष्ठभूमीतील इमारती, वाडे यांचेही चित्रण तत्कालीन मराठी वास्तूकला

प्रतिबिंबीत करतात (रानडे १९८५:३९३). या काळात मराठ्यांनी उत्तरेत व दक्षिणेत राज्यविस्तार केल्याने या सर्व ठिकाणांवरील कला व सांस्कृतिक प्रवाहांचा प्रभाव महाराष्ट्रात दिसू लागला. दख्खनमधील मुसलमानी राज्यांच्या समाप्ती नंतर तेथील कलाकार सर्वत्र विखुरले गेले व त्यांनी दख्खन मधील लहानमोठी संस्थाने व हैद्राबादच्या दरबारी आश्रय मिळविला. तसेच या सर्व ठिकाणांचा मराठा दरबाराशी संबंध येत गेल्याने तेथील कलाप्रवाह येथे येत गेले. (माटे, चव्हाण २००२:१९६).

महाराष्ट्राच्या चित्रांवर माळवा अर्थात मध्य भारतातील कलेचा ही प्रभाव दिसतो. माळवा चित्रकला ही सध्याच्या मध्यप्रदेशातील माळवा प्रांतातील चित्रशैली असून १४ व्या शतकापासून ते १९व्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत माळवा कलेच्या समृद्धीचा काळ समजला जातो. या कलेवर सुरवातीच्या इस्लामी राजवटीत इराणी प्रभाव जास्त जाणवतो. इराणी, म्हणजेच पर्शियन व स्थानिक पश्चिम भारतीय चित्रकलेच्या तत्वांचा व परंपरांचा संगम होऊन माळवा शैली विकसित झाल्याचे संशोधक मानतात. यात मांडू चित्रशैलीचे महत्त्वाचे स्थान आहे. माळवा चित्रांतून सुरुवातीच्या काळात निळ्या व सोनेरी रंगाचा वापर जास्त असल्याचे दिसते तर नंतरच्या काळात लाल, पिवळा, हिरवा या रंगांच्या प्राथमिक छटांचा वापर झाल्याचे दिसते. ठसठसशीत रेखीव पोशाख, सपाट व तीव्र भडक रंगांतील पार्श्वभूमी, गुंडाळी केल्यासारखे ढग व सरळ उभ्या बुंध्याची झाडे ही माळव्यातील मांडू शैलीची, म्हणजेच माडवा शैलीची वैशिष्ट्ये होत. (खाडे २०१४:७९). या चित्रांतील स्त्री आकृती काहीशा उंच, सडपातळ आणि नाजूक बांध्याच्या असून त्यांनी रेघा रेघांचा घेरदार लेहंगा, तोकडी चोळी आणि नक्षीकाम असलेली पारदर्शक ओढणी, अशा वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषेमुळे माळवा चित्रातील स्त्री सहजपणे ओळखू येते. १८व्या शतकात मराठा आमदानीत इंदौर, महेश्वर, उज्जैन, धार, देवास आणि नंतर ग्वाल्हेर येथे अनेक मराठा सरदार होते. त्यांच्या आश्रयाने व आवडी निवडींनुसारच्या विषयांवर येथे विपुल चित्र निर्मिती झाली. त्यांत लघुचित्रे, सचित्र हस्तलिखिते यांची निर्मिती झाली.(Chavan 1998-1999:189). चौरपंचशिका, रसिकप्रिया, संस्कृत प्रेमकाव्यांवर आधारित, तसेच मुख्य म्हणजे रागमालांवर आधारित लघुचित्रे मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. (खाडे

२०१४:७९). येथील कलेवर आजूबाजूच्या इतर प्रचलित शैलींचा, म्हणजेच मेवाड, ओरछा, दतिया येथील चित्र परंपरेची काही वैशिष्ट्ये दिसतात. तसेच मराठा काळात युरोपियन शैलीचाही प्रभाव दिसून येतो. अशाप्रकारे अनेक प्रभावांचा संगम होऊन माळव्यातील मराठाकालीन चित्र शैली तयार झाली. या शैलीला मराठा शैली असे स्पष्ट म्हणता येत नसले, तरी या चित्रकामातून चित्रित झालेले काही विषय वेशभूषा व इतर सांस्कृतिक तपशील हे मराठा परंपरेतील दिसून येतात. (माटे, चव्हाण २००२: १४१,१४२) आणि या सर्व प्रभावातून स्वतंत्र मराठी शैली विकसित झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात १८व्या शतकापासुन ऐतद्देशीय चित्रकारांनी चितारलेली अनेक ऐतिहासिक व्यक्तींची चित्रे आज उपलब्ध आहेत. शहाजी राजे, शिवछत्रपती, संभाजीराजे, शाहू महाराज नंतर प्रतापसिंह महाराज यांची चित्रे, तसेच पहिल्या बाजीराव पेशव्यांपासून ते शेवटच्या पेशव्यांपर्यंत सर्वांची दुर्मीळ म्हणावी अशी चित्रे उपलब्ध आहेत. याशिवाय मराठे शाहीतील अनेक मातब्बर सरदार, उदा. नाना फडणीस, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, पिलाजीराव जाधव, सरदार बापू गोखले इत्यादींची चित्रे देखील पहावयास मिळतात. या चित्रांतील शहाजीराजे, शिवाजी महाराज व संभाजीराजांच्या चित्रांवर दख्खनी कलमाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो, तर नंतरच्या काळातील काही चित्रांवर मात्र मुघल व राजस्थानी कलमांचा प्रभाव दिसून येतो. (गोडसे १९८१: २३२). याबरोबरीने दरबारी चित्रे, मिरवणूक, शिकार दृश्ये अशा ही विषयांवर अनेक चित्रे काढली गेली. शेवटचा पेशवा सवाई माधवराव याने मात्र पाश्चात्य चित्रण पद्धतीला प्रोत्साहान दिल्याने त्याच्या काळात स्वत: पेशव्यांची व नाना फडणीस, महादजी शिंदे यांनी स्वत:ची व्यक्तिचित्रे जेम्स वेल्स या पश्चात्य चित्रकाराकडून काढून घेतली त्यातील काही चित्रे आज उपलब्ध आहेत. (Kulkarni 2019)

राजस्थानी, पहाडी प्रदेशांप्रमाणे महाराष्ट्रातही रागरागिणी, बारहमास, नायक नायिका, खास मराठा शैलीची एकमेव अशी ताल-चित्र मालिका, योग मार्गाची चित्रे शृंगाराची युगल चित्रे, समूह चित्रे,

झरोका चित्रे, प्रसंग चित्रे अशा अनेक विषयांवर चित्रांची निर्मिती झाली. रागमालेवर आधारित खास मराठा शैलीतील 'नाशिक रागमाला' चित्रे खूपच उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. (रानडे १९८५:३९८). यां सर्वांमधून मराठ्यांच्या चित्रकलेचे प्रत्यंतर तर येतेच पण त्यांनी लघुचित्रांच्या तंत्र व नानाविध विषयांची जाण होती, हेही स्पष्ट होते. या काळात राघो, तानाजी, अनुपराव, शिवराम चितारी, माणकोजी (रानडे १९८५:३९०), बंडोबा चितारी, दामू चितारी, गंगाराम तांबट, मल्हार माळी (श्री भवानी चित्र संग्रहालय, औंध- सातारा), असे अनेक कुशल चित्रकारांच्या नावांचे उल्लेख आपल्याला मिळतात.

मराठ्यांनीही आपल्याला हवी तशी चित्रे काढून घेऊन आपले चित्रसंग्रह समृद्ध केल्याचे दिसते. दिवाणखान्यात लावण्यासाठी वा केवळ सुशोभन, संग्रहासाठी 'तसबिरीं' चा संग्रह जवळ बाळगणे हे फक्त वैभवाचे, प्रतिष्ठेचेच लक्षण नसे, तर ती एक उच्च अभिरुचीची ही निशाणी होती असे म्हणता येते. पेशवाईत थोरले माधवराव पेशवे, नाना फडणीस व राघोबादादा यांना असे चित्रसंग्रह, म्हणजे 'मुरक्के' जमविण्याचा छंद होता, हे उपलब्ध कागदपत्रांवरून स्पष्ट होते. पेशवाईत तसबिरींच्या संग्रहांना 'दफ्तनी' हा फ़ारसी शब्दही वापरत असत. (गोडसे १९८१: २३३–२३६). नाना फडणीसांनी उत्तरेहून अनेक चित्रांचे मुरक्के मागविले. तसेच गंगेच्या घाटाची अप्रतीम व कौशल्यपूर्ण छिद्रचित्रेही त्यांनी करवून घेतली. या छिद्रचित्रांचे खास वैशिष्ट्य असे होते, की चित्रातील इमारतींच्या, तसेच झाडांच्या व इतर भागांच्या बाह्यरेषांवर सर्वत्र ओळीने सुईच्या आकारा इतकी छोटी छिद्रे करून त्यामागे पणती लावली असता, ही चित्रे उजळून निघत आणि इमारतींच्या छज्जा, छतावर ओळीने अनंत दिवे लावल्याचा भास निर्माण होई. अशी ही चित्रे होती चित्रांचा हा प्रकार नक्कीच नवा आणि कल्पक होता.

या काळात अनेक सचित्र पोथ्या, देवी-देवता-अवतार चित्रे, जसे दशावतार, कृष्णावतार, भागवतावरील चित्रे, फुगडीचा खेळ, चक्री खेळणाऱ्या स्त्रिया, रामपंचायतन, शिव पंचायतन, अशा

अनेक विषयांवर चित्रे निर्माण झाली याच दरम्यान चीन मधून गुजरात मध्ये आलेला काचचित्रांचा प्रकार भारतातील इतर प्रदेशांप्रमाणे महाराष्ट्रातही लोकप्रिय झाला. देवघरांच्या अनेक खणी महिरपींमध्ये तसेच महाल व दिवाणखाण्याच्या सजावटीसाठी असे पौराणिक प्रसंग दाखविणारी काचचित्रे बसविली जात असत. (गोडबोले २०१६:४०,४२). (पाहा आ.क्र.१). मराठा काळातील बरेचसे चित्रकाम हे पेशवाईतील आहे.

उत्तर मराठेशाही काही राजस्थानी चित्रकारांना देखील पाचारण करण्यात येत होत असे दिसते. या चित्रकारांत भोजराज या चित्रकाराचे नाव अनेक पत्रव्यवहारांमधून दिसून येते. तसेच या बरोबर स्थानिक चित्रकार देखील होतेच. लवकरच नंतरच्या काळात स्थानिक चित्रकारांची स्वतंत्र शैली तयार झाल्याचे दिसते. महाराष्ट्रात इतर कलाप्रवाहांच्या मिश्रणाने तयार झालेली ही एक स्वतंत्र अशी मराठा शैली म्हणता येते. जोरकस रेखांकन, चमकदार रंगसंगती, काहीशा ठेंगण्या आकृती, विशिष्ट पद्धतीची चेहेरेपट्टी- उतरते कपाळ, टोकदार नाक, मोठे डोळे, किंचित पुढे आलेले ओठ अशी खास मराठी पद्धतीचे म्हणता येईल असे चित्रण या चित्रकारांनी केले होते. (Mate 1981:71). काळ्या रंगातील जोरकस रेषा, आणि लाल, पिवळा, निळा, हिरवा, पांढरा, काळा तसेच शेवाळी अशा रंगांचा वापर चित्रांमध्ये केलेला आहे (रानडे १९८५:३९८). यांत स्त्री-पुरुषांची वेशभूषा अस्सल मराठी पद्धतीची आहे. नऊवारी साडी, केसांचा खोपा, नाकात ठसठशीत मोत्यांची नथ, गळ्यात मोत्यांच्या माळा, कानात बुगडी, कपाळावर कुंकवाची आडवी चिरी, डोक्यावरून घेतलेला पदर, असे चित्रण स्त्रियांचे आहे, तर तालेवार, राजबिंडे जाडसर पुरुष, त्यांच्या अंगात बाराबंदी सारखे अंगरखे, लाल काठ असलेले धोतर, पुणेरी पगडी अथवा पागोटे असा त्यांचा पेहेराव आहे. पार्श्वभूमीत मराठा वास्तुशिल्पाच्या इमारती दाखविल्या आहेत. त्यात फुलांचे ताटवे, त्यामध्ये कारंजी यांचे चित्रण केलेले असे. केळी, सुरू व ताडामाडची झाडे दाखविलेली आहेत. तसेच फुलांचे गुलदस्ते अशा अनेक गोष्टींचे चित्रण या चित्रांत दिसून येते. याच काळातील सरदार दरकारांचे वाडे, राजवाडे–महल, मंदिरे यांच्या भिंतींवर हिरमुंजी–लालसर विटकरी (आबाशाई) रंगावर पांढऱ्या, लाल, हिरव्या, निळ्या, केशरी व

पिवळ्या रंगात रेखाटलेली चित्रे, हे मराठा शैलीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. (Chavan 1998-1999: 194). काही चित्रांमधून स्त्रियांचा घागरा ओढणी अशा पेहेरावाचे देखील चित्रण दिसून येते, त्यावरून सुरुवातीच्या काळातील इथल्या चित्रांवर राजस्थानी व माळवा अथवा उत्तर हिंदुस्थानी कलेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. पेशवाईच्या शेवटच्या काळात इंग्रजांच्या संपर्कामुळे पाश्चात्य चित्र पद्धतीच्या प्रभावामुळे व्यक्तिचित्रांच्या रेखाटनात काही बदल झाल्याचे दिसून येते. पाश्चात्य चित्रकार जेम्स वेल्स या पाश्चात्य चित्रकाराच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक चित्रकारांना शिक्षण दिले गेले. यापैकी गंगाराम तांबट हा चित्रकार नावारूपाला आला. (रानडे १९८५:३९१). अशा प्रकारे महाराष्ट्रातही नंतरच्या मराठे शाहीत लघुचित्रे चितारली गेल्याचे दिसते. नंतर मात्र पेशवाईच्या उतरत्या काळानंतर मराठा चित्रकलेला मिळणारे प्रोत्साहन व आश्रय कमी होत गेला. त्याबरोबरच या आश्रयदात्यांकडे असलेल्या चित्रसंग्रहांतील चित्रे इतरत्र विखुरली गेली. (रानडे १९८५:३९७).

अशा प्रकारे मुघल ते नंतरच्या काळात भारतात सर्वच प्रांतांतून लोकप्रिय झालेली लघुचित्रकला अनेक अंगांनी बहरली. त्या त्या प्रदेशांनुसार, राजाश्रयांनुसार-त्यांच्या आवडी-निवडींनुसार विषयांवर आधारित लघुचित्रांची निर्मिती होत गेली. त्यांमध्ये त्या त्या ठिकाणच्या स्थानिक लोककलेचाही प्रभाव स्पष्टपणे दिसून येत असल्याने तिच्यात वैविध्यही उत्पन्न होत स्थानिक कला प्रवाहातून वेगळेपण निर्माण होत अनेक शैली तयार झाल्याचे दिसून येते. नंतर १९व्या शतकात मात्र पाश्चात्य चित्रतंत्राचा प्रभाव, छपाई कला व नंतर छायाचित्रणकला यांच्या वाढत्या प्रसारामुळे हळू हळू चित्रकलेची निर्मिती वेगळ्या कला प्रकारांत होत गेली आणि लघुचित्रकला हळू हळू लोप पावल असे म्हणता येइल. भारत इतिहास संशोधक मंडळात उपरोक्त वर्णन केलेल्या आणि अनेक शैलींची, विषयांची चित्रे आहेत, त्यांचा अभ्यास पुढील प्रकरणांतून येईलच.

## प्रकरण २

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

'भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे' येथे लघुचित्रांचा चित्रसंग्रह आहे. काही निवडक चित्रे सोडल्यास या संग्रहातील एकूण सर्वच चित्रांवर आजपर्यंत फारसे संशोधन झालेले नाही. मंडळाच्या त्रैमासिकांमधून मागील काही वर्षांपासून संग्रहातील काही चित्रे व त्यांवरील लेख प्रकाशित झालेले आहेत. याशिवाय 'भाइसं' मंडळाने त्यांच्या संग्रहातील काही निवडक चित्रांच्या संग्रहाचे अनेकवेळा चित्रप्रदर्शने भरविली असल्याने या संग्रहातील चित्रांची थोडीशी ओळख कला अभ्यासकांस आहे.

### भाइसं मंडळ मधील चित्रांवर झालेले पूर्वसंशोधन

इ.स.१९२१ साली मंडळाने 'नवम–संमेलन' प्रसंगी भरविलेले 'ऐतिहासिक–प्रदर्शन' यावर आधारित '*प्रदर्शन–परिचय*' हा लेख छापलेला होता. 'भाइसं' मंडळातील खास चित्राच्या चित्र प्रदर्शनावर आधारित हा बहुदा पहिला लेख असावा. त्यामध्ये मंडळातील अत्यंत दुर्मीळ रंगीत चित्रे, छायाचित्रे, काचेवरील तसबिरी (कांच चित्रे), कित्ते, पोथ्या व इतर वस्तूंचे प्रदर्शन भरविले होते. त्या संबंधीची माहिती व सूची प्रकाशित केली होती. त्यामध्ये प्रदर्शनात मांडलेल्या मंडळातील काही चित्रांचे वर्णन केलेले आहे. काहींचे नावांसहित वर्णन आहे, तर काहींना नाव वगैरे काहीच नाही किंवा त्यांना क्रमांक दिले गेले नाहीत अर्थातच सध्याचे चित्रक्रमांकाचे काम या नंतरच्या काळात झाले असावे. उपरोक्त संदर्भात उदाहरणादाखल पुढील प्रमाणे माहिती लिहिली गेली. उदाहरणार्थ चित्र क्र.३० या चित्राला 'राजा बिरबल' असे म्हणून अकबराचा मित्र असे म्हटले आहे. चित्र क्र.३४ या चित्रावरती 'एक बेगम हुक्का पिते' एवढेच लिहिलेले आहे. तर तिसऱ्या चित्र क्र.३५ या चित्रावरती 'एक बेगम मागे असलेल्या सुंदर झाडाचा आंबा तोडीत आहे' असे लिहिलेले आहे. तात्पर्याने संबंधित चित्रांची शीर्षकवजा ओळखीपुरती माहिती दिलेली आहे.

इ.स.१९३५ मध्ये मंडळाने *'Album of Bharat Itihas Sanshodhak Mandal' (Presented to Scholars on the Occasion of the First All India Morden History Congress, 1935)*. हा Album प्रकाशित केला होता. (परचुरे,कानडे १९८१:३००). त्यामध्ये मंडळ संग्रहातील काही निवडक ११ चित्रे छापलेली आहेत. त्यात हरीबाबा, त्यांचा शिष्य तानसेन व अकबर, थोरले बाजीराव पेशवे, पिलाजीराव जाधव– पहिल्या बाजीरावांचे एक सरदार, पहिले बाजीराव पेशवे व मल्हारराव होळकर, भाऊसाहेब पेशवे, थोरले माधवराव पेशवे, सवाई माधवराव पेशवे, हरिपंत फडके व महादजी शिंदे (कच्चे रेखाटन) इत्यादी व्यक्तिचित्रे आहेत.

त्यानंतर जून १९३६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'भाइसं' मंडळ त्रैमासिक वर्ष१७: अंक१ यातील '*मंडळातील जुनी चित्रे*' या लेखामध्ये ग.ह.खरे यांनी मंडळातील चित्रांचे विषयांनुसार वर्णन केलेले आहे. त्यांत व्यक्तिचित्रांची यादी दिलेली आहे व जवळ जवळ ६४ ऐतिहासिक व्यक्तींची नावे त्यात दिलेली आहेत. तसेच यात ग.ह.खरेंनी चित्र विषयांचे प्राथमिक वर्गीकरण करून त्यांमध्ये किती चित्रे असावीत याचा अंदाज दिलेला आहे. या लेखात त्यांनी चित्रांच्या क्रमांकांचा संदर्भ दिलेला नाही. पुढील काळात नंतर ग.ह.खरेंनी या सर्व चित्रांना क्रमांक देऊन त्या सर्व चित्रांची स्वतंत्र सूची केलेली आहे. व त्यापुढे त्या चित्राचे थोडक्यात एकेका ओळीत वर्णन लिहिलेले आहे. नंतर प्रा.म.श्री.माटे यांनी त्यात आवश्यक ते बदल केलेले दिसतात. (पाहा आ.क्र.२)

इ.स. १९४८ मध्ये मंडळाने त्रैमासिक वर्ष२९:अंक३–४, भारतीय इतिहास परिषद, दिल्ली, अकरावे अधिवेशन –खास अंक; यामध्ये *'(The) Signed Paintings from the Bharata Itihasa Sanshodhaka Mandala Poona- Khare G.H.'* हा लेख प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये मंडळातील १२ चित्रांवर; ती चित्रे काढणाऱ्या चित्रकारांची नावे असून त्याबद्दलची माहिती देणारा हा लेख आहे. यामध्ये मुहम्मद फदील, मिहर अली, मिस्किन, हैदर अकबरी, चितरमन अथवा खानहझाद चितरमन, मिर्झा कादिर हिरवी, होनहार, शिवराम, सय्यीद गुलाम हसनखान, मिर्झा अकबर अली शीराझी, अशी **१०** चित्रकारांची नावे लिहिलेली आहेत. यातील मिस्किन, होनहार व चितरमन हे चित्रकार सर्वश्रृत आहेत; ते सोडले तर बाकीचे चित्रकार फारसे प्रसिध्द नाहीत. (Khare 1948:52)

**भाइसं मंडळाने आपल्या चित्र संग्रहातील काही निवडक चित्रांवर पुस्तके प्रकाशित केली आहेत, ती पुढील प्रमाणे–**

इ.स. १९५१ साली मंडळाने '*इतिहासकर्ते मराठे* ' (Makers of Maratha History) हे ग.ह.खरे यांनी लिहिलेले छोटे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यामध्ये मराठा इतिहासातील १० कर्तबगार पुरुषांची चित्रे व माहिती छापलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू, सरदार पिलाजी जाधव, बाजीराव बल्लाळ पेशवे, बाळाजी बाजीराव पेशवे, सरदार जयाप्पा शिंदे, माधवराव बल्लाळ पेशवे, छत्रपती प्रतापसिंह, बाजीराव रघुनाथ पेशवे, सरदार बापू गोखले इ. ऐतिहासिक व्यक्तींची चित्रे या पुस्तकात छापलेली आहेत. यातील छत्रपती शिवाजी महाराज व सरदार जयाप्पा शिंदे यांची चित्रे वगळता बाकीची सर्व चित्रे मंडळ संग्रहात आहेत.

इ.स. १९७६ साली, '*ताल–चित्रे* ' या शीर्षकाचे डॉ. कमल चव्हाण आणि डॉ. उषा रानडे यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. संगीतातील राग–रागिण्या यांच्यावर आधारित अनेक चित्रे आपणास पहावयास मिळतात परंतु ताल या विषयावर मंडळात असलेला हस्तलिखित चित्रसंगह एकमेव आहे. नृत्यासाठी**;** विशेषत: मृदंगाच्या बोलांवर आधारित मजकूर चित्राच्या वरच्या अर्ध्या भागात आहे तर खालच्या भागात तालध्यान म्हणता येतील अशी चित्रे आहेत. ही चित्रे मराठा शैलीतील आहेत. उत्तर पेशवाईत समृद्धीच्या शिखरावर पोचलेल्या मराठा शैलीने नटलेला हा सचित्र संग्रह मराठी कलेचे उत्तम उदाहरण आहे. (रानडे १९८५:३९९)

इ.स.१९७९ मध्ये '*Paintings from The Bhagvata Purana*' हे प्रा. म. श्री. माटे आणि डॉ.उषा रानडे यांनी लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. मंडळाकडे भागवत पुराणाची पूर्ण पोथी नसली तरी त्या पोथीतील एकूण २१ चित्रे आहेत. (त्रैमासिक ६७(१–४):६६). यानंतर पुढील काळात १९८१ मध्ये '*हस्तिदंती गंजिफा*' हे ग. ह. खरे यांचे छोटेखानी पुस्तक प्रकाशित झाले आहे तर १९८३ मध्ये '*बारामास चित्रे*' हे डॉ. कमल चव्हाण यांनी लिहिलेले पुस्तक प्रकाशित झालेले असून त्यात मंडळ संग्रहातील निरनिराळ्या शैलीची, महिन्यांवर (मास) आधारलेली अर्थात

**'**बारामास**'** चित्रे आहेत. त्यांच्या शैलीचे रसग्रहण व या चित्रप्रकाराच्या उगमाची चर्चा या बारामास चित्रे या ग्रंथात कमल चव्हाण यांनी केलेली आहे. याशिवाय १९२० च्या सुमारास मंडळाच्या संग्रहात आलेले एक महत्त्वाचे फारसी हस्तलिखित, म्हणजे **'***Tarif-i-Husain Shahi Badshahi Dakhan***'** हे अहमदनगरचा सुलतान हुसेन निजामशाह याच्या जीवनावर आधारित अफताबी याने लिहिलेले दीर्घ काव्य आहे. या काव्याची एकच प्रत उपलब्ध आहे. यांमध्ये १२ लघुचित्रे असून ती दख्खनी चित्रकलेच्या प्रारंभीची मानली जात असल्याने ती कलेच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाची आहेत. या हस्तलिखितावर आधारित *'Tarif-i-Husain Shah Badshahi Dakan'* हे डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी व प्रा. म. श्री. माटे. यांनी लिहिलले पुस्तक १९८८ मध्ये प्रकाशित झाले आहे**.**

यानंतर १९९७ मध्ये डॉ. समिता गुप्ता यांनी 'भाइसं' मंडळ संग्रहातील वेगळ्या अशा काच चित्रांवर आधरित– *'Glass Paintings- An Ephemeral Art in India'* हा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. अशा प्रकारे 'भाइसं' मंडळ संग्रहातील काही निवडक चित्रांवर काम झालेले आहे.

या व्यतिरिक्त मंडळाच्या उर्वरित संग्रहात इतर चित्रे, तसेच पाश्चात्य प्रभावाची चित्रे व पाश्चात्य छपाई पद्धतीची चित्रे मंडळात उपलब्ध आहेत. यासाठी या संग्रहातील सर्व चित्रांचे वेगवेगळ्या विभागांत वर्गीकरण करून त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न संबंधीत अभ्यासात केला आहे. याबद्दल सविस्तर माहिती प्रकरण ३रे– संशोधन पद्धती यमध्ये दिलेली आहे.

## प्रकरण ३

# संशोधनाची कार्यपध्दती

## 'भाइसं' मंडळ चित्रसंग्रह : पूर्व संशोधन

भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील ही चित्रे संख्येने जवळपास १३०० आहेत. त्यातून १२८७ एवढीच चित्रे अभ्यासासाठी उपलब्ध झाली. या सर्व चित्रांना ग.ह.खरेंनी व इतर तज्ञांनी जसजशी चित्रे संग्रहात येतील, तसतसे त्यांवर क्रमांक टाकून त्यानुसारच त्यांची सूची तयार केली आहे. या सूचीमध्ये त्या त्या चित्राचा क्रमांक, आकार व त्या चित्राचे एकेका ओळीत वर्णन दिलेले आहे. याबद्दल आपण प्रकरण २रे– सर्वेक्षण मध्ये सविस्तरपणे माहिती घेतलेली आहे. तसेच या संग्रहातील १३०० पैकी साधारण ६५ ते ७० इतक्याच चित्रांचा प्राथमिक अभ्यास झालेला असून त्यांतील काही चित्रांवर आधारित पुस्तके भाइसं मंडळाने प्रकाशित केलेली आहेत. उदा. ताल चित्रे (१० चित्रे), भागवत पुराणावरील मंडळातील चित्रे (२१ चित्रे), बारामास चित्रे (१५ चित्रे), इतिहासकर्ते मराठे (८ चित्रे) इत्यादि. तसेच काही त्रैमासिकांमधूनही ही चित्रे छापली गेलेली आहेत व त्यांतील काहींवर लेखही प्रकाशित झालेले आहेत. उदा. Album of Bharat Itihas Sanshodhak Mandal (७ चित्रे), Signed paintings from the Bharata Itihasa Sanshodhaka Mandala Poona (४ चित्रे), हे आपण मागील प्रकरणात सविस्तर पाहिले आहे. या व्यतिरिक्त उर्वरित चित्रांवर सविस्तरपणे संशोधन झालेले नाही.

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी प्रथम एक कार्यपद्धती निश्चित करण्यात आली, जेणे करून या सर्व चित्रांची ओळख, अभ्यास करणे सोयीचे जावे. ती पद्धती पुढील प्रमाणे–

## ३.१ प्राथमिक साधने

भाइसं मंडळ संग्रहातील असलेली ही सुमारे १३०० चित्रे ही, या संशोधनाची प्राथमिक साधने होत. तेव्हा सर्व प्रथम या सर्व चित्रांची समोरील बाजूंची व मागील बाजूंची छायाचित्रे घेऊन त्यांच्या मोजमापाची नोंद करण्यात आली.

## ३.२ वर्गीकरण व त्यासाठी वापरली गेलेली पद्धती

भाइसं मंडळ संग्रहातील चित्रे वेगवेगळ्या आकारमान व प्रकारांची असून वेगवेगळ्या विषयांवरील तसेच शैलींमधील आहेत. तेव्हा या सर्व चित्रांचे निरीक्षण करून, या सर्व चित्रांचे त्यांच्या प्रकारांनुसार, विषयांनुसार प्राथमिक शैलींनुसार वर्गीकरण केले. ते पुढीलप्रमाणे–

१) चित्रांचे प्रकार:– मंडळ संग्रहात एकूण ११ प्रकारची वेगवेगळी दुर्मीळ चित्रे आहेत. उदा.– पटचित्रे, जन्मपत्रिकांवरील चित्रे, पोथिचित्रे, लघुचित्रे, काचचित्रे, चामड्यावरील चित्रे, भरतकामाच्या धाग्याने केलेली लघुचित्रे आहेत. तसेच इतर चित्रांमध्ये छपाई चित्रे (prints), शिळाछपाई चित्रे (lithographs), व अत्यंत वेगळी अशी छिद्रचित्रे व लाकडाच्या फळीवर चितारलेली अशी चित्रे देखील आहेत. प्रकरण ४ मधील ४.१) या उपप्रकरणात या सर्व चित्रांची सविस्तर माहिती व वर्णन दिलेले आहे.

मंडळातील चित्रसंग्रहातून साधारणत: वरील ११ प्रकारची चित्रे दिसून येतात. या चित्रप्रकारांमधून लघुचित्रांचा संग्रह हा विषय संशोधनासाठी निवडलेला असल्याने पुढील सर्व संशोधन 'भाइसं मंडळ संग्रहातील लघुचित्रे' यावरच प्रामुख्याने आधारित आहे.

२) मंडळ संग्रहातील लघुचित्रांचे विषय वर्गीकरण:– सर्वसाधारणपणे एखाद्या चित्राचे प्रथम अवलोकन केले असता, त्यांतून त्या चित्राचा विषय (वर्ण्यविषय) स्पष्ट होतो. म्हणजे सदर चित्र हे व्यक्तिचित्र आहे का इतर विषयचित्र आहे. किंवा शिकारदृष्य, रागमालेवर आधारित चित्र आहे, की युरोपियन प्रभावाचे चित्र आहे, हे ठरवून त्यांनुसार त्या त्या सर्व चित्रांचे त्यांच्या त्यांच्या विषयांनुसार साधारण १६ उपप्रकरणांत वर्गीकरण केले आहे. उदाहरणार्थ –

व्यक्तिचित्रे, रागमाला चित्रे, प्रसंग चित्रे, जैन तीर्थंकारांची चित्रे, युरोपियन प्रभावाची चित्रे, छापीलचित्रे, झरोका चित्रे इत्यादी प्रकरण ४.२.अ) या मध्ये या सर्व चित्रांचे तपशीलवार वर्गीकरण करून त्यांची यादी दिलेली आहे. जसे की, व्यक्तिचित्रांमध्ये कुठल्या क्रमांकांची, कोणती चित्रे आहेत, प्रसंग चित्रे, रागमालाचित्रे, छापीलचित्रे वगैरे आदींमध्ये जी चित्रे आहेत, त्यांचे क्रमांक देण्यात आलेले आहेत. येथे या सर्व चित्रांचे दोन संचांत वर्गीकरण करण्यात आलेले आहे. संच क्र. १ मध्ये ग. ह. खरे व इतर संशोधकांनी ओळखलेल्या चित्रांचे क्रमांक व मंडळ सूचीतील त्यांनी केलेले वर्णन दिलेले आहे. तर संच क्र. २ मध्ये प्रबंधाच्या अभ्यासांती नव्याने ओळखलेल्या चित्रांचे क्रमांक, त्यांची शीर्षके वा वर्णन देण्यात आलेली आहेत.

**३)** मंडळ संग्रहातील लघुचित्रांचे त्यांच्या प्राथमिक शैलींनुसार वर्गीकरण :– यात संग्रहातील उपलब्ध सर्व चित्रांचे वर्गीकरण केले आहे. उदा.– तुर्को-पर्शियन, मुघल, राजपूत, दख्खनी, त्यातील मराठा चित्रे व इतर चित्रांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. प्रकरण ४.२.ब) मध्ये या चित्रांचे वर्गीकरण व चित्रांची यादी दिलेली आहे. यातही वरील प्रमाणेच संच क्र. १ व संच क्र. २ करण्यात आलेले आहेत.

४) संबंधित चित्रांचे त्यांच्या तंत्र पद्धतीनुसार देखील दोन भाग केलेले आहेत –

१) 'स्याह कलम' आणि 'नीम कलम चित्रे'

२) छपाई चित्रे इत्यादि.

यांतील बरीचशी चित्रे ही वेगवेगळ्या विभागांमध्ये घेतलेली आहेत. उदा. ऐतिहासिक व्यक्तिरेखां मधील काही चित्रे ही समूह चित्रांत, प्रसंग चित्रांत आलेली आहेत, काही स्त्री–चित्रे ही व्यक्तिचित्रां बरोबरच झरोका, दैनंदिन जीवनावरील चित्रांत आलेली आहेत. तसेच काही

पाश्चात्य प्रभावाची चित्रे व्यक्तिचित्रांच्या बरोबरीने झरोका चित्रांतही आलेले आहेत. येथेही संच क्र. १ व संच क्र.२ आलेले आहेत.


### ३.३ चित्र क्रमांक व आकृती क्रमांक यांची पद्धती

प्रस्तुत प्रबंधामध्ये चित्रांच्या अभ्यासासाठी या सर्व चित्रांना चित्र क्र. १, चित्र क्र. २.... चित्र क्र.८००... असे क्रमांक दिले आहेत. अर्थात मूळ चित्रांना पूर्वी दिलेले क्रमांक न बदलता तसेच ठेवले आहेत. जेणे करून पुढील संशोधकांस चित्रे शोधणे व त्यांचा अभ्यास करणे सोपे होईल. नंतर इतर साहित्य– पुस्तके, अधिकृत संकेतस्थळे (websites) व इतर संग्रहांतील समान चित्रांचा येथे तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संदर्भ वापरण्यात आलेला आहे. तेव्हा या सर्व चित्रांना आ. क्र.१, आ. क्र.२.....आ. क्र.१०... असे क्रमांक देण्यात आले असून त्यांची सूची करण्यात आलेली आहे. या पद्धतीत चित्रांच्या तीन वेगवेगळ्या सूची तयार करण्यात आल्या– १) भाइसं मंडळ संग्रहातील चित्रे, २) संदर्भ चित्रे व ३) संकेतस्थळांवरील चित्रांची सूची. चित्राच्या संदर्भात आलेल्या काही शब्दांच्या अर्थांची यादी, संक्षेप यांची यादी देखील करण्यात आलेली आहे. तसेच चित्रांचे विश्लेषण करताना आजच्या काळात वापरले जाणारे काही शब्द, तसेच अर्थ अधिक स्पष्ट व्हावा म्हणून व्यवहारात वापरले जाणारे इंग्रजी शब्द वापरले आहेत.

### ३.४. विश्लेषण

मंडळ संग्रहातील या सर्व लघुचित्रांचा अभ्यास व विश्लेषण हे प्रामुख्याने येथील चित्र संग्रह या प्राथमिक साधनांवर अवलंबून आहे. परंतु या अभ्यासासाठी दुय्यम साधने देखील तितकीच महत्वाची आहेत. या साधनांचा आढावा प्रकरण ४.३ मध्ये घेण्यात आला आहे. यासाठी उपलब्ध सर्व दुय्यम साधनांच्या सहाय्याने या चित्रांचा, म्हणजेच प्राथमिक प्रमुख साधन- चित्रसंग्रह, यांचा अभ्यास व विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. तो सोबतच्या तक्त्यात दाखविलेला आहे.

विश्लेषणासाठी वापरण्यात आलेली पद्धती पुढील तक्यातून स्पष्ट होते –




**मोडी व फारसी लेख व त्यांचे वाचन**

मंडळ संग्रहातील काही चित्रांच्या मागे लेख आहेत. यातील काही लेख मोडी लिपीत लिहिलेले असून काही फ़ारसीत देखील आहेत. त्यांचाही अभ्यास करण्यात आला. मोडी लेखांचे वाचन करण्यासाठी मोडी लिपीचा व फ़ारसीसाठी फ़ारसी भाषेचा प्राथमिक अभ्यास संशोधिकेने केला आहे.

तसेच पुढील फ़ारसी लेखांच्या फ़ारसी क्षेत्रातील वेगवेगळ्या तज्ञांची मदत घेण्यात आली. त्याच वेळेला या लेखनाचा एकमेकांशी संगत लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**फारसी माहितीचे संकलन व वाचन –** भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील बऱ्याचश्या चित्रांच्या मागे अथवा चित्रांच्या वरील वा खालील बाजूस फारसी मधून नावे व काही लिखाण केलेले आहे. तसेच काही चित्रांच्या मागे फारसी कित्ता आहे. तेव्हा या सर्व चित्रांच्या बाबतीत वा त्या त्या शीर्षक, नावे, काव्ये इत्यादींची अधिक माहिती मिळावी, या दृष्टीने या लिखाणांचा अभ्यास केला गेला. या चित्रांवर केलेल्या संबंधित लिखाणांचे प्रामुख्याने २ भाग पडतात.

१) एक म्हणजे चित्राच्या वरील आडव्या भागात किंवा खालच्या भागात, तसेच चित्राच्या मागे त्या त्या व्यक्तीचे नाव किंवा थोड्क्यात त्याचे वर्णन केलेले दिसते. हे लिखाण म्हणजे एक प्रकारे शीर्षक अथवा व्यक्तिनाम या प्रकारात मोडते.

२) चित्रांच्या मागे लिहिलेला फारसी कित्ता :– त्यात एक तर त्या काळातील एखादी प्रसिद्ध कविता, गजल लिहिलेली आहे किंवा बादशहाचे एखादे गौरवपर वर्णन लिहिलेले आहे. या प्रकारचे लिखाण हे काव्य प्रकारात मोडते. फारसी तज्ञांच्या मदतीने या दोन्ही प्रकारांचे लिखाण वाचण्याचा प्रयत्न केला आहे.

**मोडी माहितीचे वाचन :–** मोडी लेखांच्या वाचनातून काही चित्रे कोणाची आहेत हे समजले. तसेच ही सर्व चित्रे कोणी कोणी जमा केली, याबद्दलची महत्त्वाची माहिती देखील मिळते. यातील काही चित्रांच्या मागे आधारासाठी मोडीत लिहिलेले हिशेबाचे कागद एकावर एक थर देऊन चिटकवलेले आहेत. शिवाय एका चित्राच्या मागे ते चित्र किती पैशाला घेतले, हे ही लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र. ३९६, ९० व १०७६)

याशिवाय मंडळाने प्रकाशित केलेल्या 'ऐतिहासिक–प्रदर्शन' या अंकातील 'प्रदर्शन–परिचय' या लेखात १९२१ साली भरविलेल्या ऐतिहासिक प्रदर्शनात मांडलेल्या मंडळातील अनेक चित्रांचे वर्णन

केलेले आहे. हे प्र.२ मध्ये नमूद केलेले आहे. या अंकातील त्या त्या वर्णानांनुसार मंडळ संग्रहातील चित्रे शोधून त्यांची खातरजमा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून काही चित्रे व त्यांचे विषय नव्याने ओळखता आले.

**ग.ह.खरे सूची :**

मंडळ संग्रहात जसजशी चित्रे येत गेली, तशी ग.ह.खरेंनी त्यानुसार त्यांची सूची तयार केलेली होती. ही सूची म्हणजे हाताने लिहिलेले एक रजिस्टर आहे. ती छापील नाही वा ती कोठेही प्रसिद्ध झालेली नाही. ही सूची जरी प्रकाशित झालेली नसली, तरी ह्या सूचीवरूनच मंडळातील चित्रे ओळखली जातात. ही सूची म्हणजे पूर्वसूरींनी करून ठेवलेला त्यावेळचा एक महत्त्वाचा दस्तऐवज होय. त्यामुळे एक अत्यंत महत्त्वाचे अभ्यासाचे साधन म्हणून ही सूची प्रस्तुत प्रबंधात घेण्यात आलेली आहे.

इतर उपलब्ध साहित्यांतून– चित्रकला विषयावरील पुस्तके, मार्ग या नियतकालिकाचे अंक, इतर संग्रहालयांतील चित्रे इत्यादीतून मंडळातील चित्रांशी जुळणाऱ्या चित्रांमुळे या चित्रांतील व्यक्तिरेखा, शैली वा साधारण कालखंड ओळखण्यास मदत झाली.

या व्यतिरिक्त प्रस्तुत प्रबंधासाठी इतर उपलब्ध साहित्यांचा ही उपयोग करण्यात आला. जसे अनेक प्रसिद्ध झालेले शोध निबंध, चित्रकलेवर आधारित पुस्तके, नियतकालिके, त्यातील लेख व चित्रे इत्यादी.

उदा.– 'पेशवे कालीन महाराष्ट्र' – वा.कृ.भावे (१९७६), 'मराठी चित्रकला' – उषा रानडे – मराठ्यांचा इतिहास, खंड २ रा- 'ग.ह.खरे व अ.रा. कुलकर्णी' (संपा.), 'समन्दे तलाश' - द.ग.गोडसे (१९८१), 'भारतीय संस्कृती कोश', खंड ९- महादेवशास्त्री जोशी, 'भारतीय मूर्तिशास्त्र' – नी. पु. जोशी (१९७९), 'मराठी विश्वकोश', खंड ७–'रंगनाथशास्त्री जोशी', 'मध्ययुगीन कालखंड', खंड २– भ.ग.कुंटे (२०१४), 'पेशव्यांचे विलासी जीवन'– वर्षा शिरगांवकर (२००१),

'भारतीय लघुचित्रकला'– डॉ.अलका खाडे (२०१४), 'रागमाला चित्रांतील संगीताविष्कार'– डॉ. स्नेहल अभ्यंकर (२००३), 'मूर्ती परिचय'– ग.ह.खरे (१९५१) आणि 'मध्ययुगीन कलाभारती'– म.श्री.माटे आणि कमल चव्हाण (२००२) या मराठी साहित्यांचा उपयोग करण्यात आला. यातील 'मध्ययुगीन कलाभारती' या पुस्तकात म.श्री.माटे यांनी भारतीय लघुचित्रकलेवर, त्यातूनही दख्खनी कलेवर विस्तृतपणे विवेचन केलेले असल्याने या पुस्तकाचा संदर्भ सदर अभ्यासात अनेक ठिकाणी घेण्यात आला आहे.

याशिवाय मार्क झेब्रोवस्की यांच्या दख्खनी चित्रांवरील Deccani Paintings या पुस्तकाचा ही येथे अभ्यास करण्यात आला. यांशिवाय 'Mughal and Deccani Paintings'-Daljeet Kaur (1999), 'Aspects of Mughal Painting'-S.P.Verma (2009), 'Arts of India'-K.Chaitanya (1987), 'The Yoginis of The Deccani Miniatures' – M.L.Nigam, Lalit Kala (1988), 'The Art of Chhatrapatis and Peshwas'- M.S.Mate, Marg (1981), 'Maratha Painting'- K. Chavan (1998) Bulletin of Deccan College, 'Some Unpublished Deccan Miniatures' - D.Barret –Lalit Kala (1960), 'Daccani Kalams'-Marg (1963), 'Splendour of Malwa Paintings'- M.D.Khare (1983), 'Persian Painting'-S.R.Canby (1993), 'Mughal and Rajput Painting'- M.C.Beach (1992), 'Painted Delight'- S.Kramrisch (1986), The Qutub Shahs of Golconda- Marg(1992), 'Maratha Wall Paintings'- B.K. Apte (1988) इत्यादी इंग्रजी साहित्यांचा ही अभ्यास करण्यात आला.

### अन्य संग्रहालये आणि त्यांचा चित्रसंग्रह

पुण्यातील तसेच पुण्याबाहेरील विविध ग्रंथालये व संग्रहालये यांना भेटी देण्यात आल्या. यामध्ये मुंबई येथील 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय', औंध– जि. सातारा येथील 'श्री भवानीचित्र संग्रहालय व ग्रंथालय', सातारा येथील 'श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय', तसेच दिल्ली येथील 'National Museum' व पुण्यातील 'राजा केळकर संग्रहालय', येथे संग्रहित

असलेल्या चित्र संग्रहांचा अभ्यास व तेथील आपल्या संग्रहातील चित्रांशी साधर्म्य असणाऱ्या चित्रांचे छायाचित्रण करणे आणि त्या संबंधीची माहिती गोळा करण्याचे काम करण्यात आले. यावरून प्रस्तुत संग्रहातील चित्रांची शैली, कालखंड तसेच उपलब्ध असल्यास चित्रकारांची नावे संकलित करण्यास मदत झाली.

डेक्कन कॉलेजचे ग्रंथालय, एस.एन.डी.टी. कॉलेजचे ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय व पुणे मराठी ग्रंथालय या सर्व ठिकाणांच्या संदर्भ पुस्तकांचा उपयोग करण्यात आला. तसेच इंटरनेटवरील काही अधिकृत संकेत स्थळांवरील (websites) माहितीचा व चित्रांचा ही अभ्यास करण्यात आला. संकेत स्थळांचा, Google चा वापर करण्यामागचा हेतू हा होता, की google वर अनेक संग्रहालये online आहेत. त्यामुळे या विविध संकेतस्थळांवरून अनेक अधिकृत आणि खाजगी संग्रहालयांतील चित्रे आपणास पाहावयास मिळतात. त्यातील अनेक चित्रे अशी आहेत, की जी या मंडळ संग्रहातील अनेक चित्रांशी खूप साम्य दर्शवितात. त्यामळे ही चित्रे संदर्भांसाठी येथे घेणे क्रमप्राप्त होते. गूगल हे एक चांगले माध्यम आहे, ज्यामुळे आपल्याला या संग्रहालयांतील चित्रे थेट पाहावयास मिळतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'ब्रिटीश म्युझियम', 'ब्रिटीश लायब्ररी'ची चित्रे online आहेत. तसेच इतर व खाजगी ही संग्रहालयांची पण चित्रे आपण online पाहू शकतो. त्यांवर काही लेख (inscriptions) आपणास पाहावयास मिळतात– त्यांवरून आपल्याला या चित्रांचा अभ्यास करायला मिळतो, हा एक उद्देश होता.

### ३.५ चित्रविषय आणि चित्रांतील व्यक्तिरेखा यांचा अभ्यास

प्रकरण ४ मधील–४.३ या उपप्रकरणात मंडळ संग्रहातील या सर्व चित्रांचा विषय, चित्र व तंत्रपध्दती यांचे तपशीलवार विश्लेषण करण्यात आलेले आहे. या सर्व चित्रांची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. यातील काही चित्रांची, साधारण **११०** चित्रांची ओळख नव्यानेच पटलेली आहे. त्यांचे विश्लेषण करताना या चित्रांचा वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास केलेला आहे. उदा. या चित्रांसारखी हुबेहुब, समान चित्रे मिळतात का**?** असतील तर त्यावर काही लेख आहेत का? ते काय आहेत**?** ही

चित्रे ज्ञात आहेत की अज्ञात ? इत्यादी सारख्या गोष्टींचा विचार करण्यात आला. येथे ज्ञात ही संज्ञा ऐतिहासिक दृष्ट्या जी व्यक्तिरेखा सर्वश्रुत आहे; जिच्या संबंधीची माहिती, चित्रे सहसा उपलब्ध आहेत, अशा चित्रांसाठी वापरण्यात आलेली आहे. उदा. अकबर बादशहा. तर जी व्यक्तिचित्रे फारशी कोणाला माहिती नाहीत, त्यांवर काहीच संदर्भ वा लिखाण नाही, अशा चित्रांना अज्ञात चित्रे असे म्हटले गेले आहे. अशाप्रकारे ज्ञात व अज्ञात चित्रे यांचा अभ्यास करताना वेगवेगळ्या संग्रहांतून आणि वेगवेगळ्या साहित्यांतून अशा प्रकारची चित्रं जर दिसून येत असतील, तर त्यांची चेहरे पट्टी, बाकीचे तपशील, यांच्या विश्लेषणाची पद्धत येथे विकसित करण्याचा प्रयत्न केला. आणि त्यानुसार यातील काही चित्रांवरती लेख मिळाले. त्यावरून, तसेच इतर संग्रहांतून आणि साहित्यांतून इतर समान चित्रे, त्यांची आरेखने वगैरे इ. वरून आपल्या संग्रहातील चित्र व ते संदर्भ चित्र एकमेकांशी जुळत असेल तर त्यावरूनहे चित्र एकाच व्यक्तिचे असावे असा कयास बांधण्यात आला आहे.

याशिवाय चित्रातील पार्श्वभूमी, त्यातील निसर्गचित्रण, त्यांतील अवकाशाच्या चित्रणाची पद्धत, रंगलेपन, रंगसंगती, अशा अनेक गोष्टी, तसेच त्यांतील व्यक्तींची चेहरेपट्टी, नाक–डोळे, उंची यांची ठेवण, शरीरयष्टी, त्यांचा पेहेराव, पगडी अथवा देवतांचे मुकुट व इतर अनेक गोष्टींवरून चित्रांच्या अभ्यासास मदत होत असल्याने त्या त्या बाबींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. महाराष्ट्रातील मराठा चित्रांतून त्यांच्या वस्त्रप्रावरणांची वेगळी वैशिष्ट्ये दिसून येतात. म्हणजे स्त्रियांची नऊवारी साडी, त्यांचा शृंगार, कपाळावरील कुंकवाची आडवी चिरी, केसांचा खोपा, तर पुरुषांचे पेहेराव, पगडी व इतर मराठी वैशिष्ट्ये दिसून येतात. राजस्थानी स्त्रिया या घागरा ओढणीत, तर पहाडी चित्रांत गोकुळातील नंद इ. माणसे मुघल वेशात, दाढीधारी दिसून येतात. या सर्वांतून काही मराठी चित्रांत राजस्थानी पेहेराव डोकावताना देखील दिसतो. याचे कारण म्हणजे त्याकाळी जयपूरच्या कलाकारांना येथे पाचारण करुन त्यांच्या कडूनही काही चित्रे काढून घेतली गेली होती गेली होती असे काही संशोधकांचे म्हणणे आहे हे विशेष (रानडे १९८५:३९१).

विश्लेषणाच्या याच पद्धतीचा वापर करून संग्रहातील जी चित्रे ज्ञात व अज्ञात होती; ती ओळखण्याचा; म्हणजेच ज्ञात करण्याचा येथे प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्याच्यासाठी अनेक

लेख, अनेक चित्रे, या चित्रांचा आकार, प्रकार, व शैली व ती कुठल्या संग्रहात आहेत, या सगळ्यांचा अभ्यास येथे केला आहे. करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा व इतर अनेक निकषांचा इथे वापर करुन मंडळ संग्रहातील चित्रांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रकरण ४

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

## भाइसं मंडळ चित्रसंग्रह : प्रकार, वर्गीकरण, अभ्यास व विश्लेषण

या प्रकरणात भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील चित्रांचा आढावा घेण्यात आला आहे. तो खालील तीन भागांत विभागलेला आहे. हे विभाग खालील प्रमाणे आहेत-

१) ४.१. भाइसं मंडळ चित्र प्रकार; २) ४.२. भाइसं मंडळ चित्र वर्गीकरण आणि

२) ४.३. भाइसं मंडळ चित्रे अभ्यास व विश्लेषण. त्यांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे–

### ४.१. भाइसं मंडळ चित्र प्रकार.

मंडळ संग्रहातील चित्रसंग्रह एकूण ११ प्रकारच्या चित्रांत विभागला आहे. या बद्दलची माहिती पुढील ४.१ मध्ये देण्यात आलेली आहे.

### ४.२. भाइसं मंडळ चित्र वर्गीकरण.

या प्रकरणात चित्रविषय, चित्रे व तंत्र याप्रमाणे या सर्व चित्रांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. तसेच यात मंडळातील सर्व चित्रांचे दोन संचांत वर्गीकरण केलेले आहे. या संचात, संच क्र.१ मध्ये ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेल्या चित्रांचे क्रमांक व मंडळ सूचीत त्यांचे वर्णन जसे केलेले आहे तसेच दिलेले आहे. संच क्र.२ मध्ये सदर अभ्यासांती नव्याने ओळखल्या गेलेल्या चित्रांचे क्रमांक व त्यांची नावे आणि वर्णन दिलेले आहे. मंडळ संग्रहातील काही चित्रे सध्या तरी ओळखू आलेली नाहीत, त्यांची यादी प्रबंधाच्या शेवटी भाइसं मंडळाच्या नव्याने करण्यात आलेल्या सूचीत देण्यात आलेली आहे. या सर्व चित्रांचे क्रमांक, त्यांची शीर्षके, त्यावरील लेख वा वर्णने समजण्यास सोपी जावीत म्हणून त्यासाठी ४.२ या उपप्रकरणात दिलेल्या तक्ता पद्धतीत दाखवली आहेत.

## ४.३. भाइसं मंडळ चित्र अभ्यास व विश्लेषण

या प्रकरणात चित्रविषय,चित्रे व तंत्र याप्रमाणे या सर्व चित्रांचा अभ्यास व विश्लेषण करण्यात आलेले आहे. या संग्रहातील ज्या चित्रांवर फारसी काव्यं व लेख आहेत, त्यांचेही वाचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले असून त्याबद्दलची सविस्तर माहिती या प्रकरणाच्या शेवटी '४.३ ड) फारसी वाचन' या मध्ये देण्यात आलेली आहे.

## ४.१ भाइसं मंडळ चित्र प्रकार

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात पटचित्र– पिठोरी पट, चैत्रगौरीचा कापडी पट, जन्मपत्रिका, पोथीचित्रे, लघुचित्रे, छिद्रचित्रे, काष्ठचित्रे, काचचित्रे, चर्मचित्रे, भरतकामाच्या धाग्याने केलेली चित्रे, पाश्चात्य शैलीतील लिथोग्राफिक (छापील) चित्रे आहेत. या व्यतिरिक्त १८ व्या शतकातील काही रंगीत नकाशे देखील आहेत. त्यातील एक मराठा आरमाराचा महत्त्वाचा नकाशा असून त्यात १८व्या शतकातील लढाऊ नौकेचे तपशीलवार चित्रण केलेले आहे. त्यात त्या त्या लढाऊ जहाजांची नावे लिहिलेली आहेत. अशा प्रकारची विविध चित्रे मंडळ संग्रहात आहेत. ती पुढील प्रमाणे –

### १)पटचित्रे

मध्ययुगातदेखील कापडाच्या मोठ्या तुकड्यावर चित्रे रंगविली जात. तसेच नंतर कागदी पट्ट्यांवर लिखित ग्रंथांमध्ये प्रसंगानुरूप चित्रे काढली जात, त्यांनाच पटचित्रे असे म्हटले जात असे. एखादी देवता, कथा वर्णन किंवा आख्यानासाठी 'पटचित्रे' प्रामुख्याने वापरली जात असत.भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात अनेक कागदी पटचित्रे आहेत. त्यांतील ३–४ पट १८१० ते १८३५ च्या दरम्यानच्या काळात तयार झालेले आहेत. यामध्ये देवतांच्या म्हणजे गणेश व देवी यांच्या आकृती काळ्या रंगाच्या जोरकस पण तुटक बाह्यरेषांनी रेखाटलेल्या आहेत. काही पटांतील आकृती या फक्त काळ्या रंगांनी, तर काही ठिकाणी त्या रंगीत असून

त्यांच्या पोशाखासाठी तांबडा, पिवळा, फिकट निळा असे रंग वापरल्याचे दिसून येते. या उपलब्ध पटातील स्त्री आकृतींचे पोशाख मात्र खास मराठी आहेत. (रानडे १९८५:२:३९४) त्यातून त्यांचे मराठा चित्रशैलीशी नाते दिसते.

या पटांत वाई येथील पूजेसाठी रंगविलेला एक मोठ्या आकाराचा कागदी पट– म्हणजेच पिठोरीचा पट मंडळाच्या संग्रही आहे. अस्सल मराठा शैलीचा अत्यंत महत्त्वाचा आणि आकर्षक नमुना म्हणून या पटाकडे पहिले जाते. या पटाचे वैशिष्ट्य म्हणजे पिठोरी व्रताच्या कथेला कृष्ण चरित्राची जोड देऊन तत्कालीन १८व्या शतकातील मराठी समाज जीवनाचे उत्कृष्ट चित्रण यात केलेले आहे. (प्रधान २०१०:७६)

## २) सचित्र जन्मपत्रिका

आज जशा मुलांच्या जन्मानंतर जन्मपत्रिका केल्या जातात, तशाच पूर्वी मुलांच्या जन्माच्या पत्रिका तयार केल्या जात असत. परंतु पूर्वीच्या काळी त्या वेगवेगळ्या आकारांमध्ये असल्याचे दिसून येते. मंडळ संग्रहात काही चित्रमय जन्म–पत्रिकांच्या लांबच लांब गुंडाळ्या आहेत. त्यातील एक जन्मपत्रिका तर सर्वात लांब म्हणजे साधारणपणे दहा ते बारा इंच रुंद व बाराफूट लांबीची आहे. कागदाच्या पट्ट्या एकमेकांना जोडून या जन्मपत्रिकेची लांबी वाढवली आहे. त्याची लांब कागदी गुंडाळी तयार करीत. त्यावर तपशीलवार जन्म कुंडली चित्रित केलेली व लिहिलेली आहे. अशा प्रकारच्या जन्म पत्रिकांमधून ग्रहराशींची चित्रे काढली जात असत. गणपतीसारख्या देवतांची त्यांच्या वाहन वा परिवारासह चित्रे काढली जात. तसेच अधून मधून चक्रांच्या आकृती काढत असत. मंडळाच्या संग्रहात अशी बलवंत बाजीराव पेशवे यांची कुंडली आहे. यातील चित्रे खास मराठा शैलीतील आहेत. (रानडे १९८५:३९४)

### ३) पोथीचित्रे

'पोथीचित्रे' म्हणजेच सचित्र हस्तलिखिते. या पोथ्या प्रामुख्याने धार्मिक विषयांवरील आहेत. उदा. गीता, सप्तशती, शिवलीलामृत, यांप्रमाणेच गीतगोविंद, रागचित्र आदी ग्रंथांच्या पोथ्या दिसून येतात. (रानडे १९८५:३९६). भाइसं मंडळ संग्रहात ३० हजार हस्तलिखित पोथ्या आहेत. त्यांतील काही पोथ्या या सचित्र आहेत. यातील काही चित्रांमध्ये सोनेरी रंगाचा वापर करून चौकटीची नक्षी, दागदागिने, वस्त्रांचे काठ रंगविलेले आहेत.

### ४)लघुचित्रे

भित्तिचित्रे किंवा पटचित्रे यांच्या पेक्षा आकाराने लहान असलेल्या चित्रांना प्रामुख्याने 'लघुचित्रे' असे म्हटले जाते. मध्ययुगात इतर चित्र प्रकारांपेक्षा लघुचित्रे हा चित्र प्रकार जास्त लोकप्रिय होत गेला. मंडळ संग्रहात सुमारे १३०० लघुचित्रे आहेत. १७ वे शतक ते १९ वे शतक या काळात ही चित्रे निर्माण झालेली असून ती वेगवेगळ्या शैलींमधील आहेत. उदा. पर्शियन, मुघल, राजपूत, पहाडी, दख्खनी, मराठा इत्यादि. तसेच वेगवेगळ्या विषयांवरील ही सर्व चित्रे आहेत.यांमधील बहुतांशी चित्रे ही हाताने तयार केलेल्या कागदावर काढलेली आहेत. बहुदा मुरक्कामधील म्हणजे खासगी चित्रसंग्रहांतील ही चित्रे असावीत.

### ५)चर्मचित्रे

संग्रहातील काही चित्रे ही चामड्यावर चितारलेली आहेत. मंडळ संग्रहात साधारणपणे १ ते ३ चित्रे आहेत.

## ६) भरतकामाच्या धाग्याने केलेली चित्रे

अशा प्रकारची एकूण ९ चित्रे आहेत. दुर्मीळ प्रकारची ही चित्रे असूनही चित्रे भरतकामाच्या धाग्याने तयार केलेली आहेत. तर एक चित्र हे त्यातील एका चित्राची रंगीत नक्कल आहे.ही सर्व चित्रेचिनी पद्धतीची वाटतात. त्यातील ६चित्रे चिनी पद्धतीने चितारलेल्या फुलझाडांची आहेत, तर ४ उभ्या व्यक्तिचित्रांमध्ये एक चिनी स्त्री व तीन पुरुषांची चित्रे आहेत.१७व्या शतकातीलही चित्रे भाइसं मंडळाच्या संग्रहात आहेत. अशा चित्रांची फारशी ओळख नसल्याने येथे या चित्रांचा आढावा घेतला आहे. या चित्रांबद्दल खूप कमी साहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे मंडळ संग्रहातील हा १० चित्रांचा छोटेखानी संग्रह महत्त्वाचा ठरतो.

चीनमध्ये रेशमी कापडावर सोन्याच्या जरीच्या धाग्यांनी चित्रकाम (भरतकाम) केले जात असे. ज्याला आपण टांगता येणारे कापडी पट म्हणू शकू (wallhangings). बाकीच्या देशांच्या तुलनेत यांच्या कमी किमतींमुळे युरोपियन बाजारपेठेत या कापडी पटांना खूप मागणी होती. विशेष करून पोर्तुगालमध्ये. धार्मिक स्थळांमधून– चर्च वगैरे तसेच घरांमधून सजावटींसाठीही या wallhangings चा उपयोग होत असे. या प्रकारच्या चित्रांमध्ये चीनमधील काल्पनिक प्राणी (dragons), तेथील फुलझाडे तर असतच, पण काही धार्मिक व्यक्तिरेखा– विविध संतांची चित्रे, धर्माशी निगडीत चिन्हे यांचे चित्रण होत असे. पुढे जाऊन ज्या देशांसाठी ही पटे तयार करावयाची असत; तेथील काही धर्माशी निगडीत चिन्हे, प्रतीके वापरून पट तयार केले जाऊ लागले. (Ferreira 2017). यातील फुलझाडांची कापडी पटे ही पडद्याप्रमाणे खिडकीला लावत असत, जी दोन्ही बाजूंनी पाहता येत असत. याच प्रकारात परंतु छोटी चित्रे मंडळात आहेत.

मंडळ संग्रहातील या संचातील पहिल्या प्रकारची चित्रे, म्हणजे चिनी पद्धतीच्या फुलझाडांची चित्रे. ही साधारण ९ सेमी ते ४.५ सेमी (चित्र क्र.९८४ ते ९८७) व ७ सेमी ते ४ सेमी (चित्र क्र.१०११व १०१२) या आकारात आहेत. निळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर ही फुलझाडे भरतकामाचे धागे चिटकवून तयार केली आहेत. त्यावर मराठी पद्धतीची महिरप, चारी बाजूंनी पिवळ्या रंगाच्या चौकटीत लाल, निळ्या व गुलाबी रंगांची फुले व हिरव्या रंगाच्या पानांनी दाट वेलबुट्टीचे नक्षीकाम

केलेले आहे आणि वर व खाली लाल रंगाची पट्टी आहे. यामध्ये पुन्हा पानाफुलांचे काम केलेले आहे. (पाहा चित्र क्र.९८७).

तर दुसऱ्या प्रकारची चित्रे – (चित्र क्र. ९८८ ते ९९१) म्हणजे चिनी स्त्री–पुरुषांची उभी चित्रे. (आकार साधारण ७ सेमी ते ३.५ सेमी). ही चित्रे भारतीय लघुचित्रशैलींप्रमाणे फिकट हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर भरतकामाच्या धाग्यांनी चिटकवून तयार केलेली आहेत. या सगळ्यांच्या हातात काही ना काही वस्तू आहेत. (पाहा चित्र क्र.९८९)

यांच्या एकंदरीत वेशभूषा, केशभूषा, हातांतील वस्तू यांवरून आपण असा अंदाज बांधू शकतो की ही चित्रे बहुदा चिनी साधू–संन्याशांची असावीत. ही चित्रे आपल्याकडील दख्खनी योगी–योगिनींच्या चित्रांशी थोडी मिळती जुळती वाटतात. याचे कारण म्हणजे दख्खनी चित्रांतील योगिनींच्या हातातील मोरचेल, वाद्य, पाण्याचा तांब्यासदृश वस्तू, पार्श्वभूमीवर फिकट हिरव्या रंगाचे सपाट रंगलेपन, दूरवर क्षितीज रेषा, निळे आकाश, ठिपक्यांच्या स्वरूपातील झुडूपं हे सर्व दख्खनी चित्राशी साम्य दाखवितात. तसेच यात दर्शविलेली फुलझाडं ही देखील भारतीय लघु चित्रांतील गुलदस्त्यांच्या चित्रांशी साम्य दाखवितात. त्यांच्या मागील निळा रंग उत्तरकालीन दख्खनी चित्रांमध्ये दिसून येतो. गोवळकोंड्याच्या राजदरबारी अनेक देशी–विदेशी चित्रकारांचा राबता होता; त्यामुळे येताना ते तिथे अनेक विदेशी चित्रे आणत असत. त्यात चिनी कलेच्या वस्तूही असत. त्यांचा थोडाफार प्रभाव ही दख्खनी चित्रांवर पडलेला दिसून येतो. उदा. चिनीमातीच्या (Chinese Porcelain) भांड्यांवरील मोठमोठ्या फुलांचे चित्रण. मोठमोठी गुलाबाची फुलं दाखविण्याची पद्धत येथील चित्रकारांनी अवलंबिलेली दिसून येते. अनेक दख्खनी चित्रांमध्ये ती थोडीफार डोकावते. काही दख्खनी स्त्री–चित्रांच्या चित्रणात ही ती दिसून येते. (Nigam1988:334) (पाहा चित्र क्र.१०६२.)

या सर्वांवरून आपण असे म्हणू शकतो की भारतीय लघुचित्र पद्धतीची पार्श्वभूमी, रंगसंगती, चौकट, महिरप...हे सर्व भारतीय व त्यावर फक्त चिनी स्त्री–पुरुषांच्या आकृत्या वा

फुलझाडं भरतकामाच्या धाग्यांनी चिटकवलेले...या दोन्हींच्या संयोगातून अशा वेगळ्या धाटणीची चित्रे निर्माण झाली असावीत. परंतु  असे असले तरी या चित्रांत चिनी  प्रभाव जास्त दिसून येतो.

### ६) छपाई चित्रे (Prints)

मंडळ संग्रहात पाश्चात्य शैलीतील, पाश्चात्य विषयांवरील अनेक छापीलचित्रे (engravings) आहेत. अशा एकूण ३१ चित्रांचा यात समावेश करता येईल. यात काही व्यक्तिचित्रे, युरोपियन दैनंदिन जीवनातील काही प्रसंग, खेळ, बंदरांची दृश्य, तसेच ऐतिहासिक वास्तूंची चित्रे आहेत. (याबद्दल सविस्तर माहिती प्रकरण ४ मधील ४.३ क –चित्र तंत्र यामध्ये दिलेली आहे.)

### ७) शिळा छपाईचित्रे (Lithographs)

१८व्या शतकात प्रचलीत झालेली Lithographs आहेत. पुण्यातील चित्रशाळा प्रेसमध्ये तत्कालीन अनेक प्रसिध्द व ऐतिहासिक व्यक्तींची चित्रे छापली गेली होती. तसेच पौराणिक विषयांवरील ही चित्रे मोठ्या प्रमाणावर छापली गेली होती. त्यांतील काही चित्रे या संग्रहालयात आहेत. जसे– सवाई माधवराव, नाना फडणीस, तात्या टोपे, हैद्राबादचे निज़ाम व त्यांचा दिवाण...इ. ही सर्व चित्रे आकाराने मोठी असून भारतीय विषयांवरील आहेत. (पाहा आ.क्र.३ आणि आ.क्र.४ )

### ८) काचचित्रे (Glass Paintings)

मंडळ संग्रहात काचचित्रांचा देखील संग्रह आहे. ही चित्रे काचेवर मागच्या बाजूने चितारलेली असतात. यात १८ व्या शतकातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींची चित्रे आहेत. जसे की– नाना फडणीस, सवाई माधवराव, महादजी शिंदे, काही इराणी/पारसी धनिक मंडळी...वगैरे.

मंडळातील या काचचित्रांवर डॉ. समिता गुप्ता यांनी काही वर्षांपूर्वी एक ग्रंथ प्रसिद्ध केलेला आहे. (पाहा आ.क्र.५ आणि आ.क्र.६)

## ९) छिद्रचित्रे

मंडळाच्या संग्रहालयात नाना फडणीसांनी बनारस (वाराणसी) वरून खास मागविलेली गंगेच्या घाटाची अतिशय सुंदर व कल्पक अशी चित्रे आहेत. या छिद्र चित्रांचे वैशिष्ट्य असे की चित्रातील गंगेचा घाट, वाडे, झाडे व गंगा प्रवाहात सोडलेले दिवे छिद्रांकित आहेत. या चित्रांच्या मागे दिवा लावला असता ही छिद्रे प्रकाशाने उजळून निघतात व गंगेच्या घाटावर, गंगेच्या प्रवाहात असंख्य दिवे लुकलुकू लागल्याचा भास होतो. मात्र एरव्ही पहिले असता ते नेहमी सारखे रंगीत चित्र दिसते. यातील चित्रकाराचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. (प्रधान २०१०:७५) (पाहा आ.क्र.७). अशा पद्धतीची चित्रे दुर्मीळ चित्रांत मोडत असल्याने मंडळातील ही चित्रे बहुदा एकमेवाद्वितीय आहेत.

## १०) लाकडाच्या फळीवरील चित्रे

मंडळ संग्रहातील साधारण ८–९ चित्रेही एखाद्या पोथीसाठी वापरण्यात येणाऱ्या; वर व खाली लावण्यात येणाऱ्या फळ्यांवर रंगविलेली चित्रे आहेत. त्या सुंदर रंगीत चित्रांनी व फुलापानांच्या नक्षीने रंगविलेल्या आहेत. यातील चित्रांची शैली ही मराठा शैली आहे.

दुसऱ्या प्रकारातील चित्र हे मंडळाच्या म्युझियममध्ये आहे. लाकडाच्या उभ्या फळ्या जोडून तयार केलेल्या आयताकृती फलकावर एका सुलतानाच्या भव्य मिरवणुकीचे चित्रण करण्यात आले आहे. (पाहा आ.क्र.८). त्यामध्ये त्याच्या दरबारातील अनेक मान्यवर सरदार, त्यांचे सैन्य, लवाजमा यांचे खूप बारकाईने व सुंदर, वास्तववादी चित्रण करण्यात आलेले आहे. या सगळ्यांच्या पेहरावावरून हे चित्र दख्खनी पद्धतीचे वाटते. त्यांची चेहरेपट्टी, पेहराव सगळे दक्षिणी वाटते. हा सगळा लवाजमा एखाद्या स्वारीवरून विजयी होऊन आलेला दिसतो. त्यात अनेक खाशा स्वारी

हत्तींवरील अंबारींमध्ये बसलेल्या आहेत.अनेक सरदार दरकार घोड्यांवर बसून चालले आहेत. काही हत्तींवर विजयाचे नगारे वाजविले जात आहेत. काही घोडेस्वार हातात विजयाच्या पताका घेऊन जात आहेत. या सगळ्या मिरवणुकीला एक प्रकारची लष्करी शिस्त जाणवते. वरील डाव्या बाजूस ही मिरवणूक उंचावरील एका मोठ्या तटबंदी असलेल्या किल्ल्यामध्ये शिरत असल्याचे दृश्य दिसत आहे. मधल्या भागात दाट झाडींमध्ये गायी–गुरांचा कळप चरताना दिसत आहे. दूरवर एक महाल व मुस्लीम पद्धतीच्या वास्तू दिसत आहेत. या चित्रात उजव्या बाजूला वर विदेशी / ब्रिटीश सैन्य व त्यांचा ध्वज दिसत आहे. यावरून कदाचित हे चित्र हैद्राबादच्या निजामाच्या फौजेचे असावे. या चित्रात काही व्यक्तींच्या जवळ अथवा डोक्यावर, त्यांच्या घोड्यांच्या पाठीवर फारसी मधून नावे लिहिलेली आहेत. त्यातील काहीच नावे वाचता आली. ती अशी– **मिर्झा दास, मनोहर मियां, हैदर नूरxxजंग, मxxजाफर बेग.**

अशाच प्रकारची निज़ाम अलीखानच्या कारकिर्दीत कापडीपटावर चित्रित केलेली दोन मोठ्या आकाराची चित्रे हैदराबादच्या सालारजंग म्युझियम मध्ये आहेत;ज्यात निज़ामाच्या मिरवणुकीचे तपशीलवार दृश्य रंगविलेले आहे. (माटे,चव्हाण२००२:१८९). याशिवाय अगदी याच प्रकारचे अजून एक चित्र मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय येथे आहे. (पाहा आ.क्र.९) एका मोठ्या कापडी पटावर औरंगजेबाचा मुलगा आझमशाह शिकारीवरून परततानाचे हे गोवळकोंडा शैलीतील चित्र आहे. सोबत त्याचा लवाजमा आहे, जंगलातील दृश्य आहे. मागे दूरवर गोवळकोंड्याचा किल्ला दाखविला आहे. (Zebrowski1983:241). अशाप्रकारे मंडळ संग्रहातील चित्रांत ११ वेगवेगळ्या प्रकारची चित्रे आहेत.

## ४.२ भाइसं मंडळ चित्र वर्गीकरण

उपलब्ध संग्रहातील चित्रांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे –

### अ) चित्रविषय

मंडळ संग्रहात लघुचित्रे मोठ्या प्रमाणात आहेत. हाताने काढलेली चित्रे, ज्यांत कुंचला (ब्रश) व रंगांचा वापर करून काढलेली चित्रे, त्यांना लघुचित्रे असे म्हटले जाते. अशी चित्रे या प्रकरणातील पहिल्या टप्प्यात, म्हणजे विषय वर्गीकरणात आलेली आहेत. त्यांत वेगवेगळ्या विषयांवरील लघुचित्रे आहेत.

काही चित्रे फक्त ब्रश व शाईने काढलेली आहेत. फक्त त्यांची तंत्रपद्धती वेगळी असल्याने ती पुढील स्याह कलम व नीम कलम या प्रकरणात दिलेली आहेत. या प्रकारात काळी शाई वापरून केलेले एक चित्रकाम आहे, तर दुसऱ्या प्रकारात तपकिरी रंगाची शाई व सोनरी रंग वापरून केलेले चित्रकाम आहे.

संग्रहातील काही चित्रे छापील चित्रे आहेत. यांत शिळाछपाई चित्रे (lithographs), Engravings व Oleographs आहेत; ती शेवटच्या प्रकारात आलेली आहेत.

#### १. ऐतिहासिक व्यक्तिचित्रे पुरुष व्यक्तिचित्रे

मंडळ संग्रहात १०० ऐतिहासिक पुरुष व्यक्तिचित्रे आहेत. मध्ययुगाच्या इतिहासातील अनेक ज्ञात व अज्ञात ऐतिहासिक व्यक्तींची चित्रे या संग्रहात आहेत. त्या काळातील अनेक राजे–महाराजे, बादशहा, त्यांचे सरदार, दरबारी व अन्य मातब्बर मंडळी यांची चित्रे यात आहेत. यातील काही चित्रांच्या वर अथवा मागील बाजूस त्या त्या व्यक्तिरेखांची नावे लिहिलेली आहेत; मात्र अशी अनेक चित्रे आहेत, त्यांच्यावर कसलाच तपशील नाही. यात पूर्वसूरींनी ओळखलेली वा संपादन केलेली चित्रे

असून **ठळक अक्षरात** त्यांची नव्याने माहिती दिलेली असून या सर्व चित्रांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे-

**संच क्र.१.** मंडळ संग्रहातील ज्ञात व्यक्तिचित्रे (पुरुष) :- त्यांतील ग.ह.खरें व इतर संशोधकांनी ओळखलेली ऐतिहासिक पुरुष व्यक्तिचित्रे पुढील प्रमाणे आहेत (एकूण ६६)

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ९; ४०७ (२चित्रे) | जहांगीर बादशहा (इं) |
| २. | १२ | सवाई माधवराव (दे), (इं) |
| ३. | २७ | मोटा राजा (जोधपूर) (मो), (फा) |
| ४. | ३८ | अकबर पातशहा (फा), (दे) |
| ५. | ४० | बिरबल (फा), (दे) |
| ६. | ४२ | बिरमुखांपादशा (बैरामखान?) (दे), (फा) |
| ७. | ४३ | सलीमशहा पातशहा (शेरशहाचा (?)मुलगा) (दे) |
| ८. | ५४ | आसफखान वजीर (शहाजहानचा सासरा) (दे), (फा) |
| ९. | ५५ | राजा उम्मीदसिंह (रजपूत राजा, कोटा ?) (इं), (दे) |
| १०. | ८० | सटवाजी जाधव (दे) |
| ११. | ८२ | महादजी शिंदे |
| १२. | ८६; ११२७ (२चित्रे) | दुसरे बाजीराव (फा) |
| १३. | ९१ | मीर असकरी (मो), (फा) |
| १४. | ९३ | दतीयाचा राजा (दे), (फा) |
| १५. | ९९ | महमद अलीखां- तालपूर (फा) |
| १६. | १०३ | माधवराव पेशवे |
| १७. | १०४; ११८६ (२चित्रे) | यूसुफ आदिलशाह (फा), (इं), (दे) |
| १८. | १०५; ११८७ (२चित्रे) | इस्माईल आदिलशाह (फा), (इं), (दे) |
| १९. | १०६ ; ११८८ (२चित्रे) | इब्राहिम आदिलशाह १ला (फा), (इं), (दे) |

| | | |
|---|---|---|
| २०. | १०७ | अली आदिलशाह १ला (फा), (इं), (दे) |
| २१. | १०८ ; ११९० (२चित्रे) | इब्राहिम आदिलशाह २रा (फा), (इं), (दे) |
| २२. | १०९; ९३३; ११९१ (३चित्रे) | महमद आदिलशाह (फा), (इं), (दे) |
| २३. | ११०; ११८९ (२चित्रे) | अल्ली आदिलशाह २रा (फा), (इं), (दे) |
| २४. | १११; ११९२ (२चित्रे) | सिकंदर आदिलशाह (फा), (इं), (दे) |
| २५. | ११२; ११९५ (२चित्रे) | अफजलखान (विजापूर) (फा), (इं), (दे) |
| २६. | ११५ | हजरत ख्वाजा बंदेह नवाज (गुलबर्गा) (फा), (इं), (दे) |
| २७. | ११६ | हजरत हाशिम दस्तगीर (विजापूर) (फा), (इं), (दे) |
| २८. | १५७ | मिर्झा साहिब मिर्झा अन्वर बेग अन्वर जीव साहिब (फा) |
| २९. | ३५९ | रफी–उद–दरजल (१०वा मुघल बादशहा) (इं) |
| ३०. | ३८७ | बहादूरशाह (७वा मुघल बादशहा) (इं) |
| ३१. | ३९४ | लोहांग मल्ल (फा) |
| ३२. | ३९५ | मल्हारराव होळकर |
| ३३. | ४०१ | राघोबा दादा (रघुनाथराव पेशवे) (दे) |
| ३४. | ४०७ | जहांगीर (इं) |
| ३६. | ४१७ | अबू सय्यीद मिर्झा (बाबरचा आजोबा) (दे), (इं) |
| ३७. | ४९१ | सुलतान मुहम्मद मिर्झा पादशाह (इं) |
| ३८. | ४९३ | अहमदशाह पादशाह (इं) |
| ३९. | ६३८ | छत्रपती प्रतापसिंह महाराज, सातारा |
| ४०. | ६३९ | गंगाधर शास्त्री पटवर्धन |
| ४१. | ६४४ | शहाजहान बादशाह (फा) |
| ४२. | ६४५ | औरंगजेब बादशाह (फा) |
| ४४. | ८४५ | मुल्ला दो प्याजा |
| ४५. | ८५९ | महाराज अभेसिंगजी (जोधपूर ?) (दे) |
| ४६. | ८६४ | राणा अमरसिंग (चितोड) (फा) |
| ४७. | ८६५ | महाराजा गजसिंग (राजपूत सरदार) |
| ४८. | ९०९ | पहिले बाजीराव पेशवे |
| ४९. | ९१०; ९११ (२चित्रे) | पिलाजीराव जाधव (दे) |
| ५०. | ९२६ | दाराशिकोह |

| | | |
|---|---|---|
| ५१. | ९३१ | महाराणा प्रतापसिंह २रा (मेवाड) (दे) |
| ५२. | १०१३ | नवाब सहलखां (दे) |
| ५४. | १०२९ | हिंदुराव घाटगे |
| ५५. | १०५४ | आसफजहां–१ |
| ५६. | ११६० | शाहआलम बादशहा (१६ वा मुघल बादशाह) (फा), (मो) |

अशाप्रकारे ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली एकूण ६६ ऐतिहासिक पुरुष व्यक्तिचित्रे उपरोक्त सूचीत दिलेली आहेत. ज्यांची नोंद त्यांनी मंडळ सूचीमध्ये केलेली आहे.

**संच क्र.२.** नव्याने_ओळखलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत नसलेली व ऐतिहासिक पुरुष व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे (एकूण ९ व्यक्तिचित्रे)**-**–

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | **२०** | **राव जगराम** (फा) |
| २. | **७९** | **सटवाजी जाधव** |
| ३. | **८१** | **पिलाजीराव जाधव** |
| **४.** | **४३४** | **रावसाहेब पेशवे** (दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे नातू)(दे) |
| **५.** | **६४३** | **सुलतान परवेझ मिर्झा** (शहजादा दाराशिकोहाचा सासरा) |
| **६.** | **६८३** | **एक पेशवा** (पहिले बाजीराव?) |
| **७.** | **९१४** | **महाराजा माधोसिंह–** (जयपूर) |
| **८.** | **९३२** | **इराणचा सुलतान–** (शाह अब्बास–१) |
| **९.** | **१०२८** | **सुलतान परवेझ मिर्झा** (शहजादा दाराशिकोहाचा सासरा) |

अशाप्रकारे मंडळ संग्रहातील एकूण ९ पुरुष चित्रे त्यांच्यावर असलेली शीर्षकेवाचून, त्यांच्या वर्णनावरून व त्या समान चित्रांचा शोध घेऊन ओळखण्यात आली आहेत. या चित्रांची ओळख व शीर्षके उपरोक्त सूचित समाविष्ट करण्यात आली आहेत.

या प्रकारे मंडळ संग्रहात १०० पुरुष व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे. त्यातील ६६ चित्रे पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेली असून उर्वरित ९ चित्रे सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट आहेत. बाकीची २३ चित्रे जी सध्या तरी ओळखू आलेली नाहीत, त्यांची यादी प्रबंधाच्या शेवटी भाइसं मंडळाच्या नव्याने करण्यात आलेल्या सूचीत देण्यात आलेली आहे.

## २. ऐतिहासिक व्यक्तिचित्रे – स्त्री–व्यक्तिचित्रे

मंडळ संग्रहात साधारणपणे ५३ स्त्री व्यक्तिचित्रे आहेत. या संचात अनेक स्त्री व्यक्तिरेखांची व्यक्तिचित्रे असून त्यात चांदबिबी, झेबुन्निसा, नादिरा बेगम अशा ऐतिहासिकप्रसिद्ध तसेच बादशहांच्या, राजांच्या स्त्रियांची देखील अनेक चित्रे आहेत. मात्र त्यातील इतिहासप्रसिद्ध म्हणता येतील अशा व्यक्तिचित्रे फार कमी आहेत. यातील काही स्त्री प्रतिमा संबंधित पुराव्या अभावी ओळखणे कठीण आहे.

**संच क्र.१.** ग.ह.खरे व इतर अभ्यासकांनी ओळखलेली ऐतिहासिक स्त्री–व्यक्तिचित्रे पुढील प्रमाणे आहेत. या चित्रांची नोंदत्यांनी मंडळ सूची मध्ये केलेली आहे, ती पुढीलप्रमाणे. (एकूण **६** चित्रे)–

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ५२ | झेबुन्निसा – औरंगजेब कन्या (फा) |
| २. | ७८, ११४, ११९ | चांदबिबी (दे), (फा), (इं) |
| ३. | १०२७ | नादिरा बेगम – (शहाजादा दारशिकोहची पत्नी) (दे) |
| ४. | ११९४ | रंभावती (विजापूरचा सुलतान महमंद आदिलशहा याची पत्नी) (फा) |

अशाप्रकारे ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली एकूण ६ ऐतिहासिक स्त्री–व्यक्तिचित्रे उपरोक्त सूचीत दिलेली आहेत. ज्यांची नोंद त्यांनी मंडळ सूची मध्ये केलेली आहे.

**संच क्र.२.** सदर अभ्यासांती समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदीत नावे नसलेली व नव्याने ओळखलेली ऐतिहासिक स्त्री–व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे (एकूण ४) **-**

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | **५२** | **झेबुन्निसा (फारसी लेख)** |
| २. | **७०; ३०९; ५७४ (३ चित्रे)** | **नूर जहान** (जहांगीर बादशाहाची पत्नी) |
| ३. | **७५** | **युरोपीयन स्त्री (**फारसी लेख) |
| ४. | **३९२** | **एक स्त्री (**फारसी लेख) |
| ५. | **५८२** | **ताराबाई (**मोडी लेख) |

अशाप्रकारे मंडळ संग्रहातील ऐतिहासिक स्त्री–चित्रे**;** त्यांच्यावर असलेली शीर्षके वाचून, वा त्यांच्या वर्णनावरून समान चित्रांचा शोध घेऊन नव्याने ओळखण्यात आली. या चित्रांची ओळख व शीर्षके उपरोक्त सूचित समाविष्ट करण्यात आली आहेत.

या प्रकारे मंडळ संग्रहात ५३ ऐतिहासिक स्त्री–व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे. त्यातील ६ चित्रे पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेली असून उर्वरित ४ चित्रे सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

## ३. समूह चित्रे व त्या समूहात दिसणारी काही ऐतिहासिक व्यक्तिचित्रे

मंडळ संग्रहात एकूण ८१ समूह चित्रे आहेत. त्यातील काही चित्रे ही योगी–योगिनींच्या चित्रांत, तर काही दरबारी दृश्यांत, शिकार दृश्यात, रागमाला चित्रांत व युरोपियन व्यक्तिचित्रांमध्ये आलेली आहेत. यातील काही चित्रांमध्ये ऐतिहासिक व्यक्तिचित्रेही आहेत. या चित्रांचे क्रमांक पुढीलप्रमाणे–

**संच क्र.१.** या चित्रांमध्ये ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली काही समूह चित्रे पुढील प्रमाणे (एकूण ७ चित्रे)**–**

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ५० | लैला मजनू |
| २. | ३३९ | खुर्चीवर बसलेला अकबर बादशाह; समोर राजा मानसिंग हात जोडून उभा; डाव्या हातात जमिनीला टेकविलेली तरवार; उजव्या हातात तुरा; बाजूस बिरबल मोरचेल घेतलेला; त्याच्या डाव्या हातात जमिनीस टेकलेली तलवार (दे) |
| ३. | ३९८ | थोरले बाजीराव हुक्का पीत आहे; समोर मल्हारराव होळकर. मागे चवरीवाला. |
| ४. | ४०३ | पेशवा बाळाजी बाजीराव खुर्चीवर बसलेला; समोर ११ गायिका व मागे ३ दासी. |
| ५. | ४९० | सलीम व त्याचा गुरु (इं) |
| ६. | ५२७ | ख्रिस्तजन्म (दे), (इं) |
| ७. | १००६ | झिबुन्निसा बेगम (फा) |

**संच क्र.२.** नव्याने समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदीत नावे नसलेली समूह चित्रे व त्या समूहांत नव्याने ओळखली गेलेली काही ऐतिहासिक व्यक्तिचित्रे (एकूण **६** चित्रे) **–**–

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंग्रजी (इं) |
|---|---|---|
| १. | **३१ (ब)** | **एक मुसलमान बादशाहा वा सुफी संत आणि त्याचे १० अनुयायी** (फा) |
| २. | ८२; **३९६** | **हैदराबादचा निज़ाम अली खान आसफ जाह व त्याचा मंत्री अरीस्तूजाह** |
| ३. | **३१८** | **पाच दख्खनी बादशहा** |
| ४. | **३९९** | **खुसरो आणि शिरीन** (पर्शियन कथेवर आधारित चित्र) |
| ५. | **९२५** | **विजापूरचा बादशहा इब्राहीम आदिलशहा २रा (जगत्गुरु)**(फा); (दे); (इं) |

अशाप्रकारे मंडळ संग्रहातील समूह चित्रे व त्या समूहात दिसणारी काही ऐतिहासिक व्यक्तिचित्रे त्यांच्यावर असलेली शीर्षके वाचून, वा त्यांच्या वर्णनावरून त्या समान चित्रांचा शोध घेऊन नव्याने ओळखण्यात आली. या चित्रांची ओळख व शीर्षके उपरोक्त सूचित समाविष्ट करण्यात आली आहेत.

या प्रकारे मंडळ संग्रहात ८१ समूह चित्रे आहेत. त्यातील **७** चित्रे पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेली असून उर्वरित **६** चित्रे सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

## ४. झरोका चित्रे

मंडळ संग्रहात साधारण पणे ६५ झरोका चित्रे आहेत.वेगवेगळ्या स्त्रियांची halfbust मधील चित्रे यात आहेत. झरोका चित्रांचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या स्त्रीचे वा बादशहाचे झरोका किंवा खिडकीत बसल्यावर नक्षीदार चौकटीतून दिसणारे चित्रण होय. यात त्या त्या शैली वा कलमानुसार खिडकीचे चित्रण केलेले असते.

झरोका चित्रांमध्ये राजे, राज स्त्रियांची एकूण ५४ झरोका चित्रे आहेत, तर पाश्चात्य व्यक्तिरेखांची ११ झरोका चित्रे मिळून या संग्रहात अशी एकूण ६५ चित्रे आहेत. या ६५ चित्रांतून तीन चित्रे नव्याने ओळखता आली आहेत. ही तीन चित्रे एकाच ऐतिहासिक स्त्री व्यक्तिरेखेची आहेत. उर्वरित चित्रांत काही चित्रे देखील ऐतिहासिक राज स्त्रियांची असू शकतात. परंतु त्या समान चित्रे वा त्यांची ओळख दर्शविणारे साहित्य फारसे उपलब्ध नसल्यानेही या चित्रांची ओळख झालेली नाही.

**संच क्र.१.** पूर्वसूरींनी ओळखलेले एक झरोका चित्र पुढीलप्रमाणे आहे. ज्याची नोंद त्यांनी मंडळ सूची मध्ये केलेली आहे. हे चित्र पुरुष चित्र आहे. (१ चित्र)**-**

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंग्रजी (इं) |
|---|---|---|
| १. | ९ | जहांगीर बादशाह **(**वामावर्ती**)** |

**संच क्र.२.** नव्याने समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदीत नावे नसलेली झरोका चित्रे (एकूण ३ चित्रे) **-**–

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंग्रजी (इं) |
|---|---|---|
| **१.** | **७०; ३०९; ५७४ (३ चित्रे)** | **नूरजहान** |

या प्रकारे मंडळ संग्रहात ६५ चित्रे आहेत. त्यातील १ चित्र पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेले असून उर्वरित ३ चित्रे सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

## ५. युरोपियन व्यक्ती

यामध्ये एकूण ३० चित्रे आहेत. या प्रकारच्या चित्रांमध्ये युरोपीयन स्त्री–पुरुषांची व काही प्रसंगचित्रांचे भारतीय लघुचित्रशैलीप्रमाणे पारदर्शी व अपारदर्शी जलरंगात चित्रण केलेले आहे. यात काही चित्रे ही छापील असून त्यांना हाताने हशिया केला आहे, हे विशेष. यात भारतीय झरोका पद्धतीचीही चित्रे आहेत. ही चित्रे पुढील प्रमाणे आहेत.

**संच क्र.१.** या प्रकारच्या चित्रांमध्ये पूर्वसूरींनी ओळखलेली युरोपियन चित्रे पुढील प्रमाणे (एकूण **७**)

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख.<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | २२ | मेरी व ग्रॅब्रिअल (हशिया) |
| २. | ३० | चाचे कोळी दोघे |
| ३. | ५१ | आकाशात पंख असलेले देवदूत वाद्ये वाजवीत आहेत (हशिया) |
| ३. | ५१३ | ख्रिस्ताचे दफन (हशिया) |
| ४. | ५२१ | Duke of Marlbough(दे) (हशिया) |
| ५. | ५२६ | Preistess in the cave |
| ६. | ७०७ | Auguste Electeur de Saxe et Roy de Pologne (इं) (छापील) |
| ७. | ७०९ | Philippe de France due d'Orleans (इं)(छापील) |

**संच क्र.२.** यातून अभ्यासांती नव्यानेसमोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत नावे नसलेली युरोपियन चित्रे पुढीलप्रमाणे (६चित्रे ) -

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | **७५** | **युरोपीयन स्त्री** (फारसी वाचन)(हशिया) |
| २. | **३४०** | **समूह चित्र** (फारसी वाचन) |
| ३. | **५२७** | **ख्रिस्तजन्म**(दे) (इं)(छापील) |
| ४. | **७१०** | **James –II** (छापील)(हशिया) |
| ५. | **७११** | **जोसेफ, माता मेरी व बाळ येशू** (हशिया) |
| ६. | **७३१** | **एक ख्रिश्चन साध्वी** (हशिया) |
| ७. | **८८३** | **William Coxe** (छापील) |

अशा प्रकारे मंडळ संग्रहात ३० युरोपियन व्यक्तिचित्रे आहेत. त्यातील **७** चित्रे पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेली असून उर्वरित **६** चित्रे ही सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

## ६. प्रसंग चित्रे

वेगवेगळ्या प्रसंगांवर आधारित काही चित्रे या संग्रहात आहेत. या सर्व चित्रांचे त्या त्या विषयांनुसार वर्गीकरण केल्यास पुढील प्रमाणे प्रकार पडतात–

६.१. शिकार दृश्ये
६.२. दरबारी दृश्ये
६.३. शृंगार दृश्ये
६.४. स्नान, शृंगार करणाऱ्या स्त्रिया

**६.१. शिकार दृश्ये :–** यांमध्ये राजे–महाराजे, बादशहा व बेगम हे वाघ–सिंह व काळवीट यांची शिकार करतानाची चित्रे आहेत. या दृश्यांत कधी राजा किंवा एखादा वीर एकटाच वाघ किंवा सिंहाशी झुंजत आहे, तर काही चित्रांमधून राजाचा शिकारी लवाजमा सोबत दिसून येतो.

**संच क्र.१.**मंडळ संग्रहात एकूण २७ चित्रे शिकार दृश्यांची आहेत. त्यांतील ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली शिकारीची चित्रे पुढीलप्रमाणे आहेत. ज्यांची नोंद त्यांनी मंडळ सूचीमध्ये केलेली आहे. (एकूण **४** चित्रे)

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ४१ | जहांगीर बादशहा शिकार करताना |
| २. | ३९७ | छत्रपती शाहू महाराज शिकार करताना |
| ३. | ८६४ | राणा अमरसिंह(फा) |
| ४. | १२२० | सुवर्णमृगाची शिकार |

**संच क्र.२.**सदर अभ्यासांती नव्याने समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत नावे नसलेली शिकारीची चित्रे पुढीलप्रमाणे (एकूण **८** चित्रे )

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | **३१६** | **एक बादशहा शिकार करताना** |
| २. | **३३४** | **एक राज स्त्री शिकार करताना** (फारसी वाचन) |
| ३. | **३८२, ११७५** | **भिल्ल जोडपे काळविटाची शिकार करीत आहे.** |
| ४. | **३८५** | **सिंह हरणाची शिकार करीत आहे** (फारसी वाचन) |
| ५. | **९०२** | **छत्रपती शाहू महाराजांचा शिकारीसाठी निघालेला शिकारखाना** |
| ६. | **९०३** | **छत्रपती शाहू महाराजांचा शिकारीसाठी निघालेला शिकारखाना** |
| ७. | **९०४** | **छत्रपती शाहू महाराजांचा शिकारीसाठी निघालेला शिकारखाना** (फा); (दे) |

**६.२. दरबारी दृश्ये :–** या चित्रांमध्ये राजा किंवा बादशहा त्याच्या दरबारात बसलेला दाखविलेला असून त्याच्यासमोर त्याचे दरबारी वा मंत्री बसलेले आहेत, अशी दृश्यं आहेत. यांमध्ये एकूण ९ चित्रे आहेत. यातील काही चित्रे समूह चित्रांमध्ये ही आलेली आहेत.

**संच क्र.१.** ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली चित्रे पुढीलप्रमाणे. ज्यांची मंडळ सूचीमध्ये त्यांनी नोंद केलेली आहे.ही तिन्ही चित्रे एकाच विषयावरील आहेत.(एकूण **४** चित्रे)–

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | १३ | सवाई माधवराव, हरिपंत फडके व महादजी शिंदे– (आराखडा). |
| २. | ३९८ | थोरले बाजीराव पेशवे व मल्हारराव होळकर |
| ३. | ८६६ | सवाई माधवराव, हरिपंत फडके आणि महादजी शिंदे– रंगीत |
| ४. | ९२० | सवाई माधवराव, हरिपंत फडके आणि महादजी शिंदे; मागे हुजऱ्या–(रंगीत) |

**संच क्र.२.** नव्याने ओळखलेली चित्रे पुढीलप्रमाणे. यातील दोन चित्रे एकाच विषयांवरील आहेत. आणि त्यांचे चित्र संयोजन ही एकसारखेच आहे. (एकूण ३ चित्रे)

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ८२ ; १२२१ | **हैदराबादचा निजाम अली खान आसफ जाह -२रा व त्याचा वजीर अरीस्तू जाह–** ही दोनही चित्रे रेखाचित्रे वा चित्राचा आराखडा प्रकारातील आहेत. |
| २. | १२१० | **जहांगीर बादशहाचा दरबार** |

या संचातील सर्व चित्रे या पूर्वी वा आत्ता नव्याने ओळखली गेलेली आहेत. अशा प्रकारे मंडळ संग्रहातील एकूण ६ चित्रे ही दरबार चित्रे आहेत. त्यातील ३ चित्रे पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेली असून उर्वरित ३ चित्रेही सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

**६.३. शृंगार दृश्ये :–** भाइसं मंडळ संग्रहात साधारणपणे २० चित्रे ही शृंगार दृश्यांची आहेत. यांमध्ये प्रियाराधन करणारे जोडपे, प्रणयी जोडपी, तसेच प्रियाची वाट पहाणारी विरहिणी अथवा

नायिका चित्रे अशी वेगवेगळी चित्रे आहेत. या चित्रांवर कोणतेही शीर्षक अथवा लेख नाहीत. ती पुढील प्रमाणे आहेत–

**संच क्र.१.**

| अनु.क्र. | भाइस मंडळ चित्र क्र. | मंडळ सूचीतील या चित्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १६१ | एक शृंगारोत्सुक जोडपे, एक दासी |
| २. | १६३ | प्रियाराधन, जोडपे व एक दासी |
| ३. | १६४ | हुक्का पिणारा राजपुत्र, तीन स्त्रिया; एक हातात विडा देत आहे. (रागचित्र ?) |
| ४. | १६७ | राजपुत्र हुक्का पीत आहे व दुसऱ्या हाताने प्रियेस मद्याचा प्याला देत आहे. (रागचित्र ?) |
| ५. | १६८ | मिलन शृंगार |
| ६. | १७१ | प्रियाप्रिय बसले आहेत, समोर तंबोऱ्यावर एक स्त्री गात आहे, व दुसरी स्त्री ढोलके वाजवीत आहे. (रागचित्र ?) |
| ७. | ३४८ | प्रणयी जहांगीर; प्रियेस आलिंगन देऊन तिचे चुंबन घेत आहे. |
| ८. | ८५७ | एक शृंगारोत्सुकजोडपे व एक स्त्री दारातून डोकावून पाहत आहे. |
| ९. | १०५५ | प्रियाराधन करणारे जोडपे |
| १०. | १०६७ | लोडाला टेकून बसलेली एक अर्धनग्न स्त्री; एक दासी तिला मद्याचा प्याला देत आहे. |
| ११. | ११५३ | कामचित्र /प्रियाप्रिय मिलन चित्र |
| १२. | ११५४ | -----"----- |
| १३. | ११५५ | -----"----- |
| १४. | ११६१ | ३स्त्रिया; पैकी एक स्त्री व राजपुत्र मिलनोत्सुक |
| १५. | ११६३ | गादीवर रेललेली एक अर्धनग्न स्त्री; शेजारी अर्धनग्न दासी तिला मद्याचा प्याला देत आहे. |
| १६. | ११६४ | प्रिया–प्रिय मिलनाची दोन दृश्यदोन उभ्या दासी, मध्ये एक हौद व एक कारंजे. |
| १७. | ११६५ | पलंगावर पहुडलेली एक अर्धनग्न स्त्री व चार दासी |
| १८. | ११६९ | पलंगावर बसलेले जोडपे. मागे गुडगुडी धरून उभी एक दासी. |
| १९. | ११७० | मेघडंबरी खाली पलंगावर एक राजपुत्र; राजस्त्री, तीन दासी व दोन गायिका (रागचित्र ?) |
| २० | ११७२ | चौरंगावर रेललेली अर्धनग्न स्त्री; समोर दोन गायिका व दोन दासी. |

अशाप्रकारे २० चित्रे ही शृंगार दृश्यांची आहेत. ज्यांचे वर्णन पूर्वसूरींनी मंडळ सूचीमध्ये केलेले आहे.

**६.४. स्नान, शृंगार करणाऱ्या स्त्रिया :–** यामध्ये स्नानगृहांत चौरंगावर बसून वा नदीच्या काठावर स्नान करणाऱ्या ललनांची चित्रे आहेत.

**संच क्र.२.** यातील नव्याने ओळखले गेलेले एक चित्र आहे. या चित्राची नोंद या प्रकरणातील स्त्री व्यक्तिचित्रे यांमध्ये आलेली आहे.हे चित्र पुढीलप्रमाणे–

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ४०४ | **कन्हा बेगम** (फा) |

अशाप्रकारे स्नान करणाऱ्या स्त्रीचे हे १ चित्र त्यावरील लेख वाचून ओळखण्यात आले. आणि सदर अभ्यासात ते नव्याने समाविष्ट करण्यात आले आहेत.

## ७. दैनंदिन जीवन

मध्ययुगीन काळात दैनंदिन जीवनातील अनेक वेगवेगळ्या प्रसंगांवर आधारीत चित्रे काढली गेली. व्यक्तिचित्रांच्या बरोबरीने अशी चित्रे देखील रंगवली गेली. त्यांना भरपूर लोकप्रियता होती. यांमध्ये स्त्रियांची अनेक चित्रे आहेत. दैनंदिन जीवनातील त्यांची कामे, क्रिया अशा चित्रांमधून दाखविलेली आहेत. तसेच काही चित्रे तर प्राचीन शिल्पातील सुर/सुंदरींची आहेत असे दिसते, उदा. पायातून काटा काढणारी स्त्री, हरणाशी खेळणारी व त्याला खाऊ घालणारी, आरशात पाहून साजशृंगार करणारी इत्यादी साधारणत: ९० चित्रे मंडळ संग्रहात आहेत. या संचातील काही चित्रे वेगवेगळ्या प्रकरणांतही आलेली आहेत.

**संच क्र.१.** या संचातील दोन चित्रे यापूर्वी पूर्वसूरींनी ओळखली गेलेली आहेत.व त्यांची नोंद त्यांनी मंडळ सूची मध्ये केलेली आहे. ती चित्रे पुढील प्रमाणे आहेत –

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ५२ | झेबुन्निसा (फा) |
| २. | ५४४ | शालभंजिका |

अशाप्रकारे मंडळ संग्रहातील दैनंदिन जीवनावरील ९० चित्रांपैकी फक्त दोन चित्रे त्यांवरील शीर्षक आणि त्या समान चित्रांवरून ओळखली गेलेली आहेत.

## ८. योगी, योगिनी व सुफी संत

मंडळ संग्रहात योगी–योगिनींची काही चित्रे आहेत. तसेच विजापूरच्या बादशाहांचे गुरु व सुफी संत यांचीही चित्रे यांत आहेत. ही २५ चित्रे आहेत.

**संच क्र.१.** त्यातील ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली चित्रे पुढीलप्रमाणे (एकूण ४ चित्रे)–

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ११५ | हजरत ख्वाजा बंदे नवाज हुसेनी (फा), (दे), (इं) |
| २. | ११६ | हजरत हाशीम दस्तगीर (फा), (दे), (इं) |
| ३. | १२८ | एक योगिनी |
| ४. | ४९० | शहजादा सलीम त्याचा गुरु (इं) |

**<u>संच क्र.२.</u>** सदर अभ्यासांती समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत नावे नसलेली योगी व योगिनी व सुफी संतांची चित्रे पुढीलप्रमाणे (एकूण ४ चित्रे ) :–

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/लेख<br><br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ३१ (ब) | **एक मुसलमान बादशाहा वा सुफी संत आणि त्याचे १० अनुयायी** (फा) |
| २. | ४०५ | **कबीर मुनी** (फा) |
| ३. | ६१० | **एक योगिनी व तिच्या सख्या** |
| ३. | १२६० | **एक मुस्लीम धर्मगुरु सुलतान इब्राहीम इब्न अधम, बल्ख (?)** |

अशा प्रकारे मंडळ संग्रहात योगी–योगिनी व सुफी संतांची २५ चित्रे आहेत. त्यातील ४ चित्रे पूर्वसूरींनी मंडळ सूचीत नमूद केलेली असून उर्वरित ४ चित्रे ही सदर अभ्यासात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

## ९. देवी–देवता

भा.इ.सं.मंडळ संग्रहात १२१ देवी, देवता व कृष्णावतार, दत्त, शरंभ इत्यादी चित्रे आहेत. या चित्रांची; त्यांच्या विषयांनुसार वर्गवारी केली असता त्यांचे पुढील प्रकार पडतात

९.१. देवता

९.२. देवी

९.३. शिवपार्वती

९.४. शिव परिवार

९.५. अर्धनारीश्वर

९.६. कृष्णावतार, दत्त, शरभ इत्यादी

**<u>संच क्र.१.</u>** ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली देवी–देवता व अवतार चित्रे पुढील प्रमाणे.

(एकूण ११९ चित्रे)

| अनु.क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | चित्र शीर्षक/ लेख<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | ७१, ४९७, ५०५, ८७३, ११८५ (पाच चित्रे) | विष्णू–लक्ष्मी |
| २. | ५०५, १२०० (२चित्रे) | शंकर |
| ३. | ३५, ४५२, ४८०, ११६७ (४चित्रे) | गणपती |
| ४. | १२०४ | विठ्ठल–रखुमाई |
| ५. | ११९९ | हनुमान |
| ६. | ८७५ | सूर्य |
| ७. | ८७६ | इंद्र |
| ८. | ७ | सरस्वती |
| ९. | ६८१ | १७ हातांची देवी |
| १०. | ८७१ | गजलक्ष्मी |
| ११. | १०३७ | दशभुजादेवी |
| १२. | ११२१ | पंचमुखी गायत्री |
| १३. | ११३७ | महिषासूरमर्दिनी |
| १४. | ७४, ८६३, १२०१, १२५६, १२५७, १२५८ | शिवपार्वती |
| १५. | १०२, ७९०, ११७४ (३चित्रे) | शिव परिवार |
| १६. | ४९४, ६८२, ९३०, १०७३ (४चित्रे) | अर्धनारीश्वर |
| १७. | ३७६, ४८६, ४९२, ४९६, ५०५, ८६९, ८७०, ८७७, १०१४, १०७६, ११०२, १२०२, १२१९, १२२० (१४चित्रे) | राम–सीता–लक्ष्मण व हनुमान |

| | | |
|---|---|---|
| १८. | १२१ते १२५, १३०, १३१, ४७२, ४७५, ४७७, ४७८, ४८१ ते ४८५, ४८८, ४८९, ५०४, ७८८, ७८९, ७९५, ७९७, ८७४, ९३५, ९३८, ९३६, १०७२, १०९१, ११७६, १२०३, १२०५, १२०६, १२३९ ते १२५४ (४८ चित्रे) | कृष्ण लीला |
| १९. | ४९८, ११०१, ११० (३चित्रे) | जगन्नाथपुरीचे कृष्णबलराम |
| २०. | ५०१, ५०२, ९४० (३चित्रे) | श्री व्यंकटेश |
| २१. | ९४१ | श्री खळनाथ |
| २२. | ४६८, ४७०, ४७१, ४८७, ११०४, १२०७ (६चित्रे) | बुद्ध अवतार |
| २३. | ११७९, १२०८ (२चित्रे) | श्री दत्त अवतार |

अशाप्रकारे ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली एकूण ११९ देवी–देवता चित्रे उपरोक्त सूचीत दिलेली आहेत. ज्यांची नोंद त्यांनी मंडळ सूची मध्ये केलेली आहे.

**संच क्र.२.** सदर अभ्यासांती समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत असलेली काही नावे**,** परंतु या चित्रांबद्दल काही नवीन माहिती समोर आलेली व नव्याने समाविष्ट केले गेलेली देवी–देवता व अवतार चित्रे (एकूण ४ चित्रे)**-**

| **अनु.क्र.** | **भाइसं मंडळ चित्र क्र.** | **चित्र शीर्षक/लेख**<br>फारसी (फा), मोडी (मो), देवनागरी (दे), इंगजी (इं) |
|---|---|---|
| १. | **७** | **हंसवाहिनी सरस्वती** |
| २. | **४९८** | **जगन्नाथपुरी पटचित्र** |

| | | |
|---|---|---|
| ३. | **८६३** | **शिव पार्वती विवाह** |
| ४. | **८७५** | **श्रीराम** |
| ५. | **१०३७** | **शरभावतार** |

| ५. | ५४ | **आसफखान वजीर** | ४.३x३.५ सेमी | छोट्या चौकटीत उर्ध्वांग चित्र आहे. चित्राच्या वरील बाजूस फारसीतून **'आसफखान वजीर'** असे लिहिलेले आहे. हा नूरजहानचा भाऊ व शहाजहानला गादीवर बसविण्यात याचा मोठा वाटा होता. (कुंटे २०१४ : खंड २:पृ.२४४) (पाहा चित्र क्र.५४) | चित्राच्या वरील बाजूस फारसीतून **'आसफखान वजीर'** असे लिहिलेले आहे. (फा) | मागे नंतर देवनागरीतून नाव लिहिलेले आहे. (दे) |
| ६. | ८० | **सटवाजी जाधव** | १९.३x१३.९ | एक बैठा मराठा सरदार, लोड | ----- | चित्राच्या मागे **सटवाजी जाधव** असे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सेमी | तक्क्याला टेकून गालिच्यावर वीरासनात बसलेले असून ते गुडगुडी ओढत आहेत. समोर पानाचा डबा, पिकदाणी व कट्यार ठेवलेली आहे. डाव्या हातात सुवासिक फूल आहे. (पाहा चित्र क्र. ८०) | | देवनागरीतून लिहिलेले आहे. (दे) |
| ७. | ✻८६<br>✻११२७<br>(२ चित्रे) | **दुसरे बाजीराव पेशवे** | ११.८x६.३<br>सेमी<br>२९.९x१६<br>सेमी | ✻ चित्र क्र.८६– दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे तरूणपणीचे हे चित्र आहे. मागे चौरी घेतलेली व्यक्ती उभा आहे. उत्तर पेशवाईतील हे चित्र आहे. चेहेऱ्यातील बारीकसारीक तपशील, त्रिमिती, छायाभेदाने उत्तम प्रकारे दाखविण्यात आले | ✻ यातील चित्र क्र.८६ मध्ये चित्राच्या वरील बाजूस सोनेरी रंगात फारसीतून तीन भागांत लिखाण केलेले आहे, ते बरेचसे अस्पष्ट आहे. ते असे– **'अमल–इ–सय्यीद' घुलाम हसनखान, शबीह–इ–श्रीमंत महाराजा** | चित्र क्र. ८६ च्या मागे मोडीमध्ये 'बाजीरावसाहेब उर्फ बाजीराव रघुनाथ पेशवे' असे लिहिलेले आहे. (मो)<br>✻ चित्र क्र.११२७ मागील बाजूस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे. डोक्यावर कलगीतुरा असलेली पेशवाई पगडी, कानात व गळ्यात मौल्यवान दागिने, गळ्यात मोत्याचा कंठा असून कपाळावर आडवे गंध आहे. डाव्या हातात कागद आहे. शेजारी तलवार, गुलाबदाणी, पिकदाणी, वगैरे आहे. मागील चवरी घेणाऱ्याचेही चित्रण अगदी तपशीलवार पणे केलेले आहे. अगदी असेच चित्रण ❊ चित्र क्र.११२७ मध्ये आहे. फक्त ते रंगीत आहे व मागील हुजऱ्या या चित्रात नाही. एकंदरीत निरीक्षणावरून असे लक्षात येते की, हे चित्र पहिल्या चित्राच्या | **बाजीराव बहादूर, तहरीर दुयम शव्वाल सनाह १२३६ 'हिजरा दर पुनाह'** यावरून हे लिखाण इ.स. ३-७-१८२१ केलेले आहे. मात्र इ.स.१८१८ मध्ये पेशवाई बुडाल्यानंतर दुसरे बाजीराव कानपूरजवळील बिठूर येथे राहत होते. त्यामुळे हे चित्र कदाचित जुन्या चित्रावरून नक्कल केले असावे, वा त्यावर नंतर पुढील काळात वरील लिखाण केले असण्याची शक्यता आहे. (Khare1948 : 52). (फा) | **'श्रीमंत धाकटे बाजीराव साहेब पेशवे ब्रह्मावर्त समीकाली'** असे लिहिलेले आहे. (दे) शिवाय त्या खाली मोडीतही लेखन आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आराखड्यावरून (tracing) नकल केले असावे व नंतर त्यात रंग भरले असण्याची शक्यता आहे. यात नाक, डोळे, केस, दागिने यांना नंतर वरून काळ्या रंगाने गिरविलेले दिसते. त्यात सफाईदारपणा दिसत नाही. (पाहा चित्र क्र.८६ आणि चित्र क्र.११२७) | ❊ तर चित्र क्र.११२७ मध्ये चित्राच्या वरच्या भागात डावीकडे लंबगोल आकारात 'प्रो. श्री. ग. जिनसीवाले'यांचे कृष्णधवल छायाचित्र आहे, शेजारी त्यांचे नाव आहे. चित्राच्या खालील बाजूस **'श्रीमंत धाकटे बाजीराव पेशवे'** असे लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र.८६ आणि चित्र क्र.११२७) | |
| ८. | ९१ | **मीर असकरी** | २१.५x११.४ सेमी | एक मुघल सरदार | ----- | मागील बाजूस फारसतीतून **'मीर असकरी'** असे लिहिलेले आहे. त्या शेजारी नंतर मोडीतही नाव लिहिलेले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | ९३ | **दतीयाचा राजा** | १६.७x१०.१ सेमी | एक राजा उंच सिंहासनावर बसून गुडगुडी ओढत आहे. वर मेघडंबरीमागे एक चवरीधर व सेवक उभा आहे. | चित्राच्या वरील बाजूस **'दतीयाचा राजा'** हे देवनागरीत व शेजारी फारसी मधून **'दतिया राजाह'** असे लिहिलेले आहे. त्यांच्या वरील बाजूस नक्षीदार कागदी पट्टीत मोठ्या अक्षरात देवनागरीतून **'दतीयाचा राजा' खऱ्या मोत्यांच्या अलंकारात**' असे लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र.९३) हा नंतरचा लेख असून संग्रहासाठी लिहिलेला आहे. (फा, दे) | ----- |
| १०. | ९९ | **महमद अलीखां** | १८x१०.१ सेमी | एक बैठा उमराव | या चित्राच्या खालील बाजूस फारसी मधून **'सरकार–ए–** | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **झुल'इक्तिदार आमीर महमद अलीखां', शालपूर** असे लिहिलेले आहे. (मात्र मंडळ यादीत तालपूर असे लिहिलेले आहे. ते 'शालपूर'असे असावे.) शिवाय चित्राच्या डाव्या बाजूला आडव्या पट्टीत 'कार-ए-मिर्झा अली अकबर शिराझी' हे नाव आहे म्हणजेच हे चित्र या चित्रकाराने काढलेले आहे. भाइसंमं त्रै.वर्ष २९: अंक ३-४ यात या चित्रकाराची नोंद आहे. | |
| ११. | *१०४ | **युसुफ आदिलशहा** | २१.८x१५.४ सेमी | सिंहासनावर बसलेला विजापूरचा १ ला बादशहा | *चित्र क्र. १०४ - या चित्राच्या वरील बाजूस नंतरच्या काळात | *चित्र क्र. १०४ - फारसीतून **इसफअली आदिलशहा वल्द** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ✲११८६(हे चित्रे) | | ३२.७x२४.६<br>सेमी | | कागदी पट्टीवर **'Isaf Alli Adilshah (Vallad) Muaradshaha'; (First King of Bijapur)** असे लिहिलेले आहे. (इं)<br>✲चित्र क्र. ११८६ --- | **मुरादाशहा बादशहा विजापूर** असे लिहिलेले आहे. (त्याखाली नंतरच्या काळात इंग्रजी व देवनागरीतूनही नाव लिहिलेले आहे.)<br>(फा, इं, दे)<br>* ✲चित्र क्र. ११८६ - **युसुफ अदिलशहा** (फा आणि इं) |
| १२. | ✲१०५<br>✲११८७(हे चित्रे) | **इस्माईल आदिलशहा** | २१.५x१३.२<br>सेमी<br>३२.७x२४.१<br>सेमी | विजापूरचा २ रा बादशहा | ✲चित्र क्र. १०५ - **Ismail Adilshal ; (Second King of Bijapur)** (इं)<br>✲चित्र क्र. ११८७- ----- | ✲चित्र क्र. १०५ - **इस्माईल आदिलशहा** (फा, इं व दे)<br>✲चित्र क्र. ११८७ - **इस्माईल आदिलशहा** (फा व इं) |
| १३. | ✲१०६ | **इब्राहीम आदिलशहा –** | २१.०x१४.९ | विजापूरचा ३ रा बादशहा | ✲चित्र क्र. १०६- **'Ibrahim Adilshaha' ; (Third** | ✲चित्र क्र. १०६- **इब्राहीम** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ✲११८८(२ चित्रे) | **१ ला** | (सेमी)<br>३२.५x२४.१<br>(सेमी) | | **King of Bijapur)** (इं)<br>* चित्र क्र. ११८८- ------ | **आदिलशहा** (फा, इं व दे)<br>✲चित्र क्र. ११८८ - **इब्राहीम आदिलशहा कलां** (थोरला)<br>(फा आणि इं) |
| १४. | ✲१०७<br>✲११८९(२ चित्रे) | **अली आदिलशहा –१ ला** | २१x१५.७<br>(सेमी)<br>३२.७x२४.३<br>(सेमी) | विजापूरचा ४ था बादशहा | ✲चित्र क्र. १०७ - **Alli Adilshaha' ; (Fourth King of Bijapur)** (इं)<br>* चित्र क्र. ११८९ - | ✲चित्र क्र. १०७ - **अली आदिलशहा कालान** (फा, इं व दे)<br>✲चित्र क्र. ११८९ - **अली आदिलशहा कलां** (फा व इं) |
| १५. | ✲१०८<br>✲११९० (२ चित्रे) | **इब्राहीम आदिलशहा – २ रा जगतगुरू** | १८.५x१५.४<br>(सेमी)<br>३२.२x२४.३ | विजापूरचा ५ वा बादशहा. हा कवि मनाचा बादशहा सरस्वतीदेवीचा उपासक होता. त्याने सरस्वती व | *चित्र क्र. १०८- **Ibrahim Adilshaha' ; (Third King of Bijapur)** (इं) | *चित्र क्र. १०८- **इब्राहीम आदिलशहा – २ रा** (फा, इं व देवनागरीतून लिहिलेले)<br>✲चित्र क्र. ११९० - दुसरा इब्राहीम |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (सेमी) | गणेशा च्या स्तुतीपर अनेक कवनं रचली. तो स्वत:ला 'जगतगुरू'म्हणवून घेत असे. | * चित्र क्र. ११९० - ----- | आदिलशहा (फा व इं) |
| १६. | ✻१०९,<br>*९३३,<br>*११९१ (३चित्रे) | **सुलतान महम्मद बादशहा** | १८.७x१२.७<br>(सेमी)<br>६.६x५<br>(सेमी)<br>३०.७x२४.१<br>(सेमी) | विजापूरचा ६ वा बादशहा | * चित्र क्र. १०९ - '**Sultan Mahamad' ; (Sixth King of Bijapur)** (इं)<br>✻चित्र क्र. ९३३ - चित्राच्या वरील बाजूस 'मुहम्मद बादशहा विजापूर' असे लिहिलेले आहे. | ✻ चित्र क्र. १०९ - **सुलतान महमद बादशहा विजापूर** (फा, इं व देवनागरीतून लिहिलेले)<br>✻ चित्र क्र. ९३३ - --''---<br>✻ चित्र क्र. ११९१ **सुलतान महम्मद बादशहा** (फा व इं) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | ✲११० | **दुसरा अली आदिलशहा** | १८.५x१०.४ (सेमी) | विजापूरचा ७ वा बादशहा | ✲चित्र क्र. ११० - **Alli Adilshaha ; (Seventh King of Bijapur)** (इं) | ✲चित्र क्र. ११० - 'अली आदिलशहा' (फा, इं व देवनागरीतून लिहिलेले) |
| १८. | ✲१११<br>✲११९२(२ चित्रे) | **सिकंदर आदिलशहा** | २१x१५.२ (सेमी)<br>३२x२४.६ (सेमी) | विजापूरचा शेवटचा बादशहा | ✲चित्र क्र. १११- **Sikandar Adilshaha' : (Last King off Bijapur)** (इं)<br>* चित्र क्र. ११९२- ----- | ✲चित्र क्र. १११- **सिकंदर आदिलशहा** (फा, इं व देवनागरीतून लिहिलेले)<br>✲ चित्र क्र. ११९२ - **सुलतान सिकंदर आदिलशहा विजापूर** (फा व इं) |
| १९. | ✲११२<br>✲११९५(२ चित्रे) | **अफजल खान** | १९.३x१२.४ (सेमी)<br>३२.२x२४.६ (सेमी) | विजापूरच्या आदिलशाहीतील एक महत्त्वाचा व प्रसिद्ध सरदार (पाहा चित्र क्र.११९५) | ✲चित्र क्र. ११२<br>**Afzulkhan'; (Vajir of Bijapur)** (इं) | ✲चित्र क्र. ११२- **अफजल खान** (फा व दे)<br>✲ चित्र क्र. ११९५ - **अफजलखान** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | *चित्र क्र. ११९५- ----- | (फा व इं) |
| २०. | ११५ | **हजरत ख्वाजाह बन्दे नवाझ हुशेनी** | १८x१६ (सेमी) | एक सुफी संत | **'Hajrat Khaja Bande navaj Husseni' ; (Gulburga)** (इं) | हजरत ख्वाजा बंदेनवाज हुशेनी, कलबुर्गा (गुलबर्गा) (फा व दे) |
| २१. | ११६ | **हजरत हाशीम दस्तगीर** | १८.२x१४.४ (सेमी) | एक सुफी पंत | **'Hajrat Hashim Dastagir' ; (Guru of Mahamad – The King of Bijapur)** (इं) | हजरत हाशीम दस्तगीर – विजापूरचा सुलतान महम्मद बादशहाचे गुरु. (फा व दे) |
| २२. | १५७ | **मिर्झा अन्वर बेग साहिब** | ३०.९x१६ (सेमी) | एक सरदार | ----- | मिर्झा साहेब मिर्झा अन्वर बेग जीव साहेब (फा) |
| २३. | ३१९ | **एक बादशहा – शहाजहान (?)** | ३७.३x२६.४ (सेमी) | भाइसं मंडळाच्या 'ऐतिहासिक प्रदर्शन' या अंकात पृ. क्र. २३ वर या चित्राच्या वर्णनात– खुर्चीवर | ---------- | --------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बसून दासीच्या हातचा विडा घेतो. अलंकार, खुर्ची व पऱ्यांचा देखावा पहा' असे वर्णन आहे. परंतु पोषाखावरून हे चित्र निजामाचे वाटते | | |
| २४. | ३९४ | **लोहांग मल्ल** | २३.३x१९.९ (सेमी) | एक उभा मल्ल (पाहा चित्र क्र.३९४) | ----- | चित्राच्या मागील बाजूस **'लोहांग नाम पेहेलवान'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| २५. | ३९५ | **मल्हारराव होळकर** | ३८.३x२८.७ (सेमी) | मंडळ यादीत सरदार **मल्हारराव होळकर** असे लिहिलेले आहे. धारदार नजर, झुपकेदार मिशा आहेत. उजव्या हातात फूल आहे. | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | डाव्या हातात कडे आहे. कपाळावर उभे गंध असून गळ्यावरही गंधाची बोटे आहेत. अंगात पांढरा सादर असून डोक्यावर निळ्या रंगाची पगडी आहे. इंदौरच्या राजवाड्यातील मल्हारराव होळकरांच्या चित्राशी, आ.क्र.१० तसेच आ.क्र.११ या दोन्ही चित्रांशी हे चित्र थोडेफार मिळते जुळते आहे. त्यातील वेशभूषा, चेहरेपट्टी, पगडी यांवरून हे चित्र मल्हारराव होळकरांचे असावे, असे दिसते (पाहा चित्र क्र. ३९५ आणि आ. क्र.१०,११ व १२) | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| २६. | ३९७ | **छत्रपती शाहू महाराज – सातारा** | ३८.३x२५.९<br>(सेमी) | तरूण वयातील छत्रपती शाहू महाराज घोड्यावर बसून शिकार करतानाचे चित्र आहे. उजव्या हातातील भाल्याने हरणाची शिकार करीत आहेत. मागे मोरचेलवाला, पुढे हाकारे, शिकारी, कुत्री व पळणारे प्राणी दाखविलेले आहेत. भाइसं मंडळ संग्रहातील छत्रपती शाहू महाराजांचे हे एकमेव चित्र आहे. तसेच इतर संग्रहात देखील | _____ | _____ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दुर्मी आहे. (पाहा चित्र क्र.३९७) | | |
| २७. | ४०७ | **जहांगीर** | १६.५x१०.६ (सेमी) | उभा, वामावर्ती जहांगीर बादशहा, उजव्या हातात बाण धरलेला असून डाव्या हातात धनुष्य आहे. उजव्या कमरेला तलवार लावलेली आहे. निळ्या रंगाचा पोशाख असून त्यावर तांबड्या रंगाचे उपरणे आहे. गळ्यात व अंगावर मोत्यांचे दागिने घातलेले आहेत. चेहेऱ्याचे व कपड्यांचे चित्रण अगदी बारकाईने, तपशीलवार करण्यात आलेले आहे. वास्तववादी चित्रण आहे, दिल्ली कलम (पाहा चित्र क्र.४०७) | चित्राच्या खाली नंतर **'Emperor Jahangir'** असे लिहिलेले आहे. (इं) | तर मागील बाजूस पेन्सिलने **'Prince Jahangir'** असे लिहिलेले आहे. (इं) |
| २८. | ६३८ | **छत्रपती प्रतापसिंह** | ९.९ x ८.१ | संपूर्ण पांढरा पोशाख, गळ्यात | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **महाराज ड्ड सातारा** | (सेमी) | पाचूच्या माळा, डोक्याला उभा लांब, नाकापर्यंत ओढलेला गंध आहे. मंडळ यादीमध्ये हे चित्र दामू चितारी याने काढलेले आहे, अशी नोंद आहे. सातारा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय यामध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे घोडेस्वारी करीत असतानाचे एक चित्र आहे. मागे अजिंक्यतारा किल्ल्याचे दृश्य आहे. या दोन्ही चित्रांतील व्यक्तिरेखा, चेहरेपट्टी, त्यांचे पोशाख अगदी सारखे आहेत. (पाहा चित्र क्र.६३८ आणि आ.क्र.१३) | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २९. | ६४५ | **औरंगजेब बादशाह** | १४.४x१०.९ (सेमी) | या चित्रात वयोवृध्द औरंगजेब वीरासनात बसलेला आहे. मागे मोठा तक्क्या व सिंहासन दाखविलेले आहे. त्याच्या हातातील कुराणाचे तो वाचन करीत आहे. लंबगोल आकारातील या चित्रात कमीत कमी तपशील वापरून प्रभावी संयोजन केले आहे. (पाहा चित्र क्र.६४५) | आतील सोनेरी रंगाच्या किनारीवर फारसीमध्ये **औरंगजेब बादशाह** असे लिहिलेले आहे. | ----- |
| ३०. | ८४५ | **मुल्ला दो प्याजा** | १७.७x१२.१ (सेमी) | वाममुखी, घोड्यावर बसलेला **मुल्ला दो प्याजा;** लांब पांढरी दाढी आहे. विशिष्ट आकाराचे (कांद्याच्या) मोठे गोल पागोटे घातलेले असून अंगात लांब हिरवा | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंगरखा घातलेला आहे. तो एका कृश घोड्यावर बसून चाललेला आहे. **'मुल्ला'** हा अकबरकालीन होता. अबू फजलचा हा मित्र होता व अकबराचा याच्यावर जीव होता. हा दोन कांदे घातलेला पुलाव ज्याचे घरी होईल, त्याचेच घरी निमंत्रणावरून जात असे. एरवी तो आमंत्रण नाकारी. म्हणून त्याचे नाव **'मुल्ला दो प्याजा'** असे पडले, अशी माहिती भाइसं मंडळाचे जुने सभासद रा. आबा चांदोरकर यांनी इ.स.१९२२ च्या एका पाक्षिक सभेत दिलेली आहे. (भाइसं मंडळ त्रै.३:२–४:१९२२ : पृ.७७.) | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (पाहा चित्र **क्र.**८४५ आणि आ. क्र. १४) | | |
| ३१. | ९०९ | **पहिले बाजीराव पेशवे** | २७.६**X**१८ (सेमी) | भरधाव घोड्यावर स्वार झालेले **पहिले बाजीराव पेशवे** यांचे चित्र. योद्ध्याचा पोशाख असून उजव्या हातातील तलवार वर परजलेली असून डाव्या हाता**त** ढाल धरलेली आहे. कमरेला उजव्या बाजूला बाणांचा भाता, तर डाव्या बाजूला धनुष्य लटकवलेले आहे. फिकट हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर चित्रण केलेले आहे. दख्खनी मराठा शैलीतील चित्र आहे. हे चित्र भाइसं मंडळाने प्रसिध्द केलेले आहे. (पहा | _____ | _____ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | चित्र क्र.९०९) | | |
| ३२. | *९१०<br>*९११ (२ चित्रे) | **सरदार पिलाजीराव जाधव** | २१.३x१८.७ (सेमी)<br>२६.९x२०.५ (सेमी) | * छत्रपती शाहू महाराजांचे व मराठी राज्याचे आघाडीचे **सरदार पिलाजीराव जाधव** यांचे हे चित्र. पेशवा बाळाजी विश्वनाथांपासून ते सदाशिवभाऊ यांच्यासह उत्तरेतील अनेक स्वाऱ्यांमध्ये त्यांचा सहभाग होता.<br>* चित्र क्र.९१० – सरदार पिलाजीराव जाधव गच्चीत बसलेले आहेत. मागे चवरीधारी, समोर दोन स्त्रिया गायन–वादन करीत आहेत. उजव्या हातात सुवासिक फूल आहे. | चित्र क्र. ९१० च्या खाली देवनागरीत **'पिलाजीराव जाधव'** असे लिहिलेले आहे. | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ❋चित्र क्र.९११ – पिलाजीराव जाधव हे घोड्यावर स्वार असून एकटे आहेत. उजव्या हातातील तलवार उजव्या खांद्यावर धरलेली, तर डाव्या हाताने घोड्याचा लगाम पकडलेला आहे. कमरेला शेल्यावर कट्यार खोचलेली आहे. (पाहा चित्र क्र. ९१० आणि चित्र क्र. ९११) | | |

**<u>संच क्र. २</u> मंडळ संग्रहातील नव्याने अभ्यासलेली (अज्ञात) पुरूष–व्यक्तिचित्रे (एकूण १४ चित्रे)–**

| अनु. क्र. | भाइसंमं चित्र क्र. | व्यक्तिनाम | आकार (सेमी) | चित्राचे वर्णन | चित्र शिर्षक (फारसी (फा)/मोडी (मो)/देवनागरी (दे))/इंग्रजी) | चित्राच्या मागील लेख (फारसी (फा)/मोडी (मो)/देवनागरी (दे))/इंग्रजी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **२०.** | **राव जगराम** | २१.३x१२.१ (सेमी) | एक उभा सरदार ; नीम कलम चित्र. (पाहा चित्र क्र. २० मागील बाजू) | ----- | मागील बाजूस उजव्या कोपऱ्यात **'राव जगराम'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| २. | २३. | **दराई खान** | २०.३x१२.१ (सेमी) | बादशहा सरदारास रत्न नजर करीत आहे. | ----- | या चित्राच्या मागील बाजूस त्या एका मोठ्या चौकटीत शिकस्ता लिपीत लेख आहे. याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| ३. | ३१(अ) | **एक सरदार** | २४.६x | एक उभा सरदार | ----- | **४ ओळींची पर्शियन प्रेमकविता.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १४.२(सेमी) | | | याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| ४. | ४० | **बिरबल** | १८.७x१०.६ (सेमी) | मंडळ संग्रहातील बिरबलाची ही दुर्मीळ मुघल चित्रे आहेत. | चित्राच्या वर फारसीतून **'बिरबल'** लिहिलेले. शेजारी देवनागरीतून ही पुन्हा नाव लिहिलेले आहे. (फा), (दे) | मागे शिकस्ता लिपीत लेख आहे. यात सोनेरी रंगाचा भरपूर वापर केलेला आहे. मात्र यातील बरीचशी अक्षरे पुसली गेली असल्याने ती वाचता आलेली नाही. तसेच वरील बाजूस फारसीतून गोल शिक्का आहे. (फा) |
| ५. | ७९ | **सटवाजी जाधव** | २७.९x२०.५ (सेमी) | घोड्यावर स्वार, गुडगुडी ओढत, पुढे ढालवाला शिपाई, मागे चवरीवाला, उत्तर पेशवेकालीन मराठा शैलीतील चित्र. मंडळ यादीत हे चित्र पिलाजीराव जाधवांचे असे लिहिले गेलेय. मात्र चित्र क्र.८० व या चित्रातील व्यक्तिरेखा, या दोन्हींच्या चेहऱ्याची ठेवण, मिशी ची ठेवण, कपाळवरील | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लांब गंध, पागोटे यांत खूपसे साम्य आहे. यामुळे हे चित्र सटवाजी जाधवांचे आहे असे म्हणू शकतो. (पाहा चित्र क्र.८०) | | |
| ६. | ८१ | **पिलाजी जाधवराव** | १८.२x११.९ (सेमी) | एक बैठा मराठा सरदार, गुडगुडी ओढत आहे. जवळ कुत्रा आहे. मंडळ सूचित या वर्णनापुढे 'ब्रह्मेंद्र' ? अशी नोंद आहे. तसेच ऐतिहासिक प्रदर्शन या अंकात पृ.क्र. ११ वर 'तसबिरी (रंगीत)' – यातील क्र. १० मध्ये **'थोरले शाहू महाराज, जवळ कुत्रा बसलेला आहे.'** – अशी नोंद आहे.<br>* भाइसंमं त्रैमासिक वर्ष १; अंक २/३ ऑक्टो. १९२० व जाने.१९२१ – या अंकात पान नं.११ वर **'पिलाजी जाधवराव यांची खरी तसबीर कोणची ?– दत्तो वामन पोतदार'** या लेखामध्ये असे म्हटले आहे. की श्री.ताराजीराव जाधव यांच्याकडील ४ तसबिरींपैकी क्र.२ ची ***'जवळ कुत्रा असून डोईस दुपट्टा गुंडाळलेली अशी*** | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ***अर्धी उघडी' –*** ही तसबीर पिलाजीराव यांचीच आहे. असे श्री.ताराजीराव यांचे म्हणणे आहे. व ती आता मंडळाचे संग्रही आहे. याबाबत असा समज होता कि हे चित्र शाहू महाराजांचे आहे, पण शाहू महाराजांच्या उपलब्ध चित्रांशी या तसबिरीचे यत्किंचितही साम्य नसल्याने ते चित्र शाहू महाराजांचे नक्कीच नाही. त्यामुळे हे चित्र पिलाजीराव जाधव यांचे असण्यास वाव मिळतो. शिवाय **'थोरले बाजीराव साहेबांचे पराक्रमी हस्तक राजेश्री पिलाजीराव जाधव यांची ही एक तसबीर मिळवून प्रसिध्द केली आहे'**. असा उल्लेख – भाइसंमं पंचम संमेलन, पृ.१९ व प्रारंभीची चित्रे–यामध्ये आढळतो.<br><br>वरील सर्व संदर्भाच्या पार्श्वभूमीवर या चित्राचे मंडळातील पिलाजीरावांच्या दुसऱ्या चित्राशी तुलना केली असता, दोन्ही चित्रांच्या चेहेऱ्यामध्ये कमालीचे साम्य | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिसून येते. दोन्ही चित्रांतील पार्श्वभूमी, आकाश दाखविण्याची पध्दत सारखीच आहे. त्यामुळे मंडळ सूचीतील नोंदीनुसार हे चित्र ब्रह्मेंद्र स्वामींचे नसून ते पिलाजी जाधवांचे असावे. शिवाय ब्रह्मेंद स्वामींच्या उपलब्ध चित्रात आणि या चित्रात कोणतेच साम्य दिसून येत नाही. (पाहा चित्र क्र.८१ आणि चित्र क्र.९१०) | | |
| ७. | ८८ | **घोड्यावर स्वार एक सरदार** ७ | ३०.४x२१.३<br>सेमी | या चित्रात एक स्वार घोड्यावर स्वार होऊन जात आहे, हातात लांब भाला. | या चित्रावर नंतरच्या काळात **'१६७४ साली काढली. शिवाजी महाराज'** असे लिहिले आहे. परंतु हे चित्र त्यांचे नाही. ते इतर कोणाचे तरी असावे. (दे) | मागील बाजूस **'अमल-ए-मिर्झा घुलाम अली बेग मन्सूर/मुस्व्वीर'** (फा) असे लिहिलेले आहे. त्याखाली मोडीतूनही नंतर हे नाव लिहिलेले आहे. (मो) म्हणजे हे चित्र **मिर्झा घुलाम आली बेग मन्सूर** याने काढलेले आहे. या चित्रकाराची नोंद **ग. ह. खरेंच्या 'Signed Paintings from BISM Poona'** या लेखात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | केलेली दिसत नाही. मात्र मंडळ सूचीत नंतरच्या काळात तशी नोंद केलेली दिसून येते. प्रस्तुत संशोधनात ही हे फारसी व मोडीतील नाव वाचण्यात आलेले आहे. |
| ८. | ४०५ | **कबीर मुनी** | २०.८x१२.४<br>सेमी | एक मुसलमान फकीर एका मंचकावर मोठ्या लोडाला टेकून बसलेला आहे, तो हातातील सरोदसदृश वाद्य वाजवित आहे. त्याने अंगात फिकट जांभळ्या रंगाची कफनी घातलेली आहे. डोक्यावर केस व दाढी वाढलेली आहे. समोर ५ पानाचे विडे ठेवलेले आहेत. (पाहा चित्र क्र. ४०५ व त्याची मागील बाजू) | चित्राच्या वरील बाजूस उर्दूत **'कबीर मुनी'** असे लिहिलेले आहे. परंतु नेमके कुठल्या कबीरा बद्दल लिहिलेले आहे, ते नक्की सांगता येत नाही. | **चित्राच्या मागील बाजूस फारसीत कित्ता लिहिलेला आहे.**<br>याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| ९. | ४३४ | **रावसाहेब पेशवे** | २०x१५<br>सेमी | एक पेशवा उमद्या, सजविलेल्या घोड्यावर बसून चाललेला आहे, असे दृश्य आहे. दाढी मिशा वाढविलेल्या असून डोक्यावरील विशिष्ट पध्दतीच्या पागोट्याची टोके | या चित्राच्या वरील बाजूस एका पट्टीवर **'श्री.रावसाहेब पेशवे'** असे नंतरच्या काळात पेनाने लिहिलेले आहेत. चित्राच्या खाली | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | खांद्यापर्यंत लांब आलेली आहेत. त्याने संपूर्ण डोके झाकेलेले आहे. त्यावर डोक्यावर शिरपेच व कलगी तुरा लावलेला आहे. कडेने मोत्याच्या माळा लावलेल्या आहेत. मागील बाजूस एक हुजऱ्या त्यांच्या डोक्यावर सजविलेले छत्र घेऊन बरोबर चालला आहे. एकंदरीत सर्व चित्र हे स्याह-कलम पध्दतीत केलेले आहे. पेशवे, त्यांचा हुजऱ्या व घोडा या सर्वांचे चित्र अगदी बारीकसारीक तपशिलांसह केलेले आहे.<br><br>हे रावसाहेब पेशवे म्हणजे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे नातू होत. दुसऱ्या बाजीरावांनी ब्रह्मावर्तास गेल्यानंतर त्यांनी दत्तक घेतलेल्या दादासाहेब यांचे रावसाहेब हे दत्तकपुत्र होत. (राजवाडे, पटवर्धन २०१०/११ : पृ.१०७) (पाहा चित्र क्र. ४३४) | उजव्या बाजूला भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणे तर चित्राच्या डाव्या बाजूला सं-कै.पटवर्धन असे लिहिलेले आहे. चित्राच्या खाली कोपऱ्यात उजवीकडे इंग्रजीत 'B.R.Gune, Poona' असे सोनेरी रंगात लिहिलेले आहे. (दे), (इं) | |
| १०. | ६४३ | **सुलतान परवेझ मिर्झा** | ११.१x ५.६ | मंडळ यादीत एक उभा राजपूत सरदार, असे लिहिलेले | ----- | या चित्राच्या मागे पानाफुलांनी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सेमी | आहे. परंतू 'Aspects of Mughal Paintings'ह्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर अगदी असेच चित्र आहे, जे शहाजहान बादशहाचे आहे. मात्र येथील चित्र हे शहाजहान बादशहाचे नाही. या व्यक्तिरेखेचा शोध घेता www.mughalart.net या संकेतस्थळावर सुलतान परवेझ मिर्झा याचे एका साधूबरोबरचे चित्र आहे. त्या चित्रात आणि या चित्रात बऱ्यापैकी साम्य दिसून येते. सुलतान परवेझ मिर्झा हा जहांगीरचा दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा व शहाजहानचा भाऊ होता. (पाहा चित्र क्र.६४३ आणि आ. क्र. १५) | | सजविलेल्या चौकटीत चार ओळींचा कता, म्हणजेच काव्य लिहिलेले आहे.<br>याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. (पाहा पृ. क्र. २३१) |
| ११. | ७१० | जेम्स II | १४.७ x ११.१ सेमी | युरोपियन व्यक्तिचित्र. इंग्लंडचा राजा 'James, Duke of York, नंतरचा James II (१६३३-१७०१) याचे आहे. हे engraved प्रिंट आहे. चित्रात त्याच्या शेजारी त्याचा crown आहे. तर चित्राच्या वरील बाजूस इंग्लंडची | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | राजचिन्ह आहेत. मंडळ यादीत या चित्राचे नाव Mesdemoiselles Loison असे लिहिलेले आहे, परंतू संकेतस्थळावरील (https://en.m.wikipedia.org) त्याच्या चित्राशी व इतर तपशीलांची तुलना करून असा निष्कर्ष काढता येऊ शकतो, की हे चित्र जेम्स दुसरा याचे असू शकते. (पाहा चित्र क्र.७१०) | | |
| १२. | ८३३ | **Villiam Coxe.** | २० x ११.२ सेमी | युरोपियन व्यक्तिचित्र, इंग्लिश इतिहासकार व धर्मगुरू William Coxe. A.M. F.R.S. याचे चित्र आहे. १७८६ साली युरोपियन मासिकात छापलेले हे छापील चित्र आहे. (https://pictures.royalsociety.org) ही engraved प्रिंट आहे. या चित्राचा कागद बराच जुना झालेला असून, त्यावर डाग असून कडेने थोडे फाटलेले आहे. (पाहा चित्र क्र.८३३) | या चित्राच्या वरील बाजूस **European Magazine** असे छापलेले आहे. (इं) | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३. | ९१४ | **महाराजा माधोसिंह – जयपूर** | २२.८ x १४.७ सेमी | एका मध्यमवयीन गलेलठ्ठ पुरूषाचे चित्र. तेजस्वी, करारी चेहरा, गौर वर्ण आहे. लांब कल्लेदार मिशा, कपाळावर उभा गंध, अंगावर सोन्या–मोत्याचे दागिने, अंगात पायघोळ लांब पांढरा अंगरखा आहे. डोक्यावर पांढरे पागोटे, त्यांवर रत्नजडित शिरपेच लावलेला असून पायात मोजडी आहेत. उजव्या हातात जपमाळ व डावा हात हा लांब, सरळ, जमिनीवर टेकविलेल्या तलवारीच्या मुठीवर ठेवलेला आहे. डोक्याच्या मागे प्रभावालय दाखविलेले आहे. चित्रातील पृष्ठभूमीवर फिक्कट शेवाळी रंग, वर थोडेसे फिक्कट निळसर आकाश व पायाखाली गडद शेवाळी रंगाची जमीन दाखविलेली आहे.<br><br>अशाच प्रकारचे तंतोतंत चित्र '**राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**' येथील संग्रहात आहे. (पहा आ.क्र.१६) त्यांच्या चित्रसूची मधील चित्राशी (क्र.RSM३६) तुलना करून | ----- | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | असा निष्कर्ष काढता येतो की, हे चित्र व राजवाडे संशोधन मंडळ संग्रहातील चित्र हे एकाच व्यक्तीचे, म्हणजेच जयपूरचा महाराजा माधोसिंह याचे आहे.<br><br>या चित्रावर greed काढलेली आहे. तसेच मंडळ संग्रहात मोठ्या आकाराचे तैलचित्र आहे. त्याला जुन्या पध्दतीची लाकडी चौकट आहे. या चित्रात व वरील भाइसं मंडळ चित्र क्र. ९१४ मध्ये तंतोतंत साम्य आहे. त्यांतील वरून greed असे अनुमान काढता येते की या छोट्या चित्रावरून मोठ्या आकारांतील हे तैलचित्र काढले गेले असावे. हे तैलचित्र चित्रकार R.K.Kelkar यांनी काढलेले आहे. (पाहा चित्र क्र. ९१४ आणि आ. क्र.१७) | | |
| १४. | २२ | **एक सरदार**<br>**असद खान लारी** | १७.७ x १२.० सेमी | चित्र क्र.९२२ च्या मागील बाजूस चिटकविलेल्या एका पातळ कागदावर हे चित्र काढलेले आहे. हे एक रेखाचित्र, वा मसविदा आहे. ज्यात रंग भरलेले नाहीत. या सरदाराने दख्खनी पद्धतीचा पूर्ण पायघोळ अंगरखा घातलेला आहे व | ----- | चित्र क्र.९२२ च्या मागील बाजूस हे चित्र आहे. त्याच्या वरील बाजूस डावीकडे आणि चित्राच्या खालील बाजूस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | डोक्यावर तसेच पागोटे ही आहे. दाढी आहे. त्याच्या डाव्या हातात लांब काठी असून उजव्या हातात स्मरणी आहे. कमरेला तलवार लटकवलेली आहे. '**असद खान लारी**' हा विजापूरचा बादशहा इस्माईल आदिलशहाचा सरदार होता. नंतर १५११ मध्ये बेळगावची जहागीर त्याला मिळाली. | | **असदखान लारी** असे लिहिलेले आहे. (फा) |
| १५. | ९२६ | **दारा शिकोह** | ६.६ x६ सेमी | चित्र धूसर झाल्याने त्यातील तपशील व्यवस्थित दिसत नाहीत. | ----- | **चार ओळींची कता/कित्ता.**<br>याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| १६. | ९३२ | **शाह अब्बास – १** | १५.४ x ९.१४ सेमी | प्रस्तुत चित्रातील व्यक्तिरेखा ही इराणचा सुलतान शाह अब्बास–१ याच्या चित्रांशी तंतोतंत जुळत आहे. त्याच्या पोशाखाची पध्दत, विशिष्ट प्रकारची टोपी, कॉलर असलेला लांब अंगरखा, पायातील गमबूट, कमरेला असलेली विशिष्ट वक्राकार आकाराची तलवार, विशिष्ट पध्दतीची लांब मिशी ही सर्व वैशिष्ट्ये 'शाह अब्बास–१ सुलतान' याच्या उपलब्ध चित्रांशी साम्य दाखवितात. त्यामुळे मंडळातील हे | ----- | या चित्राच्या मागे मार्बल पेपर वर फारसी मधून कित्ता लिहिलेला आहे.<br>याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | चित्र इराणचा 'सुलतान शाह अब्बास-१' याचे असावे. 'Aspects of Mughal Painting'-by S.P.Verma या पुस्तकातील Plate no. XIII या चित्रात 'शाह अब्बास-१' व जहांगीर बादशहाचा राजदूत 'आलम खान' यांच्या भेटीचे चित्रण केलेले आहे. (पाहा आ.क्र.१८) हा सफाविद राजवंशाचा ५वा व कर्तबगार सुलतान होता. जहांगीर याने खास या सुलतानाचे चित्र काढण्यासाठी दरबारी चित्रकार 'बिशनदास' याला पाठविले होते. त्यामुळे त्याने काढलेल्या चित्रांपैकी हे एक चित्र किंवा त्याच्या चित्रावरून केलेली नक्कल असू शकते. परंतु या चित्रावर व मागील बाजूस मुघल रिवाजाप्रमाणे चित्रकाराचे नाव नाही. त्यामुळे हे चित्र मूळ असण्याची शक्यता कमी वाटते. (पाहा चित्र क्र. ९३२ आणि आ.क्र. १९) | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | ११६० | **शाहआलम बादशहा** | | उभा शाहआलम बादशाहा; मुखाभोवती तेजोवलय. (पाहा चित्र क्र. ११६० आणि त्याची मागील बाजू) | **शाह आलम बादशाहाच्या चित्राच्या खाली फारसीतून लिहिलेले आहे. त्या ओळीतील–**<br>**१. उजवीकडच्या भागात सुरूवातीला पुढीलप्रमाणे लिहिलेले आहे.–'बादशाह–ए–जहान ओ जहानियान अबुल नासिर (?) कुतुब उद्दीन' (फा)**<br>**२. तर डावीकडच्या भागात–'शाह आलम बहादूर अफाक सेतान (समद मिरान ?)...' असे लिहिलेले आहे. (फा)** या लिखाणावरून हे चित्र शाह आलम बादशहा–१ला याचे असू शकते. कारण **कुतुब उद्दीन** ही उपाधी शाह आलम बादशहा–१ला याची होती. | **चित्राच्या मागील बाजूस डावीकडे मोडी लिपीतून 'शाहआलम' असे लिहिलेले आहे. (मो)** |

## २. ऐतिहासिक व्यक्तिचित्रे– स्त्री व्यक्तिचित्रे

मंडळ संग्रहात ऐतिहासिक पुरुष व्यक्तिचित्रांप्रमाणेच काही इतिहास प्रसिद्ध स्त्री व्यक्तिरेखाही आहेत. ही चित्रे देखील बैठी आणि उभी या पद्धतीने चितारलेली दिसतात. त्यांत २३ चित्रे ही बैठी आहेत, तर २८ चित्रे ही उभ्या स्त्री व्यक्तिरेखांची आहेत. यांतील काही स्त्री व्यक्तिचित्रे झरोका व समूह चित्रांमध्ये पण आलेली आहेत.

मंडळ संग्रहात साधारणपणे ५१ स्त्री व्यक्तिचित्रे आहेत. या चित्रांतून या व्यक्तिरेखा, तसेच त्यांच्या जीवनातील प्रसंग चित्रित करण्यात आलेले आहेत. या संग्रहात अनेक राजस्त्रियांची चित्रे आहेत. उदा. चांदबिबी, झेबुन्निसा, नादिरा बेगम... इत्यादी बादशहांच्या, राजांच्या जनानखान्यातील काही स्त्रियांची व्यक्तिचित्रे आणि अनेक झरोका चित्रे ही आहेत.या चित्रांमधून या राजस्त्रियांच्या दैनंदिन जीवनाचे दर्शन आपल्याला घडते. जसे कोणी राजस्त्री ही सुवर्ण मंचकावर बसून सतार वाजवून आपले मन रमवित आहे, तर कोणी बागेत अथवा गच्चीत बसून समोरील निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत आहे. त्यात एखादीच्या हातात क्वचित मद्याच्या प्याला दिसून येतो. तर काही उभ्या व्यक्तिचित्रांमधून एखादी बागेतून फेरफटका मारीत आहे. तिने अंगावरून शाल घेतलेली आहे. तर कोणी एखाद्या वृक्षाची छोटी फांदी पकडून रेलून उभी आहे. एखादी स्त्री हरणाशी खेळत आहे, तर कोणी त्याला खाऊ घालत आहे. कोणी पत्र वाचीत आहे. तर कोणी साहसी आहे.

या चित्रांत एका राजस्त्रीचे वैशिष्ट्यपूर्ण चित्र दिसते. यात तिच्या उजव्या हातावर एक ससाणा पक्षी, तर डाव्या हातात पुस्तक घेऊन ती उभी असल्याचे दाखविलेले आहे. यात तिची वस्त्रे, डोक्यावरील शिरपेच असलेला वैशिष्ट्यपूर्ण टोप असा पोशाख आहे.

या शिवाय सुप्रसिध्द व कर्तबगार इतिहास प्रसिद्ध व्यक्तिमत्व म्हणजे चांदबिबीची २–३ चित्रे मंडळ संग्रहात आहेत. त्यातील एका चित्रात ती घोड्यावर स्वार होऊन वेगाने जात आहे, तर दुसऱ्या एका चित्रात ती सिंहासनावर बसलेली दाखविलेली आहे.

काही ठिकाणी २–३ साध्वी स्त्रियांचे ही चित्रण केलेले दिसून येते. याप्रमाणेच 'शालभंजिका' चे चित्र देखील मंडळात आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाने हे चित्र प्रकाशित केलेले आहे.

या संग्रहाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ख्रिस्ती धर्माची व त्या अनुषंगाने स्त्रियांचीही चित्रे आपल्याला येथे दिसून येतात. या संग्रहातील काही ठराविकच स्त्री व्यक्तिरेखांची ओळख पटलेली आहे. काही चित्रांच्या समोरील बाजूस, वरील किंवा खालील बाजूस अथवा मागील बाजूस असलेल्या लेखांवरून त्यांची ओळख पटते. शिवाय इतर संग्रहांतील हुबेहुब तशाच चित्रांवरून, लेखांवरून त्यांची खात्री पटविण्यात आली आहे. उदा. चांदबिबी, झिबुन्निसा इ.

- मंडळ संग्रहातील ज्ञात स्त्री व्यक्तिचित्रे :- चांदबिबी, झिबुन्निसा, नादिरा बेगम, रंभा, आणि MadameLaDuches.
- मंडळ संग्रहातील अज्ञात स्त्री व्यक्तिचित्रे :- नूर जहान (नूरजहाँ), ताराबाई, कन्हा बेगम इत्यादी

पुढील तक्त्या मध्ये ग.ह खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली ऐतिहासिक स्त्री–चित्रे, आणि यातील काही चित्रांवरील फारसी वा मोडी लिखाणाचे यापूर्वी केले गेलेले वाचन, यांचा तपशील दिलेला आहे. तो पुढील प्रमाणे–

**संच क्र. १**

**मंडळ संग्रहातील ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली (ज्ञात)स्त्री–व्यक्तिचित्रे (एकूण ७ चित्रे)**

| अ. क्र. | भाइसं मंडळ चित्र क्र. | व्यक्तिनाम | आकार (सेमी) | चित्राचे वर्णन | चित्र शीर्षक (फारसी (फा) /मोडी (मो) /इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे)) | चित्राच्या मागील लेख (फारसी (फा) /मोडी (मो) /इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे)) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५२ | **झेबुन्निसा** | १७.७x१०.४ (सेमी) | मंडळ यादीत '*औरंगजेबकन्या झेबुन्निसा– गुडगुडी ओढीत झाडाच्या फांदीला धरुन उभी असलेली*' असे लिहिलेले आहे. परंतु ही औरंगजेबकन्या नसून दुसरी कोणी झेबुन्निसा असावी कारण तसे स्पष्ट करणारे इतर काही लेखन तेथे आढळत नाही. त्या काळी हे नाव खूप प्रचलित होते. (पाहा चित्र क्र. ५२) | चित्राच्या वरील बाजूस . तसवीर–ए–झेबुन्निसा असे लिहिलेले आहे. (फा) | पाठीमागे फारसीतून लेख |
| २. | *७८, *११४, | **चांदबिबी** | *१७.५x११.४(सेमी) *२२.६x२ | चांदबिबी ही विजापूरचा ४ था बादशाहा अली आदिलशहा १ला याची पत्नी व अहमदनगरचा निजामशहा बुऱ्हाणशहा याची बहीण होय. ❊ चित्र क्र.७८ –पंचकल्याणी घोड्यावर स्वार चांदबिबी. उजव्या | ❊ चित्र क्र.७८- या चित्राच्या वरील बाजूस नंतरच्या काळात चांदबिबी असे लिहिलेले आहे | ❊ चित्र क्र. १९९३ च्या पाठीमागे फारसीतून व त्याखाली नंतरच्या काळात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | *११९३<br>( चित्रे) | | २.८ (सेमी)<br>*३२.७x९.६ | हाताने घोड्याची लगाम पकडलेली असून डाव्या हातावर ससाणा पक्षी बसलेला आहे, अशी ती वेगाने दौडत जात आहे.<br>* चित्र क्र.११४ व चित्र क्र.१९९३ ही दोन्ही चित्रे तंतोतंत सारखी आहेत. यांमध्ये चांदबिबी सुलताना सिंहासनावर बसलेली आहे. हे चित्र वाममुखी एकचश्म पद्धतीचे आहे. याबद्दलची सविस्तर माहिती प्रकरण ४.३ ब) मधील 'विजापूर चित्रे यांमध्ये दिलेली आहे. (पाहा पृ.क्र. २००) (पाहा चित्र क्र.७८, चित्र क्र.११४, चित्र क्र १९९३, आ. क्र.२० आणि आ. क्र.२१ ) | (दे)<br>*चित्र क्र.११४च्या वरील बाजूस नंतरच्या काळात 'Chandbibi Queen of Ahmednagar' असे लिहिलेले आहे. (इं) | इंग्रजीतून **चांदबिबी सुलताना अहमदनगर** असे लिहिलेले आहे. (फा), (इं) |
| ४. | ७०९ | Madame La Duches | ---- | युरोपियन व्यक्तिचित्र. १४ व्या लुई ची नात व Duke of Lorraine & Bar Leopold 1st याची पत्नी, 'Madame La Duchess de Lorraine' हिचे हे छापील चित्र आहे. तिचे विवाहापूर्वीचे नाव 'Elizabeth Charlotte of Orleans' असे होते. (https://en.m.wikipedia.org). (पाहा चित्र क्र.७०९) | या चित्रावर खालील बाजूस फ्रेंच मधून 'Madame La Duchess de Lorraine' असे लिहिलेले आहे. | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | १०२७ | **नादिरा बेगम** | १५.२x७.६ (सेमी) | काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर एक राजस्त्री उभी आहे. तिने उजव्या हातात एक कागद धरलेला आहे. चेहऱ्यावरील हावभाव, वस्त्रांवरील बारीक सारीक तपशील कुशलतेने चित्रित केले आहेत. | या चित्राच्या वरती अलीकडच्या काळात पेनाने 'नादिरा बेगम', राजपुत्र दाराची बायको असे लिहिलेले आहे. (दे) | मागे दोन बदकांचे व छोटी टेकडी व झाडाचे, उडणाऱ्या पक्ष्यांचे चित्रण. |
| ६. | ११९४ | **रंभावती** | ३२.७x२४.१ (सेमी) | विजापूर शैलीतील चित्र. विजापूरचा सुलतान महंमद आदिलशहाची अत्यंत सौंदर्य संपन्न म्हणून प्रसिद्धीस असलेली नर्तकी, जी नंतर त्याची राणी झाली. एकचश्म पद्धतीचे चित्र आहे. संपूर्ण उष्ण रंगसंगतीत हे चित्र आहे.(पाहा चित्र क्र.११९४ आणि आ. क्र. २२) | -------- | मागील बाजूस **रंभावती** असे लिहिलेले आहे. (फा) |

**संच क्र. २**

**मंडळ संग्रहातील नव्याने ओळखलेली (अज्ञात)स्त्री–व्यक्तिचित्रे. आणि यातील काही चित्रांवरील फारसी व मोडी लिखाणाचे नव्याने करण्यात आलेले वाचन (ठळक़ अक्षरांमध्ये). (एकूण ८ चित्रे)**

| **अ.क्र..** | **भाइसंमंडळ चित्र क्र.** | **व्यक्तिनाम** | **आकार (सेमी)** | **चित्राचे वर्णन** | **चित्र शीर्षक (फारसी (फा) /मोडी (मो) /इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे))** | **चित्राच्या मागील लेख (फारसी (फा) /मोडी (मो) /इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे))** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५२ | **झेबुन्निसा** | | --------- | **तसवीर-ए-झेबुन्निसा** | हि ४ ओळींची पर्शियन प्रेम कविता आहे. याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| २. | *७०,<br>*३०९ | **नूरजहाँ** | * ----<br>*३.६x२.६ | *. मंडळ यादीत एक मुसलमान बेगम, वाममुखी असे वर्णन आहे. या तिन्ही चित्रांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की ही तीनही चित्रे एकाच स्त्रीची आहेत. | -------- | --------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | *५७४<br><br>(३ चित्रे) | | (सेमी)<br><br>९.१x६.६<br><br>(सेमी)<br><br>*१८.५x११.१<br><br>(सेमी) | मुघल बादशहा जहांगीर याची प्रिय, हुशार व कर्तबगार पत्नी नूरजहाँ हिच्या उपलब्ध चित्रांशी मिळती जुळती ही चित्रे आहेत. या तीनही चित्रांमध्ये तिच्या अंगावरील राजसी व नाविन्यपूर्ण पेहेराव व अलंकार आहेत. तिने डोक्यावर वैशिष्ट्यपूर्ण असा लांब, उंच असा मुगुट, उंच टोप घातलेला आहे. व तो अनेक मौल्यवान रत्नांनी, मोत्याच्या माळांनी आभूषित आहे. त्यांवर लांब तुरा व मौल्यवान शिरपेच लावलेला आहे. कपाळवर बिंदी लटकविलेली आहे. मुगुटावर डाव्या बाजूला एका लांब शेपटीच्या पक्ष्याचे मोहक चित्रण आहे. व त्याने मुगुटातील मोती चोचीत धरला आहे, असे जडावाचे काम आहे. मुकुटाच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत नाजूक मोत्यांची माळ गळ्याभोवती लटकवलेली आहे. अशा प्रकारचा मुकुट इराणी स्त्रिया वापरत असत. नूरजहाँ ही इराणकडच्या वस्त्रभूषणांच्या आधुनिक पद्धती (नव्हाळी) | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | इकडे चालू करीत असे.<br><br>❋ चित्र क्र.७०- या चित्रात नूरजहाँच्या सौंदर्याबरोबरच तिच्या चेहेऱ्यावरचे करारी भाव टिपण्यात कलाकार यशस्वी झाला आहे. तिने एका हातात मद्याचा प्याला तर दुसऱ्या हातात मद्याची सुरई घेतलेली आहे. या चित्राच्या बाजूने सोनेरी रंगात कलाकुसर केलेली आहे. तसेच संपूर्ण पानभर पर्शियन प्रभावातील भौमितिक आकारांची नक्षी व गडद निळा रंग वापरलेला आहे.<br><br>❋ चित्र क्र.३०९- जहांगीर कालीन व्यक्तिचित्राचा उत्तम नमुना म्हणून या चित्राकडे पहिले जाऊ शकते. यात नूरजहाँच्या सौंदर्याचे उत्कृष्ट चित्रण केलेले दिसून येते. यात तिने उजव्या हातात पांढऱ्या रंगाची नाजूक फुले घेतलेली आहेत. मागे हलक्या निळ्या रंगाचे सपाट लेपन आहे. त्याभोवती सोनेरी रंगावर नाजूक पानाफुलांची नक्षी | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे. बाकी सर्व पार्श्वभूमी साधी आहे, त्यामुळे पूर्ण लक्ष व्यक्तिचित्राकडे जाते.<br><br>*<u>चित्र क्र.५७४</u>- या चित्रात तिच्या चेहेऱ्याच्या मागे ठसठशीत वलय काढलेले आहे. पृष्ठभागावर सपाट तेजस्वी निळ्या रंगाचे लेपन केलेले आहे. चित्रामध्ये सोनेरी रंगाचा भरपूर वापर केलेला आहे. एकंदरीत चित्रणाच्या पद्धतीवरून हे चित्र नंतरच्या काळात काढले गेले असावे. | | |
| ३. | ७५ | **एका युरोपियन स्त्रीचे झरोका पद्धतीचे चित्र** | १७.७x१४.९<br><br>(सेमी) | --------- | -------- | चित्राच्या मागील या पानाच्या मधोमध चौकटीत एका गुलदस्त्याचे चित्रण केलेले आहे. त्याच्या वरील बाजूस दोन्हीकडे दोन उडणारे छोटे पक्षी चित्रित केलेले आहेत. या चौकटीच्या खाली **'मौलवी कासीम अली खान'** असे नाव लिहिलेले आहे (फा) कदाचित हे नाव या चित्राच्या मालकाचे, म्हणजेच |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | संग्राहकाचे असू शकते. |
| ४. | ३९२ | **एक स्त्री व्यक्तिचित्र** | १८x११.४ (सेमी) | एक उभी स्त्री; उजव्या हातात प्याला व डाव्या हातात मद्याची सुरई. | या चित्राच्या चारही बाजूंनी एकेका ओळींमध्ये फारसी लिखाण केलेले आहे. | **मागील बाजूस फारसी काव्य आहे.** (फा)<br>याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| ५ | ४०४ | **कन्हा अथवा कुस्ता बेगम** | १३.७x९.१ (सेमी) | चौरंगावर बसून स्नान करणारी एक स्त्री केसांतील पाणी निचळत आहे, असे चित्र. शहाजहान बादशहाच्या जनानखान्यातील एक हिंदू स्त्री.<br>(पाहा चित्र क्र. ४०४) | या चित्राच्या वरती **'तसवीर-ए-कन्हा बेगम'** असे लिहिलेले आहे. (फा) | या चित्राच्या मागील बाजूस फारसीतून एक कविता लिहिलेली आहे. याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. (पाहा पृ. क्र. २३१) |
| ६ | ५८२ | **ताराबाई एक दख्खनी स्त्री** | १५.२x१०.४ (सेमी) | मंडळ यादीत याचे वर्णन सव्यमुखी उभी ताराबाई ? असे आहे. तिने त्याकाळी घरंदाज स्त्रिया अंगावर घेत, तशी शाल पांघरलेली आहे. परंतु हे चित्र महाराणी ताराबाईचे नसून दुसऱ्या कोणा दख्खनी स्त्री– ताराबाईचे असावे. | --------- | **पाठीमागे ताराबाई असे लिहिलेले आहे. (मो)** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कारण तिचा पेहेराव, दागिने हे दख्खनी पद्धतीचे आहेत. मराठी पद्धतीचे नाहीत. (पाहा चित्र क्र. ५८२) | | |

अशा प्रकारे मंडळ संग्रहातील या स्त्री–चित्रांपैकी ५ ऐतिहासिक स्त्री व्यक्तिचित्रे नव्याने ओळखण्यात आली. तसेच ५ स्त्री चित्रांमागील फारसी व मोडी लेख नव्याने वाचण्यात आले.

### ३) समूह चित्रे व त्यांतील ऐतिहासिक व्यक्ती.

भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहात ८१ समूह चित्रे आहेत. यांमध्ये ऐतिहासिक व्यक्तींची चित्रे आहेत. ज्यांत त्यांच्या सोबत इतर १–२ व्यक्तींचीही चित्रे आहेत. म्हणून त्यांना समूह चित्रे असे म्हटले आहे.

या चित्रांत कोणी गच्चीत बसून गायन–वादनाचा आनंद घेत आहे, तर कोणी हुक्का पीत बसलेले आहे. तर एका चित्रात लैला मजनूला भेटण्यासाठी वनात आलेली आहे. कुणी बेगम पौर्णिमेच्या रात्री मंचकावर पहुडलेली असून संगीत ऐकत आहे, तर एखाद्या चित्रात एक राजस्त्री वनात साधूच्या दर्शनास गेलेली आहे, अशी दृश्यं चितारलेली आहेत.

यांतील काही व्यक्तिरेखा या ज्ञात आहेत तर काही अज्ञात आहेत. ज्ञात व्यक्तींच्या इतर साधर्म्य असलेल्या चित्रांशी तुलना करून ही चित्रे ओळखण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा. चित्र क्र.९२०– सवाई माधवराव पेशवे, हरीपंत फडके व महादजी शिंदे.

तसेच काही अज्ञात चित्रे पण इतर संग्रहातील साम्य असलेल्या चित्रांचा अभ्यास करून, चित्र वा लिखित पुरावा, यांवरून शोधण्याचा प्रयत्न केला आहे. उदा.चित्र क्र.३९६– हैद्राबादचा निज़ाम–अली खान व त्याचा मंत्री अरीस्तू जाह.

या समूह चित्रांमध्ये चौसर खेळणाऱ्या राजस्त्रिया आहेत, तर कोणी महालातील बगीच्यात कारंज्याभोवती बसून पेयाचा आनंद घेत आहेत. तर काही चित्रांत राजपुत्र त्याच्या सख्यांच्या बरोबर बसून संगीताचा आस्वाद घेत आहे. मग यात मागे कधी शांत जलाशय असेल तर कधी महालाची गच्ची दाखविलेली आहे.

याशिवाय योगी–साधू अथवा पीर–ज्ञानी मंडळी यांचा समूह एकत्र बसलेला आहे, असेही दृश्य चित्रित केलेले दिसून येते. यात काही साधूंचा समूह एकत्र कोंडाळे करून बसलेला आहे. कोणी योगमुद्रेत आहे, तर कोणी ध्यान करीत आहे. तर कोणी हुक्का पीत आहे असे दृश्य दिसते. शिवाय एका समूहात २ साधू खंजिरी आणि विणा वाजवत आहेत, तर दोघे त्यांच्या समोर बसले आहेत.

काही मुघल चित्रांमध्ये एखादा संत व त्यांच्या बरोबरीने शहजादा वनामध्ये बसून चर्चा करीत आहे अथवा धर्मोपदेश ऐकत आहे, अशी समूह चित्रे बऱ्यापैकी दिसून येतात. यांतील शहजादा हा दारा शिकोह असण्याची दाट शक्यता असते. कारण दारा शिकोहच्या इतर उपलब्ध चित्रांशी या चित्राचे कमालीचे साम्य जाणवते. उदा. चित्र क्र.२३.

या चित्रांत धर्मगुरूंची बैठक अशी देखील दृश्ये आहेत. उदा. चित्र क्र.(३१ब) या चित्रात निरनिराळ्या वेशभूषेतील १० धर्मगुरु समोरा समोर बसलेले आहेत व त्यांच्या मध्यभागी एक सुलतान हुक्का ओढत बसलेला आहे; त्याच्या डोक्याच्या मागे वलय दाखविले आहे. त्यांच्यात चर्चा चालू आहे, असे दृश्य दाखविलेले आहे. त्यांची वेशभूषा, तसेच पागोटे विशिष्ट पद्धतींचे आहेत. यांच्यात भगवी कफनी घातलेला एक हिंदू धर्मगुरु पण दाखविलेला आहे. हे सर्व जण नदीकाठी बसलेले आहेत. रात्रीचा प्रहर आहे. हे चित्र बहुधा बादशहा आणि साधू अथवा सुफी यांच्यातील महत्त्वाच्या प्रसंगाचे असावे.

आणखी एक चित्र, चित्र क्र.१०६, यामध्ये ५ बादशहा एकत्र बसलेले असून ते हुक्का पीत आहेत, असे दृश्य चित्रित केलेले आहे. दोन्ही बाजूला त्यांच्या मागे एक मोरचेलवाला व एक सेवक उभे आहेत. तर चित्राच्या उजव्या बाजूला खाली ४ स्त्रिया गायन वादन करीत आहेत. चित्राच्या पार्श्वभूमीला सरोवर आहे. आकाशात संध्याकाळचा देखावा दाखविला आहे. असे चित्र संयोजन आहे.

एका चित्रामध्ये ओढ्याच्या काठी बागेत एक बेगम मद्य पीत आहे, तर जवळ एक सखी गुडगुडी ओढत आहे. दुसरी सखी बेगमेला मद्याचा प्याला भरून देत आहे. तर दुसऱ्या बाजूला २ स्त्रिया गायन वादन करीत आहेत, असे दृश्य दाखविले आहे. बेगम व दोन सख्या यांच्या अंगात तलम कंचुकी असावी. एकंदर त्यांचा नाजूकपणा उत्कृष्टपणे दाखविला आहे.

संग्रहातील एका चित्रामध्ये पोलोसारखा खेळ बेगमाही खेळत आहेत असे दृश्य आहे. अकबराच्या जनानखान्यातील बेगमा हा खेळ खेळत असा उल्लेख 'ऐने अकबरीत' व 'अकबरनाम्या'त येतो. [पोतदार, मुजुमदार १९२१:१६ (८८)]

अशा प्रकारची अनेक चित्रे मंडळ संग्रहात आहेत. बादशहाच्या जनानखान्यातील स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाचे, विलासी जीवनाचे अथवा स्वत:चे मन रमविण्याच्या या गोष्टींचे चित्रण अनेक चित्रांतून दिसून येते.

मंडळ संग्रहात अजून १–२ वेगळी चित्रे आहेत. त्यांपैकी चित्र क्र.९७९ मध्ये बेगम व तिची सखी अंगणात फुलबाजी उडवत आहेत. मागे रात्रीच्या अंधारात आकाशात सुंदर आतषबाजी होत आहे. त्यांच्या मागे तीन दासी हातात सामान घेऊन उभ्या आहेत. दुसऱ्या एका चित्रात गच्चीवर बेगम व तिच्या सख्या किंवा दासी बसलेल्या आहेत. वर रात्रीच्या अंधारात आकाशात आतषबाजी होत आहे. तसेच मागे सरोवरात नौका आहे, त्यावरूनही दारूकाम होत आहे. बेगम या दृश्याचा आनंद घेत आहे, असे दृश्य चित्रित केलेले आहे.

या विषयांबरोबरीनेच ख्रिस्त धर्माशी निगडीत असलेली काही चित्रेही या संग्रहात पाहावयास मिळतात.

या समूह चित्रांच्या दोन्ही संचांत, संच क्र. १ व संच क्र. २ यांमध्ये काही शिकारदृश्ये, शृंगारदृश्ये व इतर ही काही चित्र समाविष्ट करण्यात आलेली आहे, ज्यांच्यांवर फारसी मधून लिखाण आहे. कारण त्या त्या चित्रांच्या विषयांनुसार सविस्तर वर्णनात तक्ता पद्धती वापरलेली नाही. ही चित्रे पुढील प्रमाणे –

**संच क्र. १**

**मंडळ संग्रहातील ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली (ज्ञात) समूह चित्रे व त्यांतील काही ऐतिहासिक व्यक्ती. (एकूण १२ चित्रे)**

| अ.क्र.. | भाइसं मंडळ चित्र क्र. | व्यक्तिनाम | आकार (सेमी) | चित्राचे वर्णन | चित्र शीर्षक (फारसी (फा) /मोडी (मो) /इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे)) | चित्राच्या मागील लेख (फारसी (फा) /मोडी (मो) /इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे)) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १३ | **सवाई माधवराव, हरिपंत फडके व महादजी शिंदे.** | २९.४x२५.४ (सेमी) | दरबारी चित्र आहे. सवाई माधवराव मसनदीवर बसलेले असून त्यांच्यासमोर हरिपंत फडके व महादजी शिंदे बसलेले आहेत. हा मूळ चित्राचा आराखडा– म्हणजेच मसविदा असावा. किंवा स्याह कलम पद्धतीतील चित्र. या तिघांचेही कपाळावरील गंध मात्र रंगीत, लाल रंगाने दाखविले आहे. चित्राला चारही बाजूनी पानाफुलांची नक्षी असलेली किनार आहे. | चित्राच्या वरील बाजूस देवनागरीमध्ये सवाई माधवराव– हरीपंत फडके व महादजी शिंदे असे लिहिलेले आहे. | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | ४४ | **युरोपियन विषयावरील समूह चित्र** | | ---------- | या चित्रावर खाली उजव्या बाजूस फारसीतून अमल–इ–मिर्झाकादिरहिरीव असे लिहिलेले आहे.. (Khare 1948:49). मजकुराचा उर्वरीत भाग खराब झालेला आहे. | |
| ३.. | ३३९ | **अकबर बादशहा मानसिंग व बिरबल** | १६.२x९.९ (सेमी) | एका गच्चीत वयोवृद्ध अकबर बादशहा एका उंच खुर्चीवर बसलेला असून, त्याच्या समोर राजा मानसिंग हात जोडून उभा आहे. अकबराच्या मागील बाजूस बिरबल हातात मोरचेल घेऊन उभा आहे, तर डाव्या हातातील तलवार सरळ उभी जमिनीला टेकविलेली आहे. अकबराच्या उजव्या हातात तुरा असून डाव्या हातील तलवार सरळ उभी जमिनीला टेकविलेली आहे. गळ्यात मोत्याच्या माळा आहेत. अकबर व मानसिंग यांच्या डोक्याच्या मागे सोनेरी रंगात वलय दाखविलेले आहे. मागे नदीचा शांत देखावा आहे. एकंदरीत या चित्रातील चित्रकाम पूर्वीच्या मुगल परंपरे इतके सफाईदार व उच्च दर्जाचे नाही. अगदीच सुमार वाटते. मूळ चित्राची नक्कल केलेली असण्याची शक्यता आहे. | या चित्राच्या वरील बाजूस राजस्थानी भाषेत– **मानसिंगजी आमेर १६३२ ; बादस्या अकबरस्या दरबार स १६३२ व बीरबल स१६३५** असे लिहिलेले आहे. (दे) | ----- |
| ४. | ३९६ | **निजामअली खान २रा** | २५.४x१७.५ (सेमी) | मंडळ सूचीमध्ये या चित्राचे *'एक मुसलमान बादशहा; डाव्या हातात पेला, समोर वजीर, मागे एक शिपाई.'* असे वर्णन आहे. नंतरच्या काळात त्याच्या पुढे– निजाम अल्ली खां–दुसरा; रस्तुजा मुशिरुल मुल्ख (वजीर) असे लिहिलेले आहे. परंतु सदरहू अभ्यासात इतर सर्व संदर्भ पहिले असता, | | ----- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | यातील पहिली व्यक्तिरेखा ही **हैद्राबादचा निजाम अली खान म्हणजेच आसफ जाहं – दुसरा** याची असून, त्याच्या पुढे रस्तुजा मुशिरुल मुल्ख (वजीर) ही व्यक्तिरेखा नसून, त्याचा वजीर **अरीस्तू जाह** हा बसलेला आहे. निझाम अली **खानं** २ रा याच्या इतर चित्रांवरून व अधिकृत संकेत स्थळावरील संदर्भावरून या चित्राची निश्चिती केली आहे. (blogs.bl.uk) (पाहा चित्र क्र. ३९६, आ. क्र. २२ व आ. क्र २३) | | |
| ५.. | ३९८ | **पहिले बाजीराव पेशवे व मल्हारराव होळकर** | २४.६x२०<br>(सेमी) | बाजीराव पेशवे व मल्हारराव होळकर शामियान्यात बसलेले असून पेशवे हुक्का पीत आहेत. मागे मोरचेलवाला उभा आहे. त्याच्या डाव्या हातात तलवार आहे. पेशव्यांच्या समोर मल्हारराव होळकर बसलेले असून त्यांच्या उजव्या हातातील तलवार मांडीवरून जमिनीवर टेकविलेली आहे. मंडळ यादीत या चित्राचे वर्णन *'थोरले बाजीराव हुक्का पीत. समोर मल्हारराव होळकर. मागे मोरचेलवाला'* असे आहे. परंतु या चित्रातील पेशव्यांचा चेहेरा याच संग्रहातील नानासाहेब पेशव्यांच्या चित्राशी मिळता जुळता आहे. तसेच समोर बसलेले मल्हारराव होळकर नसावेत. कारण मल्हारराव होळकरांच्या उपलब्ध चित्रांमध्ये व चित्रात साधर्म्य दिसून येत नाही. त्यांची चेहेरेपट्टी, पोशाख, पगडी, व मिशीची ठेवण यांत साम्य दिसून येत नाही. (पाहा चित्र क्र.३९८) | या चित्रात उजव्या बाजूला खाली इंग्रजीतूनU.N.NAVGIRE असे लिहिलेले आहे. (इं) त्यामुळे मूळ चित्रावरून नंतरच्या काळात हे चित्र काढले असण्याची जास्त शक्यता आहे. त्यामुळे हे चित्र अलिकडचे आहे, असे म्हणता येईल. | _____ |
| ६. | ४०३ | **नानासाहेब पेशवा** | ३२x२२.६ | पेशवा बाळाजी बाजीराव खुर्चीवर बसलेले असून समोर ९ स्त्रिया गायन वादन करीत आहेत. २ स्त्रिया नृत्य करीत आहेत. मागे एक सेविका पानाचा विडा | _____ | चित्राच्या मागे **श्रीमंत बाळाजी बाजीराव** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (सेमी) | देत आहे व एक मोरचेलधारी सेविका आहे. मराठा शैलीतील चित्र आहे. चित्रातील मागील तपशील, वाड्याची इमारत, मागील झाडे यांचे चित्रण मराठा शैली प्रमाणे आहे. पेशवे व त्यांच्या मागील दासींचे पेहेराव मराठी पद्धतीचे आहेत, तर समोरील गायन वादन करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण उत्तर हिंदुस्थानी– राजस्थानी पद्धतीचे आहे | | **प्रधान** व सिवरामाचे हातची तसबीर असे लिहिल्याचे मंडळ यादीत नमूद केलेले आहे. (दे) |
| ७. | ४९० | **सलीम व त्याचा गुरु** | २४.६x१६<br>(सेमी) | किशोर वयातील शहजादा सलीम व त्याच्या समोर त्याचा गुरु जेठा मारून (पायाला योगपट्टा बांधून) बसलेला आहे. सलीम त्याचा उपदेश ऐकत आहे. समोर १–२ पुस्तके आहेत. | चित्राच्या खालील बाजूस नंतरच्या काळात Prince Salim (afterwards Jahangir) & his teacher. असे लिहिलेले आहे. (इं) | ----- |
| ८. | ५२७ | ख्रिस्त जन्म | १९.३x१२.७<br>(सेमी) | यात बाळ येशू माता मेरीच्या मांडीवर बसलेला असून तीन राजे त्याला भेट देण्यासाठी आलेले आहेत, असे चित्रण आहे. (याबद्दलची सविस्तर माहिती प्र. ४.३ अ) युरोपीयन व्यक्तिचित्रे – संच क्र. २ मध्ये आलेली आहे. (पाहा पृ. क्र.१४०.) | चित्राच्या खाली 'ख्रिस्तजन्म' व 'The Birth of Christ' असे लिहिलेले आहे. (दे), (इं) | ----- |
| ९. | ८६४ | **चितोडचा राणा अमरसिंह** | ३८.८ x<br>२२.८<br>(go_r) | या चित्रात राणा अमरसिंह हत्तीवरून जात आहे. त्याच्या हातात अंकुश आहे. डोळ्याच्या मागे सोनेरी रंगाचे वलय आहे. मागे चवरीधर सेवक बसलेला आहे. हत्तीच्या पुढे ७ व मागे ३ सेवक हातात धनुष्य बाण, लांब भाले, काठ्या घेऊन चाललेले आहेत असे दृश्य आहे | खालील बाजूस हत्तीच्या पायाजवळ **तसवीरे राणा अमरसिंह** असे फारसीतून लिहिलेले आहे. | ------- |
| १०. | *८६६, | **सवाई माधवराव,** | २३.३ x | **<u>चित्र क्र. ८६६</u> – दरबारी चित्र आहे. सवाई माधवरावांसमोर हरीपंत | ------- | ------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | *९२० | **हरिपंत फडके व महादजी शिंदे रंगीत चित्र.** | १५.४ (go_r)<br>१९.३ x १५.४ (go_r) | फडके व महादजी शिंदे हाताची घडी घालून बसलेले आहेत. हरीपंतांच्या हातात कागद आहे.<br>*चित्र क्र. ९२० मध्ये सवाई माधवरावांच्या मागे हुजऱ्या दाखविलेला आहे, जो चित्र क्र. ८६६ मध्ये नाही.<br>चित्र क्र. ८६६ बऱ्यापैकी जीर्ण झालेले आहे व त्यातील रंग उडालेले आहेत व कडेने फाटलेले आहे. चित्र क्र. ९२० हे याच चित्रावरून नंतर काढले असावे. ही सर्व मराठा शैलीची चित्रे आहेत. | | |
| ११. | १००६ | **झेब–उन–निसा बेगम** | २१.८ x १४.२ (go_r) | एक बेगम गच्चीवर शामियान्यात लोडाला टेकून पहुडलेली आहे. तिच्या बाजूला एक दासी मद्याचा प्याला देत आहे, तर दुसरी पंख्याने वर घालीत आहे. समोर चार स्त्रिया गुजगोष्टी करीत आहेत. (पाहा चित्र क्र.१००६) | चित्राच्या वरील बाजूस फारसी मध्ये **झेब–उन–निसा बेगम** असे लिहिलेले आहे. | -------- |

संच क्र. २

**मंडळ संग्रहातील नव्याने अभ्यासलेली (अज्ञात) समूह चित्रे व त्यांतील काही ऐतिहासिक व्यक्ती. (एकूण १६चित्रे) –**

| अ.क्र.. | भाइसंमंडळ चित्र क्र. | व्यक्तिनाम | आकार (इंच) | चित्राचे वर्णन | चित्र शीर्षक (फारसी (फा) /मोडी (मो)/इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे) | चित्राच्या मागील लेख (फारसी (फा) /मोडी (मो)/इंग्रजी (इं)/ देवनागरी (दे)) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २३ | **दाराशिकोह** (?) | २०.३ x १५.४ (सेमी) | मंडळ यादीत या चित्राचे वर्णन– बादशाह सरदारास रत्न नजर करीत आहे– असे लिहिलेले आहे. मात्र या चित्रातील डावीकडील व्यक्तिरेखा ही शहाजादा दारा शिकोहशी जास्त मिळती जुळती वाटते | ------- | मागे शिकस्ता लिपीमध्ये लेख आहे. त्याखाली फारसी मध्ये **'दराई खान'** असे लिहिलेले आहे. मात्र या नावाच्या आधी 'अमल' हा शब्द नसल्याने हे या चित्राच्या चित्रकाराचे नाव असावे, असे खात्रीशीरपणे सांगू शकत नाही. त्यामुळे हे नाव व्यक्तिचित्रापेक्षा सुलेखनकाराचे असण्याची पेक्षा संग्रहाकाचे असण्याची शक्यता जास्त आहे. **(फा)** |
| २. | ३१ (ब) | **एक मुस्लिम धर्मगुरु व त्याचे १० अनुयायी** | ३०.४ x ४०.६ (सेमी) | एक मुसलमान बादशहा वा धर्मगुरु मध्यभागी गुडगुडी ओढत बसलेला आहे व त्याच्या दोन्ही बाजूला ५–५ असे १० अनुयायी बसलेले आहेत. रात्रीचा शांत देखावा आहे. यांमध्ये भगवी कफनी घातलेला एक हिंदू साधू आहे. भाइसं | या चित्राच्या खालील बाजूस उजवीकडे फारसीतून **अमल–इ–खानहझाद चितरमन** असे लिहिलेले आहे. म्हणजे हे चित्र चितरमन याने | याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मंडळ त्रै. ३:२–४ : १९२२/२३ : पृ.८५ यामधील 'Times of India Historical Research the Poona Society. An instructive Exhibtion' या लेखात या चित्राचे वर्णन 'Shaikh Sadi and his friends' असे केलेले आहे. (पाहा चित्र क्र. ३१ ब) मात्र हे चित्र शेख सादीचे असण्याची शकयता खूपच कमी आहे. कारण ही व्यक्तिरेखा व त्याचा पेहेराव हा एखाद्या भारतीय सुफी संत वा मुसलमान बादशहा सारखी आहे. इराणी पद्धतीची नाही. शिवाय शेख सादी हा सामान्य कवि होता. त्यामुळे त्याच्या चेहऱ्याच्या भोवती प्रभावलय दाखविणे शकय नाही. त्यामुळे हे चित्र दुसऱ्या कोणा महत्त्वाच्या सुफी धर्मगुरुचे असण्याची शकयता जास्त आहे. | काढलेले आहे.(Khare 1948:48) | |
| ३. | ७२ | **नदीवर स्नान करणाऱ्या राजस्त्रियचे समूह चित्र** | २९.२X२१.३<br>(सेमी) | ------- | ------- | की चार ओळींची कविता आहे. काझविन या शहरात फकीर मोहमद हुसैन याने हे सुलेखन केलेले आहे. परंतु याचा मागील चित्राशी काहीही संबंध दिसून येत नाही. (फा) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | ✻८२,✻ १२२१ | **हैद्राबादचा निजाम अली खान – २रा वत्याचा मंत्री अरीस्तू जाह** | ४१X३३ (सेमी) | ✻ चित्र क्र.३९६ या चित्रात हैद्राबादचा निझाम अली **खान**– २ रा व त्याचा मंत्री अरीस्तू जाह यांचे वार्तालाप करीत असतानाचे चित्रण आहे, हे आपण पूर्वसूरींनी ओळखलेली समूह चित्रे, क्र.४ मध्ये पहिले.<br><br>✻ चित्र क्र. ८२ च्या मागील बाजूस अगदी याच चित्राचा कच्चा आराखडा आहे, तर<br><br>✻ चित्र क्र.३९६ मध्ये याच आराखड्याचे बाजू बदलून रंगीत चित्र आहे. पुन्हा हेच संयोजन वापरून<br><br>✻ चित्र क्र.१२२१ मध्ये निझामाच्या दरबाराचे चित्रण केलेले आहे. चित्र क्र.३९६ या चित्राशी या दोन्ही चित्रांचा तुलनात्मक अभ्यास **केला असता** वरील दोन्ही चित्रे–चित्र क्र..८२ व चित्र क्र. १२२१ ही हैदराबादचा निजाम अली खान आसफ **जाह** व त्याचा वजीर अरीस्तू जाह यांचीच आहेत हे समोर आले. निझाम आली खान आसफ जाह - २ रा याच्या इतर चित्रांवरून व अधिकृत संकेत स्थळावरील संदर्भावरून या चित्रांची निश्चिती केली आहे. (blogs.bl.uk) | ------- | ------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (पाहा चित्र क्र.८२ –मागील बाजू, चित्र क्र ३९६ आणि चित्र क्र. १२२१) | | |
| ५. | ९० | **खंबायत**<br>रागिणीचे चित्र | ---------- | रागिणी खंबावतीचे चित्र. यात ब्रह्मदेव व त्यांच्या समोर एकस्त्री हात जोडून बसलेली आहे असे दृश्य आहे | ---------- | याचे सविस्तर वर्णन प्र. ४.३ ड) – 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |
| ६. | ३१८ | **पाच दख्खनी बादशहा** | १३.४X१९<br>(सेमी) | मंडळ यादीमध्य '*विजापूरचे सर्व बादशाह एकत्र बसलेले आहेत या कल्पनेचे एक दृश्य.*' असे लिहिलेले आहे. एका मोठ्या गालिच्यावर पाच बादशहा बसलेले असून त्यातील चार बादशहा गुडगुडी ओढत असून त्यातील एका बादशाहाच्या हातात मद्याचा प्याला आहे. मागे २ हुजरे, व समोर खालील बाजूस गायन वादन करणाऱ्या चार स्त्रिया आहेत. मागे नदीचे दृश्य आहे. मात्र या चित्रातील बादशाहांचे मंडळ संग्रहात असलेल्या विजापूरच्या बादशाहांच्या कुठल्याच बादशहाच्या व्यक्तिरेखेशी साम्य दिसून येत नाही. उदा. चेहेरेपट्टी, दाढी–मिशीची ठेवण, वेशभूषा, डोक्यावरील पगडी अथवा मुगुट, या कुठल्याच गोष्टींत साम्य दिसून येत नाही. याच संकल्पनेवर आधारित एक चित्र ब्रिटीश म्युझियमच्या संकेतस्थळावर आहे. तसेच मार्क झेब्रोस्की यांच्या Deccani Painting या | ---------- | ---------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुस्तकात पृ.क्र.१४५ वर ही छापलेले आहे. या**दोन्ही** चित्रातील सर्व व्यक्तिरेखा मंडळ संग्रहातील विजापूरच्या बादशाहांच्या इतर स्वतंत्र चित्रांशी मात्र तंतोतंत जुळत आहेत. (http://britishlibrary.typepad.co.uk)<br><br>(पाहा चित्र क्र. ३१८ व आ. क्र. २४)<br><br>या सर्वांवरून आपण असे अनुमान काढू शकतो, की चित्र क्र.३१८ हे चित्र विजापूरच्या पाच बादशाहांचे नसून त्या काळातील दुसऱ्या कोणा महत्वाच्या व्यक्तींचे अथवा बादशाहांचे असू शकते. | | |
| **७.** | **३३४** | शिकार दृश्य | २१.८X१५.२<br><br>(सेमी) | या चित्रात एक मुघल स्त्री व तिच्या सख्या शिकार करीत आहेत. | या चित्राच्या वरील बाजूस दोन ओळींचे फारसीतून लिखाण आहे. 'मी तुझ्या प्रेमात माझ्याकडे जे काही होते ते सर्व कशाचाही विचार न करता गमावले. यात्र माझ्या पापांपेक्षा तुझी क्षमा जास्त मोठी आहे, यात काही शंका नाही. (अल्लाह ला उद्देशून)' – (फा) असे लिहिलेले आहे. परंतु | ---------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खालील चित्रात एक बेगम व तिच्या सख्या आहे. मात्र चित्र एवढे सफाईदार नाही. | |
| ८. | ३३५ | एक स्त्री व तिच्या सोबत दोन लहान मुले | १३.७X६ (सेमी) | या चित्रात एक राणी व तिची दोन मुले एक मुलगा व एक लहान मुलगी आहेत. ते उजव्या हाताने सलाम करीत आहेत. या चित्राच्या चारही बाजूंनी चौकटींत फारसीमधून लिखाण केलेले आहे. एकंदरीत चित्रणावरून हे चित्र गोवळकोंडा शैलीचे वाटते. | ---------- | या चित्राच्या मागील बाजूस उभ्या चौकटी मध्ये फारसीमधून लिखाण केलेले आहे. याचे सविस्तर वर्णन (प्र. ४.३ अ) १४– 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. (पाहा पृ. क्र. २३३) |
| ९. | ३४० | स्याह कलम पद्धतीतील एक युरोपियन समूह चित्र | १८.५X१४.७ (सेमी) | या समूह चित्रात दोन पाश्चात्य पुरुष व एक स्त्री यांचे चित्रण आहे. यातील एका पुरुषाने हिंदुस्थानी पद्धतीचा पोशाख घातलेला असून त्यावर युरोपियन पद्धतीचा कोट घातलेला आहे. डोक्यावर मुघल पगडी घातलेली आहे. तो मागील घोड्याला टेकून उभा आहे. तर इतर दोघा स्त्री व पुरुषाने | ---------- | या चित्राच्या मागील बाजूस सुलेखनाचा सराव केलेला दिसतो.<br>याचे सविस्तर वर्णन (प्र. ४.३ अ) १४– 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मात्र युरोपियन पद्धतीचा पोशाख घातलेला आहे. त्यातील स्त्रीने हातात कुत्रे घेतलेले आहे. | | |
| १०. | ३८५ | शिकारदृश्य | १५.४**X**८.६ (सेमी) | ---------- | या चित्रात एकदम वरील बाजूस फारसी मधून भैरव असे लिहिलेले आहे. (फा) मात्र या खाली सिंह हरणाची शिकार करीत आहे. असे चित्र आहे. | ---------- |
| **१३.** | **९०४** | शिकारदृश्य | ३८.१**X**२१.८ (सेमी) | शिकारीसाठी चाललेला लवाजमा/शिकारखाना | --------- | **'**तसवीर–ए–सवारी शिकार महाराजा शाहू छत्रपती**'** – (फा), (दे) छत्रपती शाहू महाराजांचा शिकारीसाठी निघालेला शिकारखाना याचे चित्र |
| **१४.** | ९२५ | **इब्राहीम आदिलशहा २ रा** | २०.७**X**१४ (सेमी) | विजापूरचा एक बादशहा लोडाला टेकून बसलेला आहे. पायाशी एक सेवक त्याचे पाय दाबत आहे. समोर एक गायक गाणे गात असून बादशहा त्याचा आनंद घेत आहे, | चित्राच्या समोरील बाजूस खालील उजव्या कोपऱ्यात **साहेब–ए–आदिलखान पादशाह–ए–विजापूर** | चित्राच्या मागे इंग्रजी व देवनागरी मधून **विजापूरचा आदिलशहा पातशहा** असे लिहिलेले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | असे दृश्य यात चितारलेले आहे. या चित्रातील व्यक्तिरेखा ही विजापूरचा ५ वा बादशहा **इब्राहीम आदिलशहा** २ रा **याची आहे**. तो कलागुणांचा भोक्ता होता. तो स्वत:ला जगतगुरु म्हणवून घेत असे. भाइसं मंडळातील चित्र क्र.१०८ व **चित्र क्र.**११९० या चित्रांशी चित्र क्र. ९२५ मधील चेहऱ्**यात**बरेच साम्य दिसून येते. उदा. त्याचा टोप, दाढी, चेहऱ्याची ठेवण..इ. त्यावरून आपण असे म्हणू शकतो की हे चित्र विजापूरचा बादशहा दुसरा इब्राहीम आदिलशहा याचे असू शकते. (पाहा चित्र क्र.१०८; चित्र क्र.११९० आणि चित्र क्र.९२५) | असे लिहिलेले आहे. मुघल हे आदिलशहा बादशहांसाठी **'आदिलखान'** असा शब्द वापरत असत. | |
| १५. | १०८८ | आसावरी रागिणीचे दख्खनी चित्र | २१.३x१४.५ | आसावरी रागिणीचे दख्खनी चित्र | ---------- | चौकोनी आकारात नजर अली बहादूर असे लिहिलले आहे. |
| १६. | ११७३ | एक बेगम | ---------- | एक बेगम गच्चीत गालिच्यावर एका मोठ्या लोडाला टेकून बसलेली आहे. ती पोपटाला (काकाकुवा) खाऊ घालीत | ---------- | मागील बाजूस फारसी मधून एक काव्य आहे.<br>याचे सविस्तर वर्णन (प्र. ४.३ अ) १४– |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे. समोर एक स्त्री तंबोरा वाजवीत आहे, तर तिच्या पायाशी तिची सखी बसलेली आहे. | | 'फारसी वाचन' मध्ये आलेले आहे. (पाहा पृ. क्र. २३२) |
| १७. | १२१० | जहांगीरचा दरबार | २१.५X१६.५ (सेमी) | एक सिंहासनाधिष्ठीत मुगल बादशहाचे चित्र समोर गायन, वादन व नर्तन करणाऱ्या ८ स्त्रिया आणि मागे व पुढे ७ दासी दाखविलेल्या आहेत. खालच्या बाजूस उभा उमराव; दोन घोडे व इतर चार लोकांचे चित्रण केलेले आहे. चित्र बहुदा जहांगीरचे असावे असे मंडळ सूचित नमूद केलेले आहे. तसेच जहांगीर बादशाहाच्या इतर उपलब्ध चित्रांवरुन या चित्रातील बादशहा हा जहांगीरच असावा हे निश्चित होते. त्यामुळे हे चित्र जहांगीर बादशाहाच्या दरबाराचे चित्र आहे. असे आपण म्हणू शकतो. | ---------- | ---------- |

## ३. झरोका चित्रे

मंडळ संग्रहात ६५ झरोका चित्रे आहेत. हे मागे नमूद केले आहेच. एकचश्म पद्धतीची व वेगवेगळ्या स्त्रियांची उर्ध्वांग (halfbust) मधील चित्रे यांत आहेत. पूर्वीच्या काळी मुघल बादशाहा ठरविक वेळी खिडकीत– म्हणजेच झरोक्यात बसून प्रजेला दर्शन देत असत. याच धर्तीवर महालाच्या एका खास खिडकीत बसल्यावर समोरून, म्हणजे बाहेरील बाजूने दिसणारे चित्रण होय. कमानदार अथवा छत्री असलेली खिडकी व त्यावर काही कथा गोल गुंडाळून वर व खाली बांधलेला जाड कापडी पडदा असे बहुदा चित्रण दिसते. अशा खिडकीत म्हणजे झरोक्यात संबंधित राजस्त्री वा पुरुष चित्रित केलेले असतात. अर्थात ही चित्रे half bust असल्याने उभी का बसलेली हे ठरविणे अवघड आहे.

या चित्रांतील स्त्रियांनी नाना प्रकारच्या वेशभूषा केलेल्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे अलंकार, मोत्यांच्या माळा, तसेच वैशिष्ट्यपूर्ण मुकुट घातलेले आहेत. कधी या स्त्रियांच्या हातात फुले घेतलेली आहेत, तर कधी मद्याचा प्याला, तर कधी कोणाच्या हातावर छोटासा पक्षी बसलेला चितारलेला आहे.

झरोका पद्धतीच्या चित्रांमध्ये अनेक ललनांचे चित्रण केलेले आहे. त्यांमध्ये त्यांच्या सौंदर्याच्या विविध छटा टिपण्यात आलेल्या आहेत. यांत बेगामांची काही निवडक चित्रे तर आहेतच– पण त्या बरोबरीने राजे–महाराजे व बादशाहांच्या जनानखान्यांतील इतर स्त्रियांचेच (गणिकांचे) चित्रण जास्ती करून आढळून येते. पूर्वीच्या प्रथांनुसार राजस्त्रिया शक्यतो पडदा पद्धतीत असत. त्या सहसा सामान्यजनांसमोर येत नसत. त्यांची चित्रे ही त्यांच्या सौंदर्याची वर्णने ऐकून त्यानुसार काढली जात. त्यामुळे त्यांचे चित्रण हे काल्पनिक असण्याची शक्यता आहे. तर मुघल दरबारात कुशल स्त्री–चित्रकारही होत्या असा उल्लेख आपणास अनेक ठिकाणी आढळतो. तेव्हा काही बेगमांची चित्रे ही या स्त्री–चित्रकारांनी प्रत्यक्ष समोर बसून काढली असण्याचीही शक्यता असू शकते. मात्र त्याबद्दल ठोस असा संदर्भ सापडत नाही. (Verma 2009:230, 231)

लघुचित्रांमध्ये स्त्री–चित्रे विपुल प्रमाणात चितारली गेल्याचे दिसते. त्यांच्या व्यक्तिचित्रांबरोबरीने झरोका पद्धतीच्या चित्रांचे प्रमाण जास्त आहे. मुघलशैली प्रमाणे दख्खनी शैलींतही विशेषत:

१७व्या –१८व्या शतकात गोवळकोंडा व हैद्राबाद शैलीतील झरोका चित्रे विपुल प्रमाणात काढली गेली.

यातील काही चित्रांतून आपल्याला पर्शियन, स्थानिक भारतीय व नंतर पाश्चात्य युरोपियन शैलींचा प्रभाव व मिलाफ दिसून येतो. विशेष करून गोवळकोंडा शैलीच्या चित्रांमध्ये आणि नंतर मुघल व दख्खनी शैलीच्या संयोगातून हैद्राबाद शैलीतील उत्कृष्ट चित्रांची निर्मिती झाली. त्यामुळे गोवळकोंडा शैलीच्या चित्रांवर स्थानिक तत्त्वांबरोबरीनेच इराणी व पाश्चात्य तत्त्वांचाही प्रभाव दिसून येतो; चित्रातील स्त्रीने परिधान केलेले अत्यंत तलम व अर्धपारदर्शक असे गुलाबी वस्त्र, ज्यातून छातीचा भाग स्पष्ट दिसून येतो, कुरळे केस, कमरेचे सोनेरी वस्त्र–ज्यावर सौंदर्याचे प्रतीक असलेल्या गुलाबाच्या फुलांची नक्षी आहे, गळ्यात कंठापासून लांबपर्यंत भरपूर मोत्याच्या माळा आणि एका हातात एक छोटासा पक्षी घेतलेला. असे खास गोवळकोंडा शैलीचे चित्र आहे. (Zebrowski1983:201). मार्क झेब्रोवस्की यांच्या Deccani Painting या पुस्तकामध्ये अगदी असेच एक चित्र पृ. क्र. २०६ वर छापलेले आहे. मंडळ संग्रहात या प्रकारची ३ चित्रे आहेत. उदा. चित्र क्र.५३४, चित्र क्र.५९६ व चित्र क्र.५९७. (पाहा चित्र क्र. ५३४)

या चित्रांमध्ये मुस्लीम स्त्रियांच्या बरोबरीने हिंदू स्त्रियांचीही चित्रे आहेत. त्यांनी डोक्यावर साडीच्या पदरासारखी ओढणी घेतलेली आहे. उदा. चित्र क्र.६, चित्र क्र.३५७, चित्र क्र.५७५, चित्र क्र.७१७.

प्रस्तुत संग्रहात काही चित्रे ही फक्त बाजूच्या फरकाने अगदी एक सारखी आहेत. म्हणजे जर एखाद्या वाममुखी स्त्रीने उजव्या हातात मद्याचा प्याला व डाव्या हातात सुरई धरलेली असेल, तर दुसऱ्या एका चित्रात तीच स्त्री सव्यमुखी दाखविलेली असते आणि तिने डाव्या हातात मद्याचा प्याला व उजव्या हातात सुरई धरलेली असते. उदा. चित्र क्र.४०६ व चित्र क्र.७२४.

यावरून असे लक्षात येते की एकच चित्र डावी–उजवी बाजू बदलून पुन्हा काढलेली आहेत. म्हणजेच मागणीनुसार एकाच चित्राच्या अनेक प्रती काढल्या जात असाव्यात. यातील काही प्रती हुबेहूब व चांगल्या दर्जाच्या आहेत तर काही अगदीच सुमार दर्जाच्या आहेत. उदा.चित्र क्र.७४० व

चित्र क्र.७४१(ब), चित्र क्र.७४४ व चित्र क्र.७४५, चित्र क्र.५९६ व चित्र क्र.५९७, चित्र क्र.५३४....अशी अनेक चित्रे या संग्रहात आहेत. बहुदा एखाद्या सजावटीत दोन्ही बाजूच्या चित्रांचे हे असे चित्रांकन करीत असावेत का ? असा प्रश्न येथे पडतो. (पाहा चित्र क्र. ७४० व चित्र क्र. ७४१(ब))

**संच क्र.१.**

झरोका चित्रांतील पूर्वसूरींनी ओळखलेले एक झरोका चित्र म्हणजे

**चित्र क्र.९– वामावर्ती जहांगीर बादशहा–** हे चित्र अनेक पुस्तकांमधून पहावयास मिळते. त्यात जहांगीर बादशाहाने Madona-mother Mary चे चित्र हातात धरलेले आहे, असे चित्रण असते. हे त्याचे प्रसिद्ध चित्र आहे.

परंतु मंडळ संग्रहातील, चित्र क्र.९ हे चित्र जहांगीरच्या या सुप्रसिद्ध चित्राच्या जवळ जाते. मात्र येथे त्याच्या हातात मद्याच्या प्याला दाखविलेला आहे. इतर मुघल चित्रांप्रमाणेच या चित्रालाही सोनेरी रंगाच्या वेलपत्तीच्या चौकटींनी सजविलेले आहे. हे **येथे**नव्याने सांगता येईल. (पाहा चित्र क्र. ९)

**संच क्र.२.** सदर अभ्यासांती नव्याने समोर आलेले आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत नावे नसलेले झरोका चित्र पुढीलप्रमाणे –

**चित्र क्र.७०; चित्र क्र.३०९ व चित्र क्र.५७४ ही चित्रे 'नूरजहानची' आहेत, हे नव्याने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. याचा उल्लेख पान क्र. १११ ते ११३ वर आलेला आहे.**

मंडळ संग्रहातील झरोका चित्रांतील अनेक स्त्री व्यक्तिरेखा या ऐतिहासिक राजस्त्रिया असू शकतात. मात्र त्यांच्याबद्दल निश्चित असे संदर्भ चित्रे व माहिती उपलब्ध न झाल्याने सध्यातरी यांतील काही चित्रे ओळखता आलेली नाहीत. त्यामुळे त्यांची निश्चित अशी ओळख पटविणे शक्य होत नाही. उदा. नादिरा बेगम चे चित्र काही ठिकाणी 'जहाँआरा बेगम' या नावाने प्रसिद्ध आहे. तसेच जानी बेगम

अर्जुमंद बेगम उर्फ मुमताज महल शहाजहानची बायको, झेबुन्निसा, साहिला बानू बेगम – मुहम्मदशहा बादशहाची बायको यांच्या उपलब्ध चित्रांसारखी चित्रे मंडळाच्या या चित्रांत आहेत. पण ठोस संदर्भांअभावी त्यांबद्दल निश्चितपणे सांगू शकत नाही.

## ५. युरोपियन व्यक्तिचित्रे

भारत इतिहास संशोधक मंडळातील अजून एक वैशिष्टयपूर्ण म्हणता येईल, ख्रिस्ती विषयाशी संबंधीत असला तरी ती असा संग्रह म्हणजे युरोपियन व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. यामध्ये ३० चित्रे आहेत.

ग.ह.खरेंनी मंडळातील 'जुनी'चित्रे या लेखामध्ये पाश्चात्य चित्रांसाठी ख्रिस्ती चित्रे असा शब्द प्रयोग केलेला आहे. परंतु या सर्व चित्रांचा अभ्यासकेल्यानंतर, ही सर्व चित्रे युरोपियन चित्रांच्या थेट प्रभावातून निर्माण झालेली चित्रे आहेत असे दिसते.

यातील जी चित्रे हाताने; म्हणजे जलरंग व कुंचल्याच्या (brush) साहाय्याने काढलेली आहेत, अशी साधारण ३० चित्रे यात आहेत. या प्रकारच्या चित्रांमध्ये युरोपियन स्त्री–पुरुषांचे व काही प्रसंग चित्रांचे भारतीय लघुचित्र शैलीप्रमाणे जलरंगामध्ये चित्रण केलेले आहे. यासाठी पारदर्शी, अपारदर्शी व सोनेरी रंगांचा वापर केलेला आहे. तर काही चित्रे स्याह–कलम व नीम–कलम पद्धतीने काढलेली आहेत.अकबर व जहांगीर काळात त्यांच्या दरबारी पाश्चात्य व्यापारी भारतात येत. पाश्चात्य पद्धतीची चित्रे, त्यांच्या प्रिंट्स (prints), लिथोग्राफ्स ते बादशाहांना भेट म्हणून देत असत. मुगल दरबारातील चित्रकार या चित्रांची उत्तम प्रकारे नकल करीत असत.(Milo 1992:54)

प्रस्तुत संग्रहातील हिंदुस्थानी धाटणीची ही पाश्चात्य व्यक्तिरेखांची चित्रे याच प्रकारातील आहेत. पाश्चात्य प्रिंट्सवरून नकल केल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यांचे चित्रण हे भारतीय पद्धतीचे एकचश्म नसून पाश्चात्य पद्धतीचे, समोरून पाहिल्यासारखे आहेत. या चित्रांना भारतीय लघुचित्रांप्रमाणेच सुंदर नक्षीकाम केलेल्या मोठ्या जाड कागदांवर चिटकवलेले आहे. तसेच पारंपारिक फुला–पानांची

वेलबुट्टीची हशिया म्हणजेच चौकटही रंगविलेली आहे. यांवरून आपण असे म्हणू शकतो. की नंतरच्या काळातील लघुचित्रांतील व्यक्तिचित्रणाचा हा एक वेगळा प्रकार प्रचलित झालेला दिसून येतो. या चित्रांतील स्त्रियांचे पोशाख, केशभूषा या पूर्णपणे पाश्चात्य आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे या चित्रांत स्त्रियांच्या छातीपर्यंतचा भाग उघडा दाखविलेला आहे. काहींनी भारतीय स्त्रियांप्रमाणे गळ्यात मोत्यांच्या माळा घातलेल्या आहेत. तसेच भारतीय शैली प्रमाणे काहींच्या एका हातात सुवासिक फुलं आहेत, तर काहींच्या हातात मद्याचा प्याला व सुरई दाखविलेली आहे.

यातील युरोपियन स्त्री व पुरुषांची जी व्यक्तिचित्रे आहेत, त्यात काही चित्रे भारतीय लघुचित्र शैलीतील झरोका पद्धतीची चित्रे आहेत. अशी एकूण ११ चित्रे या संग्रहात आहेत. यात १० चित्रे ही स्त्री–व्यक्तिचित्रांची आहेत, यातील काही युरोपियन स्त्रीयांनी भारतीय पोशाख, दागिने परिधान केलेले आहेत. तर एक पुरुष व्यक्तिचित्र आहे. ही सर्व चित्रे भारतीय लघुचित्र शैलीनुसार अपारदर्शी रंग व सोनेरी रंग यांनी कागदावर काढलेली आहेत. याशिवाय त्यांची विविध आविर्भावातील चित्रे आहेत. उदा.– मंचकावर बसून मद्याचा आस्वाद घेणारी युरोपियन स्त्री इत्यादी परंतु अशाच प्रकारचे एक चित्र इंग्रज अधिकाऱ्याचेही आहे, एकमेकांशी गप्पा मारतानाचे दोन इंग्रज अधिकारी, तसेच यात घोड्यावर बसून रपेट करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांची ४–५ चित्रे आहेत. प्रसंग चित्रांमध्ये व्हर्जिन मेरी आणि ग़ॅब्रीयल , ख्रिस्त जन्म, आकाशातील बाल देवदूत वाद्ये वाजविताना चे चित्र, देखावा, ख्रिस्ताचे दफन... असे काही प्रसंग चितारलेले आहेत. अशी एकूण ९ प्रसंग चित्रे येथे आहेत. याची नोंद मागे घेतली आहेच

मात्र विषय जरी पाश्चात्य असले, तरी त्यांच्या चित्रणाची सपाट रंगलेपनाची पद्धत भारतीय लघुचित्रशैलीची असल्याने भारतीय व पाश्चात्य तंत्राचा सुंदर मिलाफ या चित्रांमधून झालेला आपणास पाहावयास मिळतो. शिवाय या पाश्चात्य चित्रांत भारतीय पेहराव, दागिने, पार्श्वभूमी, वास्तूंची झलक पाहावयास मिळते. ही चित्रे बऱ्यापैकी निमकलम (washtechnique) या प्रकारामध्ये झालेली दिसून येतात. यात सोनेरी रंगाचा वापर चित्रातील व्यक्तींचे कपडे,दागिने, मुकुट व त्यांच्या मागील प्रभावलय दाखविण्यासाठी केल्याचे दिसते.

तसेच याच सुमारास प्रिंट मधील छायाभेद (shading) दर्शविण्यासाठी काळ्या रंगाच्या शाईने बारीक ब्रशच्या सहाय्याने बारीक बारीक समांतर रेषा वा crosshatching या तंत्राचा पण उपयोग केलेला दिसून येतो. की चित्रे स्याह–कलम पद्धतीची आहेत (Hannam 2013). (उदा. चित्र क्र. ३४०). Engravedlines वरून चित्र copy करण्याच्या प्रयत्नात अशा प्रकारच्या तंत्राने चित्रण होत असे (crosshatching) जेणे करून त्या चित्रात छायाभेद व त्रिमितीचा उत्तम आविष्कार साधला जात असे.

अशा प्रकारे ही सर्व चित्रे स्याह कलम, नीम कलम पद्धतीने चितारलेली आहेत. तर काही भारतीय लघुचित्रशैलीप्रमाणे पारदर्शी व अपारदर्शी रंगात रंगविलेली आहेत. ही चित्रे पुढील प्रमाणे आहेत–

**संच क्र.१.**

**१) चित्र क्र.५२१ – पुरुष व्यक्तिचित्र–झरोका : –** (१३.७x८.६)

ग. ह. खरेंच्या मंडळ यादीत या चित्राचा ड्युक ऑफ मार्लबरो (Duke of Marlborough) असा उल्लेख केलेला आहे. तसेच या चित्राच्या खाली देवनागरीतूनही नंतरच्या काळात हे नाव लिहिलेले आहे. या नावानुसार या व्यक्तिरेखेचा शोध घेतला असता, इंग्लंडच्या राजसत्तेच्या सैन्याचा सरसेनापती (Commanderin Cheif), John Churchill, 1st Duke of Marlborough याच्या चित्रात आणि मंडळ संग्रहातील या चित्रात साम्य दिसून येते. (www.npg.org.uk)

मंडळ संग्रहातील हे चित्र झरोका पद्धतीचे असून जलरंगात रंगविलेले आहे. पार्श्वभूमीत तेजस्वी निळा रंग आहे. चित्राच्या वर व खाली झरोका पद्धतीप्रमाणे कापडी पडदा गुंडाळलेला दाखविलेला आहे. चारी बाजूंनी लाल रंगाची चौकट आहे. त्यात सोनेरी रंगानी नाजूक वेलपत्तीचे चित्रण केलेले आहे. हे चित्र एका मोठ्या जाड कागदावर चिटकवलेले आहे. त्याला कडेने थोडी मोठ्या आकाराची चौकट आहे. (पाहा चित्र क्र.५२१)

<u>संच क्र.२.</u>

१) **चित्र क्र.७५ स्त्री व्यक्तिचित्र–(झरोका चित्र) :–** (१८.५x१४.९) सेमी

या चित्रात एक युरोपियन युवती झरोक्यात उभी दाखविलेली आहे. तिने पाश्चात्य पद्धतीचा गडद लाल रंगाचा, मोठ्या गळ्याचा पोशाख ज्याला गाऊन म्हणता येईल घातलेला आहे. त्यावर सोनेरी फुलांची नक्षी आहे. छातीपर्यंतचा भाग निम्मा उघडा आहे. गळ्यात मोत्याच्या माळा आहेत. छोटे कुरळे केस मोकळे सोडलेले आहेत. समोरील केस छोट्या गोल चापाने (clip) बांधलेले आहेत. कानांत कर्णफुले आहेत. तिच्या डोक्याच्या मागेही सोनेरी रंगात ठसठशीत वलय दाखविले आहे. तसेच तिच्या चित्राभोवती सुबक काम केलेली महिरप, सोनेरी रंगातील किनार, पाना–फुलांचे चित्रण केलेले आहे. एका संपूर्ण पानभर सोनेरी रंगात व त्यावर पानं–फुलं व वेलींचे चित्रण केलेल्या मोठ्या जाड कागदावर हे चित्र चिटकवलेले आहे. त्यावरून हे चित्र कोणा महत्त्वाच्या पाश्चात्य स्त्रीचे असावे. या चित्राच्या मागे एका मोठ्या चौकटीत मोठ्या फुलं व पानांचे गुलदस्ता पद्धतीचे चित्रण केलेले आहे. त्यात वरच्या बाजूला रंगीत छोटे पक्षी उडताना दाखविलेले आहेत, तर खालील बाजूस दोन मोठे पक्षी उभे आहेत असे चित्रण केलेले आहे. एकंदरीत अतिशय सुंदर रंगसंगती, बारीक, सुबक काम केलेले आहे. या चौकटीच्या खाली फारसीतून **'मौलवी कासीम अली खान'**असे लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र. ७५) मात्र या नावाच्या पुढे अमल हा शब्द नसल्याने ते नाव चित्रकाराचे नसावे. मग हे नाव या चित्राच्या संग्रहकाचे असावे का ? असा प्रश्न येथे निर्माण होतो.

२) **चित्र क्र.३४० समूह चित्र :– (७.३ x ५.८)**

दोन युरोपियन पुरुष व एक स्त्री. सर्वांचे पेहेराव हे भारतीय आहेत. एकाच्या डोक्यावर मुघल पद्धतीचा भारतीय टोप आहे व स्त्रीने डोक्याला रुमालासारखे वस्त्र गुंडाळलेले आहे. तिच्या हातात कुत्रा आहे तर मधला पुरुष घोड्याला रेलून उभा आहे. त्याच्या उजव्या बाजूस

एक युरोपियन पुरुष उभा आहे. स्याह–कलम पद्धतीचे चित्र आहे. छापील चित्राप्रमाणे (लिथोप्रिंट) काळ्या रंगाच्या शाईने बारीक ब्रशच्या सहाय्याने तिरप्या रेषा, crosshatching ने छायाभेद व त्रिमिती दर्शविलेली आहे. या चित्राच्या मागील बाजूस सुलेखनाचा सराव केलेला दिसतो. या पानावर मध्यभागी ठळक अक्षरात एक ओळ लिहिलेली आहे; त्यात **'सामावत अल–अर्ज'** असे, म्हणजे **'आकाश आणि पृथ्वी'** असे लिहिले आहे. कुराण मध्ये आकाश आणि पृथ्वीचा स्वामी (Lordof) Skies&Earth असे वर्णन सहसा आढळून येते. या सुलेखानाची शैली अकबराच्या फर्मानाच्या शैलींशी मिळती जुळती वाटते. त्यामुळे या चित्राच्या मागील शिकस्ता लेखन हे त्याच्या लेखन शैलीवरून अकबरकालीन वाटते.

३) **चित्र क्र.५२७– ख्रिस्त जन्म:–**(७.६ x ५)

ख्रिस्त जन्माचे चित्र. मदर मेरीच्या मांडीवर बाल येशू बसलेला आहे. मदर मेरीचे चित्रण भारतीय पद्धतीने केलेले आहे. डोक्यामागे सोनेरी रंगात मोठे वलय आहे. तिच्या मागे व आजूबाजूला ४ व्यक्तिरेखा दाखविलेल्या आहेत. त्यात मदर मेरीच्या मागे व उजव्या हाताला दोन स्त्री देवता दाखविलेल्या आहेत; ज्या बाल येशूच्या जन्मानंतर शुभेच्छा देण्यासाठी व भेटवस्तू घेऊन आलेल्या आहेत. समोर एक व्यक्ती आहे, त्याने डोक्यावर पाश्चात्य पद्धतीची टोपी घातलेली आहे. किंमती रत्नांनी जडविलेला वेष घातलेला असून कमरेला कट्यार व तलवार ही आहे. याच्या हातात द्राक्षांचा घड आहे.

या संबंधित कथेप्रमाणे येशूच्या जन्मानंतर त्याला शुभेच्छा व भेटवस्तू देण्यासाठी पर्शियामधून तीन राजे अथवा त्यांना Bible मध्ये Three wise Men असे संबोधिले जाते; ते आलेले आहेत. त्यांची नावे Casper (Gaspar) 'king of Sheba., Melchior - king of Arabia' आणि Balthasar 'king of Egypt' अशी आहेत. येताना त्यांनी बाळ येशूसाठी भेटवस्तू आणलेल्या आहेत. Caspar ने gold, Melchior ने Frankincense व

Balthasar ने Myrrh (used to anoint the dead) अशा भेटवस्तू दिलेल्या आहेत. (www.whychirstians.com).

मुघल काळात व उत्तर मुघल काळातही Madona & Child या विषयावर अनेक चित्रे या प्रकारांत काढली गेली. सर्वसाधारणपणे अशा चित्रांमधून वर उल्लेखिलेले तीन राजे म्हणजे भुऱ्या अथवा तपकिरी रंगाच्या केसांचा Caspar, जो मदर मेरीच्या मागे चित्रित केलेला आहे तर डाव्या पांढऱ्या दाढीतील Melchior व समोरील कृष्ण वर्णाचा Balthazar याचे चित्रण केलेले असते. मंडळ संग्रहातील या चित्रात मदर मेरीच्या मागील बाजूस असलेला Caspar व उजव्या बाजूला मोठा पडदा हातात धरलेल्या Melchior यांच्या ऐवजी स्त्री देवतांचे (Angels) चित्रण केलेले आहे. त्यांनी मुगल पद्धतीचे मुकुट परिधान केलेले आहेत. देवतांच्या डोक्यावर मुघल पद्धतीचे मुकुट आहेत.हे सर्व चित्रण नीम कलम पद्धतीने केलेले आहे (washtechnique). तर समोरील पुरुषाने मात्र युरोपियन पद्धतीची उंच टोपी (hat) घातलेली आहे. त्यामुळे मंडळ संग्रहातील हे चित्र इतर उपलब्ध चित्रांपेक्षा थोडे वेगळे आहे. मागे मुघल पद्धतीचा महाल आहे. मागील वास्तूचे चित्रण याच संग्रहातील चित्र क्र.४४ मधील मागच्या बाजूस चित्रित केलेल्या वास्तूसारखेच आहे. साधारण एकाच काळातील प्रिंट्स वरून या चित्रांची नकल (copying) झाली असावी असे दिसते. चित्रात तपकिरी व सोनेरी रंगांनी आकृत्यांना उठाव दिलेला आहे. मोत्याचे दागिने व फुले पांढऱ्या रंगाने दाखविलेली आहेत. या चित्राला सोनेरी रंगाची चौकट आहे. (पाहा चित्र क्र.५२७ व आ.क्र.२५). अगदी याच विषयावरील एक चित्र नाना फडणीस संग्रहातील असून ते सध्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालय, मुंबई येथे आहे. हे मुघल शैलीतील चित्र असून त्याचा कालखंड १६२०–३० असा आहे.

४) **चित्र क्र. ७११– जोसेफ, माता मेरी व बाळ येशू– (HolyFamily):-** (१९.३x१४.४)

जोसेफ, माता मेरी व बाळ येशू– यांचे हे चित्र आहे. बाळ येशू जोसेफच्या मांडीवर आहे, शेजारी माता मेरी आहे. लंबवृर्तुळाकृती आकारात हे चित्र चित्रित केलेले आहे. त्याभोवती सोनेरी रंगाची किनार आहे. बाजूने पानभर सोनेरी रंगात वेलपत्तींची नक्षी असून त्यानंतर निळ्या रंगाची चौकट आहे.

५) **चित्र क्र.७३१ एक ख्रिश्चन (नन) :–** (८.६x५.५)

एक ख्रिश्चन नन हातात एकताऱ्यासारखे वाद्य घेऊन उभी आहे. त्यात मागे फिकट हिरवा रंग दिलेला असून दूरवर आकाशात निळ्या रंगात ढग दाखविलेले आहेत. दख्खनी योगिनींच्या चित्राच्या आधारावर बहुदा हे चित्र काढलेले आहे. शांत व प्रसन्न चेहरा तिच्यातील देवत्व दाखविण्यासाठी तिच्या डोक्यामागे सोनेरी रंगात प्रभावलय दाखविलेले आहे. (पाहा चित्र क्र.७३१)

६) **प्रसंग चित्रे**

भाइसं मंडळातील संग्रहात इतर वेगवेगळ्या प्रसंगांवर आधारीत चित्रे आहेत. या सर्व चित्रांचे त्या त्या विषयांनुसार वर्गीकरण केल्यास पुढील प्रमाणे प्रकार पडतात –

६.१. शिकारीची दृश्ये

६.२. दरबारी दृश्ये

६.३. शृंगार दृश्ये

६.४. स्नान शृंगार करणाऱ्या स्त्रिया

## ६.१. शिकारीची दृश्ये

या प्रकारच्या चित्रांमध्ये राजे–महाराजे, बादशाहा, बेगम यांना शिकार करताना चित्रित केलेले आहे वाघ–सिंह व काळवीट, रानडुकरं यांच्या शिकारीची चित्रे आहेत. या चित्रातून कधी राजा किंवा एखादा वीर एकटाच वाघ किंवा सिंहाशी झुंजत आहे, तर काही चित्रांमधून राजाबरोबर त्याचा शिकारी लवाजमा पण त्याच्या सोबत दिसून येतो. या चित्रातून, सहकारी, शिपायांची फौज, शिकारी कुत्रे, ससाणे इत्यादीचे बारीक सारीक तपशीलवार चित्रण या चित्रांतून केलेले आहे.

भाइसं मंडळ संग्रहातील शिकारी दृश्यांच्या चित्रांत आपणास काही मुघल, राजपूत, दख्खनी व मराठा शैलीतील चित्रे पाहावयास मिळतात. अशा या संग्रहातील काही ज्ञात व अज्ञात चित्रांचे वर्णन पुढील प्रमाणे –

**संच क्र.१.**

**चित्र क्र.४१ जहांगीर बादशहा शिकार करताना** (१७x१२.१) **:–** या चित्रात जहांगीर बादशाहा हत्तीवरून बंदुकीने वाघाची शिकार करीत आहे. वाघाने हौद्यापर्यंत उडी घेतलेली आहे. त्याला घाबरून माहूत हौद्याखाली लपला आहे, तर हत्तीही घाबरला आहे. हौद्यातील एक जण घाबरून उडी मारण्याच्या तयारीत आहे. खाली डावीकडे राजा बीजेसिंग हातात भाला घेऊन व उजवीकडे मोहबत खान तलवार उपसून वाघावर धावले आहेत. असे दृश्य आहे. या चित्रावर फारसी नावे आहेत. (पोतदार, मुजुमदार १९२१ : १७(९३))

या संग्रहातील चित्र क्र.३१६, चित्र क्र.३१७, चित्र क्र.३४७, चित्र क्र.३८२, चित्र क्र.३८५, चित्र क्र.९२३, चित्र क्र.११७५ ही चित्रे मुघल शैलीची चित्रे आहेत.

**चित्र क्र.१२२० सुवर्णमृगाची शिकार (१८.५x१३) सेमी:–**

मंडळ संग्रहात अजून एक वैशिष्ट्यपूर्ण चित्र आहे; सुवर्णमृगाची शिकार करणाऱ्या श्रीरामाचे हे चित्र आहे. रामायणातील कांचनमृगाच्या कथेवर आधारित हे चित्र असून प्रत्यक्ष राजा बादशहा किंवा इतर व्यक्तींच्या शिकारी दृश्यांच्या व्यतिरिक्त हे चित्र रामायणाच्या एका प्रसिद्ध प्रसंगावर आधारित आहे.

बहुदा रामायण कथा चित्राच्या संग्रहातील हे चित्र असावे. (पाहा चित्र क्र.१२२०)

**संच क्र.२.**

१) **चित्र क्र.३१६ (३७x२२.६) सेमी :–** या चित्रामध्ये एक बादशाहा नीलगायींची शिकार करीत आहे, असे दृश्य आहे. त्याच्या डोक्यामागील सोनेरी प्रभावलय त्याचे राजेपण दर्शवित आहे. त्याच्या आजूबाजूला इतर शिपाई दबा धरून बसलेले आहेत. मागे दूरवर त्याचा लवाजमा, हत्ती उभे असल्याचे दाखविले आहे. (पाहा चित्र क्र.३१६).

अशा प्रकारचे चित्रसंयोजन अनेक मुघल शिकारदृश्यांत दिसून येते. त्यात जहांगीर बादशहाचे चित्रण बऱ्यापैकी दिसून येते. या चित्रात मात्र चित्र क्र. ३१६ मधील बादशहा नेमका कोण, हे नक्की सांगता येत नाही.

२) **चित्र क्र.३८२ (२१.५x१३.९) सेमी :–** एक भिल्ल जोडपे काळविटाची शिकार करीत आहे; असे हे एक अप्रतिम चित्रही या संग्रहात आहे. या मध्ये जंगलातील रात्रीचा देखावा, शिकारीचा प्रसंग हुबेहुबपणे आपल्या समोर जिवंत करण्यात चित्रकार यशस्वी झाला आहे. यात भिल्लीण एका हाताने छोटी घंटी वाजवून हरणांना आपल्याकडे आकर्षित करून घेत आहे, तर दुसऱ्या हाताने पलित्याच्या साहाय्याने उजेड पाडला आहे व त्याच्या प्रकाशात भिल्लाने काळविटास बाण मारला आहे, असे दृश्य आहे. भिल्ल व भिल्लीणीची तत्परता, पलित्याच्या उजेडाने भांबावलेली हरणे असे अगदी वास्तववादी चित्रण केलेले आहे. अशाच प्रकारचे एक चित्र मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालयात आहे, असे ग.ह.खरेंनी मंडळातील जुनी

चित्रे या लेखात नमूद केले आहे. (खरे १९३६: वर्ष.१७:अं.१:७). बहूदा हे चित्र देखिल एखाद्या कथेचा भाग असावे.

अगदी याच रचनेचे (composition) अजून एक चित्र मंडळात आहे, चित्र क्र. ११७५. मात्र या चित्रात भिल्ल, भिल्लीण व काळवीट यांच्या बरोबरीने मागे एक मुघल बादशहा, त्याचा शिकारीचा ताफा मोठा लवाजमा अंधारात दबा धरून उभे आहे. असे दृश्य चितारलेले आहे.

३) **चित्र क्र.९०२ :-(३८x२४) सेमी :-** छत्रपती शाहू महाराजांचा शिकारखाना शिकारीसाठी निघालेल्या लवाजम्याचे हे उत्कृष्ट आणि दुर्मिळ चित्र मंडळात आहे. याच मालिकेतील आणखी २ चित्रे येथे आहेत– चित्र क्र.९०३ व चित्र क्र.९०४. यांतील ९०२व ९०३ ही चित्रे कडेने बऱ्यापैकी फाटलेली आहेत, तर ९०४ चे चित्र उजव्या बाजूने मधूनच कात्रीने कापलेले आहे. परंतु या सर्वांतील चित्रांकन उत्कृष्टरीत्या केलेले आहे. यामध्ये तत्कालीन पेहेराव, शिकारीसाठी असणारा लवाजमा, खाशा स्वारीचा उमदा घोडा व त्याबरोबर असलेला शिपाई, हाकारे, भालदार–चोपदार, डंका वाजविणारे, हत्ती व ससाणे घेतलेले शिकारी, पिंजरा घेतलेले सेवक दिसतात. यात प्रत्यक्ष शिकारीत भाग घेणाऱ्यांचा सैनिकांचा ठराविक असा शिकारीचा शेवाळी रंगाचा पोशाख इतर अनेक चित्रातून दिसतो बहुदा शिकारीसाठी खास शेवाळी रंगाचा पोशाख घालत असावे का असा प्रश्न उभा राहतो असे तपशीलवार चित्रण येथे दिसून येते. यातील चित्र क्र. ९०२ आणि चित्र क्र. ९०३ या दोन वेगवेगळ्या चित्रांत दोन घोडे आहेत, पण त्यावर स्वार दर्शविलेले नाहीत त्यांच्याबरोबर इतर लवाजमा दिसतो. त्यांच्या हातात राहुट्यांच्या तंबूच्या गुंडाळ्या दिसतात. ही तीनही चित्रे कदाचित एकाच मोठ्या चित्राचा भाग असावीत. मात्र या चित्राचा मधला भाग कापला गेल्यामुळे या चित्राचे नक्की प्रयोजन काय आहे ते कळत नाही. शिकारीला कोणी दोन मोठ्या असामी आहेत का ? की त्यांची भेट आहे ? हे कळत नाही. पण एकंदरीत हे शिकारीचे चित्र असावे. कारण त्यातील हिरव्या रंगाच्या पोशाखातील हाकारे, त्यांच्या हातातील पिंजरे, ससाणे इत्यादींवरून हे सांगता येते.

मंडळातील छत्रपती शाहू महाराजांच्या चित्र क्र.३९७ प्रमाणेच या चित्रावरही राजपूत शैलीचा प्रभाव जाणवतो हे त्यातील आकृतींच्या रेखाकनांची पद्धत, रंगसंगती यांवरून दिसून येते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात त्यांनी आपल्या दरबारात राजस्थान, जयपूरहून चितारी बोलावले होते. त्यांच्यापैकी कोणीतरी ही चित्रे काढली असण्याची शक्यता वाटते. (पाहा चित्र क्र.९०४)

यातील चित्र क्र. ९०४ च्या मागील बाजूस 'तसवीर–ए–सवारी शिकार महाराज साहू छत्रपती' असे फारसीतून लिहिलेले आहे. त्याखाली देवनागरी मधून 'तस्वीर स्वारी सीकार माहाराज... छत्रपती' असे लिहिलेले आहे. यातील मधले अक्षर स्पष्ट नाही पुसले गेले आहे.

संग्रहातील चित्र क्र.३६९, ३७१, ३७५, ३७८,३७९,६८० व ८१५ ही सर्व चित्रे एकाच संग्रहातील असावीत. दख्खनी शैलीतील या चित्रांतून मागे पोपटी हिरव्या रंगाचा वापर, ठिपक्यांच्या स्वरूपात दूर क्षितिज रेषेवरील झाडे, ताड–माडाची झाडे आदी रंगवलेली आहेत.

तसेच चित्र क्र.६३२, ६३४, ६३५ व ६३६ ही चित्रे एकाच संग्रहातील असावीत. वाघ–सिंह, हरणं, काळवीट, रानडुकरं व नीलगायींच्या शिकारींची दृश्ये यांत आहेत. या सर्व चित्रांतूनही शेवाळी रंगाचा पोशाख घातलेले सैनिक दिसतात. बहुदा शिकारीसाठी खास शेवाळी रंगाचा पोशाख घालत असावे का असा प्रश्न उभा राहतो अशाप्रकारे हे एक वेगळे वैशिष्ट्य आपल्याला या चित्रांमधून दिसून येते.

## ६.२) दरबारी दृश्ये

दरबारी चित्रांमध्ये राजा किंवा बादशहा मसनदीवर बसलेला व त्याच्या समोर त्याचे १ किंवा २ किंवा त्यापेक्षा जास्त दरबारी अधिकारी बसलेले आहेत, असे ठरीव संयोजन दिसून येते. संग्रहात अशा प्रकारची एकूण ९ दरबारी चित्रे आहेत. त्यांतील काही चित्रे पुढीलप्रमाणे –

<u>संच क्र.१.</u>

१) **सवाई माधवराव व समोर हरीपंत फडके व महादजी शिंदे** दरबारात बसलेले आहेत, असे दरबारी चित्र आहे. या एकाच विषयावर मंडळ संग्रहात एकूण ३ चित्रे आहेत.

पहिले चित्र, **चित्र क्र.१३ :** या चित्रामध्ये मसनदीवर सवाई माधवराव बसलेले असून, त्यांच्या समोर हरीपंत फडके हे मांडीवर हात ठेऊन, तर महादजी शिंदे हाताची घडी घालून बसलेले आहेत. हे चित्र म्हणजे मूळ चित्राचे आधी केलेले रेखाटन अथवा मसविदा म्हणजेच चित्राचा कच्चा आराखडा असावा.(पाहा चित्र क्र.१३)

नंतर याच संयोजनात थोडेसे किरकोळ बदल करून दुसरे चित्र रंगविले गेले असावे. त्यात हरीपंत फडकेंच्या हातात कागद दिसून येतो– उदा.– **चित्र क्र.८६६**. तर तिसऱ्या चित्रात, **चित्र क्र. ९२० :** यामध्ये सवाई माधवरावांच्या मागे एक चवरीदार दिसून येतो. हे चित्र, चित्र क्र.८६६ पेक्षा जास्त सफाईदार आहे चित्र क्र.८६६ बऱ्यापैकी खराब झाले आहे. ते एका बाजूने फाटले असून, त्यातील रंग ही उडालेले आहेत.

(पाहा चित्र क्र.९२०)

१) **चित्र क्र.३९८– थोरले बाजीराव व मल्हारराव होळकर :–(२४.६ x २०) सेमी**

या चित्रात एक पेशवा व त्याचा सरदार असे दोघे जण शामियान्यात बसलेले आहेत. पेशवाबैठकीवर बसून गुडगुडी ओढत आहे. मागे मोरचेलवाला उभा आहे. समोर गालिच्यावर त्यांचा सरदार वीरासनात बसलेला आहे. त्यांचा उजवा हात तलवारीवर असून ती जमिनीवर टेकवलेली आहे.

भाइसं मंडळ **'ऐतिहासिक प्रदर्शन'** या अंकात पान नं.१२ वर क्र.१८ मध्ये '*थोरले बाजीराव गुडगुडी पीत असून पुढे मल्हारराव होळकर बसले आहेत. अस्सल चित्र. शिवराम चिताऱ्याने काढलेले. इतकें बारीक काम व सफाईचा हात फिरविला आहे की, मल्हारावाच्या कपाळी असलेला पिवळा भंडारा दिसत आहे.*' असे वर्णन आहे. परंतु या चित्रातील पेशव्यांची व्यक्तिरेखा व चित्र क्र.६८३, या चित्रातील पेशव्यांच्या व्यक्तिरेखेत खूपच साम्य दिसून येते. मात्र चित्र क्र.६८३ मधील चित्राला

पूर्वसूरींनी नाव न देता 'एक पेशवा– आधुनिक पण जुन्याची नकल' असे म्हटले आहे. त्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे चित्र क्र.३९८ मधील पेशवे हे थोरले बाजीराव असावेत का ? असा प्रश्न येथे उपस्थित होतो.

तसेच या चित्रातील समोर बसलेले मल्हारराव होळकर असावेत का असा प्रश्न उभा राहतो. नसण्याची शक्यता आहे. कारण मल्हारराव होळकरांच्या इंदौर येथील होळकर राजवाड्यातील उपलब्ध चित्रामध्ये व या चित्रामध्ये साधर्म्य दिसून येत नाही. त्यांची चेहरेपट्टी, पोशाख, पगडी व मिशीची ठेवण इत्यादीत कोणतेच साम्य दिसून येत नाही. तसेच 'पु. ना. गाडगीळ ॲण्ड सन्स' चे श्री. अजित गाडगीळ यांच्या संग्रहात असलेले मल्हारराव होळकरांचे शिळा छपाई चित्र आणि मंडळातील या चित्राचे साम्य दिसून येत नाही. अर्थातच या चित्रात अनेक विसंगती दिसतात.

(पाहा चित्र क्र. ३९८, पाहा चित्र क्र. ६८३ आणि आ.क्र. १२)

या चित्रात उजव्या बाजूला खाली इंग्रजीतून U. N. NAVGIRE असे लिहिलेले आहे. त्यामुळे मूळ चित्रावरून हे चित्र नंतरच्या काळात नकलून घेतले असण्याची शक्यता आहे.

**चित्र क्र.६८३ (१४.२ x १०.१) सेमी :–** मंडळ संग्रहातील उपरोक्त चित्र क्र.३९८ मधील पेशवा आणि त्याच्या मागील चवरीधारी असे अगदी तंतोतंत संयोजन (compose) या चित्रात म्हणजे चित्र क्र.६८३ मध्ये दिसून येते. शिवाय हे चित्र आधुनिक जलरंगातील वाटते. त्यामुळे हे चित्र, वरील चित्र क्र.३९८ या चित्रावर आधारित असावे. मंडळ यादीत या चित्राची नोंद '*एक पेशवा. आधुनिक पण जुन्याची नकल* ' *असे लिहिलेले आहे. या चित्राच्या मागे अलीकडच्या काळात पेनाने* '*थोरले माधव*' *असे लिहिलेले आहे.*

<u>संच क्र.२.</u>

१) **हैद्राबाद चा निज़ाम अली खान असफ जाह व त्याचा मंत्री अरीस्तू जाह** हे दरबारात बसलेले आहेत, असे दृश्य आहे. येथेही परत या एकाच विषयावर मंडळ संग्रहात ३ चित्रे आहेत.

पहिले चित्र,

**चित्र क्र.३९६ :- (२५.४ x १७.५) सेमी-**

मंडळ सूचीमध्ये या चित्राचे 'एक मुसलमान बादशहा; डाव्या हातात पेला, समोर वजीर मागे एक शिपाई'. असे वर्णन आहे. नंतरच्या काळात त्याच्या पुढे- निज़ाम अल्ली खान-दुसरा; रस्तुजा मुशिरुल मुल्ख (वजीर) असे लिहिलेले आहे. परंतु सदरहू अभ्यासात इतर सर्व संदर्भ पाहिले असता, यातील पहिली व्यक्तिरेखा ही हैद्राबादचा निज़ाम अली खान, असफ जाह - २रा याची असून, त्याच्या पुढे रस्तुजा मुशिरुल मुल्ख (वजीर) ही व्यक्तिरेखा नसून, त्याचा वजीर अरीस्तू जाह असावा असे वाटते. निज़ाम अली खान २ रा याच्या इतर चित्रांवरून व अधिकृत संकेत स्थळावरील संदर्भावरून या चित्राची निश्चिती केली आहे. (https://blogs.bl.uk).

या चित्रामध्ये हैदराबादचा निज़ाम अली खान दरबारात बसलेला आहे व समोर त्याचा एक मंत्री अरीस्तू जहाँ हा, वीरासनात दोन्ही हाताचे तळवे एकमेकांवर ठेऊन अदबीने बसलेला आहे. मागे एक हुजऱ्या उभा आहे. निजाम मागे एका मोठ्या लोडाला टेकून मसनदीवर बसलेला आहे. याच सारखे अगदी तंतोतंत चित्र blogs.bl.uk>asian-african>2014/07 या संकेतस्थळावरील (website) Some more unpublished Deccani Paintings या लेखामध्ये आहे. त्यात असा उल्लेख आहे की हैद्राबादचा निज़ाम 'अली खान' व त्याचा मंत्री 'अरीस्तू जाह'. त्यामुळे आपल्या संग्रहातील हे चित्र 'निज़ाम अली खान आसफ जाह-२रा' याचे असावे आहे, यास दुजोरा मिळतो. आणि त्याच्या समोरील सरदार हा अरीस्तू जाहच आहे असेही आपण म्हणू शकतो, कारण वरील लिंकमधेच असे म्हटले आहे की Victoriaand Albert Museum येथील अरीस्तू जाहच्या चित्राशी हे चित्र मिळते जुळते आहे. यामध्ये या चित्राचा कालखंड साधारण १७९० चा म्हटले आहे. याशिवाय मार्क झेब्रोवस्की यांच्या Deccani Painting या पुस्तकातील आ.क्र. २४७ मध्ये 'अरीस्तू जाह' म्हणजेच

'मुनीर अल मुल्क' याचे एक चित्र छापलेले आहे. (Zebrowski 1983:268: plate no. 247). या चित्राच्या अनेक आवृत्ती (copies) आपणास दख्खनी चित्रांच्या पुस्तकातून व संकेस्थळावर पहावयास मिळतात. यावरून आपण असे म्हणू शकतो की त्या काळात अथवा नंतरही या प्रसिध्द चित्राच्या अनेक नकला तयार झाल्या असतील. मंडळातील चित्र हे त्यापैकीच एक असावे.

अगदी याच चित्राचे म्हणजे चित्र क्र.३९६ चे कच्चे रेखाटन **चित्र क्र.८२ – महादजी शिंदे** यांच्या चित्राच्या मागील बाजूस केलेले आहे. (पाहा चित्र क्र.८२)

पुन्हा याच चित्राचा हाच आराखडा (sketch) **चित्र क्र.१२२१** साठी जसाच्या तसा वापरला आहे. फक्त हे चित्र मोठे असून त्यात निजामाच्या पूर्ण दरबाराचे चित्रण आहे आणि या चित्रात निज़ाम उजव्या ऐवजी डाव्या बाजूला बसलेला दाखविलेला आहे. समोर त्याचा मंत्री 'अरीस्तू जाह' आहे. त्याच्या मागे एक बसलेला व एक उभा असे २ मंत्री आहेत. निजामाच्या मागील बाजूस डावीकडे २ मंत्री दरबारी रिवाजाप्रमाणे बसलेले आहेत. चित्राच्या मागील बाजूस पृष्ठभागावर महालाचे चित्रण आहे. तर चित्राच्या पुढील बाजूस उजवीकडे ३ स्त्रिया व ३ पुरुष गायन–वादन करीत आहेत, तर डाव्या बाजूस दोन पुरुष उभे आहेत.

या चित्राचे रंग भरण्याचे काम अपूर्ण राहिलेले आहे. फक्त निजामाच्या बैठकीमध्ये व मागील बाजूस महालाच्या बाजूच्या बागेत रंग भरलेत. चित्रातही लाल रंगाचे थोडे थोडे काम झाले आहे. (पाहा चित्र क्र.३९६ व चित्र क्र.१२२१)

येथे चित्र क्र.८२ व चित्र क्र.१३ च्या आराखड्यां वरून असे म्हणता येईल, की मूळ चित्राचा आराखडा जसाच्या तसा वापरून (trace करून) त्याचे डावी–उजवी बाजू बदलून व पार्श्वभूमी वर थोडे फार तपशील कमी–जास्त करून अशा प्रकारे चित्रे काढलेली स्पष्ट दिसतात. त्यामुळे एकतर एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीच्या चित्रणात फारसा फरक दिसून येत नाही. तीच व्यक्तिरेखा इतर सर्व चित्रांमध्ये हुबेहूब दिसते. अशा प्रकारचे तंत्र सर्रासपणे / जास्त करून वापरले जात होते असे दिसते. अशा प्रकारची referenc book चित्रकारांच्या पिढ्या न पिढ्या वापरत असाव्यात. राजस्थानात अजूनही अनेक चित्रकारांकडे अशी स्केच बुक्स (Sketch book) आहेत.

२) **चित्र क्र.१२१० (२१.५ x १६.५) सेमी :–** दरबारात बसलेला सिंहासनाधिष्ठीत मुघल बादशहा मंडळ यादीत  याचे वर्णन 'चित्र बहुधा जहांगीरचे' असे केलेले आहे. त्याच्या समोर १३ स्त्रिया गायन, वादन व नृत्य करीत आहेत. बादशहाच्या मागे २ मोरचेलधारी व बाजूला दोन दासी उभ्या आहेत. तर समोर एका बाजूला एक व्यक्ती उभी आहे. चित्राच्या खालील बाजूस महालाबाहेरचे दृश्य चित्रित केले आहे. प्रवेशद्वारापाशी एक उमराव उभा आहे. त्याच्या समोर चार नागरिक आहेत, असे दृश्य आहे. त्यांच्या बरोबर २ घोडे ही आहेत. या चित्रावर पर्शियन प्रभाव दिसून येतो. विशेष करून स्त्री आकृती, त्यांची चेहरेपट्टी, पोशाख इ. चित्राचे संयोजन व रंगसंगती हे मुघल काळातील सुरुवातीच्या चित्रांप्रमाणे दिसून येते.

## ६.३. शृंगार दृश्ये

भाइसंमंडळ संग्रहात साधारणपणे २० चित्रे ही शृंगार दृश्यांची आहेत. यांमध्ये एखाद्या चित्रात प्रियाराधन करणारे जोडपे आहे, तर एखाद्या चित्रात प्रणयातूर राजपुत्र, तर एखादी नवयौवना असे चित्रण आहे. कुठे संगमोत्सुक जोडपे आहे, तर काही चित्रे ही समागमी जोडप्यांची आहेत.

तसेच अंत:पुरातील काही दृश्यांमध्ये ज़नानखान्यातील ललना अर्धनग्न अवस्थेत मंचकावर पहुडलेली दाखविलेली आहे. कुठे ती विरहिणी आहे तर कुठे ती मद्यपान करीत आहे, तर कधी त्याबरोबर संगीताचाही आस्वाद घेत आहे. तर कुठे ती सख्यांबरोबर रममाण झालेली आहे.

या सर्व चित्रांमध्ये प्रणयी जोडप्यांच्या बरोबरीने त्यांच्या एखाद–दुसऱ्या दासींचेही चित्रण आहे. कोणी मद्याची सुरई, तर कोणी हुक्का घेऊन उभी आहे. यांतील काही चित्रे पुढीलप्रमाणे ड्ड

१) **चित्र क्र.३४८ (१६.२ x १०.६) सेमी :–** या चित्रात प्रणयी जहांगीर प्रियेस आलिंगन देऊन तिचे चुंबन घेत आहे, मागे जलाशयाचा देखावा आहे. या चित्राच्या मागील बाजूस इंग्रजीतून Emperor Jehangir in Seraglio असे लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र. ३४८)

**२) चित्र क्र.११६३ (१७.३ x १०.७) सेमी :–** एक बेगम गच्चीवर मेणबत्तींच्या प्रकाशात एकांतात लोडाला रेलून बसलेली आहे. तिच्या एका हातात सुवासिक फुले आहेत. तिच्या शेजारी तिची सखी, तिला मद्याचा प्याला देत आहे. समोर पानाचा डबा, पिकदाणी, मद्याची सुरई आहे. बेगम वा सखी दोघींनीही कंचुकी घातलेली नाही व अंगावर तलम व झिरझिरीत वस्त्र आहे. त्या पारदर्शक वस्त्रातून तिची अंगकांती दिसत आहे. (पाहा चित्र क्र.११६३)

अशाच प्रकारची अजून तीन चित्रे संग्रहात आहेत– चित्र क्र.१०६७, चित्र क्र.११६५ व चित्र क्र.११७२. त्यांत कुणी बेगम चांदण्या रात्री मद्य किंवा संगीताचा आनंद घेत आहे, तर एखादी राणी सख्यांशी गुजगोष्टी करीत आहे.

ही सर्व चित्रे रंगसंगती, तंत्र, संयोजन यांवरून उत्तर मुघल शैलीतील आहेत. यातील काही चित्रे उदा. चित्र क्र.१०६७ त्यामानाने सुमार दर्जाची आहेत. ही चित्रे अशा एखाद्या चित्राची नकल असावीत.

**३) चित्र क्र.११७० (२२.५ x १४.६) सेमी :–** या चित्रात महालाच्या गच्चीवर शामियान्यात पलंगावर शहजादा पहुडलेला आहे. समोरून तीन दासी एका नवयौवनेला शहजाद्याकडे घेऊन येत आहेत. चित्रात उजवीकडे खालील बाजूस दोन स्त्रिया गायन व वादन करीत आहेत असे दृश्य आहेत. मुघल आणि दख्खनी कालखंडात अशा प्रकारचे दृश्य बऱ्यापैकी चित्रित झालेले दिसून येते. Mughal & Deccani Paintings (Daljeet1999:76-77) व Deccani Painting (Zebrowski1983). मंडळातील या चित्रात मागे, पृष्ठभागावर सरोवर दाखविले आहे; त्यात अनेक बदके, मासे, पाणपक्षी दाखविले आहेत; मागे जंगलाचा देखावा आहे. त्यात दोन हरणे पळताना, तर मागे वाघ झुडुपांत दबा घेऊन बसलेला दाखविला आहे. तर दुसऱ्या बाजूला भिल्लांची जोडी शिकारीसाठी लपलेली आहे. आकाशात पूर्ण चंद्र आहे असा रम्य व शांत देखावा चित्रित केला आहे. (पाहा चित्र क्र. ११७० आणि आ.क्र. ३२)

मंडळ संग्रहात ही अशा प्रकारची अजून दोन चित्रे आहेत– चित्र क्र.१६४ व चित्र क्र.११६१. अशा प्रकारची प्रणयदृश्यांची चित्रे मध्ययुगीन कालखंडात बहुधा प्रचलित होती. राजे–राजवाडे, सरदार– सरंजामदारांच्या खासगी संग्रहात खास करून अशा चित्रांच्या दफ्तन्या म्हणजे चित्रांचे संग्रह असावेत. अठराव्या शतकातील मुघल, राजस्थानी शैलीतील या चित्र विषयांवरील चित्रे त्याकाळी दिल्ली व परिसरात विकली जात असत; नाना फडणीसांच्या संग्रहांत अशा चित्रांच्या दफ्तन्या होत्या. तसेच त्यांच्या तरूणपणी ते दिल्लीला गेले असता, त्यांनी अशी चित्रे विकत घेतली असल्याचे त्यांनी त्यांच्या आत्मवृत्तात नमूद केले आहे. (गोडसे १९८१:२२२)

## ६.४. स्नान, शृंगार करणाऱ्या स्त्रिया

या प्रकारच्या चित्रांत एकूण ११ चित्रे आहेत. यांमध्ये स्त्रियांची स्नान करतानाची वेगवेगळी दृश्ये आहेत. यातील काही चित्रांत स्त्रिया स्नानगृहात चौरंगावर बसून स्नान करीत आहेत. समोर पाण्याचे भांडे, अत्तराच्या कुपी, बाजूला वस्त्र ठेवलेले आहे, साधारण असे संयोजन या चित्रांत दिसून येते. एखादी स्त्री केसांतील पाणी निथळून काढत आहे, तिच्या शरीराचा वरचा भाग अनावृत्त आहे, तर खालील तलम वस्त्रांतून तिची अंगकांती दिसत आहे. उदा. चित्र क्र. ७४७. स्त्री पाण्याचा कमंडलू घेऊन ओलेत्याने मंदिरात निघालेल्या एका स्त्रीचे चित्र देखील आहे, या चित्रात तिने पायात उंच टाचांच्या खडावा घातलेल्या आहेत. बहुधा हे चित्र रागिणी भैरवीचे असावे असे वाटते. (पाहा चित्र क्र. ७४७ आणि चित्र क्र.७५५). दुसऱ्या चित्रातील युवती नदीकाठी बसून आंघोळ करीत आहे. तिने एक पाय मांडीवर घेतलेला असून, टाच घासत आहे. काही दृश्यांत ती एकटीच आहे, तर काही चित्रांमध्ये तिच्या दासी तिच्या सेवेसाठी तत्पर उभ्या आहेत. तर आणखी एका चित्रात एक स्त्री नदीवर ओलेत्याने कपडे धूत आहे.

**संच क्र.२.** सदर अभ्यासा अंतर्गत यातील नव्याने ओळखले गेलेले एक चित्र आहे. हे चित्रे पुढीलप्रमाणे–

१) **चित्र क्र.४०४ (१३.७ x ९.१) सेमी :–** या चित्रात चौरंगावर बसून स्नान करणारी एक स्त्री केसांतील पाणी निथळत आहे, असे हे चित्र आहे. कमरेच्या वरील भाग अनावृत्त आहे. या चित्राच्या वरती फारसीतून **'तसवीर-ए-कन्हा बेगम'** असे लिहिलेले आहे.

## ७. दैनंदिन जीवन

भाइसं मंडळ संग्रहात स्त्रियांची दैनंदिन जीवनक्रम दाखविणारी साधारण १०३ चित्रे आहेत. त्यांतील ८८ चित्रे ही सर्वसामान्य दैनंदिन व्यवहारांवर आधारीत चित्रे आहेत. यातील काही चित्रे नायिका व रागिणी चित्रांशी साधर्म्य दाखवतात. झाडांची फुले तोडणे, देवपूजा करणे, अशी चित्रे आहेत. तर काही चित्रांमध्ये ती ओलेत्याने पूजेची थाळी घेऊन मंदिरात जात आहे, अंगणात फुलांचा हार करीत बसलेली आहे, तर कधी वनात शंकराची पूजा करणारी स्त्री आहे, तर कोणी एखादी राजस्त्री जंगलात जाऊन साधूचे दर्शन घेत आहे. अशीही चित्रे मंडळ संग्रहात आहेत.तसेच चक्री खेळणारी स्त्री, चेंडू खेळणाऱ्या, फुगडी खेळणाऱ्या, पिंगा घालणाऱ्या, झाडावर झोका घेणाऱ्या मैत्रिणींची चित्रे आहेत. तसेच मैत्रिणीला आलिंगन देऊन गुजगोष्टी करणारी, डोक्यावर पाण्याचा घडा घेतलेली, तहानलेल्या राजपुत्रास विहिरीतून पाणी शेंदून देणारी स्त्री अशी चित्रे आहेत. (पाहा चित्र क्र.९७५ आणि चित्र क्र.११७८)

अनेक भारतीय मंदिर शिल्पांमध्ये काही शिल्पं आहेत, त्यांना 'सुरसुंदरी' असे नाम आहे. अशाच पद्धतीची काही चित्रे इथे पाहावयास मिळतात. आरशात पाहणारी स्त्री, साजशृंगार करणारी, पत्र लेखिका, पत्र वाचणारी, पायातून काटा काढणारी, पायात उंच टाचांची चप्पल घातलेली; अशी अनेक शिल्पे आपणास पाहावयास मिळतात. मध्ययुगीन काळात विविध ललित कलांमधून– काव्य, साहित्य,चित्र, शिल्प, नृत्यं...या सर्वांतून स्त्री सौंदर्याचे, विविध नायिकांचे उल्लेख दिसून येतात. यावरून हे विषय सर्वच कलांमधून जास्त लोकप्रिय होते असे लक्षात येते. मंडळ संग्रहातील चित्रांमध्येही अशा प्रकारची चित्रे अधिक दिसून येतात. (पाहा चित्र क्र.७५० – उंच टाचांची चप्पल घातलेली स्त्री) यांमध्ये सर्वसामान्य स्त्रियांच्या बरोबरीनेच राजपरिवारातील स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाचेही चित्रण आढळून येते.

साजशृंगार करणाऱ्या, हरणास खाऊ घालणाऱ्या, गच्चीमध्ये बसून सर्व बेगमा अथवा राण्या वेगवेगळे खेळ खेळत आहेत, जसे की– चौपर (चौसर), चंदल–मंदल (चौपर/चौसर खेळातील सोंगट्यांच्या ऐवजी माणसांना तेथे उभे करून हा खेळ खेळला जात असे) , तसेच  पत्ते, बुद्धिबळ इत्यादी हे खेळ मुघल जनानखान्यात खूप लोकप्रिय होते. याशिवाय घोडेस्वारी, तिरंदाजी, बंदुकीने नेम धरून शिकार करणे, पोलो सारखे खेळ खेळणे हेही त्यांचे आवडते खेळ होते. विजापूरची बेगम चांदबिबी हिची घोडेस्वारी करतानाची, पोलोचा खेळ खेळतानाची चित्रे प्रसिद्ध आहेत. तर मुघल बेगम, जहांगीरची पत्नी नूरजहान ही बंदुकीने नेम धरून शिकार करण्यात तरबेज होती असे उपलब्ध साहित्यांतून कळते. या चित्रांमध्ये आपणास  झाडाला टेकून पुस्तक वाचण्यात मग्न झालेली स्त्री, एका हातात पुस्तक व दुसऱ्या हातात ससाणा घेतलेली,  काव्य अथवा पत्र लेखिका, तसेच गुरूंकडून गायनाचे धडे घेणारी स्त्री, तर कोणी बागेमध्ये, गच्चीत मंचकावर बसून, तर कधी वनात नदीकाठी बसून वीणा वाजवून संगीतात मन रमवित आहे, अश स्त्रियांची १२ चित्रे आहेत.  (पाहा चित्र क्र.१११०)  यातील काही चित्रे रागमालेत असावीत.

याशिवाय राजपरिवारातील ज़नानखान्यांतील विलासात रमलेल्या स्त्रियांचेही चित्रण आहे. अशी एकूण १५ चित्रे आहेत. अशा प्रकारे ज़नानखान्यातील स्त्रिया गुजगोष्टी, खेळ, मनोरंजन यांत गुंतलेल्या आहेत.

(५चित्रे). तसेच सख्या व इतर राजस्त्रियांच्या बरोबर रात्रीच्या वेळी फुलबाजी उडविणे, आकाशात फटाक्यांची आतषबाजी करून दिवाळीचा सण साजरा करून त्याचा आनंद घेणे हा मुघल स्त्रियांचा आवडता शौक होता. मध्ययुगात हिंदूंबरोबरीने मुघल ही दिवाळीचा सण साजरा करीत, याच्या नोंदी आपल्याला आढळून येतात. याविषयावरील काही चित्रे मंडळ संग्रहात आहेत. उदा. चित्र क्र.९७९ व चित्र क्र.११७१. (पाहा चित्र क्र. ११७१)

शिवाय या चित्रांत काही वेगळ्या, हटक्या विषयांवरीलही चित्रे दिसून येतात– जसे की चरख्यावर सूत कातणारी स्त्री, पोपट आणि मांजराचा खेळ पाहणारी स्त्री, कोंबड्यांची झुंज पाहणाऱ्या स्त्रिया– यांत अंगणातील एका झाडाखाली एक बेगम उंच खुर्चीवर हुक्का पीत बसलेली आहे. आजू–

बाजूला तीन दासी आहेत. एकीच्या हातात मोरचेल, तर दुसरीने हातात एक कोंबडा पकडलेला आहे. समोर दोन कोंबड्यांची झुंज चालू आहे. मागे नदी आहे, रात्रीचा शांत व रम्य देखावा आहे. (पाहा चित्र क्र.१६१)

काही चित्रांमधून बागेमध्ये फेरफटका मारणाऱ्या स्त्रियांचे चित्रण आहे. यांत त्यांनी डोक्यावरून अंगभर एक सुंदर नक्षी, वेलबुट्टी असलेली शाल पांघरलेली आहे. अशी एकूण ४ चित्रे संग्रहात आहेत. पूर्वीच्या काळी राजस्त्रिया बाहेर जाताना अशा प्रकारची शाल अंगावर ओढून घेत असाव्यात. यातील एक चित्र, चित्र क्र.५८२ च्या मागे मोडी लिपीमध्ये नंतरच्या काळात ताराबाई असे लिहिलेले आहे. मात्र चित्रातील राजस्त्रीने अंगात पायापर्यंत जामा घातलेला आहे. त्यावर भरपूर सोनेरी जरीकाम केलेले आहे. हातात, गळ्यात भरपूर मोत्याचे दागिने, कपाळावर बिंदी आहे, नाकात नथनी घातलेली आहे. एकंदरीतच तिचा पेहेराव हा दख्खनी वाटतो. मराठी नाही. त्यामुळे हे चित्र कोणत्या ताराबाईचे असावे हे समजणे कठीण आहे. (पाहा चित्र क्र.५८२)

मंडळाने यापूर्वी शालभंजिका हे चित्र प्रसिद्ध केलेले आहे. (चित्र क्र.५४४). यात एका तरुणीने एका हाताने झाडाची एक छोटी फांदी धरलेली आहे, तर दुसरा हात कमरेवर ठेऊन ती सहजपणे उभी आहे. सुंदर वस्त्र आणि आभूषणांनी ती सजलेली आहे. पृष्ठभूमीवर गडद शेवाळी रंग दिलेला असून अपारदर्शक रंगात चित्र रंगविलेले आहे. याच प्रकारातील अजून ५ चित्रे मंडळ संग्रहात आहेत. यात एका चित्रात एक राजस्त्री एका छोट्या झाडाला टेकून उभी आहे, एका हाताने तिने झाडाची नाजूक फांदी धरलेली आहे, तर दुसरीच्या हातात मद्याचा प्याला आहे; तर कोणाच्या हातात हुक्का, तर कोणाच्या हातात सुवासिक फुल आहे. तर एक प्रेमिका पत्र वाचत आहे.

यातील चित्र क्र.५२ मध्ये एक मुघल स्त्री एका हाताने गुडगुडी ओढत आहे व एका हाताने झाडाची नाजूक फांदी धरलेली आहे. या चित्राच्या वरील बाजूस फारसीमधून **'तसवीर–ए–झेबुन्निसा'** असे लिहिलेले आहे. मात्र ती औरंगजेब कन्या झेबुन्निसा असावी का असा प्रश्न उभा राहतो. बाकीची पाच चित्रे 'चित्र क्र.३३०, ५४४ व ५४६ ही एकंदरीत वेशभूषा, पेहेराव, पार्श्वभूमीवरील हिरवा रंग,

ढगांची चित्रणाची पद्धत व चित्राच्या बाजूच्या किनारी, वेलबुट्टीची पद्धत यांवरून ही चित्रे दख्खनी चित्रांजवळ जातात.

लहान मुलाला खेळविणाऱ्या स्त्रिया, दही घुसळणारी यशोदा, लहानग्या कृष्ण–बलरामाबरोबर खेळणारी यशोदा, बाळकृष्णाला दूध पाजणारी यशोदा, घरी आलेल्या साधूची सुश्रुषा करणाऱ्या स्त्रिया अशीही चित्रे आहेत. कुत्र्याला घाबरलेली एक स्त्री, तिच्या डोक्यावरील फळांची टोपली व फळे खाली पडत आहेत, असे खूप विलोभनीय असे चित्र आहे. (चित्र क्र.१०६४) तेच चित्र बाजू बदलून पुन्हा काढलेले आहे.(चित्र क्र.१०६५) (पाहा चित्र क्र.१०६४)

या संग्रहात आणखी दोन चित्रे वैशिट्यपूर्ण आहेत– पहिले एका स्त्रीचे समोर बसून चित्र काढणारी स्त्री आहे. तर दुसरे; आपल्या सख्याचे, स्मरणांत ठेऊन चित्र काढणारी स्त्री. यातील चित्र क्र. ९६९ या चित्रावर धनाश्री, तर भाइसं मंडळ या चित्र क्र. १०२३ या चित्रावर रागिणी धनासरी असे लिहिलेले असल्याने ही चित्रे रागचित्रे असावीत हे नक्की मुघलकाळातही – अकबर व शहाजहानच्या काळात कुशल स्त्री चित्रकार असाव्यात का ? ज्या जनानखान्यातील स्त्रियांची हुबेहुब चित्रे काढत असावीत ? असा प्रश्न येथे उपस्थित होतो. परंतु ते स्पष्ट करणारे तसे पुरावे वा लिखाण उपलब्ध नाहीत (verma 2009:230,231) व त्या जनानखान्यातील बेगामांची उत्तम चित्रे काढत असत. मात्र भगतण जिंदी ही आत्तापर्यंतची खात्रीशीरपणे माहिती असलेली महिला चित्रकार आहे, असा उल्लेख दिल्ली येथील National Museum मध्ये मेवाड के पांच कलावंत– 'मेवाड, राजस्थान– १७५०' या चित्राखालील शीर्षकात केलेला आहे. यांवरून त्याकाळी स्त्री चित्रकारही होत्या याची साक्ष ही चित्रे देतात. (पाहा चित्र क्र. ९६९ व चित्र क्र. १०२३).

## ८. योगी, योगिनी व सुफी संत

मंडळ संग्रहात योगी आणि योगिनी व काही सुफी संतांची ही चित्रे आहेत. योगी पुरुषांची साधारण ८ चित्रे, योगिनींची ११ चित्रे व सुफी संतांची ६ चित्रे अशी एकूण २५ लघुचित्रे या संग्रहात आहेत.

साधू–संतांच्या, योग्यांच्या व योगिनींच्या चित्रांचा हा संग्रह असून यात अनेक पुरुष योगी व योगिनी, फकीर व सुफी संतांची चित्रे काढली गेली. विशेष करून दख्खनी शैली मध्ये. (Nigam1988:340). या चित्रांमधून आपल्याला या साधू–संतांची वेशभूषा, केशभूषा, त्यांचे राहणीमान, दिनचर्या यांचे ज्ञान तर होतेच, त्यांचा परिवार, तसेच समाजातील इतर उच्चभ्रू लोक त्यांचे शिष्यत्व पत्करत व त्यांच्या आशीर्वादासाठी त्यांना भेटी देत. याच विषयांला अनुसरून मध्ययुगात अनेक लघुचित्रे काढली गेली.उदा. बादशहा अकबर व सलीम चिश्तींची भेट, अकबर–तानसेन व त्याचे गुरु यांची भेट, शहजादा सलीम व त्याचा गुरु, दारा शिकोह व सुफी संतांच्या भेटी–सांगितली....इत्यादी. (पाहा चित्र क्र. ११६)

मंडळ संग्रहातील चित्रांमध्ये काही चित्रांत एखादी राणी अथवा बेगम आपल्या सखी व दासींबरोबर एखाद्या योगी पुरुषाच्या दर्शनासाठी वनात आलेली दाखविलेली आहे (चित्र क्र.३०८ आणि चित्र क्र.८२२), तर एखाद्या चित्रात ती राजस्त्री योगिनीसमोर बसून उपदेश ऐकत आहे. (चित्र क्र.३२५)

कुठे ४–५ साधूंचे कोंडाळे भजन–कीर्तनात दंग आहे (चित्र क्र.१४). तर काही चित्रांत ते वेगवेगळ्या योगमुद्रेत बसलेले आहेत (चित्र क्र.९२). कधी एखादा राजा वा शहजादा योगी अथवा फकीर वा सुफी संतांच्या समोर बसून उपदेश ऐकत आहे किंवा तत्त्वज्ञानावर चर्चा करीत आहेत. अशा प्रकारची ही चित्रे आहेत. मंडळ संग्रहात विजापूरच्या बादशाहांचे धर्मगुरु व सुफी संत–फकिरांचीही चित्रे आहेत.(पाहा चित्र क्र. १४)

याशिवाय योगिनींची वेगळी वैशिष्ट्यपूर्ण अशी साधारण ८ चित्रे या संग्रहात आहेत. मोरचेल, त्रिशूल, वीणा व पाण्याचा तुंबा घेतलेल्या करणाऱ्या योगीनींची ही चित्रे आहेत. योगिनींचीही सर्व चित्रे दख्खनी कलमाची आहेत. हातात मोरचेल, त्रिशूळ वा अंगाला भस्म व कपाळावर चंदनाचे त्रिपुंड्राचे लेपन, केसांच्या जटांचा उंच अंबाडा गळ्यात व हातात रुद्राक्षांच्या माळा त्यांनी घातलेले कफनीसारखे वस्त्र ज्याला 'खेसा' म्हणत; ज्याचे वरील वस्त्र केशरी रंगाचे असे, असा एकंदरीत पेहराव असे. (Nigam1988:35). (पाहा चित्र क्र. १०४८)

काही चित्रामधून मात्र या योगिनी उंची मुस्लीम पेहेरावात आहेत– जसे तंग जरीचा पायजमा, लांब पर्यंत जामा, पायापर्यंत, कमरेला जरीचा शेला बांधलेला, लांब ओढणी, अंगभर भरपूर मौल्यवान दागिने आहेत. याचा अर्थ असा की त्या काळी मुस्लीम राज घराण्यातील– उच्चभ्रू स्त्रिया शैव पंथीयांच्या योगिनींचा वेश परिधान करून काही विशिष्ट काळासाठी, विशिष्ट उद्दिष्टासाठी घराबाहेर पडून भटकंती करीत असत. बव्हंशी त्या त्यांच्या प्रेमीच्या शोधासाठी घराबाहेर पडत. त्यामुळे त्यांची खरी ओळख लपविण्यासाठी त्या योगीनींचा वेश धारण करीत. व स्वसंरक्षणासाठी कमरेला कट्यार बाळगीत असत. असे दख्खनी योगिनींबद्दलचे वर्णन समकालीन कवी मीर हसन देहलवी याने आपल्या 'मथनवी ए शाहरूल बयान' या काव्यसंग्रहात केलेले आहे, असे निगम यांनी नमूद केले आहे. (Nigam1988:39). अशा चित्रांबद्दल हे विशेष म्हणता येईल. (पाहा चित्र क्र. १२८).

**संच क्र.१.**

यामध्ये ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली चित्रे पुढील प्रमाणे -

**१) चित्र क्र.११५ :–** हजरत ख्वाजा बन्दे नवाज हुसेनी– गुलबर्गा. हे दख्खन मधील सुफी संत होते.

**२) चित्र क्र.११६ :–** हजरत हाशीम दस्तगीर– हे विजापूरचा सुलतान महमद बादशहाचे गुरु होते. (पाहा चित्र क्र.११६)

**३) चित्र क्र.१२८ :–** या चित्रामधील योगिनी ही उंची वस्त्रे व मौल्यवान आभूषणांनी सजलेली आहे. ती जंगलात नदीकाठी एका उंच खडकावर बसलेली आहे. तिच्या हातात एकतारा ती वाजवीत आहे. तिच्या शेजारी एक सिंह आहे. समोरील जलाशयात पक्षी आहेत. तर मागे गडद रंगाच्या पार्श्वभूमीवर घनदाट झाडांचा देखावा आहे. झाड फुलांनी लगडलेली आहेत. झाडांवर अनेक पक्षी बसलेले आहेत. तर आकाशातही बगळ्यांची रांग उडताना दाखविलेली आहे. गुलाबी रंगाचे खडक, डोंगर, घनदाट वृक्षराजी, योगिनींचा पेहराव, वेशभूषा, उंच सडसडीत शरीरयष्टी या सर्वांवरून हे चित्र दख्खनी आहे. मंडळातील या चित्राचा उल्लेख मार्क झेब्रोवस्की यांनी आपल्या Deccani Paintings या पुस्तकामध्ये

केलेला आहे. (Zebrowski 1983:182). (147. Yogini. Golconda, c.1630, BISM, Poona,128)

योगिनींच्या बाजूला एखादे जंगली श्वापद, पशू–पक्षी दाखविलेले असतात, यातून त्यांच्या दैवी शक्तीचे अस्तित्व दाखविले जाते. बहुदा त्यांच्या दैवी शक्तींमुळे जंगली श्वापदे ही माणसाळतात. हेच जणू दर्शविले असावे. (Nigam1988:40). चित्र क्र.१२८, चित्र क्र.५३६. चित्र क्र.५३६ मध्ये योगिनीच्या हातात मैना अथवा तत्सम छोटा पक्षी देखील दाखवला आहे.

**४) चित्र क्र.४९० :–** या चित्रात शहजादा सलीम त्याच्या गुरुंसमोर बसून त्यांचा उपदेश ऐकत आहे. या चित्राच्या खाली व मागे इंग्रजीतून Prince Salim (after wards Jahangir) & his teacher असे लिहिलेले आहे. त्याचा गुरु हा (योगपट्टी बांधून) बसलेला आहे.

**<u>संच क्र.२.</u>**

सदर अभ्यासांती नव्याने समोर आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदीत नावे नसलेली योगी–योगिनी व सुफी संतांची चित्रे पुढीलप्रमाणे - (एकूण ४ चित्रे )

१) **चित्र क्र.३१ (ब)**(३०.४ **x** ४०.६):– या चित्रात एक मुस्लिम धर्मगुरु व त्यांचे व १० अनुयायी धर्मगुरु बसलेले आहेत. बादशहा मधोमध बसलेला आहे, तो गुडगुडी ओढत आहे. त्याचे महत्त्व दर्शविण्यासाठी त्याच्या डोक्यामागे मोठे वलय दाखविले आहे. त्याच्या दोन्ही बाजूला ५-५ धर्मगुरु बसलेले आहेत. यात भगवी कफनी घातलेला एक हिंदू साधू ही असावा. पार्श्वभूमीवर नदीचे दृश्य आहे. या चित्राच्या खालील बाजूस फारसी मध्ये छोटया अक्षरात 'अमल इ खानहझाद चितरमन' असे लिहिलेले आहे. (भाइसंमं त्रै.३:२–४ : १९२२/२३ : पृ.८५). तर मागील बाजूस फारसीतून एक शेर (कविता) व काही मजकूर लिहिलेला आहे. (३–मंडळ संग्रहातील नव्याने ओळखलेली (अज्ञात) समूह चित्रे व त्यांतील काही ऐतिहासिक व्यक्ति.

यामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे.) (मागील फारसी लेखाचे सविस्तर वर्णन 'प्रकरण ४.३ ड) फारसी वाचन' मध्ये आलेले आहे पाहा पृ. क्र.२२७)

२) **चित्र क्र.४०५ (२०.८ x १२.४) :–** यात एक सुफी संत वा फकीर मंचकावर लोडाला टेकून बसलेला आहे. त्याच्या हातातील सरोद सदृश वाद्य तो वाजवीत आहे. या चित्राच्या वर फारसीतून **'तसवीर-ए-कबीर मुनी'**_असे_लिहिलेले आहे. हे चित्र प्रसिद्ध संत कबीर यांचे असावे का किंवा तेच आहेत हे खात्रीशीर सांगता येत नाही. नवी दिल्ली येथील संग्रहालयातील कबीर यांच्या मुघलकालीन चित्राशी हे चित्र फारसे जुळणारे नाही. त्यांमुळे हे चित्र संत कबीर यांचे नसून दुसऱ्या कोणा कबीर मुनी याचे आहे का अशी शंका येते. (पाहा चित्र क्र.४०५ आणि आ.क्र. २७)

३) **चित्र क्र.६१० (२०.५ x १०.४):–** या चित्रामध्ये एक योगिनी जंगलात तिच्या कुटी / झोपडीच्या बाहेर एका झाडाला टांगलेल्या झोक्यावर हात ठेऊन रेलून उभी दाखविलेली आहे. डोक्याच्या मागे मोठे प्रभावलय दाखविले आहे. तिच्या अंगात फिकट गुलाबी रंगाची कफनी आहे, डोक्यावर केसांचा उंच अंबाडा बांधलेला आहे. तिच्या मागे झोपडीच्या दाराशी एक व बाजूला एक अशा दोन साध्वी स्त्रियांचे चित्रण आहे. त्यांतील एक आसनावर योगपट्टी बांधून बसलेली आहे, ती हुक्का पीत आहे. तर एक तिच्याकडे पाहत आहे. ती बहुदा दासी असावी. वनातील रात्रीचा शांत, निवांत असा देखावा आहे. (nmhm {Mì H«$.610)

कार्ल खंडालवाला त्यांच्या ललित कलाच्या Deccani Painting या लेखात असे नमूद करतात. की कर्नाटकात मध्ययुगीन काळात स्त्री वा पुरुष आपला एखादा नवस फेडण्यासाठी अथवा एखादी इच्छा पूर्ण होण्यासाठी काही ठराविक दिवसांसाठी सलग उभे राहण्याची शपथ घेत असत. या विषयावरही योगिनींची काही चित्रे काढली गेली. यांमध्ये संन्यासी अथवा योगिनी झाडाला बांधलेल्या झोक्यासारख्या फळीवर आधारासाठी रेलून उभ्या असलेल्या

दाखवत; जेणे करून त्यांचा झोपेत तोल जाऊन त्या पडू नयेत. (Khandalwala1985:39). यासाठी तेवढ्या काळात त्यांच्या दासी अथवा सहयोगी साध्वी त्यांना खाऊ पिऊ घालत असत. ग. ह. खरेंनी पण कर्नाटकातील लिंगायत समाजात अशी प्रथा होती, याला दुजोरा दिलेला आहे. (Nigam 1988:340).

**४) चित्र क्र.१२६० :- (१७.२x११.२)** या चित्रात एक मुस्लीम धर्मगुरु वनात त्याच्या झोपडी बाहेर आसनावर बसलेला आहे. समोर इराणी वेशातील दोन स्त्री देवदूत त्याच्यासाठी भेटवस्तू वा खाद्यपदार्थ घेऊन मोठ्या नम्रपणे बसलेल्या दाखविलेल्या आहेत. इस्लामी कथांनुसार स्वर्गातील हे देवदूत या गुरूच्या / पीराच्या सेवेसाठी आलेले आहेत. (kramrisch 1986 : 175 : pl. no. 84)

सुलतान इब्राहिम इब्न अधम, बल्खच्या कथेतील वर्णनानुसार असलेल्या चित्रांप्रमाणे या चित्राची संकल्पना वाटते. त्यामुळे या चित्रात दाखविलेला संत हा सुलतान इब्राहिम इब्न अधम, बल्ख असावा. त्यांच्या इतर उपलब्ध चित्रांतील त्यांचा चेहरा, वेशभूषा, स्त्री देवदूतांचे चित्रांकन जवळपास सारखे आहे.

## ९. देवी–देवता

मंडळाच्या संग्रहात देवदेतांची अशी १२१ चित्रे आहेत.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहातील या देवी–देवतांच्या चित्रांत विष्णुलक्ष्मी, शिवपार्वती, शिव परिवार, अर्धनारीश्वर, राम–सीता, बालाजी, जगन्नाथ पुरीचा देखावा, देवी गायत्री, सरस्वती शंकर, विठ्ठल–रुक्मिणी, कृष्णलीला व देवींची काही चित्रे ही पोथी चित्रांमधील सुटी पाने आहेत. यांची चित्रे आहेत. याशिवाय रामायण, महाभारत, शिवलीलामृत, देवीभागवत, आदी ग्रंथांवर आधारीत चित्र आहेत.

या चित्रांचे विषय ही वेगवेगळे आहेत, जसे अनंतशायीन विष्णु, शिव परिवार, राम–सीता व शिव–पार्वती यांच्या भेटीचे दृश्य, एका चित्रात मारुती राम–लक्ष्मण यांना, तर दुसऱ्या चित्रात विष्णू–लक्ष्मी यांना गरुड  खांद्यावर घेऊन जात असल्याचे दृश्य आहे. पंचमुखी गायत्री, हंसवाहिनी सरस्वती देवी, सतरा हातांची देवी अशी ही चित्रे या संचात आहेत. या शिवाय सीतेची अग्निपरीक्षा, शिव पार्वतीच्या विवाहाचीही २ चित्रे या संग्रहात आहेत.

या शिवाय कृष्णलीलेवर आधारित ४८ चित्रे या संग्रहात आहेत. यात कृष्णाच्या जीवनांतील विविध लीलांवर आधारित अनेक चित्रे आहेत. जसे की त्याच्या बाललीला, कृष्ण–यशोदा, नंद आणि कृष्ण, राधा–कृष्ण, गोपींबरोबर वेणुवादन करणारा, लपंडाव खेळणारा, रंग खेळणारा कृष्ण, तर कधी तो त्यांची दह्यादुधाची मडकी फोडत आहे. कधी तो गोपांबरोबर चेंडू खेळत आहे, तर कधी तो गोपींचे वस्त्रहरण करीत आहे. काही चित्रांतून तो गोवर्धन पर्वत उचलत आहे, तर कधी असुरांचे मर्दन करीत आहे अशी चित्र या संग्रहात आहेत. अशाप्रकारे कृष्णाची विविध रूपे आपणाला या चित्रांतून दिसून येतात.

जगन्नाथपुरीच्या भगवान जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा यांचा एक पट आहे. बुद्धावताराची चित्रे, श्री व्यंकटेश, श्री रवळनाथ आदी चित्रे आहेत. रथात बसलेला सूर्य व ऐरावताच्या रथात बसलेला इंद्र असेही चित्रण केलेले दिसून येते.

या सर्व चित्रांचे खालील प्रमाणे वर्गीकरण केलेले आहे –

९.१. देवता

९.२. देवी

९.३. शिवपार्वती

९.४. शिव परिवार

९.५. अर्धनारीश्वर

९.६. अवतार

**संच क्र.१.**

ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली काही देवतांची चित्रे पुढील प्रमाणे.–

**१. चित्र क्र.११८५–विष्णुलक्ष्मी :–** यामध्ये एका पानाफुलांनी बहरलेल्या बागेत सिंहासनावर विष्णू आणि लक्ष्मी बसलेले दाखविलेले आहेत. त्यांच्या एका बाजूला ब्रह्मा व शंकर आहेत आणि दुसऱ्या बाजूला नारद व तुंबर गायन वादन करीत आहेत. समोरील बाजूस गरुड व हनुमान हात जोडून उभे आहेत. महालाच्या चारही दरवाज्यांवर प्रत्येकी दोन असे ८ द्वारपाल उभे आहेत. या चित्रातील व्यक्तिरेखांचे चित्रण, त्यांची वेशभूषा मराठी/ दख्खनी आहे. लक्ष्मी नऊवारी साडीत दाखविलेली आहे. शिवाय मागे सुरुची व नारळाची उंच झाडी दाखविलेली आहेत. चित्रात महालातील हंड्या व झुंबरे दाखविली आहेत. तसेच समोरील बाजूस व सिंहासनावर मोरांचे चित्रण केलेलं आहे. चित्रात सर्वत्र वेगवेगळ्या पक्ष्यांचे चित्रण केलेलं आहे. मंडळ यादीत या चित्राचे वर्णन वैकुंठाचा देखावा असे केलेले आहे. परंतु मार्क झेब्रोवस्की यांनी त्यांच्या Deccani Paintings या पुस्तकामध्ये या चित्राचे वर्णन Marriage of Vishnu & Lakshmi, Shorapur असे केलेले आहे. (Zebrowski1983:276). परंतु या चित्रातील या सर्व तपशिलांवरून हे चित्र विवाहाचे नसून वैकुंठाचेच आहे असे म्हणता येईल. परंतु मार्क झेब्रोवस्की यांनी लिहिल्या प्रमाणे हे चित्र सुरपूर शैलीच्या जवळचे आहे. (पाहा चित्र क्र. ११८५)

**२) चित्र क्र.७८९ कालिया मर्दन :–** या चित्रात यमुनेच्या डोहामध्ये कृष्ण असून त्याच्यावर कालिया नागाने आपल्या ५ फण्यांनी छत्र धरलेले आहे. त्याच्या दोन्ही बाजूला दोन नागस्त्रिया पंचारती घेऊन उभ्या आहेत. या चित्रांत कृष्ण व नागस्त्रिया यांची वेशभूषा संपूर्ण मराठी आहे. त्यांनी नऊवारी साडी, नथ घातलेली आहे. उत्तर पेशवाईतील हे चित्र असून त्यावर देवनागरीतून 'कालिया मर्दन' असे लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र.७८९)

**संच क्र.२.**

नव्याने नोंदण्यात आलेली आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदीत नावे नसलेली देवता चित्रे

**१) चित्र क्र.७ – हंसवाहिनी सरस्वती :–** हंसवाहिनी देवी सरस्वतीचे एक वैशिष्ट्यपूर्ण चित्र आपल्याला येथे पाहावयास मिळते. ही कमळावर बसलेली असून तिचा एक पाय हंसावर तर दुसरा छोट्या कमलपुष्पावर ठेवलेला आहे एका हातात वीणा आहे, तर दुसऱ्या हातात पुस्तक आहेत. शुभ्र वस्त्र ल्यालेली, डोक्यावर मुगुट, गळ्यात अलंकार असलेले हे प्रसन्न देवीचे चित्र आहे. देवीच्या मुखामागे मागे प्रभावलय आहे. हंसाच्या चोचीत मोत्यांची माळ दाखविलेली आहे. या चित्रातील पार्श्वभूमी, मागील निळा रंग, नारळाचे झाड, समोरून दिसणारा देवीचा चेहरा, त्याची व वस्त्रांची चित्रणाची शैली, यांवरून हे चित्र एकोणिविसाव्या शतकातील असू शकते. अगदी याच पद्धतीचे शिळाछपाई चित्र (lithoprint) १८८३ मध्ये कलकत्ता आर्ट स्टुडिओ (Calcutta Art Studio) ने छापलेले आहे. तर राजा रवी वर्मा यांनी याच विषयावर आधारित एक काढलेले एक शिळाछपाई चित्र आहे. (पाहा चित्र क्र. ७, आ.क्र. ३० आणि आ.क्र. ३१)

२) चित्र क्र. ४९८ व चित्र क्र. ११०१ पुरीच्या भगवान जगन्नाथांचे चित्र – यातील चित्र क्र. ४९८ मध्ये पुरीच्या भगवान जगन्नाथांच्या पटचित्राचा देखा आहे. यात मध्यभागी एका मोठ्या चौकटीत मंदिराचे चित्रण आहे. भगवान जगन्नाथ हा श्रीकृष्णाचा अवतार समजला जातो. या अवताराशी निगडीत पौराणिक कथेवर हे पटचित्र आहे. त्यात बलराम, सुभद्रा आणि भगवान जगन्नाथ यांच्या मूर्तींचे चित्रण केलेले आहे. या मूर्तींना वस्त्र आणि दागिन्यांनी सुशोभित केलेले आहे. त्यांच्या आजूबाजूला त्यांच्या साधकांचे व देवीदेवतांचे चित्रण केलेले आहे. तसेच मंदिरात चालणाऱ्या विविध पूजा दृश्यांचे चित्रण केलेले आहे. या मोठ्या चौकटीच्या वर अर्धवर्तुळाकारात विष्णूंच्या दशावतारांचे चित्रण केलेले आहे. श्रीविष्णूंच्या विविध अवतारांचे तसेच रामायण–महाभारतातील प्रसंगाचे कथनात्मक चित्रण देखील केलेले आहे. यात वरील उजव्या कोपऱ्यात राम–लक्ष्मण व रावण यांच्यातील युद्धाचे दृश्य आहे. त्याखाली ब्रह्मदेव हात जोडून उभे आहेत. शेजारी एका छोट्या देवळात एक शिवभक्त शंकराच्या पिंडीची पूजा करीत आहे. त्याखाली वेगवेगळ्या पट्ट्यांमध्ये विविध पौराणिक प्रसंग चितारलेली आहेत. तर वरील डाव्या कोपऱ्यात घोड्यावर स्वार दोन योद्धे आहेत. त्यांच्या समोर एक स्त्री उभी आहे. त्याखाली भगवान शंकराचे चित्रण आहे. त्यानंतर खालील बाजूस मदिरांची वेगवेगळी दृश्ये आहेत. तर

सगळ्यात खाली बलराम, सुभद्रा व जगन्नाथांची छोटी मंदिरे दाखविलेली आहेत. खालील बाजूस दोन्ही कोपऱ्यांमध्ये जलाशय व त्यात जलचरांचे चित्रण आहे.

या पटचित्राच्या चित्रणाची पद्धत पारंपारिक ओडिसा शैली, तसेच लोककला यांच्या मिश्र शैलीतील आहे. यात आकृतींचे रेखाटन हे ठळक, जाड रेषांनी केलेले आहे. मोठे डोळे, टोकदार नाक, हसरे लांब ओठ हे या चित्रांचे वैशिष्ट्य दिसते. या चित्रांसाठी ठराविक नैसर्गिक रंगाचा वापर केला जात असे;. लाल, पिवळा, पांढरा, काळा आणि निळा. यात एकाच पटलावर या सर्व कथेचे चित्रण केलेले असते. त्यात यथादर्शन (perspective) वा त्रिमिती दाखवलेली दिसत नाही. चित्राच्या पार्श्वभूमीत प्रामुख्याने लाल–पिवळ्या रंगाचा वापर जास्त केलेला आहे. त्यात मनुष्याकृतींबरोबरच विविध पशु–पक्षी, फुले–पाने यांचेही चित्रण करून सुशोभन केलेले आहे. चित्रात रंग भरून पूर्ण झाल्यावर त्यावरून lacquer चा हात दिलेला आहे. जेणे करून चित्रातील रंग टिकतात व त्याला एक प्रकारची चमक येते. मंडळ संग्रहात अशा प्रकारची ओडिसा शैलीतील ६ ते ७ चित्रे आहेत. एकंदरीत या चित्रातून समस्त जगन्नाथपुरीचे दर्शन घडविले आहे.

चित्र क्र. ११०१ व चित्र क्र. ११०३ या साधारण १० x १२ सेमी आकाराच्या कागदावर चौकोनात बलराम, सुभद्रा आणि भगवान जगन्नाथांचे चित्रण केलेले आहे. आजूबाजूला इतर कुठलेही तपशील नाहीत. लाल रंगाच्या पार्श्वभूमीवर आकृतींचे चित्रांकन अगदी ठसठशीत असून ठळक जाड काळ्या रेषांनी रेखाटलेल्या आहेत. त्यात पिवळा, हिरवा व काळ्या रंगाचे सपाट रंगलेपन करण्यात आलेले आहे. चित्राला चारही बाजूंनी काळ्या रंगाची जोड चौकट असून त्यात पिवळ्या रंगाच्या ठिपक्यांनी सुशोभन केलेले आहे. चित्र क्र. ११०३ मात्र अपूर्ण असून त्यात पूर्ण रंग भरलेले नाहीत. (पाहा चित्र क्र. ४९८ आणि चित्र क्र. ११०१)

**१) चित्र क्र. ८६३ (१) व चित्र क्र. ८६३ (२) शिव पार्वती विवाहाची एकूण २ चित्रे :–** मंडळ संग्रहात शिव–पार्वतीच्या विवाहाची २ चित्रे आहेत, चित्र क्र. ८६३ (१) व चित्र क्र. ८६३ (२). ही दोन्हीही चित्रे अगदी तंतोतंत एकसारखी आहेत. यातील चित्र क्र. ८६३ (१) यामध्ये शिव आणि

पार्वती वधू व वर यांच्या वेषात सजलेले असून ते मंडपात एका उंच आसनावर बसलेले आहेत. त्यांच्या डोक्यावर सोनेरी, उंच रत्नजडीत मुकुट आहेत, कपाळावर मुंडावळ्या आहेत. त्यांनी हात जोडलेले असून त्यात एक एक नारळ धरलेला आहे. शिवाच्या डाव्या बाजूला श्रीविष्णू, ब्रह्मदेव, इतर देवाधिदेव व मागे नारद उभा आहे. तर पार्वतीच्या उजव्या हाताला शेजारी आठ स्त्रिया उभ्या आहेत. त्यातील दोघींच्या हातात तबक आहे. मागे दोन दासी मोरचेल घेऊन उभ्या आहेत. शिव आणि पार्वतीच्या समोर दोन तबकांत दोन हार ठेवलेले असून समोर सर्व पूजेचे साहित्य ठेवलेले आहे. ब्रह्मदेवाच्या समोर एका पात्रात अग्नी आहे. चित्राच्या पुढील भागात दोन मोठे मेणबत्तीचे स्टँड आहेत. त्यांच्यासमोर एका छोट्या पुष्करिणीमध्ये एक कारंजे आहे. त्यात चार बदक व हंस पक्षी पोहत आहेत. या पुष्करिणीच्या दोन्ही बाजूंना गायन–वादन व नृत्य करणारे सात स्त्री–पुरुष आहेत. मागे एक भालदार उभा आहे. तर डावीकडे चार स्त्रिया बसलेल्या आहेत. एकीने हात जोडलेले आहेत, तर दोघांच्या हातात पूजेचे तबक आहे.

या चित्रात मागील बाजूस महालांचे चित्रण आहे. त्यांच्या मागे चांदण्यांनी भरलेले रात्रीचे निळे आकाश दाखविलेले आहे. त्यांत केळीची व सुरुची झाडे आहेत. आकाशात उजव्या बाजूला दोन पऱ्या अथवा पंख असलेले देवदूत दाखविलेले आहेत. त्यांच्या हातात असलेल्या तबकांतून ते शिव आणि पार्वतीच्या अंगांवर फुलांचा वर्षाव करीत आहेत असे दृश्य आहे. त्यांच्या पेहेराव्यावर व मुकुटांवर इराणी प्रभाव जाणवतो. तर शिव–पार्वती, देवता, इतर स्त्रिया, नर्तक यांच्या पेहेराव्यात पहाडी प्रभाव जास्त दिसून येतो. लांब, पायघोळ अंगरखे, कमरेचा शेला, डोक्यावरील मुकुटही पहाडी पद्धतीचा वाटतो. के चित्र उष्ण रंगसंगतीतील आहे. तसेच पार्श्वभूमीवर इमारतींना पांढरा व हलका निळा रंग दिलेला आहे, त्यातून रात्रीचे वातावरण निर्माण करण्यात चित्रकार यशस्वी झालेला आहे. हे चित्र खालील बाजूने थोडे फाटलेले आहे. त्यावर अलिकडच्या काळात इंग्रजीतून The marriage of Shiva & Parvati असे लिहिलेले आहे. चित्रात आकृत्यांची संख्या जास्त असली, तरी गर्दी जाणवत नाही. उत्कृष्ट रंगसंगती आणि चित्रसंयोजन आहे. त्यामुळे चित्र पाहणाऱ्याची नजर मुख्य विषयावरच केंद्रित होते.

तर चित्र क्र. ८६३ (२) हे वरील चित्राची तंतोतंत नक्कल आहे. मात्र यात वरील चित्रात असलेले इतर देवता, नारदमुनी, महालांचे चित्रण व नृत्य करणारे स्त्री–पुरुष यांचे चित्रण नाही. फक्त शिव–पार्वती, श्रीविष्णू, ब्रह्मदेव, समोर बसलेले दोन पुरुष व आठ स्त्रिया, मोरचेलधारी दासी व कारंजे एवढेच चित्रण आहे. मात्र या चित्रात आधीच्या चित्राचा आराखडा जरी जसाच्या तसा वापरला असला, तरी त्यात रंग भरताना मात्र सफाईदापणा दिसून येत नाही. त्यामानाने याचे चित्रण खूपच साधारण वाटते. किंवा वरील चित्राची colour print ही असू शकते. कारण या चित्राला चारही बाजूंनी केशरी रंगाची बारीक चौकट आहे. त्याखाली डावीकडे – ८६३ शिव–पार्वती विवाह तर उजवीकडे इंग्रजीतून 863 Marriage of Śiva-Parvati असे छापलेले आहे.

**२) चित्र क्र.८७५ 'श्रीरामाचे चित्र (आणि चित्र क्र.४९७) विष्णू लक्ष्मी :–** मंडळ सूचीमध्ये 'सूर्या'चे म्हणून या चित्राची नोंद आहे, परंतु हे चित्र अभ्यासले असता; त्यातील रथात बसलेल्या दोन आकृतींपैकी एक श्याम वर्णाची आहे. त्याच्या पुढे धनुष्य व बाणांचा भाता ठेवलेला आहे. त्यावरून हे चित्र सूर्याचे नसून श्रीरामाचे असावे व त्याच्या मागे लक्ष्मणाऐवजी एक सेवक दाखविलेला आहे. समोर रथ चालविणारा सारथी आहे. याच संग्रहातील चित्र क्र.४९७ मध्ये अगदी असेच चित्र संयोजन आहे. मात्र या चित्रातील दोन घोडे जोडलेल्या रथात श्याम वर्णाच्या आकृतीसोबत मागे एक स्त्री प्रतिमाही आहे. आणि पुढील बाजूस चित्र क्र.८७५ प्रमाणेच सारथी आहे. मात्र या चित्र क्र. ४९७ मध्ये धनुष्यबाणाचे चित्रण दिसून येत नाही. तसेच रथाच्या वरील बाजूस पुढे आकाशात उडणाऱ्या गरुडाचे चित्रण केलेले आहे. या सर्व तपशिलांवरून हे चित्र विष्णू–लक्ष्मी यांचे आहे, या निष्कर्षाप्रत पोहोचता येते. या चित्र क्र.४९७ मधील मनुष्याकृतींचे चित्रण खूपच सफाईदार वाटते. भक्कम शरीरयष्टी, मोठे डोळे, डोक्यावरील टोप, लक्ष्मीची नऊवारी साडी यावरील दाक्षिणात्य प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. मात्र १८ व्या शतकातील मराठा चित्रांप्रमाणे वस्त्रांचे काठ, दागिने व डोक्यावरील मुकुट यांचे चित्रण पांढऱ्या रंगाच्या ठिपक्यांनी केलेले आहे. शिवाय वरील छत्रीचा आकार यांवरून हे चित्र सुरपूर शैलीचे असू शकते. या चित्रात कमीत कमी रंग वापरलेले असून उष्ण रंगसंगती आहे. त्यात अपारदर्शी रंग वापरलेले

असून जाड कागदावर हे चित्र काढलेले आहे किंवा चामड्यावरही काढलेले असू शकते. मंडळ संग्रहातील चित्र क्र.१०३१ प्रमाणे या चित्राची शैली व रंगलेपनाची पद्धती वाटते.

**३) चित्र क्र.१०३७ – शरभावतार :–** या चित्रात एका विचित्र पक्ष्याचे रूप दाखविलेले आहे. यात त्याचे मुख एका पक्ष्याचे आहे. बाकदार नाक, ओठांचा आकार चोचीसारखा आहे. डोळ्यात अग्निज्वाळा आहेत. कपाळावर तिसरा नेत्र असून डोक्यावर मुकुट धरण केलेला आहे. त्याचे धड हे मनुष्याचे असून गडद हिरव्या रंगाचे आहे. त्याला १० हात असून त्यांत विशेष आयुधं धारण केलेली आहेत. जसे– चक्र, वज्र, त्रिशूल, बाण, भाला, गदा, दंड, शंख व एका हातात कपाल असून डावीकडील वरचा हात अभय मुद्रेतील आहे. त्याला मागे पांढऱ्या रंगात दोन पंख दाखविले असून त्यांत उजवीकडे दुर्गा व डावीकडे महाकाली चित्रात केलेली दिसते. त्याच्या हृदयात भद्रकाली आणि पोटात वडवानल अग्नि दर्शविलेले आहेत. त्याच्या शरीराचा खालील भाग हा व्याघ्राचा असून त्याला लांब शेपटी आहे. मागील दोन पायांमध्ये तीन पायांच्या व्याधीला व मृत्यूदेवतेला धारण केलेले आहे. गळ्यात मोत्यांच्या माळा, हार व खांद्यावरून लाल उपरणे घेतलेले आहे. या देवतेच्या सर्वांगावर–म्हणजे दहाही हातांना, गळ्यात, डोक्यावर, कानात व्याघ्ररूपी शरीराच्या चारही पायांना सर्प गुंडाळलेले दाखविलेले आहेत. या विराट रूपासमोर लहान आकारातील एक दैत्य नतमस्तक होऊन उभा दाखविलेला आहे.

या चित्राच्या मागे पार्श्वभूमीवर सपाट निळ्या रंगाचे लेपन केलेले असून चित्राच्या चारही बाजूंना लाल रंगाची छोटी चौकट आहे. या चित्राच्या वर्णनावरून शोध घेतला असता; हे चित्र 'शरभेश्वर' या भगवान महादेवाच्या अवताराचे आहे. भगवान विष्णूंनी भक्त प्रल्हादाला वाचविण्यासाठी जेव्हा नरसिंहावतार घेतला; तेव्हा हिरण्यकशिपूला मारल्यानंतरही भगवान नरसिंहांचे रूप शांत होत नव्हते. त्यांच्या डरकाळ्यांनी व उग्र रूपाने सारी पृथ्वी भयभीत झाली, तेव्हा त्यांना शांत करण्यासाठी व पृथ्वीला वाचविण्यासाठी भगवान महादेवांनी हा अतिशय उग्र व शक्तिशाली शरभावतार घेतला. ही पुराणकथा सर्वश्रुत आहे.

अशाच प्रकारचे शरभेश्वराचे एक चित्र 'Painted Delight' (Kramrisch 1986:119:pl.no.109) या पुस्तकात छापलेले आहे. यामध्येही गडद निळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर शिव शरभेश्वराचे चित्रण केलेले आहे. मात्र यात त्याचा चेहेरा हा चोच असलेल्या पक्ष्याचा आहे. मात्र शरीर हे पूर्णपणे व्याघ्राचे आहे. त्याच्या डोक्यावर चंद्राकोर असून जटेतून गंगा वाहत आहे. पुढील दोन हातात शंख पकडलेला असून मागील दोन पायांत श्री नरसिंहाला पकडलेले आहे. या चित्रात शरभेश्वराच्या समोर त्रिशुलधारी देवीचे चित्रण केलेले आहे. अशा प्रकारचे चित्रसंयोजन हे इतर साहित्यांमधून अथवा मंदिरांच्या शिल्पांमधून पाहावयास मिळते. (पाहा चित्र क्र.१०३७ आणि आ.क्र. ३२)

भारतात शिवाच्या शरभावताराची काही मंदिरे आहेत, विशेष करून दक्षिण भारतात. जसे त्रिभुवन मंदिर–तंजावर, ऐरावतेश्वर मंदिर–दारासुरम. तसेच श्रीलंका येथेही शरभेश्वराचे मुन्नेश्वरम हे मंदिर आहे. भगवान शंकराच्या या अवताराचे–मंडळ संग्रहातील हे चित्र शिवाच्या शरभेश्वराचे आहे. डॉ.नी.पु.जोशी यांनी भारतीय मूर्तिशास्त्र या पुस्तकात शरभ हा काल्पनिक प्राणी आहे, असे म्हटलेले आहे. (जोशी १९७९:१८३–१८४).

मंडळ संग्रहातील बरीचशी चित्रे ही १८ व्या शतकातील मराठा शैलीतील चित्रे आहेत. जसे शिव–पार्वती, अर्धनारीश्वर, शिवपरिवाराची काही चित्रे ही उत्तर पेशवाईतील असू शकतात. यातील पार्वती ही नऊवारी साडी नेसलेली, केसांचा अंबाडा, नाकात नथ घातलेली दाखविलेली आहे. तसेच संग्रहातील बाकीच्या सर्व चित्रांतील देवादिकांचे चेहरे हे इतर लघुचित्रांप्रमाणे एकचश्म (side profile) ने न दाखविता, समोरून पाहिल्यासारखी काढलेली आहेत; विशेषत: शंकराची चित्रे. (चित्र क्र.७९०, चित्र क्र.११७४). तसेच श्रीव्यंकटेशाचे चित्र 'चित्र क्र.९४०, श्रीरवाळनाथाचे चित्र– चित्र क्र.९४१, सतरा हातांची देवी – चित्र क्र.६८१...इ. पूर्वीसारखी एकचश्म पद्धतीची नाहीत. बहुदा ही चित्रे१९व्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य प्रभावातून निर्माण झालेली असावीत.

यातील काही चित्रं ही राजस्थानी चित्रकारांनी काढलेली असावित असे त्यांच्या चित्रणाच्या शैली वरून वाटते. जसे पार्वतीचा राजस्थानी घागरा– चोळी व ओढणी हा पेहेराव. उदा. चित्र क्र. ७४, चित्र क्र.४८०, व चित्र क्र. ११६७– गणपती, त्याच्या मांडीवर ऋद्धी असून समोर गायन वादन चालू आहे.

मागे एक दासी पंख्याने वारा घालीत आहे. चित्रातील गणपती, मागील वाडा, त्याच्या कमानी, महिरपी, खिडकी, स्त्रियांच्या कपाळावरील आडवी चिरी.. हे सर्व मराठा शैलीतील आहेत, तर स्त्रियांची वेशभूषा मात्र राजस्थानी पद्धतीची आहे.

संग्रहातील शिव, विठ्ठल रखुमाई व हनुमान यांची काही चित्रे ही पोथ्यांमधील काळ्या रंगातील रेखाचित्रे आहेत. ऐरावताच्या रथात बसलेला इंद्र असे एक चित्र आहे. अशा प्रकारे अनेक चित्रे देवता चित्रांमध्ये समाविष्ट आहेत. १८ व्या २०व्या शतकांत अनेक विषयांवर चित्रे काढली गेली. त्यात देवी–देवतांवर, धार्मिक ग्रंथांवर आधारित चित्रेही विपुल प्रमाणात काढली गेली.

**१०. दशावतार**

भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहातील या संचात श्री विष्णूंच्या १० अवतारांवर आधारित चित्रे आहेत. धर्माच्या रक्षणासाठी व असुरांच्या संहारासाठी विष्णूंनी वेगवेगळे १० अवतार घेतल्याच्या कथांवर आधारित ही चित्रे आहेत. (जोशी २००८:६६४) ती पुढीलप्रमाणे आहेत–

**संच क्र.१.**

या संचात ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली दशावतारावरची चित्रे पुढील प्रमाणे.–

**१०.१. मत्स्यावतार:–** (एकूण ६ चित्रे). चित्र क्र.१३३, ४५४, ४५५, ७४३, ८३६ व ८९३.

शंखासुराला मारण्यासाठी आणि प्रलय काळी मनूचे रक्षण करण्यासाठी विष्णूने हा अवतार घेतला.

**१०.२. कूर्मावतार:–** (६ चित्रे). चित्र क्र.१३३–१३४, १३४, ४५६, ४५७, ८९४, ११२९.

देव व दैत्य समुद्र मंथन करीत असताना मंदार पर्वताला आधार देण्यासाठी कूर्मावतार.

**१०.३. वराहावतार:–** (५ चित्रे). चित्र क्र.४५८, ४५९, ८३५, ८९५, ११२३.

श्रीविष्णूंनी हिरण्याक्ष राक्षसाचा वध करून पाण्यात बुडणाऱ्या पृथ्वीला वर काढण्यासाठी वराहावतार.

**१०.४. नरसिंहावतार:–** (४ चित्रे). चित्र क्र.४६०, ४६१(१), ४६१(२), ८९६.

या अवतारात श्रीविष्णूनी हिरण्यकशिपूचा वध करून प्रल्हादाचे रक्षण केले.

**१०.५. वामनावतार:–** (४ चित्रे). चित्र क्र.१३२, ४६२, ४६३, ४६५.

तीन पावलांत बळीचे सर्वस्व हरण करून बळीराजाला पाताळात लोटून पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी हा अवतार घेतला.

**१०.६. परशुरामावतार:–** (२ चित्रे). चित्र क्र.४६४, ४६६.

सहस्त्रार्जुनाला मारण्यासाठी आणि उन्मत्त झालेल्या दुष्ट क्षत्रियांचा नाश करण्यासाठी.

**१०.७. रामावतार:–** (१ चित्र). चित्र क्र.८९७.

रावणादी राक्षसांचा नाश करण्याकरिता या अवताराचे प्रयोजन होते.

**१०.८. कृष्णावतार:–** (१ चित्र). चित्र क्र.४६७.

या अवतारात श्रीविष्णूने कंसादी दुष्टांचा वध केला.

**१०.९. बुद्धावतार:–** (५ चित्रे). चित्र क्र.४६८, ४७०, ४७१, ४८७, ८९८.

यज्ञ हिंसेचा अतिरेक थांबवून अहिंसेचे तत्त्व प्रतिपादन करण्यासाठी हा अवतार होता.

**<u>संच क्र.२.</u>**

नव्याने समोर आलेले आणि उपरोक्त पूर्वसूरींच्या नोंदींत नाव नसलेलेचित्र (१ चित्र) –

**चित्र क्र.१०३१ – कल्की अवतार :–** म्लेंच्छादी दुष्टशक्ती नाश करून धर्मस्थापना करण्यासाठी हा शेवटचा अवतार असून कलियुगाच्या शेवटी होणार आहे,असे कल्कीपुराणात म्हटले आहे.या अवताराचे चित्र उपलब्ध झाले नाही. परंतू संग्रहातील एक चित्र, जे चामड्यावर काढलेले आहे, ते कल्की अवताराच्या वर्णनाशी मिळतेजुळते वाटते. त्यावरून हे चित्र कल्की अवताराचे आहे, असे आपण म्हणू शकतो. (पहा चित्र क्र.१०३१)

मंडळ संग्रहातील दशावतारांची ही चित्रे वेगवेगळ्या शैलींतील आहेत. या संचातील चित्र क्र.१३२, १३३ व १३४ हे चित्रे एकाच शैलीची आहेत. त्यांतील चित्र क्र. चित्र क्र.१३३ व १३४ ही दोन्ही चित्रे पुन्हा एकत्र एका जोड पानावर काढलेली आहेत. या चित्रांतील विष्णूची प्रतिमा / चित्र, त्याचा मुकुट, पितांबर जरी दख्खनी पद्धतीचे असले, तरी स्त्रियांचे चित्रण मात्र राजस्थानी पद्धतीचे

आहे. पृष्ठभागात मागे दख्खनी मराठा शैलीतील घरे, गोल घुमटाकार मंदिरे, भगवा झेंडा दाखविलेला आहे. त्यांवरून कदाचित मराठा आधिपत्याखालील संस्थानांमध्ये तयार झालेली चित्र मालिका असू शकते. आशय, भावनांचे, रचना (composition) व रंगसंगती यांमध्ये ही चित्रे उत्तम आहेत. त्यामुळे संचातील इतर चित्रांच्या मानाने ही चित्रे वेगळी उठून दिसतात.

उदा. मत्स्यावताराचे क्र.१३३ चे चित्र :– बाकीच्या मत्स्यावताराच्या चित्रांपेक्षा हे चित्र वेगळे आहे. या चित्रात शंखासुराचे चित्रण केलेले नसून त्या ऐवजी ३ ब्राह्मण हातात वेद घेऊन पाण्यात उभे आहेत. हे बहुदा तीन वेद आहेत. मत्स्यावतारातील चतुर्भुज विष्णूंच्या वरील दोन हातात खड्ग आहेत, तर खालील दोन हातांत चक्र व कमळ आहे. मागे हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर दोन स्त्रिया राजस्थानी वेषात हात जोडून बसलेल्या आहेत. त्यांच्या मागे वरील बाजूस कामधेनु बसलेली दाखविलेली आहे. चित्रात हलका छायाभेद दाखविला आहे. विष्णूंच्या मुखामागे सोनेरी रंगात प्रभावलय दाखविलेले आहे. (पाहा चित्र क्र.१३३)

चित्र क्र.४५४ व ४५५, चित्र क्र.४५६ व ४५७, ४५८ व ४५९, चित्र क्र.४६०–४६१(१) व ४६१(२), चित्र क्र.४६२–४६३–४६५, ४६४ व ४६६ तसेच चित्र क्र.४६७ व ४६८ ही चित्रे एकाच शैलीतील आहेत. यातील जोड्या या समान चित्रांच्या आहेत. उदा. चित्र क्र.४५४ व ४५५ ही एक समान विषयाची चित्रे आहेत. त्यांतील रचना, तपशील अगदी सारखेच आहे. यातील आधीच्या क्रमांकाचे चित्र फाटलेले व खराब झालेले असल्याने त्याची अगदी तंतोतंत तशीच, पण उत्तम नकल पुढील चित्रात केलेली आहे. आधीची चित्रे रचनेच्या दृष्टीने साधी आहेत. तपशील अगदीच कमी आहेत, तर नवीन चित्रांमध्ये पार्श्वभूमीवर थोडे अधिक तपशील वाढविलेले चित्रित केलेले दिसतात – उदा. झाडे–झुडुपे, महालांच्या इमारती इत्यादी.

चित्र क्र.८३५– वराहावतार व चित्र क्र.८३६– मत्स्यावतार ही दोन चित्रे खास मराठा शैलीची चित्रे आहेत.

उदा. चित्र क्र.८३६ :- या चित्रामध्ये मराठा शैलीप्रमाणे चेहेऱ्याचे रेखांकन, मोठे डोळे, गोल चेहरा, सुदृढ बांध्यावर आकाराने थोडे मोठे वाटणारे डोके, उतरती कपाळपट्टी, टोकदार नाक असे खास

मराठा शैलीप्रमाणे चित्रण आहे. डोक्यावरील मुकुट दाक्षिणात्य पद्धतीचा आहे. अंगात पीतांबर असून कमरेला लाल शेला बांधलेला आहे. अंगात मोत्यांचे दागिने आहेत. विष्णूचे वरील अर्धे शरीर मानवाचे, तर खालील अर्धे शरीर मत्स्याचे आहे. त्याचे शरीर निळ्या रंगात दाखविले आहे. बाह्यरेषा हलक्या काळ्या रंगात, बारीक, लयदार व ओघवती आहेत. कपड्यांमध्येही बारीक काम केलेले आहे. दागिने, मुकुट यांमध्ये गोल पांढऱ्या ठिपक्या–ठिपक्यांनी सुशोभिकरण केलेले आहे. उत्तर मराठा काळात उदयास आलेली बहुदा ही एक नवीन चित्रपद्धत होती. मत्स्याचे ही चित्रण खूप बारकाईने, तपशीलवार केलेले आहे. यात थोडया गडद रंगाने शरीराची गोलाई, त्रिमिती दाखविलेली आहे. शंखासुराच्याही शरीराचा वरील अर्धा भाग मानवाचा, तर खालील भाग शंखाचा दाखविलेला आहे. (पाहा चित्र क्र.८३६)

चित्राच्या पार्श्वभूमीवर वरील भागात हिरव्या रंगाचे डोंगर, त्यामागे आंबा, केळी, सुरुच्या झाडांची वृक्षराजी, त्यामागे गडद निळ्या रंगाचे आकाश दाखविलेले आहे, तर खालील बाजूस निळ्या रंगात पाणी दाखविलेले आहे. पार्श्वभूमीवर सपाट रंगलेपन आहे. एकंदरीतच चित्रात प्रसन्न वातावरण आहे, आल्हाददायक रंगसंगती आहे. चित्राला लाल रंगाची साधी चौकट आहे. कोणतेही नक्षीकाम नाही. त्यामुळे संपूर्ण लक्ष आतील चित्रावर खिळून राहते. हे संपूर्ण चित्र एका मोठ्या जाड कागदावर चिटकवलेले असून त्यावर जांभळ्या रंगाच्या छोट्या छोट्या पानाफुलांचे चित्रण आहे.

चित्र क्र.८९३, ८९४, ८९५, ८९६, ८९७, ८९८ ही चित्रे दशावतार चित्रांच्या संचातील अगदी वेगळ्या प्रकारची चित्रे आहेत. यांतील मानवाकृती या दाक्षिणात्य वाटतात, धष्टपुष्ट, भक्कम बांध्याच्या आहेत. उत्तर भारतीय शैलीतील नाजूकपणा यांत नाही. बाह्यरेषा या बारीक, काळ्या रंगात असून सलग, लयदार व ओघवत्या आहेत. छायाभेद जास्त नाही. सपाट रंगलेपन आहे. फक्त चेहेऱ्यात थोडेसे काम केलेले आहे. पार्श्वभूमीवर तेजस्वी पिवळा रंग व आकाशी निळा रंग खालील अर्ध्या भागात वापरलेला आहे. या संचातील सर्वच चित्रांची रचना (compose) अशीच आहे. चित्रातील मागील डोंगर उभे, गुलाबी रंगात, दख्खनी शैली प्रमाणे दाखविलेले आहेत. चित्रात तेजस्वी, प्राथमिक रंग लाल, पिवळा, हिरवा, निळा असे रंग वापरलेले आहेत. सोनेरी रंगाचा ही वापर जास्त केलेला आहे. विष्णूचा मुकुट हा दाक्षिणात्य, विजयनगर पद्धतीचा आहे. स्त्री आकृतींमध्येही भक्कम बांधा, नाकात नथ,

केसांतील डोक्यावरील दागिना, मानेवर रुळणारा सैलसर अंबाडा यावरही दाक्षिणात्य प्रभाव दिसून येतो. (पाहा चित्र. क्र. ८९६)

एकंदरीत खूपच वेगळे आणि आकर्षक चित्रसंयोजन दिसून येते. त्यात संपूर्ण चित्रतलाचा वापर केलेला आहे. चित्रातील आकृती मोठ्या आहेत, तर दूरच्या आकृती लहान आकारात आहेत. मागील दृश्यासाठी पिवळा रंग वापरलेला आहे.संपूर्ण प्रसंगांचे– कथेचे वर्णनात्मक चित्रण एकाच पटावर केलेले आहे. त्यांचे विभाग (partitions) केलेले नाहीत. राक्षसांच्या, देव–दानवांच्या चेहेऱ्यावरील तपशील बारकाईने चित्रित केले आहेत. यांमध्येही चित्र क्र.८३६ प्रमाणे दागिने, मुकुट व काही ठिकाणी वस्त्रांच्या नक्षी मध्ये पांढऱ्या ठिपक्यांची पद्धत वापरलेली दिसते.

मंडळ संग्रहातील मत्स्यावताराची चित्रे– चित्र क्र.७४३ व ८३६, आणि वराहावताराचे चित्र, चित्र क्र.८३५ – या चित्रांच्या चित्रकामाची शैली ही मंडळ संग्रहातील ताल–चित्रांच्या शैली जवळ जाते, असे जाणवते. चेहेऱ्याचे चित्रांकन, दाग–दागिने दाखविण्याची पांढऱ्या ठिपक्यांची पद्धत, पार्श्वभूमीतील रंगसंगती, डोंगर, झाडे, पाने–फुले यांचे तपशील...सर्वच जवळपास सारखे आहेत. यांवरून असे म्हणता येऊ शकते, की ही चित्रे मराठा शैलीतील असावीत व ताल चित्रांच्या साधारण जवळपास त्याच काळातील असू शकतात.

## ११. जैन तीर्थंकर

जिनांच्या अनुयायांना 'जैन' असे म्हटले जाते. यांनाच तीर्थंकर, केवली वा अरिहंत असे म्हटले जाते.(जोशी १९७९:३३७). आदिनाथ किंवा ऋषभनाथ हे प्रथम तीर्थंकर असून त्यानंतर तेवीस– असे सर्व मिळून चोवीस तीर्थंकर आहेत. भगवान महावीर हे शेवटचे तीर्थंकर म्हणून ओळखले जातात.

मंडळ संग्रहात जैन तीर्थंकरांची २३ चित्रे आहेत. त्यांतील फक्त २१ तीर्थंकरांची चित्रे मंडळात उपलब्ध आहेत. जैन तीर्थंकरांच्या प्रतिमा दोन स्थितीत असतात; एक म्हणजे उभी – या स्थितीला खड्गासन किंवा कायोत्सर्ग मुद्रा  तर दुसरी स्थिती म्हणजे ध्यानमुद्रा होय. मंडळ संग्रहातील

तीर्थंकरांची चित्रे ही ध्यानमुद्रेतील आहेत. या सर्वच चित्रांमध्ये चित्रसंयोजन सर्वत्र एकसारखेच आहे – म्हणजे षटकोनी सोनेरी मंचकावर एकेक तीर्थंकर पद्मासनात बसलेले दाखविलेले आहेत. हाताची ध्यानमुद्रा आहे. या सर्व प्रतिमा पूर्ण दिगंबर आहेत. लांब कान व डोळे उघडे आहेत. डोळे पश्चिम भारतीय म्हणजेच जैन लघुचित्र शैलीप्रमाणे चेहेऱ्याच्या थोडे बाहेर आलेले आहेत. डोक्यावरील केस वरील बाजूस बांधलेले आहेत. इतर जैन प्रतिमांप्रमाणे पुरुषोत्तमत्वाचे लक्षण म्हणून तीर्थंकरांच्या वक्षस्थलांवरील श्रीवत्स चिन्ह व भुवयांमधील ऊर्णा चिन्ह (जोशी १९७९:३३७) या चित्रांमधील प्रतिमांमध्ये दिसून येत नाहीत.

डोक्यावर रत्नजडीत सोनेरी छत्री आहे. मागील प्रभावलय सोनेरी रंगात दाखविलेले आहे. तीर्थंकरांच्या शरीराचा रंग त्या त्या अवतारांप्रमाणे वेगवेगळा– म्हणजे सोनेरी, पांढरा, तांबडा, हिरवा, काळा असे दाखविलेले आहेत. त्यांच्या समोर दोन चवरीधारी सेवेकरी उभे आहेत. त्यांनी रंगीत, जांभळे व लाल रंगांचे धोतर नेसलेले असून अंगात मोत्यांचे दागिने आहेत. डोक्यावरील केस मागे बुचड्यासारखे बांधलेले आहेत. यांचे चित्रण एकचश्म आहे. मागे पृष्ठभूमीवर पोपटी हिरव्या रंगांचे वा निळ्या रंगाचे सपाट रंगलेपन केलेले असून, चित्राला चारी बाजूंनी लाल रंगाची साधी जाड चौकट आहे. या सर्व चित्रांत त्रिमितीचा अभाव असून सर्व रंगकाम सपाट रंगलेपन पद्धतीत केलेले आहे. जाड पुठ्ठ्यावर ही चित्रे चिटकविलेली आहेत. अशा प्रकारचे संयोजन सर्व चित्रांत सारखेच आहे. या सर्व चोवीस तीर्थंकरांच्या प्रतिमा जवळ जवळ सारख्याच असतात. मात्र प्रत्येक तीर्थंकरांच्या समोर पिठावर वा मंचकावर खाली एकेक प्राणी वा चिन्ह दाखविलेले असते, त्यांना त्यांचे लांछन असे म्हटले जाते. (खरे १९५१:१६९). या प्रतिमा लक्षणांवरून– म्हणजेच लांछनांवरून  त्या त्या तीर्थंकरांची नावे ओळखली जातात.

उदा. चित्र क्र.६४६– श्रीऋषभजी :– त्यांच्या समोर मंचकावर वृषभाचे (बैल) चित्र दाखविलेले आहे, त्यावरून हे चित्र ऋषभनाथांचे आहे

**संच क्र.१.**

मंडळ संग्रहातील पूर्वसूरींनी ओळखलेल्या व या चित्रांच्या वरील बाजूस देवनागरीमधून शीर्षके दिलेली आहेत. या सर्व तीर्थंकरांच्या प्रतिमांची सविस्तर माहिती पुढील तक्यात दिलेली आहे– (एकूण २३ चित्रे)

| क्र. | चित्र क्र. | तीर्थंकरांचे चित्रावरील नाव (तीर्थंकरांचे प्रचलीत नाव) | वर्ण | चित्रात असलेले त्यांचे चिन्ह अथवा लांछन |
|---|---|---|---|---|
| १ | ६४६ | श्री रिषभजी (१ले तीर्थंकर) (दे) (श्री ऋषभनाथ) | सोनेरी | वृषभ बैल |
| २ | ६४७ | (श्री अजितजी (२रे तीर्थंकर) (दे) (श्री अजितनाथ) | ” | हत्ती |
| ३ | ६४८ | श्री संभजी (३रे तीर्थंकर) (दे) (श्री संभवनाथ) | ” | घोडा |
| ४ | ६४९ | श्री अभिनंदनजी (४थे तीर्थंकर) (श्री अभिनंदननाथ) | ” | वानर |
| ५ | ६५० | श्री पदमजी (६वे तीर्थंकर) (श्री पद्मप्रभ) | ” | कमळाचे फूल (लाल) |
| ६ | ६५१ | श्री सुपार्श्वनाथजी (७वे तीर्थंकर) (श्री सुपार्श्वनाथ) | हिरवा | नंद्यावर्त (स्वस्तिक) |
| ७ | ६५२ | श्री मालिजी (?)(दे) (मुनीसुव्रत ?) | सोनेरी | कासव |
| ८ | ६५३ | श्री चंद्रप्रभुजी (८वे तीर्थंकर) (श्री चंद्रप्रभ) | पांढरा | चंद्र |
| ९ | ६५४ | श्री पोपदंतंजी (९वे तीर्थंकर) पूर्वसूरींनी श्री पोपचंदजी असे नाव दिलेले आहे मागील बाजूस (श्री पुष्पदंत) | सोनेरी | मकर |
| १० | ६५५ | श्री सीतलजी (१०वे तीर्थंकर) (श्री शीतलनाथ) | ” | कल्पवृक्ष/श्रीवृक्ष |
| ११ | ६५६ | श्री यासजी (११वे तीर्थंकर) (श्री श्रेयांसनाथ) | श्याम | गेंडा |
| १२ | ६५७ | श्री वासुपूज्यजी (१२वे तीर्थंकर) (श्री वासपूजजी) | ” | महिष |
| १३ | ६५८ | श्रीविमलजी (१३वे तीर्थंकर) (श्री विमलनाथ) | तांबडा | वराह |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | ६५९ | अनंतजी (१४वे तीर्थंकर)<br>(श्री अनंतजी) ?<br>(श्री शांतीनाथ ? १६ वे तीर्थंकर) | सोनेरी | जांभळ्या रंगात सर्पसदृश्य चिन्ह (स्पेन ?/स्नेही) |
| १५ | ६६० | श्रीअनंतजी (१४वे तीर्थंकर) | तांबडा | हरीण (मृग) |
| १६ | ६६१ | पीरमजी | करडा | घार |
| १७ | ६६२ | श्री कुंथजी (१७वे तीर्थंकर) (श्री कंथुनाथ) ? | सोनेरी | मेष |
| १८ | ६६३ | श्रीसुमरसजी (श्री मल्लीनाथ ?) | ” | कुंभ |
| १९ | ६६४ | श्रीमनसुत्रजी (२०वे तीर्थंकर)<br>(श्री मुनीसुत्रनाथ) | ” | साळिंदर |
| २० | ६६५ | श्रीनेमजी (२१वे तीर्थंकर)<br>(श्री नेमीनाथ) ? | ” | मासा |
| २१ | ६६६ | श्रीनेमीजी (२२वे तीर्थंकर)<br>(श्री नेमीनाथ) ? | ” | शंख |
| २२ | ६६७ | श्रीपार्श्वनाथजी (२३वे तीर्थंकर)<br>(श्री पार्श्वनाथ) | हिरवा | डोक्यावर ७ फण्यांचा नाग. तसेच मंचकावरही |
| २३ | ६६८ | श्रीमहावीरजी (२४वे तीर्थंकर)<br>(श्री महावीर) | पिवळा–सोनेरी | सिंह |

अशाप्रकारे २३ चित्रे या संचात आहेत, जी त्यांच्यावरील बाजूस दिलेल्या शीर्षकांवरून ओळखण्यात आलेली आहेत. या संग्रहात २४ तीर्थंकरांपैकी फक्त २१ तीर्थंकरांची चित्रे आहेत. बाकीच्या ३ तीर्थंकरांची चित्रे दिसून येत नाहीत. श्रीसुमतिनाथ (५वे तीर्थंकर),श्रीधर्मनाथ (१५वे तीर्थंकर) व श्री शांतीनाथ (१६वे तीर्थंकर), श्री अहरनाथ व श्री मल्लीनाथ या ५ तीर्थंकरांची चित्रे या मंडळ संग्रहात मिळाली नाहीत. (पाटील २००८:३७३). शिवाय एकाच नावांची २–२ चित्रे आहेत. जसे– श्रीअनंतजी या नावाची दोन चित्रे आहेत. मंडळ संग्रहातील या सर्व चित्रांत तीर्थंकारांच्या नावापुढे 'नाथ' ऐवजी 'जी' हा शब्द लावलेला दिसून येतो. उदा. 'ऋषभनाथ' या प्रचलित नावाऐवजी मंडळ संग्रहात ते श्री रिषभजी', 'श्री अजितनाथ' ऐवजी श्री अजितजी' असे लिहिलेले आहे.

**संच क्र.२.**

नव्याने समोर आलेली जैन तीर्थंकरांची चित्रे पुढीलप्रमाणे (एकूण ३ चित्रे)

भाइसं मंडळातील या संग्रहातील चित्रांत प्रचलित नावांपेक्षा थोडी वेगळी नावे येथे दिसून येतात. जसे की – **श्रीपोपदंतंजी, श्रीपीरमजी, श्रीसुमरसजी**. जी इतर संदर्भांमध्ये दिसून येत नाहीत. यातील **पोपदंतंजी** हे नाव म्हणजे **पुष्पदंत** असू शकते. मंडळात त्याचे चिन्ह पिवळसर हिरव्या रंगाचा मासा आहे. मात्र पुष्पदंतांचे चिन्ह मगर असल्याने हा मासा नसून मगर असू शकते. (पाहा चित्र क्र.६५४). आणि **'श्री मल्लिनाथ'** म्हणजेच **'श्री मालिजी'** कदाचित असू शकते. शिवाय त्यांची चिन्हे पण मागेपुढे झालेली दिसतात.

उदा.– १) उपलब्ध संदर्भसूची (जोशी १९७९:३४०–३४३) प्रमाणे २० वे तीर्थंकर श्री मुनिसुत्रनाथ अथवा मुनीसुव्रत यांचे लांछन 'कासव' आहे, तर मंडळ संग्रहातील चित्र क्र.६५२ या चित्रामधील श्री मालिजी यांचे चिन्ह कासव दाखविलेले आहे. तर चित्र क्र.६६४ या चित्रातील श्री मनसूत्रजी यांचे चिन्ह साळिंदर दाखविलेले आहे, जे श्री अनंतनाथ यांचे असते. (पाहा चित्र क्र.६५२ व चित्र क्र.६६४)

२) १९वे तीर्थंकर श्री मल्लिनाथ यांचे चिन्ह कुंभ आहे, तर चित्र क्र.६६३ या चित्रात श्री सुमरसजी यांचे चिन्ह कुंभ दाखविलेले आहे. तेव्हा ते चित्र श्री मल्लीनाथांचे असावे का ?

३) येथे श्री नमिनाथ – २१ वे तीर्थंकर या **'श्री नेमजी'** असे लिहिलेले आहे आणि श्री नमिनाथांचे चिन्ह नीलकमल असते तर येथे मात्र शंख आहे, जे इतर ठिकाणी १८ वे तीर्थंकर **'श्री अरहनाथांचे'** असते. तेव्हा हे चित्र **'श्री अहरनाथ'** यांचे असावे का ? असा प्रश्न पडतो. (पाहा चित्र क्र.६६५)

४) तर चित्र क्र. ६६० मध्ये 'श्री अनंतजी' यांचे चिन्ह 'मृग' आहे. जे १६ वे तीर्थंकर 'शातीनाथांचे असते.

तेव्हा हे चित्र 'श्री शांतीनाथांचे असू शकते.

संग्रहातील या चित्रांतील चिन्हांचे चित्रण त्यामानाने मध्यम स्वरूपाचे वाटते. त्यांत सफाईदारपणा नाही. तसेच तीर्थंकरांची चित्रे शरीर लयता नसलेली वाटतात.

## १२. रागमाला चित्रे

सर्व ललितकला या एकमेकांच्या हातात हात घालून चालतात. म्हणूनच एका कलेच्या माध्यमातून दुसरा कलेचा झालेला आविष्कार हा निश्चितपणे वेगळा वाटतो. म्हणूनच आपण येथे असे म्हणू शकतो की चित्रांच्या माध्यमातून केलेला रागांचा आविष्कार म्हणजे रागमाला चित्रे होत. काहीवेळा या रागमालाचित्रांवर त्या रागांना पूरक असे काव्य अथवा श्लोक त्या त्या बोलीभाषेतून अथवा संस्कृत मधून लिहिलेला दिसून येतो. यालाच रागध्यान असे म्हटले जाते.

'*राग हा अमूर्त असतो. परंतू रागमाला चित्रे म्हणजे त्याला दिलेले मूर्त स्वरूपच होय. एखादा राग गात असताना किंवा ऐकत असतांना गायकाच्या किंवा चित्रकाराच्या दृष्टीसमोर उभी राहिलेली त्या रागाची दृश्य स्वरूपातील प्रतिमा म्हणजेच रागचित्र. या राग रागिण्यांचे शुद्ध स्वरूपात ध्यान अथवा गायन केल्याने मनामध्ये जे रूप आकार घेते, ते चित्रांच्या माध्यमातून दाखविणे म्हणजे रागचित्र म्हणता येईल.* ' (अभ्यंकर २००३:१२-१३) असे काही संशोधकांचे म्हणणे असले तरी प्रत्येक चित्राचे ध्यान आणि प्रतिमा ठरलेल्या आहेत हे रागचित्र पाहताच लक्षात येते.

भाइसं मंडळ संग्रहात आज मितीला सुमारे २५० रागचित्रे आहेत. या रागचित्रांचे, त्यांच्या नावांप्रमाणे ६० स्वतंत्र प्रकरणे केली आहेत. उ.दा.- राग बसंत, देस राग, राग भैरव, राग बिलावल, रागिणी आसावारी...इ.

'प्रकरण ४.२-भारत इतिहास संशोधक मंडळातील चित्रांचे वर्गीकरण' यामधील रागमालाचित्रे यांमध्ये या सर्व राग-रागिण्यांची नावे, कोणत्या रागाची किती चित्रे आहेत, त्यांचे क्रमांक आदींचा सविस्तर तपशील दिलेला आहे. यांतील काही रागचित्रांवर वरील बाजूंस संस्कृत, ब्रज स्थानिक वा

बोलीभाषेतून रागांची वर्णने आहेत. तर काही चित्रांवर वरील बाजूस फक्त त्या त्या रागांची नावे आहेत. ती स्थानिक तसेच फारसीतून ही दिलेली आहेत. यातील काही चित्रांवर काहीच म्हणजे नाव अथवा राग वर्णन काहीच आढळून येत नाही. परंतु त्यां चित्रांतील तपशीलांवरून व इतर समान चित्रांवरून ते चित्र कोणत्या रागाचे आहे, याचा अंदाज बांधता येते.

**संच क्र. १** मंडळ संग्रहातील एकूण २३ चित्रांपैकी एकूण २२१ रागमाला चित्रे ग. ह. खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली आहेत. मंडळ सूचीमध्ये चित्र क्र. १२२९ पर्यंतच्याच चित्रांची नोंद केलेली आहे. त्यापुढील चित्राची नोंद दिसत नाही. त्यामुळे चित्र क्र. १२३० च्या पुढील रागचित्रे प्रकरण ४.२) भाईसं मंडळ चित्र मंडळ चित्र वर्गीकरण – १२. रागमाला – यातील संच क्र. २ मध्ये नमूद केलेली आहेत. अशी एकूण २२ रागचित्रे आहेत, ज्यांची नोंद मंडळ सूचीत दिसून येत नाही. मात्र या प्रकरणात त्यांची वेगळी दखल घेण्यात आलेली नाही. यांतील सुमारे ८५ चित्रांच्या वरील बाजूस राग वर्णने आहेत. तर अंदाजे १४० चित्रांवर त्यांची नावे आहेत. त्यांतील काही चित्रांच्या वर फक्त त्यांची देवनागरीतून नावे आहेत तर काही चित्रांच्या दिसत वरील बाजूस आणि चित्रांच्या मागील बाजूस फारसीतून नावे आहेत.

यातील बरीचशी चित्रे ही उत्तर भारतीय– राजस्थानी, पहाडी आहेत. तर काही चित्रे ही दख्खनी कलमाची असू शकतात.

### संच क्र. २ नव्याने अभ्यासली गेलेली रागचित्रे

मंडळ संग्रहातील साधारण ५० चित्रांच्या वरील बाजूस आणि मागील बाजूंस फारसीतून लेख आहेत. हे फारसी वाचन पूर्वसूरींकडून कदाचित करण्याचे राहून गेले असावे असे दिसते. सदर संशोधनात या फारसी लिखाणाचा समावेश करण्यात आला आहे. त्यात असलेले विषय व वर्णन, माहिती खालील तक्त्यांमधून दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे–

| अ.क्र. | चित्र क्र. | रागाचे नाव (मंडळ यादी) | चित्र शीर्षक लेख (फारसी (फा); मोडी (मो); देवनागरी (दे); इंग्रजी (इं)) | चित्राच्या मागील लेख (फारसी (फा); मोडी (मो); देवनागरी (दे); इंग्रजी (इं)) |
|---|---|---|---|---|
| १ | ९० | खंबावत | -------- | फारसीतून काव्य आहे, ज्यात औरंगजेबाचा उल्लेख आहे. **'शाह औरंगजेब.. ठुमकत.. चपरावत..'** – बाकीचे शब्द लागत नाहीत. त्या काव्यात ब्रज भाषेतील शब द आहेत. तसेच या काव्यात एका स्त्रीच्या डोळ्यांचे वर्णन आहे. या काव्याच्या वरती फारसीतून **'कुनहात', म्हणजे 'कहाणी'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| २. | २०६ | कानडा | यातील शीर्षककावर कागदी पट्टी नंतरच्या काळात चिटकविलेली आहे. त्यामुळे वाचन करता आले नाही. (फा)<br>या कागदी पट्टीवर राग कानडा असे लिहिलेले आहे. (दे)<br>चित्रावर मोडीत **'कानडा'** असे लिहिलेले आहे. (मो) | **जेव्हा रात्रीचे ३ तास म्हणजेच १ प्रहर उलटलेला होता**. या खाली **'३६'** हा आकडा लिहिलेला आहे. (फा) |
| ३. | २०७ | देवगंधार | **देवगंधार रागिनी चहोराम रंग हिंडोल**. (फा) म्हणजे हिंडोल रागाची ४ थी रागिणी देवगंधार | **दिवस उगवल्यापासून २ (घडी) घटका झाल्या आहेत**. खाली **'२१'** हा आकडा लिहिलेला आहे. (फा) |
| ४. | २०८ | देवसाग | या लिखाणावर कागदी पट्टी चिटकविलेली आहे. (फा) त्यावर देवनागरीतून '**देवसाग राग**' असे लिहिलेले आहे. (दे) **देवसाग** (मो) | **दिवसाचा दीड प्रहर उलटलेला आहे.** त्याखाली **'३४'** हा आकडा लिहिलेला आहे. |
| ५. | २०९ | राग देस | येथे **कणकली रागिणी पंजोम राग मालकौस** असे लिहिलेले आहे. (फा) म्हणजे | **जेव्हा ४ (घडी) घटका दिवस '३१'** हा आकडा लिहिलेला आहे. (फा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 'मालकंस रागाची ५वी रागिणी गुणकली.' मात्र मालकंस रागाची ५वी रागिणी ही गुणकली आहे. त्यामुळे येथे कणकली ऐवजी गुणकली असे असू शकते. | |
| ६. | २१० | रागिणी गुणकली | **देसी रागिणी** असे लिहिलेले आहे. (फा) | **दिवसाचा एक प्रहर आणि एक घटका (घडी) उलटलेली आहे** खालील बाजूस '३३' आकडा लिहिलेला आहे. (फा) |
| ७. | २११ | राग बंगाला | **बंगाला रागिणी पंजोम राग श्री** म्हणजेच 'श्रीरागाची ५वी रागिणी बंगाला'. मात्र श्रीरागाची ५वी रागिणी केदारा ही आहे. तर रागिणी बंगाला ही राग मेघाची ५वी रागिणी (अभ्यंकर २००३:२४) (फा) | **दिवसाचे २ प्रहर व २ घटिका (घडी) झालेल्या आहेत**. खाली '३०' हा आकडा लिहिलेला आहे. (फा) |
| ८. | २१२ | राग मधुमाधवी | **मधुमाधवी रागिणी पंजोम राग हिंडोल.** (फा) म्हणजेच 'हिंडोल रागाची पाचवी रागिणी मधुमाधवी.' | **एक प्रहर दिवस राहिला होता**. खाली '१७' हा आकडा लिहिलेला आहे. (फा) |
| ९. | २१३ | राग बसंत | **बसंत रागनी सेव्वम दीपक राग**. म्हणजे वसंत रागिणी–राग (फा) दीपकची ३री रागिणी. मात्र वसंत रागिणी ही दीपक रागाची २ऱ्या क्रमांकांची रागिणी आहे. (अभ्यंकर २००३:२४) | **दिवस संपायला एक प्रहर राहिला असताना**. (फा) |
| १०. | २१५ | राग ककुभ | **ककुभ** (मो) | **रागनी ककुभ** (फा) |
| ११. | २१६ | राग केदार (कानडा) | वरील बाजूस कागदी पट्टीवर 'कानडा' असे लिहिलेले आहे. (दे) **केदार** (मो) मात्र हे चित्र '**राग कानडा**' चे आहे. | **रागनी केदारा तालुक मेघ मल्लार.** (दे) याचा अर्थ– 'रागिणी केदारा मेघ मल्हार रागाशी संबंधित आहे'. मात्र ती चित्रकार प्रणाली नुसार श्रीरागाशी संबंधित आहे. तर हनुमान प्रणाली नुसार दीपक रागाशी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | संबंधित आहे.<br>त्या खाली **'रागिनी केदारा'**असे लिहिलेले आहे. (फा) |
| १२. | २१७ | राग कानडा<br>(केदार) | राग केदार (दे)<br>**कानडा** (मो) | **रागिनी कानडा**. (फा)<br>त्याखालील **केदार** हे नाव खोडलेले आहे. मात्र हे चित्र **केदार रागाचे** आहे. |
| १३. | २१८. | रागिणी खंबावती | खंबावती, ३०. असे लिहिलेले आहे. (फा)<br>**खंबावती** (मो) | **रागनी खंबावती तालुक रंग मेघ मल्लार** (दे)<br>याचा अर्थ– 'रागिणी खंबावती मेघ मल्हार रागाशी संबंधित आहे'. मात्र ती मालकंस<br>रागाशी संबंधित आहे. |
| १४. | २१९ | राग गुजरी | राग गुजरी, २७ (दे)<br>**गुजरी** (मो) | **रागनी गुजरी तालुक राग हिंडोल** (दे)<br>म्हणजे– 'गुजरी रागिणी ही राग हिंडोलशी संबंधित आहे'. मात्र प्रत्यक्षात ती मेघ रागाशी संबंधित आहे.<br>त्याखाली **'रागिनी गुर्जरी'** असे लिहिलेले आहे (फा) |
| १५. | २२० | रागिणी गुणकली | गुनकली (दे)<br>**गुनकली** (मो) | रागनी गुनकली तालुका श्रीराग (दे)<br>म्हणजे– 'गुनकली रागिणी ही श्री रागाशी संबंधित आहे'. मात्र प्रत्यक्षात ती मालकंस रागाशी संबंधित आहे.<br>त्याखाली **'रागिनी गुणकली'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| १६. | २२१ | रागिणी गुणकली | गुनकली (दे) | रागनी गुनकली तालुक मेघ मल्लार (दे)<br>म्हणजे– 'गुनकली रागिणी ही मेघ मल्हार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **गुनकली** (मो) | रागाशी संबंधित आहे'. मात्र प्रत्यक्षात ती मालकंस रागाशी संबंधित आहे.<br><br>त्याखाली **'गुणकली'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| १७. | २२३ | राग दीपक | राग दीपक (दे)<br><br>**दीपक** (मो) | राग दीपक पाच रागनी सहित (दे)<br><br>त्याखाली **'दीपक राग'**<br><br>असे लिहिलेले आहे. (फा) |
| १८. | २२४ | रागिणी देवसाख | देवसाख (दे)<br><br>**देवसाख** (मो) | वरील बाजूस **'देवसाखम'** असे, तर खालील बाजूस **'देवसाखे'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| १९. | २२६ | रागिणी नट | रागिणी नट (दे)<br><br>**नट कल्याण** (मो) | रागनी नट तालुका दीपक (दे)<br><br>याचा अर्थ– 'नट रागिणी ही **दीपक रागाशी** संबंधित आहे'**.**<br><br>त्याखाली **'नटकल्याण'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| २०. | २२७ | राग पंचम | राग पंचम (दे)<br><br>**पंचम** (मो) | रागानी पंचम तालुक रंग दीपक (दे)<br><br>याचा अर्थ– **'रागिणी पंचम ही दीपक रागाशी संबंधित आहे'. मात्र प्रत्यक्षात ती श्री रागाशी संबंधित आहे .**<br><br>त्याखाली **'रागनी पंचम** असे लिहिलेले आहे (फा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१. | २२८ | रागिणी पटमंजरी | पटमंजरी (दे)<br><br>**पटमंजरी** (मो) | रागनी पटमंजरी तालुक राग हिंडोल (दे)<br><br>म्हणजे– **'पटमंजरी रागिणी ही हिंडोल रागाशी संबंधित आहे'.**<br><br>त्याखाली **'पटमंजरी'** असे लिहिलेले आहे. (फा) |
| २२. | २२९ | राग बंगाला | बंगाला (दे)<br><br>**मालकंस** (मो)<br><br>देवनागरीत मालकंस खोडून बंगाला असे लिहिलेले आहे. मात्र हे चित्र बंगाला रागाचे नसून मालकंस रागाचेच आहे. | रागनी बंगाला तालुक मालकौस'(दे)<br><br>म्हणजे– 'रागिणी बंगाला ही **म**ालकंस रागाशी संबंधित आहे'. **म**ात्र प्रत्यक्षात ती भैरव रागाशी संबंधित आहे.<br><br>त्याखाली **'बंगाल'** असे लिहिलेले आहे.<br><br>(फा) |
| २३. | २३० | राग भैरव | भैरव (दे) | राग भैरव पंच रागनी तालुक (दे)<br><br>म्हणजे– भैरव राग त्याच्या पाच रागिणींशी संबंधित आहे.<br><br>त्याखाली **'भैरव'** असे लिहिलेले आहे.<br><br>(फा) |
| २४. | २३१. | रागिणी भैरवी | **भैरवी** (मो) | **रागिनी भैरवी तालुका भैरव ( दे)**<br><br>म्हणजे –रागिणी भैरवी ही भैरव रागाशी संबंधित आहे'.<br><br>त्याखाली **'भैरवी'** असे लिहिलेले आहे<br>(फा) |
| २५. | २३२. | रागिणी मधुमाधवी | मधुमाधवी (दे) | **रागनी मधुमाधवी तालुक राग हिंडोल** (दे)<br><br>याचा अर्थ– 'रागिणी **मधुमा**धवी ही हिंडेल रागाशी संबंधित आहे'. (चित्रकार प्रणाली) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | त्याखाली **'मधुमाधवी रागनी'** असे लिहिलेले आहे (फा) |
| २६. | २३३ | राग मालकौंस<br>पांच रागिणी सहित | मालाकौंस पांच रागिणी सहित (दे)<br>**मालकौंस** (मो) | ..... |
| २७. | २३४ | रागिणी मालसिरी | मालसिरी (दे)<br>**मालसिरी** (मो) | **रागनी मालसिरी तालुक मेघमल्लार** (दे)<br>म्हणजे– 'रागिणी मालसिरी ही मेघ मल्लार रागाशी संबंधित आहे'.<br>मात्र प्रत्यक्षात ती भैरव रागाशी (चित्रकार प्रणाली नुसार) संबंधित आहे. तर हनुमान प्रणाली नुसार ती श्री रागाशी संबंधित आहे. त्याखाली **'मालसरी रागनी'**<br>असे लिहिलेले आहे. (फा) |
| २८. | २३५ | राग मेघमल्हार | राग मेघमल्हार (दे) | **राग मेघमल्हार पाच रागनी सहित** (दे)<br>त्याखाली **'राग मेघ मलार'**<br>असे लिहिलेले आहे (फा) |
| २९. | २३६ | रागिणी रामकली | रामकली (दे) | **रागनी रामकली तालुक भैरव** (दे)<br>याचा अर्थ – 'रागिणी रामकली ही भैरव रागाशी संबंधित आहे'.<br>मात्र प्रत्यक्षातचित्रकार प्रणाली नुसार ती मालकंस रागाशीसंबंधित आहे. तर हनुमान प्रणाली नुसार ती हिंडोल रागाशी संबंधित आहे. त्याखाली **'रामकली'**असे लिहिलेले आहे . (फा) |
| ३०. | २३७ | रागिणी वसंत | वसंत (दे) | **रागनी वसंत तालुक रंग दीपक** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **वसंत** (मो) | म्हणजे – 'वसंत रागिणी ही दीपक रागाशी संबंधित आहे'.<br>त्याखाली **'बसंत'** असे लिहिलेले आहे . (फा) |
| ३१ | २३८ | राग वराडी वर्णन | राग वराडी वर्णन (दे)<br>वराडी (मो) | **रागनी वरारी तालुक राग हिंडोल** (मो)<br>म्हणजे – 'रागिणी वरारी ही हिंडोल रागाशी संबंधित आहे'.<br>मात्र प्रत्यक्षात चित्रकार प्रणाली नुसार ती<br>दीपक रागाशी संबंधित आहे. तर हनुमान प्रणाली नुसार ती भैरव रागाशी संबंधित आहे. त्याखाली **'वरारी'** असे लिहिलेले आहे . (फा) |
| ३२ | २३९ | राग श्रीराग | श्रीराग (दे) | **राग श्रीराग पाच रागनी सहित** (दे)<br>**श्रीराग** (फा) |
| ३३. | २४० | राग सारंग | राग सारंग (दे)<br>**सारंग** (मो) | **सारंग** (फा) |
| ३४. | २४१ | राग सोरट वर्णन | राग सोरट वर्णन (दे)<br>**सोरट** (मो) | रागनी सोरट (फा) |
| ३५. | ३४२ | राग हिंडोल वर्णन | राग हिंडोल वर्णन (दे)<br>**हिंडोल** (मो) | राग हिंडोल तालुक रागनी पाच (दे)<br>**हिंडोल** (फा) |
| ३६. | २६१ | रागिणी आसावरी | ---------- | रागनी असावरी (दे)<br>**रागनी असावरी** (फा) |
| ३७. | २६२ | रागिणी भैरवी | ---------- | भैरवी (दे) |
| ३८. | २६३ | रागिणी शामगुजरी | शामगुजरी (दे) | शामगुजरी (दे) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **रागनी शामगुजरी** (फा) |
| ३९. | २६४ | रागिणी गौडी/कौडी | ---------- | रागनी गौडी (दे)<br>**रागनी कौरी** (फा) |
| ४०. | २६५ | रागिणी तोडी | तोडी (दे) | रागिणी तोडी (दे) |
| ४१ | २६६ | रागिणी देवसाग | देवसाग (दे) | रागनी देवसाग (दे) |
| ४२. | २६७ | रागिणी धनासरी | ---------- | रागनी धनासरी (दे)<br>**रागनी धनासरी** (फा) |
| ४३. | २६८ | रागिणी बंगला | ---------- | रागनी बंगला (दे) |
| ४४. | २६९ | रागभैरव | ---------- | राग भैरोव (दे) |
| ४५. | २७० | रागिणी मधुमालती | ---------- | रागनी मदमालती (दे)<br>**रागनी मदमालती** (फा) |
| ४६. | २७१ | रागिणी नट | ---------- | रागनी मारू (नट) (दे)<br>**रागनी मारू** (फा) |
| ४७. | २७२ | राग मेघमल्हार | चित्राच्या खालील बाजूस कागदी पट्टीवर 'मेघमल्हार राग वर्णन' (दे) | राग मेघमल्हार (दे)<br>**राग मेघमल्हार** (फा) |
| ४८. | २७३ | राग ललत | ---------- | रागलंत (दे)<br>**रागलंत** (फा) |
| ४९. | २७४ | राग हिंडोल | ---------- | राग हिंडोल (दे)<br>**राग हिंडोल** (फा) |
| ५०. | ३०१ | राग हिंडोल | ---------- | हिंडोल/हिंडोली राग: (दे)<br>**पंजोम राग हिंडोल** (फा)<br>म्हणजे **पाचवा राग हिंडोल** |

यातील चित्र क्र. २०६ ते चित्र क्र. २१३ ही चित्रे एकच संचातील आहेत. या सर्व चित्रांची चित्रणांची शैली एकसारखी आहे. या सर्व चित्रांना चारी बाजूंनी असणारी पानाफुलांची चौकट, त्यातील वरील पट्टीत केलेले फारसी लेखन, चित्रातील रंगसंगती, आकृत्यांच्या चित्रणाची पद्धत, वेशभूषा इत्यादी सर्वत्र सारखेच आहेत. या सर्व चित्रांच्या मागील बाजूस फारसीतून दिवसाच्या प्रहारांबद्दल वर्णन केलेले आहे. त्यांची वर्णन करण्याची पद्धत, लेखन एक सारखेच आहे. (पाहा चित्र क्र. २०९ आणि चित्र क्र. २१२)

यानंतर चित्र क्र. २१५ ते चित्र क्र. २४२ ही चित्रे एकाच मालिकेतील आहेत. या चित्रांना अगदी साध्या, सोनेरी रंगाची बारीक चौकटी आहेत. मात्र या चित्रांचे चित्रांकान, चित्र संयोजन उत्कृष्टरित्या केलेले आहे. या मालिकेतील सर्व चित्रांच्या मागे देवनागरीतून त्या त्या रागाचे वर्णन एका ओळीत लिहिलेले आहे. त्याखाली फारसीतून रागांची नावे लिहिलेली आहेत.

तर तिसऱ्या संचात २६१ ते २७४ अशी १४ चित्रे आहेत. या संचातही अतिशय उत्कृष्ट दर्जाची रागचित्रे आहेत. उत्तम चित्रसंयोजन, रेखांकन व रंगसंगती आहे. या चित्रांच्या मागे फारसीतून रांगाची नावे लिहिलेली आहेत, तर त्याखाली देवनागरीतूनही नावे आहेत. या संग्रहातील चित्र क्र. ३०१ हे या सर्व चित्रांपेक्षा वेगळे आहे. त्याच्या चित्रांकनाच्या पद्धतीवरून ते उपलब्ध चित्रातून जुन असण्याची शक्यता आहे. ही चित्रे दख्खनी वाटतात. या संच क्र. २ मधील बऱ्याचशा चित्रांच्या मागील बाजूस हिंदीतून लिहिलेले वर्णन व त्या रागाचे फारसीतून अथवा मोडी, देवनागरीतील नावे यात साम्य वा संबंध दिसून येत नाही.

साधारणपणे १५ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंत भारतातील अनेक राज्यांमध्ये, विविध राजवटींमध्ये ही रागमाला चित्रे विपुल प्रमाणात रेखाटली गेली. मध्ययुगातील हा अतिशय लोकप्रिय चित्रप्रकार होता. मंडळ संग्रहातही वेगवेगळ्या ठिकाणची, वेगवेगळ्या प्रदेशांतील, विविध शैलींतील असंख्य रागमाला चित्रे आहेत. त्यातील बरीचशी चित्रे चित्रकामाच्या दृष्टीने अतिशय उत्तम

आहेत, काही माध्यम स्वरूपाची, तर काही त्यामानाने कमी प्रतीची वाटतात. यातील बरीचशी नक्कल केलेली असू शकतात.

रागमाला चित्रे या विषयावर आत्तापर्यंत बऱ्यापैकी समग्र संशोधन झालेले असल्याने प्रस्तुत संशोधनात त्यावर नव्याने सांगण्यासारखे जास्त काही नसल्याने व विस्तारभयास्तव संशोधकाने ही चित्रे प्रस्तुत संशोधनातून वगळलेली आहेत. यातील फक्त फारसी वाचन नव्याने करण्यात आले आहे.

## १३. प्राणी

मंडळ संग्रहात इतर चित्रांच्या बरोबरीने एकूण १२ प्राणीचित्रे आहेत. मध्ययुगीन कला परंपरेला साजेशीच ही सर्व चित्रे आहेत. प्राण्यांच्या चित्रणातील अगदी बारीक सारीक तपशीलांसह ही चित्रे काढलेली आहेत. मुघल, मराठा तसेच पाश्चात्य लिथो प्रिंट मधील ही चित्रे आहेत. मुघल काळात जहांगीर बादशहाने व्यक्तिचित्रांच्या बरोबरीनेच फुले–पाने, झाडेझुडपे, पशु–पक्षी आदींची असंख्य चित्रे आपल्या चित्रकारांकडून काढून घेतली व त्यांचे संच तयार करवून घेतले. त्याच्या दरबारी असलेला मन्सूर नावाचा चित्रकार हा अशा प्रकारची चित्रे काढण्यात वाकबगार होता.

यातील चित्रांमध्ये हत्तींची साठमारी, एडक्यांची टक्कर, मेंढा, बकरा, साखळदंडांनी जखडलेला सिंह, पिसाळलेल्या हत्तीस काबूत आणणारे शिपाई, काळविटावर झडप घालणारा चित्ता अशी स्वतंत्र प्राणी चित्र आहेत. यातील काही चित्रे पुढीलप्रमाणे –

१. **चित्र क्र.२६- चित्त्याला बांधून घेऊन चाललेली बैलगाडी :-** हे एक अतिशय सुंदर चित्र असून, त्यात उत्कृष्ट संयोजन (copmosition) आणि रंगसंगती आहे. एका बैलगाडीत चित्त्याला बांधलेले आहे. तो चित्ता गाडीत बसलेला असून मागे वळून पाहत आहे. त्यास शिकारी साठी नेले जात आहे. गाडीवान बैलजोडीला हाकत आहे. पूर्वीच्या काळी शिकारीसाठी शिकारी कुत्र्यांप्रमाणे चित्त्यांचाही शिकारीसाठी वापर केला जात असे. या चित्राला चारही

बाजूंनी सोनेरी व निळ्या रंगाची चौकट असून त्यात सोनेरी रंगाने वेल–पत्तींचे चित्रण केले आहे. हे चित्र या एकंदरीत वैशिष्ट्यावरून मुघल शैलीतील आहे. (पाहा चित्र क्र.२६)

२. **चित्र क्र.८६०–हत्तींची जलक्रीडा :-** जंगलातील एकूण ७ हत्तींच्या कळपाचे चित्रण केलेले आहे. त्यातील चार हत्ती तलावातील पाण्यात मनसोक्त डुंबत असून तीन हत्ती काठाजवळ फिरत आहेत. त्यात एक पिल्लू आहे. नीम कलम पद्धतीने याचे चित्रण केलेले आहे.हत्ती हा कुटुंबप्रिय प्राणी आहे त्याच्या या स्वभावाचे तंतोतंत चित्रण यात आलेले आहे. विशेष म्हणजे आपल्या पिल्लाशी खेळणारी हत्तीण व तिच्या पिल्लाचे चित्रण उत्कृष्टरीत्या झालेले आहे. (पाहा चित्र क्र.८६०)

३. **चित्र क्र.८६२ – प्राण्याची अनेक चित्रे :-** एका पातळ कागदावर साधारण ८०–८५ प्राण्यांची चित्रे काढलेली आहेत. वेगवेगळ्या प्राण्यांची; जंगलातील वेगवेगळ्या अवस्थांमधील सुरेख रेखाचित्रे आहेत (linedrawings). यामध्ये ससे, हरणं, काळवीट, हत्ती, वाघ–सिंह, कोल्हा, लांडगा, घोडा, साळींदर, कासव...अशा अनेक प्राण्यांची तपशीलांसह रेखांकाने केली आहेत. हे चित्र कडांनी फाटलेले आहे.

४. **चित्र क्र.९०८– हत्तींची साठमारी :-** हा पूर्वीच्या काळी राजे–रजवाड्यांचा एक आवडता साहसी खेळ असे. या विषयावर अनेक चित्रे काढली गेली. हे चित्र त्यांतील एक. या चित्रामध्ये दोन हत्तींची झुंज चालू आहे. त्या दोघांवर दोन स्वार बसलेले असून आपल्या हातातील अंकुशांनी त्यांना लढवत आहेत. त्यांच्या मागे त्यांचे सेवक बसलेले आहेत. एकंदरीत या खेळातील थरार दर्शविण्यात चित्रकार यशस्वी झाला आहे. या चित्रातील व्यक्तिरेखांची चेहरे पट्टी, मागील निळा रंग यांवरून हे चित्र दख्खनी शैलीतील असावे.

५. **चित्र क्र.८८४– दोन पक्ष्यांची चित्रे** (छापील चित्र) **:–** यामध्ये एका फांदीवर दोन पक्षी बसलेले आहेत, असे चित्रण आहे. त्यातील एक कबुतर किंवा पारवा मोठा पक्षी यासारखा हा आहे असून त्याची लांब शेपटी आहे. त्याच्या डोक्यावर Fig.1- COLUMBA असे लिहिलेले असून दुसऱ्या छोट्या पक्ष्याच्या डोक्यावर Fig.2- CREEPER असे लिहिलेले आहे. याला American treecreeper या नावाने ओळखले जाते North America मध्ये हा पक्षी आढळतो. या चित्राच्या खालील बाजूस एक चित्र असून त्यावर Fig.3- COMENTARIUM असे लिहिले आहे. हे एखाद्या पाश्चत्य पुस्तकातील पाने लिथो प्रिंट केलेले एखादे पान असावे.

## ४.३.ब) चित्रे (तुर्को–पर्शियन, मुघल, दख्खनी व इतर)

### १. तुर्को–पर्शियन चित्रे

या संचात एकूण २१ चित्रे आहेत. ग.ह.खरे व इतर संशोधकांनी या चित्रांना तुर्को–पर्शियन चित्रे असे म्हटलेले आहे. यात स्त्री–पुरुषांची वेगवेगळी चित्रे आहेत; तर काही गप्पा मारणारी लोकं, नाच–गाणी अशी समूह चित्रे आहेत. त्यांतील चित्र क्र.४२९, चित्र क्र.४३०, चित्र क्र.४४०, चित्र क्र.४४१, चित्र क्र.४४२, चित्र क्र.४४३, चित्र क्र. ४४७, चित्र क्र.४४८, चित्र क्र.४४९, आणि चित्र क्र.४५० ही चित्रे त्यांची रंगसंगती, रचना (compositions) व चित्रांकनाच्या पद्धती वरून एकसारखी वाटतात. या चित्रांमधील व्यक्तिरेखांचे चित्रण एवढे सफाईदार वाटत नाही. चेहऱ्याचे, मुख्यत: भुवयांचे चित्रण हे थोडे फार चिनी प्रभावासारखे वाटते. इराणी कलेवर सुरुवातीच्या काळात मंगोल वंशाच्या चेहरेपट्टीचा प्रभाव जाणवतो. भुवया थोड्या वरच्या बाजूला रेखलेल्या आहेत. पण नाक, डोळे मात्र इराणी आहेत. गोल, बदामी आकाराच्या चेहऱ्यावर छोटे डोळे काढलेले आहेत. साधे, सुटसुटीत रेखांकन असून त्यात सपाट रंग भरलेले आहेत. आकृतींचे बाह्याकार हे काळ्या तुटक रेषांनी रेखले आहेत. या चित्रांतील चेहरे थोडेसे उग्र वाटतात.

या संचातील ही सर्व चित्रे हलक्या करडया (grey) रंगाच्या कागदावर काढलेली आहेत. या सर्वांत सर्वसाधारणपणे मध्यवर्ती रचना (central composition) दिसून येते. मध्यभागी एखादी आकृती, तिच्यामागे एखादे झाड, घर अथवा महाल असे चित्रण आहे. यातील काही चित्रांमध्ये बैठ्या आकृतींत त्या त्या व्यक्तीच्या कमरेपासूनचा खालील  भाग हा वरील भागापेक्षा आकाराने मोठा दाखविण्यात आलेला आहे. उदा. चित्र क्र.४२९ व चित्र क्र.४३०. अशी चित्रे साधारणपणे सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात अथवा सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात दिसतात. परंतु हि चित्रे १९ ते २० व्या शतकातील असण्याची शक्यता आहे. (www.Ink&Gold on paper-persian style-Safavid Period>folio from an album;seated youth,early 17th century, Safavid)

पार्श्वभूमीवर खास इराणी पद्धतीची भौमितिक आकारांची नक्षी ही चित्रातील गालीचा, घरे, भिंती यावर केलेली दिसून येते. तर, पोशाखावर वेलबुट्टीचे चित्रण आहे. आकाशातील ढग हे काळ्या गोलाकार रेषांनी दाखविले आहेत. झाडांच्या पानांचा आकार वैशिट्यपूर्ण गोलाकार असा; पण त्यातूनही भौमितिक आकार दिसून येतो. (पाहा चित्र क्र.४२९ आणि आ.क्र.३०)

एकंदरीतच या चित्रांमध्ये तेजस्वी पिवळा, लाल, गुलाबी, हिरवा, आकाशी, पांढरा, केशरी, जांभळा अशा अपारदर्शी (opaque) रंगांचा व शाईचा  वापर केलेला दिसून येतो.

या संचातील चित्र क्र.४३३ हे चित्र त्याची रंगसंगती, रचना या सर्वांवरून पूर्ण वेगळे आहे. हे चित्र आडवे आहे. (horizontal composition) आणि त्यात आकृतींची संख्याही जास्त आहे. त्यामुळे हे चित्र बाकीच्या चित्रांच्या जवळ जात नाही. ते एका वेगळ्याच संचातून आले असावे असे दिसते.

तर उर्वरित चित्रांपैकी चित्र क्र.४३१, चित्र क्र.४३२, चित्र क्र.४३४ ते चित्र क्र.३३९ आणि चित्र क्र. ४४५, चित्र क्र. ४४६ ही चित्रे वेगळी आहेत. या चित्रांची रचना, रंगसंगती व चित्रांकनाची पद्धत एकसारखी आहे. ही चित्रे इतर सर्व चित्रांपेक्षा तंत्र, रंगसंगती, रचनात्मक दृष्ट्या खूपच सफाईदार आहेत. या चित्रांमध्ये स्त्री व पुरुष एकत्र बसलेले वा काही ठिकाणी वाद्य वाजविणाऱ्या एकेका स्त्री व पुरुषांची चित्रे आहेत.

**संच क्र.२.**

**सदर अभ्यास अंतर्गत नव्याने समाविष्ट केलेली चित्रं पुढील प्रमाणे –**

या संचातील चित्र क्र. ४५० च्या मागील बाजूस एक पोस्टाचे तिकीट चिटकवलेले आहे. तो इराणचा अल्पवयीन (१२ वर्षांचा) बादशहा 'अहमद शाह'- कजार वंश, याचा आहे. हा बादशहा १९११ साली गादीवर आल्यानंतर त्याच्या नावाने पोस्टाचे तिकीट stamps काढले गेले होते. त्यावर त्याचा फोटो असे. तिकिटावर बादशाहाच्या फोटोच्या वरील बाजूस **'पोस्ट... शाह इराण'** असे फारसीतून लिहिलेले आहे. तर खालील बाजूस **'POSTES PERSANES'** असे लिहीलेले आहे. याची किंमत '**३Ch**' म्हणजेच....**'३शाही'** इतकी आहे. शाही हे इराण मधील चलन आहे. शिवाय या

stamp च्या खाली चिटकवलेल्या कागदावर इंग्रजीतून '..ki khosoro…..'.असे लिहिलेले आहे. बाकीचा कागद फाटला आहे. (पाहा चित्र क्र.४५० आणि आ.क्र.३१)

या चित्राच्या संबंधात हे थोडेसे वेगळे असले तरी हे तिकिट चित्राच्या काळाशी बहुधा संबंधीत असावे का ही चित्र कोणी इराणवरून पोस्ट केली असावीत ? विशेष म्हणजे हे तिकट थेट चित्राच्या मापाच्या कागदावर चिटकवले असल्याने बहुदा तिकिट चिटकवलेला कागद नंतर चित्र काढण्यासाठी वापरला असावा का ? असे प्रश्न येथे निर्माण होतात.

बहुदा हा चित्र संग्रह एखाद्या बड्या कला रसिकाने इराण मधून खास मागविलेला असावा, असे चित्र क्र.४५० च्या मागे असलेल्या इराणी स्टॅम्प वरून अनुमान काढता येईल या चित्रांची शैली, काळ बघता ही चित्रे नक्कीच दुर्मीळ व वैशिष्ट्यपूर्ण म्हणावयास हरकत नाही.

## २. मुगल चित्रे

भारत इतिहास संशोधक मंडळातील संग्रहामधील १२८७ चित्रांपैकी अनेक चित्रे ही मुगल शैलीतील आहेत. या चित्रांत  बादशहा व त्यांचे शहजादे यांची व्यक्तिचित्रे, दरबारी मंडळी, दरबारदृश्यं, ज़नान खान्यांची चित्रे, झरोका चित्रे, शिकार दृश्ये, गुलदस्ता चित्रे यांची चित्रे असल्याचे मागे नमूद केले आहेच. या चित्रांतून सौम्य व आल्हाददायक रंगसंगती, एकचश्म पद्धतीचे चेहेरे दिसतात. वास्तववादी वाटणारे चित्रण केलेले दिसते. व्यक्तिचित्रणातून त्या त्या व्यक्तीचे तपशीलवार चित्रण, सफाईदार रेखांकन केलेले असे. आल्हाददायक रंग व संयत भावमुद्रा यामुळे मुगलकाळातील चित्रे ही दर्जेदार आहेत. चित्राच्या बाजूने चौकटी पानाफुलांच्या नक्षीने सुशोभित करण्याची पद्धत मुगल काळात सुरु झाली, अशा चौकटींना हशिया असे म्हटले जाई. तसेच संपूर्ण पानभर सोनेरी रंगांत काम केले जाऊ लागले. पुढे जहांगीर व शहाजहान काळात ही कला अधिकच बहरली.

मंडळ संग्रहातील चित्रांमध्ये अनेक मुगल बादशहा, त्यांचे दरबारी यांची व्यक्तिचित्रे आहेत. यातील बऱ्याचश्या चित्रांवर किंवा खाली, वा मागील बाजूस त्या त्या व्यक्तिचित्रांची नावे लिहिलेली आहेत. यात  जहांगीर बादशाहाचे शिकार करतानाचे दृश्ये आहे. राजपुत्र सलीम व त्याचे गुरु, पीर व

ज्ञानी मंडळींच्या सहवासात बसलेला शहजादा दाराशिकोह यांची हि चित्रे या संग्रहात आहेत. बेगम नूरजहान, झेबुन्निसा बेगम यांची चित्रे आहेत. शिवाय साधूसंतांच्या दर्शनास जाणारी बेगम हे ही त्याकाळी लोकप्रिय विषय होते. यावरीलही काही चित्रे मंडळ संग्रहात आहेत. जहांगीरच्या पशू–पक्ष्यांवरील प्रेमामुळे त्यांचीही खूपच दर्जेदार चित्रे निर्माण झाली. अशा प्रकारची चित्रे काढण्यात मन्सूर नावाचा त्याचा चित्रकार तरबेज होता. तर व्यक्तिचित्रणात अबुल हसन व बिशनदास हे चित्रकार निष्णात होते. तसेच गोवर्धन नावाच्या चित्रकाराचा योगी–योगिनी, फकीर, अवलिया यांच्या चित्रणात हातखंडा होता. (Milo 1992:90). अशाप्रकारे अबुल हसन, मन्सूर, गोवर्धन, बिशनदास, बालचंद्र, मीर हाशीम, बिचीत्तर, मनोहर, होनहार आदी कुशल चित्रकार मुगल दरबारी होते. याचा थोडक्यात परिचय मागील प्रकरणात दिला आहेच

संग्रहातील बऱ्याचशा मुगल चित्रांबद्दलची माहिती या प्रबंधात वेगवेगळ्या ठिकाणी त्या त्या विषयांनुसार आलेली आहे. त्यामुळे येथे १–२ चित्रांबद्दलची माहिती आपण येथे घेऊ.

**संच क्र.१.**

पूर्वसूरींनी ओळखलेली काही मुघलचित्रे पुढीलप्रमाणे –

**चित्र क्र.३५९ –रफी उद दरजत:–**(६.६ x ४.३). या चित्राच्या खालील बाजूस व मागील बाजूसही इंग्रजी मधून (Rafi Ud-Darjat) असे लिहिलेले आहे. हे लिखाण नंतरच्या काळात करण्यात आले असावे. मंडळ सूची मध्ये ही या चित्राचे वर्णन 'रफी उद दरजत'; उभा, सव्यावर्ती; तरवारी वर हात, दिल्ली कलम, अर्वाचीन असे केलेले आहे. हा १० वा मुघल बादशहा होता. या चित्रात मागील फिकट हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर या बादशाहाचे चित्रण केलेले आहे. त्याचा चेहरा व कपडे यांचे अगदी बारीक सारीक तपशिलांसह चित्रण केलेले आहे.

**चित्र क्र.४१७–सुलतान अबु सय्यद मिर्झा :–** (६.४ x ४.२). या चित्राच्या खालील बाजूस व मागील बाजूस इंग्रजी मधून ('Sultan Abu Sayad Mirza Padshan') असे लिहिलेले आहे. मंडळ

सूचित या चित्राचे वर्णन 'बाबरचा आजा; वामावर्ती पण सन्मुख; दिल्ली कलम; अर्वाचीन' असे आहे. या चित्रात हा पादशहा उभा असून उजव्या हातातील तलवार सरळ उभी जमिनीवर टेकविलेली आहे तर डाव्या हातात ढाल धरलेली आहे. या चित्रात चेहेऱ्याचे व कपड्यांचे चित्रण अगदी तपशीलवार व सफाईदारपणे केलेले आहे. पार्श्वभूमीवर फिकट निळ्या रंगाचे लेपन केलेले आहे. मात्र ही पद्धत पारंपरिक मुघल चित्रांप्रमाणे सपाट रंगलेपन प्रमाणे दिसत नाही. पाश्चात्य तंत्र पद्धतीनुसार पार्श्वभूमीचे रंगलेपन केलेले आहे.

**संच क्र.२.**

सदर अभ्यासा अंतर्गत या संचातील सर्व चित्रे नव्याने अभ्यासून त्यांची शीर्षके आणि फारसी लेख नव्याने वाचले आहेत.ही चित्रे पुढीलप्रमाणे –

**चित्र क्र.९०– खंबावती रागिणीचे एक चित्र :–** हे चित्र रागमाला चित्रातील खंबावती रागिणीचे चित्र आहे. या चित्राच्या मागील बाजूस फारसीतून काव्य आहे. त्यात औरंगजेबाचा उल्लेख आहे. त्यात 'शाह औरंगजेब..(?) तसेच ठुमकत...' असे शब्द आहेत. तर बाकीचे शब्द लागत नाहीत. यात एका स्त्रीच्या डोळ्यांचे वर्णन आहे. या काव्यातील भाषा उत्तर भारतातील उर्दूप्रमाणे आहे. हे बहुदा कुठल्यातरी पुस्तकातील पान आहे. या काव्याच्या वरती फारसीतून '**खंबायत**' असे लिहिलेले आहे.

**चित्र क्र.१०२८–सुलतान परवेझ मिर्झा :– (६.२ x ३.६).** या चित्राच्या वरील बाजूस अलीकडच्या काळात 'राजपुत्र दाराचा सासरा' असे देवनागरीतून लिहिलेले आहे. तसेच मंडळ सूचीत या चित्राचे वर्णन 'दाराचा सासरा; मागे रंगीत फुलझाड; छापील चित्र' असे लिहिलेले आहे. मात्र हे चित्र छापील नसून हातानेच जलरंगात काढलेले आहे. वरील शीर्षकावरून शोध घेतला असता, दाराची सुकेक्षणी पत्नी नादिरा बेगमच्या वडिलांचे नाव सुलतान परवेझ मिर्झा असे होते. त्यामुळे हे चित्र सुलतान परवेझ मिर्झा याचे आहे. चित्रातील व्यक्तिरेखा ही वृद्ध आहे. तर मंडळ संग्रहातीलच अजून एक चित्र; चित्र क्र.६४३ ही व्यक्तिरेखा सुलतान परवेझ मिर्झा याची आहे; जी तरुणपणीची आहे. **यावरून मंडळ**

**संग्रहात सुलतान परवेझ मिर्झा याची दोन चित्रे असून ती सुलतान परवेझ मिर्झाच्या तरुण वृद्ध वयोमानाची आहेत हे विशेष .**

### ३. राजपूत राजे, रागचित्रे, मासचित्रे इ.

राजस्थानी लघुचित्रशैलीचा उदय साधारण १५ व्या शतकात झाला व ती पुढे १८व्या शतकापर्यंत प्रचलित होती. परकीय आक्रमणांमुळे राजस्थानचे अनेक लहान लहान राज्यांमध्ये भाग पडले. त्याप्रमाणे राजस्थानी शैली सुद्धा अनेक केंद्रांत विभागली गेली. जयपूर, जोधपूर, किशनगढ, बिकानेर, मेवाड, बुंदी, कोटा, बिकानेर, अलवार इ. शहरे या चित्रकलेची महत्त्वाची केंद्रे झाली. त्यावरून त्यांच्या शैलींना नावे मिळाली. या वेगवेगळ्या राज्यांमधून चित्रनिर्मिती होत असल्याने त्या त्या विशिष्ट ठिकाणच्या चित्रांत तेथील स्थानिक वैशिष्ट्ये दिसून येतात.

राजस्थानी शैलीतील चित्रविषयात अनेक संतांचे तत्कालीन चित्रण दिसते. मीराबाई, कबीर, तसेच रामायण, महाभारत, कृष्णलीला इ. पुराणे, ग्रंथांतील कथा–प्रसंग, काव्यकल्पना चित्रित करण्यात आल्या. या शिवाय अष्टनायिका, राग–रागिण्या, बारा महिने, ऋतूंची वर्णने इ. विषयांवरही विपुल चित्र निर्मिती झाली. ऋतूंच्या प्रत्येक चित्रांत त्या त्या महिन्याची विशेषता दिसून येते. त्यात नायक–नायिकेचे मिलन व विरह यांना प्राधान्य दिलेले दिसून येते. ती मुगल शैलीतील व्यक्तिचित्रांप्रमाणे प्रभावी नसुन त्यांची वेगळी पद्धत होती, सादृश्य, हि चित्रे रेखांकन या दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ही चित्रशैली मुगल कलेप्रमाणे दरबारी स्वरूपाची नसून तिचे स्वरूप लोककलेचे, साधेसुधे व मानवी भाव–भावनांवर आधारित आहे. या मध्ये काव्यातील कोमलता, प्रतिभा वा कल्पनाविलास यांचे रम्य दर्शन घडते. लोकजीवन, धार्मिक जीवन, सण, उत्सव व चालीरीती यांचे चित्रण या शैलीतून दिसून येते; या चित्रकामात उष्ण रंगसंगतीचा वापर केलेला असून त्यात लाल व पिवळ्या रंगाचा वापर जास्त केलेला आहे. त्यांच्या बरोबरीने निळा, हिरवा, केशरी, पांढरा व काळा यांचाही वापर केलेला आहे. गतिमान व जोमदार रेषांमुळे चित्रातील आकृतींच्या हालचाली सजीव आणि वेगवान वाटतात. कौशल्यपूर्ण रेखांकनातून भावभावनांचे उत्तम दर्शन घडते. विषयाला पोषक अशा

वातावरण निर्मितीसाठी निसर्गाचा अलंकारिकतेने व प्रतीकात्मकतेने उपयोग केलेला आहे. नायिकाभेद, बारामास व रागमाला चित्रांतून त्याचे प्रत्यंतर येते. आनंद, करुणा, विरह, शृंगार हे भाव व्यक्त करण्यासाठी त्यांचा कौशल्याने वापर केला आहे. राजवाडे, गच्ची, घरे, मंदिरे, गड, किल्ले यांतून संपन्न व समृद्ध जीवन पाहावयास मिळते. चित्रकामातील स्त्री–पुरुषांच्या आकृती या बांधेसूध, ठेंगण्या व मोहक आहेत. मत्स्याकृती व विशाल नेत्र, भव्य कपाळ, सरळ व नाजूक नासिका, लयबद्ध व नाजूक हालचाली व त्यातून व्यक्त होणारा भावनेचा आविष्कार उत्कृष्टपणे चित्रित केलेला असतो. (खाडे २०१४ : ७१,७२).

राजपूत शैलीचा दुसरी शाखा म्हणजे पहाडी शैली. मुगल शैली व राजपूत शैली यांच्या मिश्रणातून ही शैली उदयास आली. (खाडे २०१४:७७) १७व्या शतकाच्या अखेरीपासून ते १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत या शैलीत चित्रकाम झाले. यातील चित्रविषय जरी राजस्थानीशैली सारखे असले; तरी या चित्रांमध्ये निसर्गाचे चित्रण जास्त कुशलतेने व भरपूर केलेले दिसते. (खाडे २०१४ : ७७). अत्यंत नाजूक, मंद व आकर्षक रंगसंगती, सुंदर स्त्रियांचे मनोहारी चित्रण यामुळे पहाडी कागरा चित्रे सर्वोत्कृष्ट मानले जातात. (हे सर्वश्रृत आहेच)

भाइसं मंडळ संग्रहातील चित्रांमध्ये वरील विषयांवरील, राजपूत शैलीतील अनेक चित्रे दिसून येतात. विशेष करून रागमालेवरील, बारा मासाची व भागवत पुराणावरील चित्रे. तसेच अनेक ऐतिहासिक व्यक्तिचित्रे ही आहेत. उदा.– महाराणा प्रतापसिंह–२ रा, हत्तीवर अंबारीत बसलेला राणा अमरसिंह, अभेसिंह, गजसिंह...इ. व अनेक राजपूत सरदारांची चित्रे आहेत. मात्र त्यांवर मागे वा पुढे त्यांच्या नावांची वा चित्रकारांची कसलीच नोंद नसल्याने त्या व्यक्तिरेखा ओळखता आल्या नाहीत.
यातील काही चित्रांचे उदाहरणादाखल येथे अवलोकन करू.

**संच क्र.१.** ग.ह.खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली राजपूत चित्रे पुढीलप्रमाणे –

**चित्र क्र.९३१– महाराणा प्रतापसिंह– २रा:**–(८.१ x ५.९). मेवाडचा महाराणा प्रतापसिंह– २रा याचे हे एकचश्म पद्धतीचे चित्र आहे.या चित्राच्या वरील बाजूस राजस्थानी भाषेतून महाराणा ..

प्रतापसिंघजी २ असे लिहिलेले आहे. महाराणाने अंगात पांढऱ्या रंगाचा अंगरखा घातलेला असून त्याच्या वरील भागात छातीवर केशरी रंगावर सोन्याचे भरजरी जरीकाम केलेले आहे. अंगरख्याला गुडघ्यापासून खाली टोकदार टोके आहेत. पायात फिकट जांभळ्या रंगाची चुणीदार सलवार घातलेली आहे. पायात लाल मोजडी आहेत. कमरेला भरजरी शेला बांधलेला असून त्यात उजव्या बाजूला कट्यार खोचलेली आहे. गळ्यात मोत्यांच्या माळा आहेत. त्यांतील एका माळेला पाचू व माणकाचे पदक आहे. डोक्यावर लाल रंगाचे राजस्थानी पागोटे असून त्यावर रत्न जडवलेली आहेत. डोळे मोठे, मिशा व कानावरील लांब कल्ले, झुपकेदार आहेत. चेहेऱ्याच्यामागे सोनेरी प्रभावलय दाखविले आहे. उजव्या हातातील तलवार जमिनीवर सरळ उभी टेकविलेली असून डाव्या हातात दोन कमळाची फुले आहेत. चित्राच्या मागे फिकट हिरव्या रंगाचे सपाट रंगलेपन केलेले आहे. वरती दूरवर आकाश दाखविले आहे व पायाखाली गडद हिरव्या रंगात भूमी चित्रीत केली आहे. (पाहा चित्र क्र.९३१)

**संच क्र.२.** सदर अभ्यासा अंतर्गत नव्याने समजलेली एकूण ६ राजपूत चित्रे आहेत. ही चित्रे नव्याने अभ्यासून, त्यांच्या वरील लेख, वर्णने वाचून व इतर समान चित्रांचा अभ्यास करून नव्याने समाविष्ट केली आहेत. ती चित्रे पुढीलप्रमाणे

**चित्र क्र.९१४ महाराजा माधोसिंह–जयपूर :–**या संचातीलएका राजपूत राजाचे व्यक्तिचित्र नव्याने ओळखले गेले आहे - **जयपूरचा राजा महाराजा माधोसिंह.** या चित्राचे सविस्तर वर्णन प्र.४.३– नव्याने ओळखलेली पुरुष व्यक्तिचित्रे यांत आलेले आहे.

तसेच **चित्र क्र.१२३०, चित्र क्र.१२३१, चित्र क्र.१२३२, चित्र क्र.१२३५ आणि चित्र क्र.१२३७ ही बारा मासाची ५ चित्रे नव्याने चित्रे मिळाली आहेत. या चित्रांची नोंद मंडळ सूचित मिळाली नाही. शिवाय या पूर्वी मंडळाने १९८३ साली प्रकाशित केलेल्या बारामास चित्रे या पुस्तकात ही या चित्रांची नोंद नाही.** ही चित्रे पुढीलप्रमाणे -

१. **चित्र क्र.१२३०–बैसाषमास** (या चित्राच्या मागे **बसाष २** असे लिहिलेले आहे.)

२. **चित्र क्र.१२३१–ज्येष्ठ मास** (या चित्राच्या मागे **जेठ ३** असे लिहिलेले आहे.)

३. **चित्र क्र.१२३२– आषाढ मास** (या चित्राच्या मागे **आषाढ ४** असे लिहिलेले आहे.)

४. **चित्र क्र.१२३५– मार्गशीर्ष मास** (या चित्राच्या मागे **मागीसर ५** असे लिहिलेले आहे.)

५. **चित्र क्र.१२३७– माहा मास** (या चित्राच्या मागे **माहा ११** असे लिहिलेले आहे.)

या पाचही चित्रांतील चित्र संयोजन, रंगसंगती, आकृतींचे रेखांकन, त्यांतील पार्श्वभूमी वरील महाल, निसर्ग यांचे तपशील एकसारखेच आहेत. हे स्पष्ट होते. या सर्व चित्रांत नायक–नायिका व त्यांच्या आजूबाजूला दोन स्त्रिया अथवा दासी असे संयोजन दिसते. आणि राजस्थानी पेहेराव आहेत. या सर्व चित्रांच्या वरील बाजूस पिवळ्या रंगाच्या पट्टीत मासाचे नाव व वर्णन राजस्थानी भाषेतून लिहिलेले आहे. (पाहा चित्र क्र.१२३५). ही सर्व चित्रे एकाच संग्रहातील आहेत.

## ४. दख्खनी चित्रे

मध्ययुगात उत्तर हिंदुस्थानाप्रमाणेच दक्षिण भारतात ही मोठ्या प्रमाणात चित्र निर्मिती झाली. दक्षिण भारतात निर्माण झालेल्या कलेची अभ्यासाच्या दृष्टीने ढोबळपणे २ भागांत विभागणी होते. एक– पूर्वार्धाची दख्खनी चित्रकला; यात अहमदनगर, विजापूर व गोवळकोंडा येथे तयार झालेली चित्रकला येते. तर दुसऱ्या भागात उत्तरार्धातील दख्खनी चित्रकला, यात हैद्राबाद, दख्खनी संस्थानांतील चित्रकला व त्यात समाविष्ठ झालेली मराठा चित्रकला गणली जाते. या सर्वांबद्दल आपण प्रकरण १ मधील १.५ या प्रकरणात संक्षिप्त आढावा घेतलेला आहेच.

या प्रकरणात दख्खनी शैलीतील मंडळात असणाऱ्या चित्रांबद्दल थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

## ४.१. अहमदनगर चित्रे

दख्खनी चित्रकलेतील अहमदनगर येथे तयार झालेली चित्रकाम सर्वात जुने मानण्यात येते. (माटे चव्हाण२००२:१८१) साधारण १५५६ ते १५९५ या काळात येथील मुस्लीम शासकांच्या आश्रयाने महत्त्वाचे चित्रकाम झाले, त्यात तेथील सुलतानांची व्यक्तिचित्रे व रागमालेतील हिंडोल रागाचे चित्र यांचा समावेश होतो. ही चित्रे फार थोडी असून दुर्मीळ आहेत. तसेच येथे तयार झालेला एक महत्त्वाचा सचित्र ग्रंथ म्हणजे **'तारिफ–इ–हुसेनशाही बादशाह-इ-दकन'** हा होय. यातील १४ चित्रांपैकी १२ चित्रे आता उपलब्ध आहेत. हा १६व्या शतकातील महत्त्वाचा ग्रंथ भाइसंमंडळाच्या संग्रही आहे.

## ४.२. विजापूर चित्रे

भाइसंमंडळ संग्रहात एकूण ३० चित्रे ही विजापूर चित्र शैलीतील आहेत. या चित्रांमध्ये आदिलशाहीतील ऐतिहासिक स्त्री–पुरुषांची; म्हणजेच सुलतान व बेगम यांची चित्रे आहेत. तसेच सुफी संतांचीही १–२ चित्रे आहेत.

ही चित्रे विजापूर चित्र शैलीची वैशिष्ट्ये उद्धृत करतात. तजेलदार उष्ण रंगसंगती, चेहरे पट्टीचे विशिष्ट पद्धतीने केलेले चित्रण यात दिसून येते. या सर्व चित्रांत हे सर्व सुलतान व बेगम दरबारी रिवाजाप्रमाणे उच्चासनावर बसलेले दाखविलेले आहेत. ते सर्व वीरासनात बसलेले असून एका हातात फूल व एका हातात किंवा कमरेला तलवार लावलेली आहे, काही एकचश्म आहेत, तर काही तीनचतुर्थांश किंवा समोरून पाहिल्या सारखी चित्रे आहेत. यात चांदबिबी ची घोडेस्वारी करतानाची चित्रे देखिल आहेत.

दरबारी चित्रांमध्ये विजापूरच्या आठ सुलतानांची व चांदबिबी यांची प्रत्येकी २–२ चित्रे या संग्रहात आहेत आणि ती हुबेहूब एकसारखी आहेत. त्यांतील चित्र क्र.९३३ व चित्र क्र.११८६ ते चित्र क्र.११९५ ही चित्रे एकाच संचातील (album मधील) असावीत. चित्रांचे संयोजन व सतेज उष्ण

रंगसंगती यांवर इराणी शैलीचा प्रभाव दिसून येतो.या चित्रांमध्ये थोडाफार छायाभेदाचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ही चित्रे कडेने खराब झालेली आहेत.

तर दुसऱ्या प्रकारातील; म्हणजे चित्र क्र.१०४ ते चित्र क्र.११७ ही चित्रे आधीच्या संचातील चित्रांवरून नकल (copy) केलेली चित्रे असावीत. ती एकाच संचातील आहेत. ही चित्रे सुस्थितीत आहेत. त्यांच्या चित्रणात पहिल्या संचातील चित्रांपेक्षा जास्त सफाईदारपणा आहे. तसेच रंगसंगती मध्ये, रंग लेपनामध्ये थोडाफार फरक जाणवतो. हि चित्रे आधुनिक पद्धतीच्या पातळ जलरंगाने रंगवलेली आहेत. त्यामुळे हि चित्रे पारंपारिक चित्रांच्या रंगलेपन प्रकारापासून भिन्न आहेत. त्यांत छायाभेद दाखविलेला नाही.

ही सर्वच चित्रे अतिशय बारकाव्यांसहित; त्या त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबीत होईल. इतक्या सफाईदारपणाने काढलेली आहेत.

तसेच संग्रहातील चित्र क्र.७८, चित्र क्र.७८७ व चित्र क्र.९७८ ही चित्रे चांदबिबी घोडेस्वारी करत असतानाची आहेत. चित्र क्र.३१८ मध्ये ५ बादशहा एकत्र बसलेले आहेत असे दृश्य आहे. तर चित्र क्र.१२८ हे एका योगिनीचे चित्र आहे. ही सर्वच चित्रे रेखाटन, चित्र संयोजन, रंगसंगती व तंत्र या सर्वच बाबतीत अतिशय उत्कृष्ट दर्जाची आहेत. १७ व्या शतकातील विजापूर शैलीची ही चित्रे आहेत. या विजापूर शैलीतील प्रसिद्ध चित्रांशी वरील दरबारी चित्रांच्या दोन संचांची तुलना केली असता ही दरबारी चित्रे अगदीच सर्वसाधारण वाटतात. (पाहा चित्र क्र.७८, चित्र क्र.१०४ व चित्र क्र.११८६)

इब्राहिम आदिलशहा–२रा याला सुफी तत्त्वज्ञानात मोठी रुची होती. त्यामुळे त्याच्या काळात या विषयावर आधारीत चित्रे मोठ्या प्रमाणावर काढली गेली असावीत. त्याकाळातील तत्वज्ञानी, सुफी संत, त्यांच्या सांगिती / तत्त्वज्ञानावर चर्चा चालतानाच्या बैठकींचे चित्रण, योगी–योगिनी....इ. विषयांवर चित्रे काढली गेली. साधारण पणे इ.स.१५८० ते इ.स.१६२७ या कालखंडा दरम्यान अशी चित्रे काढली गेली. मंडळ संग्रहात सुफी संत व योगीनींची विजापूर शैली व उत्तर दख्खनी शैलीतील काही चित्रे आहेत. या चित्रांचा काळ बहुदा १७व्या शतकाचा उत्तरार्ध वा १८व्या शतकाची सुरुवात असा धरू शकतो. परंतू ही चित्रे मूळ चित्रे आहेत वा त्यांची नकल आहेत, हे मात्र सांगणे कठीण असते.

कारण मध्ययुगात मूळ चित्रांवरून त्यांच्या अनेक नकला करण्याची पद्धत सर्रासपणे चालू होती. काही नकला मूळ चित्राबर हुकूम अगदी तंतोतंत वा सरस असत, तर काही सुमार दर्जाच्या असत. त्यांमुळे चित्राची मूळ प्रत कोणती व नकल कोणती, हे आपण खात्रीशीर पणे सांगू शकत नाही.

सतराव्या शतकाच्या मध्यास विजापूरवर मुघलांचे आधिपत्य सुरु झाले. त्यामुळे मुघल शासक व त्यांचे सरदार, अधिकारी यांचे जाणे येणे वाढले. त्यांच्याबरोबर त्यांचे उत्तर हिंदुस्तानी चित्रकारही असत.

(माटे चव्हाण २००२:१८०) परिणामी दख्खनी कलमाच्या विजापूर येथील चित्रकामांवर मुघल व राजपूत शैलींचा प्रभाव वाढला. हे आपण प्रकरण क्र.१ मध्ये सविस्तरपणे पाहिले आहेच.

सुलतान मुहम्मद आदिलशाह (इ.स. १६२७– इ.स. १६५६) याच्या कालखंडात दख्खनी चित्रांतील कल्पनारम्यता जाऊन मुघल कलेतील वास्तव चित्रण दिसू लागले. पूर्वीच्या उष्ण, तेजस्वी रंगांऐवजी सौम्य व आल्हाददायक रंग वापरले जाऊ लागले. पृष्ठभूमीवर पिवळ्या–फिकट हिरव्या रंगाचा वापर होऊ लागला. एकचश्म चेहरा व तंत्रामध्ये सफाईदारपणा आला.

मंडळ संग्रहामध्ये विजापूर शैलीच्या चित्रकामात, काळानुसार होत गेलेल्या बदलांनुसार बदलत गेलेली चित्र परंपरा येथे पहावयास मिळते. म्हणजेच अगदी सुरूवातीची इराणी प्रभावाखालील कला, नंतर मधल्या काळातील कला व नंतर मुघल प्रभावाने बदलत गेलेली कला असे त्यांचे आपण ढोबळमानाने भाग पाडू शकतो.

विजापूर शैलीतील काही निवडक चित्रे येथे घेतली आहेत.

**संच क्र.१.** ग.ह.खरे व इतर संशोधकांनी एकूण २७ विजापूर चित्रे ओळखलेली आहेत. पुढीलप्रमाणे (एकूण ९ चित्रे)–

**चांदबिबी :–** मंडळ संग्रहातील चांदबिबीच्या चित्रांपैकी चित्र क्र.११४ व चित्र क्र.११९३ ही दोन चित्रे अगदी तंतोतंत सारखी आहेत. मात्र चित्र क्र.११९३ हे चित्र चित्र क्र.११४ क्रमांकाच्या चित्रापेक्षा बरेच साधारण दर्जाचे वाटते. क्र.११४ मध्ये असलेले चांदबिबीचे हे चित्र प्रसिद्ध आहे.

इंटरनेटवरील 'https://navrangindia.blogspot.in -> Daring exploits of Muslim woman ruler Chand Bibi -02' या संकेतस्थळावर चांदबिबीचे एक चित्र प्रकाशित केलेले आहे. हे चित्र व आपल्या संग्रहातील चित्र क्र.११४ ही दोन्ही चित्रे अगदी सारखी आहेत. या चित्राच्या खाली– '**The Deccan Heroine : CHAND BIBI, Princess of Ahmednagar & Queen of Bijapur.'** असे लिहिलेले आहे. ते जलरंगात रंगविलेले असून इ.स.१५८५ च्या सुमारास ते काढले असावे असा काळाचा उल्लेख असून हे चित्र सध्या विजापूरच्या संग्रहालयात आहे, असेही म्हटले आहे. याशिवाय 'Bijapur The City of Domes' या पुस्तकात चांदबिबीचे अगदी असेच चित्र छापलेले असून त्याखाली 'Chand Bibi Courtesy: Bijapur ASI' असे लिहिलेले आहे. (Rajput 2018-19). चांदबिबीच्या या चित्रावरून असे लक्षात येते, की या चित्राच्या अनेक प्रती तयार झाल्या असाव्यात. मात्र मंडळातील ही चित्रे त्या मानाने कमी सफाईदार वाटतात.

याशिवाय औंध, सातारा येथील भवानी संग्रहालयास तेथील लघुचित्रांच्या दालनात चांदबिबी चे एक लघुचित्र आहे. या चित्रात ती गच्चीमध्ये एका बैठकीवर लोडाला टेकून बसलेली दाखविलेली आहे. उजव्या हाताने गुडगुडी हातात धरून ती हुक्का पीत आहे. समोर पानाचा डबा, पिकदाणी, दोन तबक असे चित्रण आहे. हे चित्र उत्तरकालीन असण्याची शक्यता आहे. एकचश्म चेहरा, हलके, आल्हाददायक रंग येथे आहेत. चित्राच्या रेखाटनातील सफाईदारपणा जास्त जाणवतो. (पाहा चित्र क्र.११४, चित्र क्र.११९३व आ.क्र.३२)

याच प्रमाणे मंडळात रंभावतीचे एक चित्र आहे– **चित्र क्र.११९४** :– वर नमूद केलेल्या पुस्तकात,'Bijapur The City of Domes' यामध्ये **रंभा** चे पण चित्र छापलेले आहे, (Rajput 2018-19). जे विजापूर संग्रहालयात आहे. या चित्राशी मंडळ संग्रहातील चित्राशी तुलना केली असता मंडळ संग्रहातील चित्र साधारण वाटते, त्यात सफाईदारपणा दिसून येत नाही.औंध संग्रहालयातही रंभावतीचे एक चित्र आहे. रंभावतीचे चित्र हे तेथील चांदबिबी च्या चित्राप्रमाणे उत्तरकालीन असण्याची शक्यता आहे.

**संच क्र.२.**

या संचातील सर्व चित्रे नव्याने अभ्यासून त्यांची ओळख व शीर्षके, फारसी लेख नव्याने वाचले आहेत. ती पुढीलप्रमाणे –(एकूण ८ चित्रे)

**चित्र क्र.३१८– पाच बादशहा एकत्र बसलेले आहेत** :- या चित्राबद्दल सविस्तर माहिती प्र४.३) समूहचित्रे व त्यातील ऐतिहासिक व्यक्ति – संच क्र. २ यामध्ये दिलेली आहे.

**चित्र क्र.९२५– इब्राहीम आदिलशहा २रा (जगतगुरु)** :- सुलतान अली आदिलशहा–२रा याच्या काळात म्हणजे इ.स.१६५६– इ.स.१६७२ यादरम्यान मुघल व विजापूर शैलीचा मिलाफ होऊन नवीन शैलीचा प्रसार झाला. मुघल प्रभावामुळे चित्रात सफाईदारपणा, आल्हाददायक रंगसंगती, सौम्य रंग यांचा प्रभाव वाढला. त्यामुळे औंध संग्रहालयातील चित्रे ही या व पुढील कालखंडातील असण्याची शक्यता आहे मंडळ संग्रहातील विजापूरचित्रे ही आधीच्या काळात तयार झालेल्या चित्रांच्या नकल (copy) ही असू शकतात किंवा ही चित्रे दख्खनी कलेच्या अवनतीच्या काळात तग धरून राहिलेल्या कलेचे प्रतिबिंब असू शकतात. या काळात कलाकारांचा राजाश्रय संपुष्टात आल्याने कलेचा म्हणवा तसा दर्जा टिकून राहिला नाही. या काळात निर्माण झालेली चित्रे ही कलाकारांनी उदरनिर्वाहासाठी केलेल्या जुन्या प्रसिद्ध चित्रांच्या नकला असाव्यात.

## ४.३. गोवळकोंडा व हैद्राबाद चित्रे

मुघलांच्या आधिपत्यानंतर दख्खनमधील चित्रकारांनी आजूबाजूच्या लहान मोठ्या आश्रयदात्यांकडे आश्रय मिळविला. तसेच उत्तरेकडीलही कलाकार दक्षिणेकडे आले. त्यामुळे आश्रयदातेही निरनिराळ्या थरांतले व विभिन्न आवड असणारे निर्माण झाले; तसेच कलाकारही वेगवेगळ्या शैलींमध्ये काम करणारे होते. त्यामुळे या सर्वांमध्ये देवाण घेवाणही मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे नंतरच्या काळातील चित्रकामात शैलीच्या दृष्टीने एकसंघता दिसून येत नाही. (माटे,चव्हाण २००२:१८८). त्यामुळे ठराविक एक चित्र अमुक एका शैलीचेच आहे, असे आपण ठामपणे सांगू शकत

नाही. मात्र काही ठळक वैशिष्ट्यांमुळे दख्खनी कलमाची चित्रे हे इतर शैलींच्या चित्रांपेक्षा वेगळी काढता येतात. जसे चित्रांचे विषय, त्यांतील इतर बारीकसारीक तपशील, त्यांतील व्यक्तिरेखांचे पोशाख, रंगसंगती इत्यादींवरूनही हे चित्रे साधारणपणे ओळखता येऊ शकतात. रागमालेवर आधारित अनेक उत्कृष्ट चित्रे दख्खनी शैलीत निर्माण झाली. तसेच अनेक स्त्री व्यक्तिरेखा, झरोका चित्रे, समूह चित्रे व योगी व योगिनींची चित्रे यांचे चित्रण या शैलीमध्ये झाले. मंडळ संग्रहात अशा विषयांवरची चित्रे मोठ्या प्रमाणावर आहेत.

हैद्राबाद संस्थानामध्ये १८व्या व १९व्या शतकामध्ये असलेली आर्थिक सुबत्ता, संपन्नता यामुळे आलेली विलासी वृत्ती; यामुळे तेथे निर्माण झालेल्या कलेवर ही या विलासी वृत्तीचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. या काळात येथे निर्माण झालेल्या व्यक्तिचित्रांबरोबरच विलासात रमलेल्या महालाच्या गच्चीवर नाच गाणे ऐकत, मद्याचा आस्वाद घेणाऱ्या स्त्रिया, प्रियाची वाट बघणारी विरहिणी अशी चित्रे लोकप्रिय होती. (Zebrowski1983:253).

**उदा. चित्र क्र.१६९ : –** चांदण्या रात्री मंचकावर एक बेगम पहुडलेली आहे. समोर एक स्त्री मयूरवीणा वाजवीत आहे. एक दासी बेगमेच्या पायाजवळ बसली आहे तर दुसरी तिला काहीतरी खायला देत आहे. मागे पाण्याचा शांत देखावा आहे. त्यात चंद्राचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले दाखविले आहे. मागे दूरवर इस्लामी पद्धतीच्या इमारती व मनोरे दाखविलेले आहेत.

तसेच संग्रहातील एक चित्र; **चित्र क्र.६१८** सारखेच एक चित्रमार्क झेब्रोवस्की यांच्या 'Deccani Painting' या पुस्तकात छापलेले आहे. (Zebrowski 1983:250) PL No. 223 .सदर चित्र India Office Library, London यांच्या संग्रहात आहे. (Zebrowski 1983:250). या चित्राच्या साम्यतेवरून मंडळातील वर नमूद केलेले चित्र हैद्राबाद शैलीतील असावे. अशाच संयोजनाची आणखी काही चित्रे इतर संग्रहालयातून ही दिसून येतात. (पाहा चित्र क्र.१६९ व चित्र क्र.६१८ आणि आ.क्र. ३३)

या संग्रहातील चित्र क्र.५३१, ५३२, ८१६, १०६०, १०६२ व १०६३ या चित्रांमधील स्त्रिया या हातात फुलांचे गुच्छ, पंखा वा एखादे फूल घेऊन बागेत उभ्या असलेल्या दाखविलेल्या

आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूला सुरुची झाडे, गुलाबांनी बहरलेली झुडूपं दाखविलेली आहेत. या गुलाबांच्या चित्रणावर चिनी पद्धतीच्या कामाचा प्रभाव दिसून येतो. गोवळकोंडा चित्रांमध्ये अशा पद्धतीच्या फुलांचे चित्रण पाहावयास मिळते. या चित्रांत पार्श्वभूमीवर दख्खनी पद्धतीचा फिकट हिरवा, काही ठिकाणी फिकट निळा रंग दिलेला आहे. यातील स्त्रियांची वेशभूषा ही दख्खनी पद्धतीची आहे. अगदी असेच एक चित्र 'Deccani Painting' या पुस्तकात छापलेले आहे. (Zebrowski 1983:233). ते चित्र १८व्या शतकाच्या पूर्वार्धातील आहे. संग्रहातील या मालिकेतील ही चित्रे दख्खनी चित्रे या चित्राशी मिळती जुळती आहेत. अशी एकूण ७ चित्रे मंडळ संग्रहात आहेत. (पाहा चित्र क्र.१०६०, चित्र क्र.५३२ व आ.क्र. ३४)

याशिवाय मंडळ संग्रहातील चित्र क्र.३९६ व चित्र क्र.१२२१ या चित्रांमध्ये एक बादशहा त्याच्या दरबारात बसलेला आहे. त्याच्यासमोर त्याचा एक मंत्री बसलेला आहे. या समान चित्राचा, व्यक्तिरेखेचा शोध घेतला असता, हे **चित्र हैद्राबादचा निज़ाम अली खान–२ रा व त्याचा मंत्री अरीस्तू जाह** यांचे आहे हे निष्पन्न झाले. (www.blogs.bl.uk). चित्र क्र.१२२१ मध्ये याच दोन व्यक्तिरेखा असून त्यांच्या बरोबरीने दरबारातील इतर अनेक दरबारींचेही चित्रण आहे.

## ४.४.मराठा चित्रे

प्रकरण १.५ मध्ये आपण मराठा लघुचित्र शैलीचा थोडक्यात आढावा घेतला. त्यात नमूद केल्याप्रमाणे १८व्या व १९व्या शतकात; उत्तर मराठा काळात; म्हणजेच पेशवाईत मराठा लघुचित्र शैलीत विपुल प्रमाणात चित्रण झाले. या काळात राजकीय स्थैर्य, आर्थिक सुबत्ता, मराठ्यांचा राज्य विस्तारानिमित्त उत्तर हिंदुस्तान व दक्षिणेकडे वाढत गेलेला संपर्क, यातून अनेक सांस्कृतिक गोष्टींची देवाण घेवाण पण झाली. त्यामुळे या सर्वांच्या संयुक्त प्रभावाने व येथील असलेल्या पूर्वीच्या स्थानिक कलेच्या मिश्रणातून एक खास अशी मराठा चित्रशैली निर्माण झाली. पेशवाईत विविध विषयांवर आधारित अनेक लघुचित्रे निर्माण झाली.

भाइसं मंडळ संग्रहात मराठी लघुचित्र शैलीत निर्माण झालेली साधारण ८०–८३ चित्रे आहेत. या चित्रांत व्यक्तिचित्रांमध्ये छत्रपतींची चित्रे, पेशव्यांची व मराठा सरदाराची चित्रे आहेत. याशिवाय देवी–देवता चित्रे, प्रसंग चित्रे, शिकारदृश्यशे, ताल चित्रे, छिद्र चित्रे व पोथिचित्रे अशी वेगवेगळ्या विषयांवरील चित्रे दिसून येतात.

अठराव्या शतकाच्या मध्यानंतर म्हणजे साधारण १७६० च्या सुमारास महाराष्ट्रात एक स्वतंत्र अशी चित्र शैली निर्माण होऊ लागली होती; ज्यात खास मराठा म्हणता येतील अशी. इतर दख्खनी शैलींपेक्षा काहीतरी वेगळेपण दर्शविणारी; या चित्रांवर राजस्थानी, मराठा इत्यादी शैलींचा मिलाफ आहे. त्यात वेगळी शैलीचा अविष्कार दिसून येतो हि वेगळी शैली म्हणजे मराठी शैली. त्यांत अनेक मराठा ऐतिहासिक व्यक्तींची उत्कृष्ट व्यक्तिचित्रे तयार झाली. यातील छत्रपतींच्या चित्रांमध्ये सातारचे छत्रपती शाहूमहाराज यांचे काळविटाची शिकार करतानाचे एकमेव चित्र मंडळ संग्रहात आहे. (चित्र क्र.३९७). हे चित्र रंग, रेषा, संयोजन दृष्ट्या जास्त सफाईदार वाटते. पार्श्वभूमीतील फिकट शेवाळी रंग, मागील गुलाबी रंगांचे डोंगर, यातून चित्रावरील दख्खनी प्रभाव दिसून येतो. मंडळात छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे एक उत्तरकालीन चित्र आहे.(चित्र क्र.६३८). परंतु अगदी असेच एक चित्र सातारच्या छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात आहे. फक्त त्यात प्रतापसिंह महाराज घोड्यावरून रपेट मारतानाचे चित्रण आहे. मागे अजिंक्यतारा किल्ला दाखविलेला आहे. तर मंडळातील वर उल्लेख केलेले हे चित्र लंबवर्तुळाकारात असून मागील लोडाला टेकून ते बसलेले आहेत असे दृश्य आहे. परंतु यातील व्यक्तिरेखा हुबेहुब एकच आहे हे विशेष

पेशव्यांच्या चित्रांमध्ये पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या चित्रापासून ते शेवटचा पेशवा सवाई माधवराव अशी सर्वांची एकूण १३ चित्रे आहेत. उत्तर मराठाकालीन अतिशय उत्कृष्ट अशा व्यक्तिचित्रण परंपरेची ही चित्रे साक्ष देतात. ही चित्रे तंत्र, रंगसंगती, चित्र संयोजन (composition) खूपच सफाईदार आहेत. चित्राच्या बाह्यरेषा बारीक, सलग व लयदार आहेत. अपारदर्शी जलरंगात रंगविलेली आहेत. लोड तक्क्यांच्या बैठकीवर बसलेले पेशवे; समोर अत्तरदाणी, गुलाबदाणी, पानाचा डबा, कट्यार वा

तलवार आणि हातात एखादे सुवासिक फूल असे चित्रण सहसा दिसते. मागे एखादा चौरीधर उभा असलेला दाखविलेला असतो. या चित्रांमध्ये वाऱ्याच्या वेगाने घोडा फेकत, तलवार परजत जाणारा पहिला बाजीराव, नृत्य पाहणारा नानासाहेब पेशवा, थोरले माधवराव, रघुनाथराव, सवाई माधवराव, दुसरा बाजीराव, रावसाहेब पेशवे...इत्यादी पेशव्यांची चित्रे आहेत. तर त्यांचे मातब्बर सरदार व दरबारी– हरीपंत फडके, पिलाजी जाधवराव, सटवाजी जाधव, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, हिंदुराव घाटगे; आदी इतिहास प्रसिद्ध पुरुषांची चित्रे आहेत. (पाहा चित्र क्र.८६ व चित्र क्र.१०३)

याशिवाय सवाई माधवराव–हरिपंत फडके व महादजी शिंदे यांचे दरबारात बसलेले चित्र आहे. या एकाच विषयावरील तीन चित्रे मंडळ संग्रहात आहेत. त्यांतील एक चित्राचा निमोना, म्हणजे मसविदा असावे (चित्र क्र.१३) ते नुसते रेखाचित्र आहे. त्यांत रंग भरलेले नाहीत, तर बाकीची दोन रंगीत आहेत, पैकी एक बरेच जीर्ण झाले आहे (चित्र क्र.८६६). त्यावरून नंतर दुसरे चित्र काढले गेले असावे (चित्र क्र.९२०). (पहा चित्र क्र.१३ व चित्र क्र.९२०)

देवता चित्रांमध्ये मध्ययुगीन साहित्यांवर आधारित, पौराणिक विषयांवरील चित्रे काढली गेली. त्यांत देवी–देवता, त्यांचे अवतार, लीला, यांवर अनेक चित्रे काढली गेली. मंडळ संग्रहातील या चित्रांमध्ये गणपती, रिद्धी–सिद्धी, अष्टभुजा देवी, विष्णू, बालाजी, रवाळनाथ, शिव–पार्वती, शिवपंचायतन, अर्धनारीश्वर, दशावतार, कालियामर्दन, राम–लक्ष्मण व मारुती अथवा रामपंचायतन, व एक चित्र दत्तात्रेयांचे आहे.

या सर्व चित्रांमधून खास मराठा शैलीची वैशिष्ट्ये दिसून येतात. मराठी चेहरेपट्टी, वेशभूषा, आभूषणे यांत स्पष्ट पणे दिसतांत. उदा. चित्र क्र.४९४ अर्धनारीश्वरचे चित्र. यातील पार्वतीची नऊवारी साडी, नाकातील नथ, आभूषणे, डोक्यावरील मुकुट आणि शंकराचे वस्त्र, चेहेऱ्याचे चित्रण, शिवाय मागील दूरवरची सुरुची झाडे हे सर्व मराठी शैलीतील आहे. तर दुसरें अजून एक अर्धनारीश्वराचे चित्र आहे, चित्र क्र.६८२, त्यामध्येही शंकर पार्वतीचे चित्रण मराठी शैलीप्रमाणे आहे. मात्र या चित्राचा दर्जा त्यामानाने कमी वाटतो. त्यांत सफाईदार पणा जाणवत नाही.

या संग्रहातील कालियामर्दन (चित्र क्र.७८९), वराहावतार (चित्र क्र.८३५), मत्स्यावतार (चित्र क्र.८३६) ही एकचश्म पद्धतीची चित्रे एकाच संचातील अथवा एकाच काळातील आहेत. त्यांची चित्रणाची पद्धत, रंगसंगती, चित्रांचे संयोजन हे जवळपास सारखेच आहे. यातील कृष्ण व विष्णू यांचे चित्रण अगदी मराठी घाटाचे आहे, त्यांनी पितांबर नेसलेले आहे, व उपरणे घेतलेले आहे. चित्रांतील स्त्रिया चापून चोपून नऊवारी नेसलेल्या, नथ, मोठे गोल कुंकू व काही ठिकाणी कुंकवाची आडवी चिरी ओढलेल्या दाखविलेल्या आहेत. (पहा चित्र क्र.६८२ व चित्र क्र.७८९). या चित्रांचे पेशवेकालीन वाड्यांवरील चितारलेल्या भित्तीचित्रांतील दशावतारांच्या चित्रांशी बरेचसे साम्य दिसून येते. त्याांची चित्रणाची पद्धत संरचना , रंगसंगती, वस्त्रप्रावरणे इत्यादी (पाहा Apte 1988:72: plate no.45)

संग्रहातील या चित्रांपैकी बाकीच्या सर्व चित्रांतील देवादिकांचे चेहरे हे समोरून पाहिल्यासारखे काढलेले आहेत, विशेषत: शंकराची चित्रे..(चित्र क्र.७९०, चित्र क्र.११७४). तसेच, श्रीव्यंकटेशाचे चित्र चित्र क्र.९४०, श्रीरवाळनाथाचे चित्र– चित्र क्र.९४१, सतरा हातांची देवी– चित्र क्र.६८१...इ. पूर्वीसारखी एकचश्म पद्धतीची नाहीत. त्यावरून ही चित्रे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात वा १९व्या शतकाच्या सुरुवातीस पाश्चात्य प्रभावातून निर्माण झालेली असावीत. त्यांमध्ये छायाभेद व त्रिमिती दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

या संग्रहात गणपतीची दोन चित्रे आहेत. त्यातील चित्र क्र.३५ मध्ये गणपती आसनावर मोठ्या लोडाला टेकून बसलेला आहे, एक हात अभय मुद्रेत असून बाकीच्या हातांत मोदक परशू, अंकुश आहे. परंपरागत मराठा शैलीतील चित्र आहे. मागे पार्श्वभूमीवर गडद हिरवा रंग दिलेला आहे. आकृतीच्या बाह्यरेषा या काळ्या जाडसर तुटक रेषांनी रंगविलेल्या आहेत. त्यांच्या आतील बाजूस गडद तपकिरी रंगाने त्रिमिती दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तर दुसऱ्या प्रकारचे चित्र, चित्र क्र.४५२ यामध्ये गणपती व त्याच्या मांडीवर ऋद्धी व सिद्धी बसलेल्या दाखविलेल्या आहेत. त्या दोघींचाही पेहेराव खास मराठी आहे. चित्रातील इतर घटक– जसे महिरप, खांब, मागील शेवाळी रंग, पेहेराव इ. सर्व मराठी असले; तरी या संपूर्ण चित्रावर राजस्थानी कलमाचा प्रभाव जाणवतो. कदाचित राजस्थानी कलाकाराने मराठा आश्रयदात्यासाठी हे चित्र काढले असण्याची शक्यता आहे.

तसेच यातील श्रीविष्णू, राम–लक्ष्मण यांना हनुमान खांद्यावर घेऊन जात आहे, शिव पार्वती, विठ्ठल–रखुमाई, अष्टभुजा देवी  यांची ही चित्रे औंध व सातारा संग्रहालयातील चित्रांसारखी आहेत. म्हणजेच १८व्या व १९ व्या शतकात देवी–देवतांची ही पारंपरिक चित्रे सर्व ठिकाणी काढली जात असत. मंदिरांमध्ये, घरातील देव्हाऱ्यांच्या महिरपींवरील सजावटीसाठी ही अशी चित्रे काढली जात. मंडळ संग्रहातील ही चित्रे त्यामानाने जास्त सफाईदार वाटतात.

या मराठा चित्रामध्ये शिकारीची दृश्ये असलेली १० चित्रे आहेत. यातील चित्र क्र. ३७१, ३७२, ३७५ ही चित्रे बहुदा एकाच संचातील असावीत. त्यांतील पार्श्वभूमी, रंगसंगती, शिकार करणाऱ्या वीराचा पोशाख, पगडी सारखेच आहेत. वीराचा पोशाख मराठी आहे. यातील आकृती या ठेंगण्या व भक्कम बांध्याच्या आहेत आणि युद्धाच्या वेळी मराठा सरदार डोक्यावरील पगडी वरून गळ्याला रूमालासारखा शेला बांधत, तसा शेला बांधलेला आहे. यांत कधी तो वाघाची शिकार करीत आहे, तर कधी त्याच्याची लढत आहे, तर कधी भाल्याने सापास मारीत आहे. चित्र क्र. ३७८ व ३७९ या दोन्ही चित्रांत एका हत्तीवर अंबारीत तिघेजण बसलेले असून त्यांच्यावर वाघाने झेप घेतलेली आहे, व ते त्यास भाला, तलवार व बंदुकीने मारीत आहेत. मागील जंगलातील दृश्यांत दख्खनी पद्धतीची झाडे, ताड–माडाची वृक्षे दाखविलेली आहे. चित्र क्र. ७४३ मध्येही एका मराठा सरदार मागून हल्ला करणाऱ्या वाघावर तलवार चालवीत आहे, असे दृश्य आहे. चित्र क्र. ३९७ मध्ये सातारचे छत्रपती शाहू महाराज शिकार करीत आहेत असे दृश्य आहे.

चित्र क्र. ९०२, ९०३ व ९०४ मध्ये सातारच्या छत्रपती शाहू महाराजांच्या शिकारीच्या स्वारीचे चित्रण केलेले आहे. त्यात त्यांचा शिकारीचा लवाजमा दाखविलेला आहे. त्यात घोडदळ, पायदळ, हाकारे, बहिरी ससाणे हातात घेतलेले शिपाई. असे दृश्य आहे. या चित्रातील सर्व व्यक्तिरेखांचा पोशाख मराठी आहे. शाहू काळात मराठी शैलीत तयार झालेली ही उत्तम चित्रे आहेत. या एकाच प्रसंगाची तीन चित्रे आहेत.

मंडळ संग्रहात एकमेव अशी मराठा शैलीतील तालचित्रे आहेत. ज्याप्रमाणे दर एका रागा करीता एक विशिष्ट चित्र कल्पिले जाते; अथवा निश्चित केलेले असते; त्याप्रमाणे येथे एकेका

तालाकरीता एकेक चित्र कल्पिल्याचे दिसून येते. या चित्रांमध्ये नृत्यासाठी, विशेषत: मृदंगाच्या बोलांवर आधारित मजकूर चित्राच्या वरील अर्ध्या भागात लिहिलेला असून खालील अर्ध्या भागात त्या त्या तालावर आधारित तालध्यान म्हणू शकू असे चित्र काढलेले आहे. साधारण १२ इंच  १० इंच या आकारात ही चित्रे काढलेली आहेत. १८व्या शतकात उत्तर मराठा काळात स्वतंत्रपणे प्रगत झालेल्या मराठा शैलीतील ही उत्तम चित्रे आहेत. यातील व्यक्तिरेखांचे चित्रण, त्यांचे पोशाख, स्त्रियांची नऊवारी साडी, दागिने, पृष्ठभूमीवरील मंदिरे, महाल या वास्तू...यांचे चित्रण खास मराठा शैलीतील आहे. मात्र रंग किंवा रेखाटनाच्या पद्धतीवरून ही चित्रे दख्खनी किंवा गोवळकोंडा हैद्राबादी शैलीशी मिळतीजुळती वाटतात. (रानडे १९८३:६२:१–४:२६६).  ही चित्रमालिका कोणा एका रसिक मराठा सरदारासाठी तयार करण्यात आली असावी. यातून त्याचे संगीत व कला यांची उत्तम जाण, व उच्च अभिरुचीचे व कल्पकतेचे  दर्शन होते. (पाहा चित्र क्र.६७९– तालचित्र–जय)

मंडळ संग्रहातील या चित्रांमध्ये पोथ्यांमधील चित्रांची काही सुटी पाने आहेत. मंडळ संग्रहातील पोथीचित्रे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. मंडळामध्ये अनेक सचित्र पोथ्या आहेत. त्यातील काही पोथ्या मंडळाच्या चित्रशाळेत (museum) प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत. मात्र येथे काही सुट्या पानांच्या चित्रांबद्दल आपण येथे ओझरती माहिती घेणार आहोत. या संचामध्ये पेशवे काळात तयार झालेल्या पोथ्यांमधील काही चित्रे आहेत. ही सर्व चित्रे काळ्या रंगातील शीघ्र रेखाटन पद्धतीतील आहेत. या चित्रांत कलाकारांनी आकृती, त्यांचे सौष्ठव याकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते. त्यांत प्रमाणबद्धता दिसत नाही. रुंद खांदे व पायाकडे निमुळत्या होत गेल्यामुळे या आकृती त्रिकोणाकृती भासतात. त्यांची उतरती कपाळपट्टी, टोकदार नाके, मोठे व डोळ्यांच्या मधोमध लक्ष वेधून घेणारी डोळ्यांची बाहुली, पुढे आलेले ओठ, किंचित मागे गेलेली हनुवटी इ. तपशिलांवरून ही चित्रे चित्रकथीच्या पोथीचित्रांशी साम्य दाखवितात. (रानडे १९८३:६२:१–४:२६४). अशा प्रकारची चित्रे केवळ अठराव्या शतकातील महाराष्ट्रातच लोकप्रिय झाली. या चित्रांना आपण स्थानिक मराठी शैलीतील चित्रे म्हणू शकतो, जी लोककलेच्या जवळ जाऊ शकतात. या चित्रांत शिवलीलामृत, रामगीता टीका, गाथा सप्तशती, भक्तविजय, गीत गोविंद या धार्मिक ग्रंथांतील चित्रांची सुटी पाने आहेत. यातील देवी–

देवतांचे पोशाख मराठी आहेत. शंकर, बाळकृष्ण, विठ्ठल–रखुमाई यांचे चेहरे समोरून पाहिल्यासारखे आहेत. तर इतर देवादिकांचे चेहरे एकचश्म पद्धतीचे आहेत. मध्ययुगात सचित्र पोथ्यांना भरपूर मागणी असे आणि ग्रंथांची नकल करणाऱ्यांना त्याकाळी चांगला मोबदला मिळत असे. चित्रकार होईल त्या गतीने चित्र पूर्ण करीत असत. त्यामुळे या चित्रांचा दर्जा बाकीच्या मराठा शैलीतील लघुचित्रांएवढा चांगला दिसून येत नाही. (पाहा चित्र क्र.१२०१ आणि चित्र क्र.१२०२)

**संच क्र. १** ग. ह. खरे व इतर संशोधकांनी ओळखलेली मराठा चित्रे, ज्यांची नोंद त्यांनी मंडळ सूचीमध्ये केलेली आहे. अशी एकूण ४४ चित्रे यांत आहेत. ज्यांच्यामध्ये मराठीशाहीतील ऐतिहासिक व्यक्तिचित्रे आहेत, जसे की छत्रपती, पेशवे, त्यांचे काही मातब्बर सरदार यांची व्यक्तिचित्रे आहेत. तर काही देवताचित्रे, शिकारींची चित्रे, पोथीचित्रे आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी ताल व छिद्रचित्रे आहेत. त्यातील काही निवडक चित्रांचा आढावा येथे घेण्यात आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे –

या संचातील बऱ्याचशा चित्रांचे सविस्तर वर्णन प्रकरण ४.३ अ) मध्ये आलेले आहे. उदा. चित्र क्र. ६३८, ६७९, ९०९ इत्यादी.

**संच क्र. २** सदर अभ्यासांतर्गत नव्याने ओळखलेली मराठा चित्रे पुढील प्रमाणे आहेत. ही चित्रे नव्याने अभ्यासून, त्यांच्या वरील लेख, वर्णने वाचून व इतर समान चित्रांचा अभ्यास करून नव्याने ओळखलेली आहेत. अशी एकूण ७ चित्रे आहेत, ती पुढीलप्रमाणे –

चित्र क्र. ७९ – सटवाजी जाधवराव, चित्र क्र. ८१ – पिलाजीराव जाधव, चित्र क्र. ४३४ (१) – रावसाहेब पेशवे यांच्या बद्दलची सविस्तर माहिती प्रकरण ४.३ अ) १ – ऐतिहासिक व्यक्तिचित्रे–पुरुष, संच क्र. २ मध्ये दिलेली आहे. (पाहा पृ. क्र...) तर चित्र क्र. ९०२, चित्र क्र. ९०३ व चित्र क्र. ९०४ या चित्रांचे वर्णन प्रकरण ४.३ अ) ६.१ – शिकारीची दृश्ये, संच क्र. २ मध्ये आलेले आहे. (पाहा पृ. क्र. १३८)

**चित्र क्र. ४९६ श्रीरामाचे चित्र : –** हे चित्र कलाकाराने खूपच कल्पकतेने काढलेले आहे. यात श्रीराम एका उंच आसनावर बसलेले असून एकचश्म पद्धतीचे चित्र आहे. उजव्या हातात एक फूल आहे. खांद्याला धनुष्य व बाणांचा भाता लावलेला आहे. डोक्यावरील मुकुट उंच व दाक्षिणात्य पद्धतीचा आहे. हे एक रेखाचित्र आहे (contour), त्यात रंग भरलेले नाहीत. ते पांढऱ्या रंगाच्या कागदावर काढलेले आहे. या चित्राचे वैशिष्ट्य म्हणजे यात सरळ रेषेऐवजी बारीक अक्षरात राम राम राम... असे लिहून संपूर्ण रेखाचित्र त्यात केलेले आहे. अगदी रामाचा शेला, धोतर, चेहेरा, हातपाय, केस, मुकुट, धनुष्य–बाण, हातातील फूल इत्यादी सगळ्यांची बाह्यरेषा रामनामाने चितारलेली आहे. यातून त्या काळातील कलाकाराच्या कल्पक बुद्धीचा प्रत्यय येतो. वरील बाजूस निळ्या रंगाचा पडदा दाखविला आहे, त्यावर सूर्य व चंद्राचे चित्रण आहे.

**चित्र क्र. १२१९ राम पंचायतन :–** या चित्रात एका महालाच्या गच्चीत कमलासनावर राम व सीता बसलेले आहेत. समोर त्यांचे गुरु वसिष्ठ मुनी बसलेले असून, खाली हनुमान श्रीरामांच्या पायावर डोके ठेऊन नमस्कार करीत आहे. मागे मोरचेलवाला दाखविलेला आहे. या सर्वांचा पेहेराव, चेहेरेपट्टी मराठी आहे. मागे दूरवर जंगलात दोन हरणे बागडत आहेत. महालातील मागील बाजूस छोटा तलाव असून त्यात कमळे उगवलेली आहेत व माशांचे चित्रण आहे. तर चित्राच्या पुढील बाजूस फुलांचे ताटवे असून त्यात मधोमध कारंजे दाखविलेले आहे. चित्राला कडेने पानाफुलांची जाडसर किनार आहे. अगदी याच धर्तीचे एक चित्र सातारा संग्रहालयातील श्री. गोविंद रामचंद्र माटे यांच्या मंदिरातील पारंपारिक चित्रांमध्ये आहे. (पाहा चित्र क्र.१२१९ आणि आ.क्र. ३५). अशा प्रकारचे चित्र संयोजन लघुचित्रांच्या बरोबरीनेच आपल्याला पेशवेकालीन वाड्यांवरील भित्तीचित्रांमधूनही दिसून येते. (Apte 1988:80-81)

## ४.३ क) लघुचित्र तंत्र

### १. स्याह कलम व नीम कलम चित्रे

'स्याह–कलम' म्हणजे काळ्या रंगाच्या शाईने केलेले चित्रकाम होय. ही अजून वेगळ्या पद्धतीची चित्रकामाची पद्धत मुगल काळात लोकप्रिय झाली. सुरुवातीच्या मुगल काळात अनेक पर्शियन चित्रकार मुगल दरबारी होते. त्यांनी इराणमधील प्रचलित असलेले हे अजून एक तंत्र आपल्याबरोबर आणले. त्याला स्याह–कलम (black-pen) असे म्हटले जाते. यात काळ्या रंगाच्या शाईने व बारीक टोकाच्या ब्रशने तिरप्या छोटया छोट्या रेषांच्या साहाय्याने आकृतींना उठाव दिला जात असे. यामध्ये काही ठिकाणी सोनेरी रंग व हलकासा लाल रंग वापरल्याचे दिसते. १७ व्या शतकात ही चित्र पद्धत इतकी लोकप्रिय झाली की उत्तर भारतासहित दख्खनमध्येही या प्रकारात काम झाले. शिवाय या चित्रकामात त्या त्या स्थानिक कलेचा ही प्रभाव पडत गेलेला दिसून येतो. उदा. मुगल शैली, दख्खन शैली– गढवाल, हैद्राबाद, मराठा शैली.. वगैरे.

या चित्रांत रंग नसल्याने, फक्त काळ्या रंगाच्या शाईने चित्रात मोजकेच तपशिलाचे काम केले जात असल्याने व शक्यतो मागे पृष्ठभागात काम करीत नसल्याने या प्रकारची चित्रे चुकीने अपूर्ण चित्रे समजली जातात.

दख्खन संस्थानातील गढवाल येथील साधारण १८ व्या व १९व्या शतकात झालेल्या चित्रकामात स्याह–कलम पद्धतीची काही उत्कृष्ट व्यक्तिचित्रे निर्माण झाली. यात वेलपत्तीचे सुरेख चित्रण असून चित्रकाराचे रेखांकनावर पूर्ण प्रभुत्व असल्याचे दिसून येते. तसेच चित्रांतील तपशील खूप काळजीपूर्वक दाखविला जात असे.

उदा. **चित्रक्र.४८६– राम–सीता–लक्ष्मण व हनुमान** :–पानांनी गच्च भरलेल्या वृक्षाखाली एका मंचकावर एका लोडाला टेकून श्रीराम बसलेले असून समोर हात जोडून सीता बसलेली आहे. रामाच्या उजव्या बाजूला लक्ष्मण उभा असून तो रामावर चवरी ढाळत आहे. तर सीतेच्या बाजूला हनुमान हात जोडून उभा आहे. या सर्व चित्रात काळ्या शाईने बारीक रेषांनी चित्रकाम केलेले आहे. तसेच मुकुट, कपड्यांचे काठ, दागिने, सिंहासन यांत सोनेरी रंग वापरलेला आहे, तर मारुतीच्या चेहेऱ्यामध्ये व

वस्त्रांत हलका केशरी रंग वापरलेला आहे आणि रामाच्या बाणांच्या भात्यामध्ये थोडासा लाल व सोनेरी रंग वापरलेला आहे. सीतेच्या अंगावर नऊवारी साडी नेसलेली दाखविलेली आहे. अंगात मोत्याचे व सोन्याचे दागिने घातलेले आहे. राम–लक्ष्मण व हनुमान यांच्या अंगावरही मोत्यांचे दागिने आहेत. रामाच्या चेहेऱ्यामागे सोनेरी रंगात वलय दाखविले आहे.

**चित्रक्र.८६० :– हत्तींची जलक्रीडा (९.७ x ४.४) :-** या चित्रात एकूण सात हत्तींचे स्याह कलाम पद्धतीत चित्रण केलेले आहे. यातील ४ हत्ती तलावाच्या पाण्यात मनसोक्त डुंबत आहेत, तर ३ हत्ती जमिनीवर आहेत. आजूबाजूला वनाचा देखावा आहे. यांत प्राण्यांचे हावभाव टिपण्यात कलाकार यशस्वी झाला आहे. विशेषत: जमिनीवरील एक हत्तीण व तिच्याशी तिचे पिल्लू खेळत आहे, या दृश्यात त्यांच्या चेहेऱ्यावरील आनंद स्पष्ट दिसत आहे.

**चित्र क्र.८२– महादजी शिंदे.** (या चित्राबद्दल पुरुष–व्यक्तिचित्रे सविस्तर लिहिलेले आहे.)

**चित्रक्र.४९६– श्रीरामाचे चित्र :-** या चित्रात श्रीरामाच्या चित्राची संपूर्ण बाह्यरेषा ही राम राम राम.... या नावाने काढलेली आहे. काळ्या रंगाच्या शाईने ही नावे लिहिली आहेत.

**चित्रक्र.७०४ :–** यात एक बेगम एका झाडाच्या फांदीवर हात टेकवून रेलून उभी आहे. समोर उभ्या असलेल्या वाद्य वाजविणाऱ्या स्त्रीच्या वादनाचा आस्वाद घेत आहे. मागे एक दासी मोरचेल घेऊन उभी आहे. संपूर्ण चित्र काळ्या रंगाच्या शाईने चित्रित केलेले आहे. मात्र सर्वांच्या वस्त्रांच्या किनारी, दागिने सोनेरी रंगात रंगविलेली आहेत. पायाखालील जमिनीसाठी थोडा तपकिरी व झाडांमध्ये थोडासा हिरवा रंग वापरलेला आहे. या चित्राच्या कागदावरही भरपूर सोनेरी रंग वापरलेला आहे. या स्याह कलम प्रकारची साधारण ७ चित्रे संग्रहात आहेत. (पाहा चित्र क्र.४८६ आणि चित्र क्र.८६०)

### नीम–कलम चित्रे

नीम–कलम (half-pen) हे चित्रकामाचे तंत्र मुगल काळात – विशेषत: जहांगीरच्या काळात लोकप्रिय झाले होते. (Daljeet 1999:63:Plate No. 50) चित्राच्या पृष्ठभागावर **तपकिरी** रंगाचा हात

(wash) देऊन त्यावर आकृतीचे रेखांकन केले जात असे व नंतर या आकृतींना सोन्याच्या रंगाने उठाव दिला जात असे.

पाश्चात्य चित्र परंपरेच्या प्रभावातून हे नीम कलमाचे तंत्र विकसित झाले असावे, असे म्हणता येऊ शकते. कारण अकबराच्या काळात अनेक पाश्चात्य धर्मगुरू व व्यापारी युरोपियन शैलीतील अनेक चित्रे भेटीदाखल आणत असत. त्यात अनेक monochromatic engraved paintings च्या प्रती पण असत. मुगल चित्रकारांनी या एकाच रंगात रंगविलेल्या चित्रांच्या हुबेहूब नकला केलेली चित्रे विविध पुस्तकांमधून पाहावयास मिळतात. पाश्चात्य छपाई तंत्राबद्दल पूर्णच अनभिज्ञ असणाऱ्या मुगल चित्रकारांनी ही चित्रे एकाच रंगात रंगविलेली आहेत, असे समजून त्यांच्या हुबेहूब नकला केल्या. त्यासाठी त्यांनी चित्रतलावर हलक्या तपकिरी रंगाचा हात (wash) देऊन त्यांतील आकृतींना सोनेरी रंगात उठाव देण्याचे तंत्र विकसित केले. ही चित्रकामाची पद्धत १७व्या शतकात बरीच लोकप्रिय ही झाली. या पद्धतीच्या चित्रांना रेखाचित्र असेही म्हटले जाऊ शकते. (माटे,चव्हाण २००२:१५०)

या पद्धतीमध्ये जास्ती करून साधू–संत, योगी, फकीर, त्यांचे समूह यांची चित्रे काढली गेली. स्वतंत्र व्यक्तिचित्रांचे प्रमाण त्यामानाने तसे कमी दिसते. व्यक्तिचित्रांमध्ये हात व चेहरा सोडून बाकी संपूर्ण कागदावर रंगाचा हात दिला जात असे. (Safrani 1992:57). नंतरच्या काळात या चित्रांमध्ये हलकासा लाल, निळा वा किंचित पिवळा रंग वापरल्याचे दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकारच्या चित्रांत पाश्चात्य चित्रांच्या नकला केल्याने सुरुवातीस त्यांचे विषय ही युरोपियन दिसतात.

उदा. चित्र क्र.४४ :– (७x३.७ इंच) यामध्ये एक युरोपियन स्त्री एका चौथऱ्यावर बसलेली आहे. तिचा वेश पाश्चात्य पद्धतीचा असून तिच्या डाव्या हातात पुस्तक आहे. मात्र तिने भारतीय/मुगल पद्धतीचा सोन्याचा रत्नजडीत मुकुट घातलेला आहे. त्यावर तुरा लावलेला आहे. कानात व गळ्यात दागिने आहेत. तिच्या समोर एक युरोपियन पुरुष, बहुदा सेवक गुडघे टेकून बसलेला असून त्याचा ही पोशाख व डोक्यावरील टोपी पाश्चात्य पद्धतीचे आहेत. ती अधिकारी स्त्री त्यास उजव्या हाताने काही देत आहे, वा त्यास काही समजावून सांगत आहे. तो पुरुष ही तेवढ्याच नम्रतेने ते ऐकत आहे. तिच्या मागे एक पाश्चात्य पेहेरावातील दासी उभी आहे. या सगळ्यांच्या मागे एक तीन मजली इमारत आहे.

चित्रात मागे आकाशासाठी हलक्या निळ्या रंगाचा वापर केलेला आहे. चित्राच्या खालील बाजूस पुढे फळांचे तबक, पाण्याची सुरई, पेला व कोपऱ्यात एक मांजर बसलेले दाखविलेले आहे. या सर्वांचे चित्रण हलक्या भुऱ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर केलेले आहे व आकृतींना, कपड्यांना सोनेरी, हलक्या तपकिरी रंगाने उठाव दिलेला आहे. चित्रात खाली उजव्या बाजूस, ज्या चौथऱ्यावर ती स्त्री बसलेली आहे, त्यावर फारसीमधून **अमल–इ–मिर्झा कादिर हीरवी** असे लिहिलेले आहे. म्हणजे हे चित्रकाम मिर्झा कादिर हीरवी या चित्रकाराने केलेले आहे. (Khare1948 : Vol.xxix:115-116:49)

चित्र क्र.५१ :– पऱ्यांचा देखावा

चित्र क्र.५२७ : ख्रिस्त जन्माचा देखावा

**चित्र क्र.९२ साधूंचा समूह :–(६.२ x ४.२)** या चित्रात १० साधूंचा समूह एका झाडाखाली बसलेला आहे. वरील बाजूस ६ साधू हातात कलम व कागद अथवा पोथी घेऊन त्यांवर काही नोंदी करीत आहेत व ते सर्व आपापसांत चर्चाही करीत आहेत. तर खालील बाजूस ४ साधू वाद्य वाजविण्यात मग्न आहेत. त्यातील तिघे शिंग वाजवीत आहेत, तर एक शंख वाजवीत आहेत. या सर्वांच्या चेहेऱ्याच्या चित्रांकनात, विशेषत: डोळ्यांमध्ये इराणी प्रभाव दिसतो.

या प्रकरची साधारण १४ चित्रे मंडळ संग्रहात आहेत. (पाहा चित्र क्र.४४ आणि चित्र क्र.९२)

## २. युरोपियन रंगीत छपाई चित्रे (Prints) :– ३७ चित्रे

भारत इतिहास संशोधक मंडळात असलेला हा पाश्चात्य छापील चित्रांचा संग्रह हा एक वैशिष्ट्यपूर्ण संग्रह आहे. १८ व्या व १९ व्या शतकात साधारणपणे युरोपमध्ये प्रिंटींगचा शोध लागल्यानंतर या तंत्राचा वापर तेथील कलाकारांनी आपल्या चित्रकृतींच्या एका पेक्षा अनेक प्रती काढण्यासाठी केला. यासाठी त्यांनी छपाई तंत्राच्या वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला. जसे की– engraving, etching, lithographs. यातील पहिल्या प्रकारात तांब्याच्या वा स्टीलच्या प्लेटवर (copper plate or steel plates) tools च्या सहाय्याने आकृती कोरून (engraving) त्याला शाई लावून त्या आकृतीचा कागदावर दाबून छाप घेतला जातो. मंडळ संग्रहातील ही सगळी चित्रे म्हणजे

१८व्या शतकातील European Prints – म्हणजेच छापील चित्रे आहेत. व ही सगळी छापील चित्रे ब्रिटनमधील प्रकाशक व संग्राहक 'Robert Sayer' यांच्या संग्रहातील प्रिंट्सच्या प्रती (copies) आहेत यांत अनेक कलाकारांच्या copper plate वर engrave केलेल्या चित्रांच्या copies आहेत. या सगळ्या प्रिंट्सच्या खाली त्या त्या चित्रासंबंधीची माहिती, प्रकाशकाचे नाव, प्रकाशित झाले ते ठिकाण व काही ठिकाणी साल पण छापलेले आहे. Robert Sayer हा १८ व्या शतकातील ब्रिटनमधील आघाडीचा प्रकाशक व विक्रेता होता. कलाकारांनी काढलेल्या चित्रांच्या, रेखांकनांच्या छापील आवृत्ती काढणे व त्यांची विक्री करणे हा त्याचा मुख्य व्यवसाय होता. या प्रिंट्समध्ये १८व्या शतकातील चित्रकारांच्या चित्रांच्या प्रिंट्स, सागरी व हवाई नकाशे यांचा समावेश असे. १८ व्या शतकात ब्रिटनमध्ये वेगवेगळ्या ठिकाणांचे, ऐतिहासिक वास्तू, प्रसिद्ध ठिकाणे यांचे रेकॉर्ड्स ठेवण्यासाठी त्यांचे चित्रित documentation केले जात असे. त्यासाठी landscape, townscape वा street view यांचे रेखांकन, रंगीत चित्रण केले जात असे. या मूळ चित्रांवरून engraved प्रिंट्स छापलेली आहेत. व पुन्हा याच प्रिंट्स नंतरच्या काळात पुन्हा रंगीत छापलेल्या आहेत. (https://www.bl.uk: British Liabrary)

मंडळ संग्रहात Robert Sayer च्या संग्रहातील चित्रांच्या साधारण २५ प्रती आहेत. तर एक चित्र हे John Bowles या प्रकाशकाचे आहे. या चित्रांचे त्यांच्या विषयानुसार वेगवेगळे प्रकार केले आहेत. ते पुढील प्रमाणे–

**१. वास्तूंची चित्रे :–** ११ चित्रे. यांमध्ये युरोपमधील काही प्रसिद्ध ठिकाणे, धार्मिक स्थळे, विशिष्ट प्रसंग, यांचे चित्रण आहे. जसे की– View of the House from Parte, View of the Church & Piazza of All Saints-Florence, Ruins of Athens, Royal Palace of St. Jame's, Entrance to the Temple of the Sun at Palmire, View of Queens Theater from the Rotunda, How Sallieds Are Defended and Repulsed, View of Royal Hospital, View of London & Westminister, View of Lambeth-The Archbishop of Canterbury's Palace-1745.(पाहा चित्र क्र.१८३)

**२. समूह चित्रे– नाच, गाणी, गप्पा:–५ चित्रे.**

या प्रकारच्या चित्रांत इंग्लंडमधील खेडूत वा सर्वसाधारण लोकांच्या जीवनशैलीवर आधारित चित्रे आहेत. जसे नाच–गाणी–गप्पा. यांतून या लोकांचे पेहराव, टोपी, राहणीमान, त्यांच्या आवडी निवडी यांचे दर्शन होते.

उदा. चित्र क्र.१९१:– 'The Country Diversion of Leap Frog'- या चित्रात काही खेडूत तरुण एकमेकांच्या पाठीवरून उडी मारण्या 'Leap Frog' हा खेळ खेळत आहेत.

तर दुसरे चित्र,चित्र क्र.१८०:-'Diversion of Sliding on Ice' - यात काही तरुण Ice sketing चा खेळ खेळताना दिसत आहेत. हा खेळ १७ व्या ते १९ व्या शतकापर्यंत सर्व वर्गांमध्ये प्रसिद्ध व लोकप्रिय होता.

**३. सागरी जहाजांची चित्रे:– ४ चित्रे.** Brave Captain Tyrrill, Monmouth of 64 Guns, Glorious Action off Cape Francois, View of Taking Quebec 1759. या प्रकारच्या चित्रांमध्ये १८व्या शतकाच्या मध्यामध्ये इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्ये झालेल्या सागरी युद्धांच्या काही प्रसंगांचे तसेच काही प्रसिद्ध युद्धनौकांचे चित्रण आहे.

**४. निसर्ग दृश्ये–बागेची चित्रे:– ६ चित्रे.**View of Dove Dale, Vauxhall Gardens, A View off Queens Statue, Chinese Pavilions Vauxhall Gardens, View from Island Seat of Lake of Temple of Venus & Hermitage, View of the Grotto & Shell Temples.

यांमध्ये ब्रिटन मधील काही रमणीय स्थळे, तसेच करमणुकीची ठिकाणे– जसे Vauxhall Gardens यांचे चित्रण आहे. जिथे ब्रिटनमधील प्रतिष्ठित लोकं एकत्र येत असत व बागांमधून सहपरिवार फिरणे, गप्पागोष्टी करणे, निसर्गाच्या सान्निध्यात निवांतपणे बसणे, तळ्याकाठी मासेमारीची मजा लुटणे आदींचे चित्रण केलेले आहे. १७व्या शतकाचा मध्य ते १९ वे शतक या काळात 'Vauxhall Gardens' हे लंडनमधील एक प्रसिद्ध करमणुकीचे ठिकाण होते. त्यामध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारची आकर्षक झाडे–झुडुपे, त्यांमधून जाणारे सुंदर मार्ग, तळी, सुंदर वास्तू, पुतळे.

अशा प्रकारची सुंदर रचना केलेले होती. हे Garden फक्त उन्हाळ्यातील रात्री चालू असे; जेव्हा लंडनमध्ये चांगले वातावरण असे. तेथील theater, Orchestra यांचा आस्वाद घेण्यासाठी शहरातील अनेक लोकं तेथे येत असत. या चित्रांमधून **तेथील** शहरी जीवनाचे, उच्चवर्गाचे प्रतिबिंब आपल्याला दिसून येते. (पाहा चित्र क्र.१९७)

५. **ख्रिस्ती विषयांवर आधारित चित्रे :–**या मध्ये ख्रिस्तजीवन व धर्म यांच्याशी निगडीत तीन छापील चित्रे आहेत.

**संच क्र. १ ग. ह. खरे व इतर संशोधकांनी ओळखलेले ख्रिस्त जन्मावर व धर्मावर आधारित चित्रे**

चित्र क्र. ५०७ ख्रिस्त जन्म :– या चित्राबद्दल सविस्तर वर्णन प्रकरण ४.३) ५ युरोपियन व्यक्तिचित्रे मध्ये आलेले आहे. (पाहा पृ. क्र....)

**संच क्र.** २ सदर अभ्यासंर्गत ख्रिस्त जीवन व धर्मावर आधारित नव्याने ओळखलेली चित्रे (२चित्रे)

**चित्र क्र.** ५०८ निरनिराळ्या मुद्रांचे एक डिझाईन :– (६.३ x ४.१ सेमी) हे एक निरनिराळ्या मुद्रांचे एक आहे. ख्रिस्ती धर्माशी संबंधित ११ लंबवर्तुळाकारांत (ovals) मध्ये वेगवेगळी दृश्ये आहेत. त्यांच्या बाजूने oval shape मध्येच latin भाषेत लिहिलेले आहे. या ovals च्या मध्ये वरच्या बाजूला मदर मेरी चंद्रकोरीवर उभी आहे (cresent moon). तिच्या दोन्ही बाजूला आकाशात ढगांच्या मधून प्रगट झाल्याप्रमाणे ३–३ बाल देवदूतांच्या चेहेऱ्यांचे चित्रण आहे. सगळ्यात खाली क्रॉस चे चिन्ह आहे. त्यावर व त्याच्या खाली आडव्या पट्टीत Latin भाषेतून लिहिलेले आहे. या cross पासून वर मदर मेरी पर्यंत वळणदार रस्ता जात आहे. त्यात वरील भागात काही cross हातात घेऊन उभी उंच चढण चढत आहेत व त्यांच्या दोन्ही बाजूला पंख असलेले दोन दोन देवदूत असून ते सर्वांना मदर मेरीकडे. म्हणजेच स्वर्गाच्या दिशेला घेऊन जात आहेत, तर खालील निम्म्या भागत तीन एका स्त्रीला व पुरुषाला हातात धरून नरकाच्या द्वाराकडे नेत आहेत... असे दृश्य आहे. cross च्या खालील पट्टीत *'Vitam praesta puram, Inter para tutum vt videntes Iesum semper collatemur'* असे latin भाषेत लिहिलेले आहे. (https://en.m.wikipedia.org)

याचे इंग्रजीत भाषांतर पुढीलप्रमाणे होते – 'Bestow a pure life, prepare a safe way' मध्ययुगीन काळात सर्वसाधारणपणे प्रवासी लोकांच्या सुरक्षित प्रवासासाठी ही प्रार्थना म्हटली जात असे. (https://en.m.wikipedia.org->Book frontispiece). बहुदा हि चित्रे प्रवासाच्या दरम्यान काही प्रवासी आपल्या सुरक्षेच्या प्रार्थनेसाठी ... बाळगत असत. त्यामुळे .. .. चित्रे अनेक ठिकाणी गेल्याचे आपल्याला आढळते.

**चित्र क्र.११०८ :–**(४.९ सेमी २.१ सेमी). **'Britannia trampling on the Badges of Superstition & Slavery'** असे शीर्षक मंडळ सूचीमध्ये दिलेले असून ते याच चित्राच्या खाली असलेल्या **title** वरून घेतलेले आहे

२ जुलै १७७४ साली प्रकाशित झालेल्या युरोपियन मासिकाच्या मुखपृष्ठावर छापलेले होते. या चित्राच्या वरील बाजूस उजवीकडे'Frontispiece' असे लिहिलेले आहे, चित्राच्या खाली या चित्राचे त्याचे पूर्ण शीर्षक **'Britannia trampling on the Badges of Superstition & Slavery : Rests her History & c.on the Basis of Liberty' Published by G.Kearsley in Fleet street as the act directs July 2nd 1774.'** असे लिहिलेले आहे. या चित्रात थोडासा लाल व निळ्या रंगाचा वापर करण्यात आला आहे. (पाहा चित्र क्र.११०८)

**६. व्यक्तिचित्रे :–** या प्रकारच्या चित्रांमध्ये साधारण ८ छापील व्यक्तिचित्रे आहेत– ५ पुरुष, तर ३ स्त्री–व्यक्तिचित्रे आहेत. यातील काही चित्रे ही युरोपियन नियतकालिकांमधील (European Magazines) काही छापील पानं आहेत. ही चित्रे पुढीलप्रमाणे–

**संच १**

- चित्र क्र.१८८ :– (१०.५ x ८.८सेमी). दोन चेहरे व दोन हातांचे चित्रण.
- चित्र क्र.५०९ :–(१०.१सेमी x ६.४सेमी). इटालियन गार्डचे रंगीत चित्र. मागे फारसीत कित्ता.

- चित्र क्र.७०७ :– (९सेमी x ११.५सेमी). **Electeur de Saxe.et Roy de pologne:– हे** साधारण १६९७ सालचे प्रिंट आहे. या चित्राच्या खालील मजकूर फ्रेंच मधून लिहिलेला आहे. हे चित्र पोलंड चा राजा Auguste II, याचे आहे. त्याचा राज्याभिषेक २७ जून, १६९७ रोजी झाला, त्या प्रसंगाचे हे चित्रण असावे. कारण या चित्राच्या खाली तशी तारीख लिहिलेली आहे. त्याआधी त्याला Prince Electeurde Saxe या नावाने संबोधिले जात असे. (https://fr.m.wikipedia.org>wiki>AugusteII). या लिंकवरील चित्रातील व्यक्तिरेखा व मंडळ संग्रहातील चित्र क्र. ७०७ ची व्यक्तिरेखा चेहरेपट्टी, वेशभूषा याबाबतीत मिळती जुळती आहे. मंडळातील या चित्रात फक्त त्याच्या डोक्यावर फरची टोपी व तुरा आहे आणि हातात राजदंड आहे. राज्याभिषेकाच्या वेळेचा पेहेराव असू शकतो. ही पूर्ण व्यक्तिरेखा आहे व engraving आहे, (छापलेला) तर उपलब्ध चित्र halfbust असून ते painting आहे. (पाहा चित्र क्र.७०७ आणि आ.क्र.२६)

- **चित्र क्र.७०९ :–** हे चित्र **'Madame La Duches de Lorraine'** हिचे आहे. १४व्या लुईची ती नात होय. तिचे विवाहा पूर्वीचे नाव Elizabeth Charlotte of Orleans असे होते. Duke of Lorraine & Bar Leopold 1st याच्याशी १३ ऑक्टोबर १६९८ मध्ये तिचा विवाह झाला. (https://fr.m.wikipedia.org ->Elizabeth Charlotte of Orleans-engraved print). १७व्या शतकात प्रकाशित झालेल्या **'Costumes-17th century'** या मासिकात Loison ladies ने परिधान केलेला पेहेराव आणि या चित्रातील राणीचा पेहेराव तंतोतंत सारखा आहे.

**संच क्र. २ – सदर अभ्यासांतर्गत नव्याने ओळखलेली युरोपियन छापील व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे:**

- **चित्र क्र.७१० :–** मंडळ यादीमध्ये या व्यक्तिरेखेचे नाव Mesdemoisells Loison असे लिहिलेले आहे. परंतु हे चित्र इंग्लंड चा राजा, 'James, Duke of York, later James II' (१६३३–१७०१) याचे असू शकते, असे संबंधित लिंक वरून आपण अनुमान काढू शकतो. (https://en.m.wikipedia.org) **या** चित्रात त्याच्या शेजारी त्याचा crown आहे, तर

वरील दोन्ही बाजूंस इंग्लंडची राजचिन्ह आहेत. मंडळ यादीत लिहिलेले नाव हे फ्रान्समधील एका प्रतिष्ठित घराण्याचे नाव आहे.

- **चित्र क्र.८८१ व ८८२ :– London Evening Dresses :-** या दोन्ही चित्रांमध्ये २–२ युरोपियन स्त्रिया सुंदर व आकर्षक पेहेराव, केशरचना केलेल्या दाखविलेल्या आहेत. या दोन्ही चित्रांच्या खाली 'LONDON EVENING DRESES' Printed for Richard Phillips 71. St. Paul's Church Yard. असे लिहिलेले आहे. १८व्या शतकातील 'London Promenade Dresses, The Fashions of London & paris' या मासिकांतील ही चित्रे आहेत. या मासिकांत १७व्या–१८व्या शतकातील युरोपमधील स्त्रियांचे वेगेवेगळे पेहेराव, केशरचना, डोक्यावरील hats ribbons यांची विविध प्रकारांची चित्रे छापलेली आहेत. त्याकाळी प्रचलित असलेल्या fashions वर आधरित ही मासिकं होती. (https://in.pinterest.com) मध्ययुगातील प्रसिद्ध राजघराण्यांतील राजे व राण्यांच्या आणि प्रतिष्ठितांच्या विविध पेहेरावांचे चित्रण यांत केलेले असे. दरवर्षी याचे अंक निघत असत. (पाहा चित्र क्र.८८१ आणि चित्र क्र.८८२)

- **चित्र क्र.८८३ :–William Coxe.A.M.F.R.S.** या इंग्लिश इतिहासकार व धर्मगुरुचे engrave केलेले १७८६ मधील हे चित्र आहे. Thomos Holloway या ब्रिटीश engraver ने ही प्रिंट काढलेली आहे व J. Sewell Cornhill यांनी ते प्रकाशित केलेले आहे. या चित्राच्या वरील बाजूस 'European Magazine' असे छापलेले आहे. तसेच National Library of Wales यांच्या संग्रहातील हे portrait आहे, असे या संकेतस्थळावर नमूद केलेले आहे. (https://pictures.royalsociety.org) (पाहा चित्र क्र.८८३).

**६) स्मारकशीला:– चित्र क्र.८८६ :–** The Eyrecoote Monument

ब्रिटीशांचा भारतातील सैन्यातील अधिकारी लेफ्ट.जन. सर आयर कुट (Sir Eyre Coote-1726-1783) याच्या 'Wandiwash' च्या लढाईतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ईस्ट इंडिया कंपनी कडून त्याचे स्मारक उभारण्यात आले होते. Thomas Banks या मूर्तीकाराने हे स्मारकशिल्प बनविले, त्या स्मारकाचे हे चित्रण आहे. Westminster, London Abbey येथे हे स्मारक आहे. १७९० मध्ये European Magazine साठी याचे illustration केले गेले. के stipple व etching मध्ये केलेले आहे, त्याची ही प्रिंट आहे. (www.sebraprints.com.au). या चित्राच्या वरील बाजूस EUROPEAN MAGAZINE असे छापलेले असून त्याच्या खाली त्याबद्दलची माहिती आहे. सगळ्यात खाली Pub. August 1. 1790 by I.Sewell, Cornhill, London असे छापलेले आहे. (पाहा चित्र क्र.८८६).

**७) हत्यारांचे tools चित्रण :–** (१२.१सेमी X ७.७सेमी). एका पानावर वेगवेगळ्या ६ tools चे छापील चित्रण आहे. सर्वात खाली, Tourneur, Divers, Ouvrages rounis असे type केलेले आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळातील मागणी प्रकरणातुन सविस्तपणे नोंद केलेला असा चित्र संग्रह आहे. यात लघुचित्रे, प्रिंटस् व इतर चित्रे आहेत. इतिहासाचा अभ्यासच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा हा संग्रह असल्याने त्याचा सविस्तर अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ४.३.ड) फारसी वाचन

मंडळ संग्रहात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेले फारसी लेखन म्हणजे काही चित्रांच्या मागील बाजूंस फारसीतून लिहिलेले लेख, काव्य–कित्ते होय. यातील काही चित्रांवर त्या त्या व्यक्तिरेखांची  चित्रांच्या वरती वा मागे फारसीतून नावे आहेत. अशी बरीच चित्रे मंडळ संग्रहात आहेत. प्रस्तुत संशोधनात उर्वरित ३५ व्यक्तिचित्रांच्या नावांचे व चित्रांच्या मागील कित्ते वा काव्यांचे आणि लेखांचे वाचन नव्याने करण्यात आलेले आहे. तसेच रागमाला चित्रांतील एकूण ५० चित्रांवरील शीर्षके वा त्यांच्या मागील बाजूस असलेल्या फारसी लेखनांचेही वाचन करण्यात आले. यातून काही व्यक्तिनामं, काव्यं, त्यांचे कवी, सुलेखनकार, चित्रकार वा त्या चित्राचे वर्णन तसेच रागचित्रांत त्या त्या रागांच्या प्रहरांचे वर्णन याबद्दलची माहिती नव्याने समोर आली. ही चित्रे पुढीलप्रमाणे आहेत –  एकूण ८१ चित्रे.

### १) फारसी काव्य :  एकूण १५ चित्रे.

यातील काही काव्यं ही चित्रांच्या समोरील बाजूस चित्राच्या कडेने असलेल्या 'हशिया'च्या बाजूने लिहिलेली आहेत, तर काही चित्राच्या मागील बाजूस चौकटींत लिहिलेली आहेत. यांत काही ठिकाणी सुलेखनांचा सराव केलेला दिसून येतो. त्यात एकाच पानावर वेगवेगळ्या कविता, शेर यांचा सराव केलेला दिसून येतो. ती पुढील प्रमाणे–

**चित्र क्र.२ (समूह चित्र):–** या चित्रात एक शहजादा दोन सख्यांबरोबर असून समोर एक स्त्री हातात तंबोरा घेऊन उभी आहे. या चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक लिपीत लिहिलेले 'मसनवी' या काव्य प्रकारातील एक काव्य आहे. एखाद्या मोठ्या कवितेतील या काही ओळी असाव्यात. तिरप्या ओळींमध्ये हे काव्य लिहिलेले आहे. यातील सगळ्यात वरील ओळीत लहान अक्षरांत '**बेहजाद नबाब**' असे लिहिलेले आहे. पुढील चार ओळींमध्ये काव्य लिहिलेले असून त्याचा अर्थ – **'रुकू, सुजूद, फतेह आणि तकबीर– हे सर्व दु:खांवरचे औषध आहे'**. –असा आहे. यातील रुकू, सुजूद, फतेहा आणि

तकबीर हे सर्व नमाज पढत असतानाच्या चार क्रिया (positions) आहेत. यात दोन ओळींनंतर उजवीकडे छोट्या अक्षरांत **'सालामुल्ला ता–आला'** म्हणजे 'त्या अल्लाहला सलाम' असेही लिहिलेले आहे. सगळ्यात शेवटी **हाकीर 'महमद हुसैन'** या काव्याच्या सुलेखानकाराचे नाव लिहिलेले आहे. येथे सुलेखनकार हा स्वत:ला 'हाकीर'– म्हणजे नम्रपणे अगदी छोटा, क्षुद्र असे म्हणवतो.

- **चित्र क्र.३१(अ) :–** या चित्रामध्ये 'एक सरदार उभा आहे' असे चित्रण आहे. या चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक मध्ये एक चार ओळींची फारसी प्रेमकविता आहे. त्यात काही 'दोहरा' म्हणजे २–२ ओळींच्या कविता व 'मिसरा' म्हणजे त्यातील एखादी ओळ अशा प्रकारचे लेखन केलेले आहे. **इराणचा प्रसिद्ध कवि हाफिज (१४वे शतक, शिराझ) याच्या एका गझल मधील या काही ओळी आहेत.** त्यांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे – **'हे साकी..मला मद्याचा प्याला दे आणि आणि माझी सगळी दु:खं दूर कर..'** तसेच पुढील काही ओळींमध्ये– **'अशा प्रकारे मी तिच्या तिच्या प्रेमात पडलो आहे आणि उद्ध्वस्त झालो आहे... मला माहिती आहे, की आता माझ्या आयुष्यात दु:खाशिवाय काहीच नाही आणि या अशा जीवनापेक्षा मृत्यू आलेला खूपच चांगला...'** असे लिहिलेले आहे. यात हे सुलेखन **'दौला खान'** याने केलेले आहे, असे नमूद केलेले असून हे लेखन **१२७३ हिजरी सन** मध्ये केलेले आहे, असेही लिहिलेले आहे.

- **चित्र क्र.३१ (ब) :–** या चित्रात 'एक मुसलमान बादशहा वा धर्मगुरु आणि त्याचे १० अनुयायी' असे चित्रण आहे. मात्र या चित्राच्या मागील बाजूस वरील चित्र क्र.३१(अ) च्या मागील बाजूस लिहिलेल्या काव्याचेच लेखन केलेले आहे. या दोन्ही चित्रांतील काव्य एकच आहे. हे सुलेखन **'अब्दूररहिम अन्बरीन कलाम'** या सुलेखनकाराने केलेले आहे. **हे लेखन हिजरी सन १२७३ (म्हणजे इ.स.१८५६–१८५७) मध्ये केलेले आहे.** एके ठिकाणी छोट्या

अक्षरांत **'मीर अली अल कातीब'**या सुलेखानकाराचेही नाव आलेले आहे. यात **'दौला खान'** असाही उल्लेख आहे. येथे एकाच पानावर सुलेखनाचा सराव केलेला दिसून येतो.

- चित्र क्र.३१(ब) च्या मागील लेखाच्या वरील बाजूस फारसीतून एक शिक्का आहे. त्यात **'अल हमदू–लील्लाह १६४१ हिजरी'** असे लिहिलेले आहे. मात्र ते '१२४१'हिजरी सन असावे. त्यामुळे हे चित्र साधारण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील असावे. (Khare 1948:48). तसेच हे लेखन **'मुहीयाबाद'**– म्हणजे आताचे **'पुणे'** येथे केलेले आहे असेही यात लिहिलेले आहे.

- **चित्र क्र. ४२:–** हे चित्र 'बैराम खान' याचे आहे. या चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक मध्ये काव्य आहे. यात सुरुवातीला या कवीने **'त्या अल्लाह च्या नावाने**..' अशी सुरुवात केली आहे. (सगळ्यात वरील छोट्या अक्षरांतील शब्द). हे स्तुतीपर काव्य आहे – **'जणू स्वर्गीय घोड्याची नाल तुला मिळाल्यासारखे तू या आकाशात स्वैर संचार कर...'स्वबळावर तू या जगावर हुकुमत गाजव...' 'तुला दीर्घायू लाभो..' 'ही जशी तुझ्या आयुष्याची चांगली सुरुवात झाली आहे, तसेच तुझे पुढील आयुष्यही सुखद जावो..'**. सगळ्यात शेवटी खाली या काव्याच्या सुलेखनकाराचे नाव लिहिलेले असून, तो स्वतःबद्दल नम्रपणे असे म्हणतो, की– **'मी अब्दुल्ला, मातीच्या एका कणाएवढा आहे**.'

- **चित्र क्र. ५२:–** या चित्रात एक स्त्री एका हाताने झाडाची फांदीधरून उभी आहे. वरील बाजूस फारसीतून **'झेबुन्निसा'** असे लिहिलेले आहे. या चित्राच्या मागील बाजूस एक ४ ओळींची पर्शियन प्रेम कविता आहे. सगळ्यात सुरुवातीला अल्लाहची स्तुती केलेली आहे– **'अल्लाह हा प्रिय आणि दयाळू आहे'**. हे काव्य 'दुबेती' या काव्य प्रकारात येते. त्यात असे लिहिलेले आहे, **'तू जिथे जिथे पावले टाकतेस, तेथील धूळ सुद्धा कस्तुरी बनते' 'तुझ्यापायाची धूळ जरी उडाली तरी त्याचा एक कण देखील सूर्याच्या बरोबरीचा आहे.' 'तुझ्या अंगाला स्पर्शून**

**जाणारा वारा आत्म्यांना (रूह) मुक्ती देतो' 'आणि तुझ्या ओठांचा स्पर्श झालेले पाणी गुलाबजल होते..'** हे सुलेखन **'हाफिज नझारत खान'** याने केलेले असून सगळ्यात शेवटी तो आपल्या नावापुढे स्वतःचे कौतुक करताना म्हणतो, की **'माझे सुलेखन हे शुद्ध कस्तुरी समान आहे.'** यात हे सुलेखन कधी व कुठे केलेले आहे, याची काहीच नोंद नाही. या चित्राच्या मागील बाजूस एक स्त्री एका हाताने झाडाची फांदी धरून उभी आहे, तर दुसऱ्या हाताने गुडगुडी पीत आहे. चित्राच्या वरील बाजूस **'तसवीर–ए–झेबुन्निसा'**असे फारसीतून लिहिलेले आहे. झेबुन्निसा म्हणजे– स्त्रियांमधील दागिना. मंडळ यादीत ती 'औरंगजेब कन्या झेबुन्निसा' असे लिहिलेले आहे. परंतू ती औरंगजेब कन्या नसावी. कारण ते स्पष्ट करणारे काहीच लेखन तेथे आढळत नाही. त्या काळी हे नाव खूप प्रचलित होते.

- **चित्र क्र.७२:–** हे एक नदीवर स्नान करणाऱ्या स्त्रियांचे समूह चित्र आहे. या चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक मध्ये एक चार ओळींचे काव्य आहे. त्याचा अर्थ– **'माझे काम आहे, तिच्या कडे जाणे. (मला तिच्याकडे जाणे भाग आहे).' 'जर तिने प्रतिसाद दिला तर फारच छान' 'नाहीतर मी व माझे प्रेम आणि माझे नशीब..' 'काझविन'** या इराण मधील शहरात '**फकीर मोहमद हुसैन'** याने हे सुलेखन केलेले आहे. परंतु या काव्याचा मागील चित्राशी काहीही संबंध दिसून येत नाही.

- **चित्र क्र.९०:–**हे खंबावती रागाचे चित्र आहे. या चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक लिपीत काव्य लिहिलेले आहे. या मजकूराच्या वरती **'कहनात'** असे शिर्षक आहे. कहनात म्हणजे 'कहाणी'. त्या खाली फारसीतून एक काव्य लिहिलेले असले, तरी त्यातील भाषा ही उत्तर भारतातील उर्दू आहे. तसेच त्यात ब्रज भाषेतील शब्द आहेत. एका स्त्रीच्या डोळ्यांचे वर्णन आहे. आणि औरंगजेबाचा उल्लेख आहे. **'शाह औरंगजेब...तुमकत...चपरावत'**. यातील इतर शब्द लागत नाहीत.

- **चित्र क्र.३३४:–** हे एक शिकार दृश्य आहे. या चित्राच्या वरील बाजूस दोन ओळींचे फारसीतून लिखाण आहे. **'मी तुझ्या प्रेमात माझ्याकडे जे काही होते ते सर्व कशाचाही विचार न करता गमावले. मात्र माझ्या पापांपेक्षा तुझी क्षमा जास्त मोठी आहे, यात काही शंका नाही'**. हे काव्य बहुदा **'अल्लाह'ला उद्देशून, की तू खूप दयाळू आहेस..**' असे असावे. या लेखाखाली एक स्त्री व तिच्या सख्या शिकार करीत आहेत असे दृश्य आहे.

- **चित्र क्र.३३५ :–** या चित्रात एक राणी तिच्या दोन लहान मुलांसमवेत – एक मुलगा आणि छोटी मुलगी यांच्या सोबत उभी आहे. या चित्राच्या चारही बाजूंनी चार मोठ्या आकारांच्या चौकटींमध्ये बारीक अक्षरांत काव्याचे लेखन केलेले आहे. हे काव्य म्हणजे प्रसिद्ध इराणी कवि **'फक्रुद्दीन इराकी'** (१२वे –१३वे शतक) याची एक प्रसिद्ध कविता आहे. यात एका प्रेमीने आपल्या प्रेयसीच्या सौंदर्याचे वर्णन व कौतुक केलेले आहे. जसे की– **'मी माझ्या मनाला सदैव तुझा विचार करण्यापासून रोखू शकत नाही.. माझे मन सारखे तुझ्या सुंदर चेहेऱ्याभोवती (चौदहवी का चांद) घुटमळत असते, जसे की एखादा पतंग दिव्याच्या ज्योती भोवती भिरभिरत असतो. जो आपल्या प्रिये बरोबर एकनिष्ठ आहे, शेवटी त्याला दु:खच मिळते.. एका सुंदर स्त्रीच्या अदांनी तो विचलित होतो. ती सुंदर तर आहेच, पण निष्ठूर ही आहे..जी सतत मला घायाळ करीत असते..**

- **चित्र क्र.३९२:– या** चित्राच्या पुढील बाजूस एक स्त्री उभी असून तिच्या हातात मद्याचा प्याला आणि सुरई आहे. या चित्राच्या चारही बाजूंनी चौकटीत फारसीतून काव्य लिहिलेले आहे. त्याचा अर्थ असा आहे की– **'मी असा एक बिचारा आहे, की ज्याच्या दु:खांना अंत नाहीये..या दोन्ही जगांत तुझ्याशिवाय माझे कोणीही नाही..एकदा तरी माझ्याकडे बघ, आणि माझी सगळी दु:खं दूर कर. जरी मी अगणित पापं (गुनाह) करून माझं अख्खं आयुष्य**

**उध्वस्त केलं आहे...तरी माझी एकाच इच्छा आहे, की तु अल्लाह आणि माझ्यातील दुवा बनून माझी सगळी दु:खं दूर करावीस.'**

तर याच चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक लिपीत 'अरबी' मधून महामंद पैगंबरास उद्देशून म्हटले आहे, की– **'मला माफ कर..मी तुझ्यावर कुर्बान होईन..'** या वरून या दोन्ही काव्यांच्या अर्थांचा एकमेकांशी संदर्भ लागतो.

- **चित्र क्र.४०४:–** एक बैठी स्त्री– **'कन्हा बेगम**'. या चित्राच्या मागील बाजूस नस्तालिक लिपीत एक काव्य लिहिलेले आहे. काव्य– **'होळी के बादल हिंदरा रंग फराअस्त..'** म्हणजे– होळीचे दिवस आहेत, रंग चढत आहेत / आनंदाचे दिवस आहेत. हे काव्य **'कवी प्रकाश'** याने लिहिलेले आहे, असे यात नमूद केलेले आहे.

- **चित्र क्र.४०४:–** सुलतान परवेज मिर्झा याचे चित्र आहे या चित्राच्या मागे पानाफुलांनी सजविलेल्या चौकटीत चार ओळींचा 'कता', म्हणजे काव्य लिहिलेले आहे. त्याचा अर्थ पुढील प्रमाणे – '**अंतकरणापासून भेटीस आलो आहे. तुझ्या कृपेसाठी तुझ्या पुढ्यात आलो आहे. मी याकुब अलीखान फय्याजच्या सेवेसी कृपेच्या आशेने आलो आहे.**

- **चित्र क्र.९२६:–** हे 'शहजादा दारा शिकोह'चे चित्र आहे. या चित्राच्या मागील बाजूस चार ओळींची कता/ कित्ता आहे. सगळ्यात वरील बाजूस छोट्या अक्षरात **'तो जो की..(अल्लाह..)'** असे लिहिलेले आहे. त्या खाली चार ओळीचे काव्य आहे –**'आम्हाला खूप आनंद वाटतो तुझे काव्य लिहायला..' 'आम्ही तुझे फक्त नावच लिहित आहोत, त्याचा उच्चार देखील करू धजणार नाही' 'हे विश्वाचे चक्र तुझ्या पुढे तुझ्या कानातील बाळी एवढेच आहे..' 'सदा सर्वदा तुझीच स्तुती करावी..'.** या मध्ये सगळ्यात शेवटी **'महमद बाकीर उल हुसैनी'** हे या काव्याच्या सुलेखानकाराचे नाव लिहिलेले आहे.

- **चित्र क्र.९३२ :–** इराणचा सुलतान 'शाह अब्बास १ला' याचे हे चित्र आहे. या चित्राच्या मागील बाजूस चौकटीत तिरप्या रेषांमध्ये काव्य लिहिलेले आहे त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे– **'सगळे लोक विवंचनेतून मुक्त झाले आहेत. पण 'माहवी' (कवीचे टोपण नाव) तु कमनशिबी. तु मात्र मयखाना सोडून मस्जिदमधे गेलास, जिथे सर्व शुष्क आणि माळरान आहे.'** ही **रुबाई** आहे, म्हणजे ४ ओळींचे काव्य. सगळ्यात खाली छोट्या अक्षरांत **'आब्देह खलिलुल्ला'** असे लिहिलेले आहे. हे सुलेखनकाराचे नाव आहे.
- **चित्र क्र.११७३:–** एक स्त्री गच्चीमध्ये गाणे ऐकत बसलेली आहे. यामध्ये चौकटीत तिरप्या रेषांमध्ये चार ओळींचे काव्य आहे. त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे **–'आजच्या ईदच्या तुला कयामत पर्यंत शुभेच्छा. तू कयामत पर्यंत सुदैवी होवोस ही मनापासून केलेली प्रार्थना तुझे कायम रक्षण करेल यात काही शंका नाही.'**

अशाप्रकारे १५ चित्रांच्या वरील वा मागील बाजूस असलेल्या काव्यांचे वाचन करण्यात आलेले आहे.

### ३) चित्रांच्या मागील फारसी लेख यांचे स्वैर भाषांतर :–७ चित्रे

मंडळ संग्रहातील या चित्रांमध्ये फारसी काव्यांप्रमाणेच काही फारसी लेखही लिहिलेले आहेत. त्यांचे भाषांतर पुढीलप्रमाणे–

- **चित्र क्र.१६:–** या चित्रात एक बादशहा किंवा सरदार हुक्का ओढत बसलेला असून त्याच्या समोर बसलेली एक स्त्री तंबोरा वाजवत आहे. या चित्राच्या मागील बाजूस शिकस्ता लिपीतील **'नसिहत'** प्रकारचे लेखन आहे. त्यात एका वडीलधाऱ्यांकडून लहानास– जसे एखाद्या वडिलांकडून मुलास बोधपर उपदेश केलेला आहे. यात त्याने वडीलधाऱ्यांचा मान राखावा, सगळ्यांशी प्रेमाने व आदराने वागावे. गोरगरीबांना दान करावे, मदत करावी वगैरे लिहिलेले आहे.

- **चित्र क्र.२३:–** या चित्रात एक बादशहा सरदारास एखादी भेट वस्तू नजर करीत आहे असे दृश्य आहे. या चित्राच्या मागील बाजूस एका छोट्या चौकटीत शिकस्ता लिपीतील लेख लिहिलेला आहे. त्यात एका मोठ्या अधिकारी वा बादशाहाची स्तुती केलेली आहे. कदाचित हा लेख मागील चित्राशी संबंधित असू शकतो. या चौकटीच्या खाली छोट्या अक्षरांत **'दराईखान'** असे लिहिलेले आहे. मात्र याच्या लिखाणाच्या पद्धतीवरून हे नाव या लेखाच्या सुलेखनकाराचे, चित्रकाराचे वा त्या चित्रातील व्यक्तीचे नसावे असे वाटते. हे नाव कदाचित या चित्राच्या संग्राहकाचे असू शकते.

- **चित्र क्र.३०:–** या चित्राचे वर्णन मंडळ सूचित 'दोन चाचे कोळी' असे लिहिलेले आहे. या चित्राच्या मागील बाजूस शिकस्ता लिपीत लेख लिहिलेला असून तो एखाद्या बादशहाच्या स्तुतीपर लेख आहे.

- **चित्र क्र.३३५:–** या चित्रात एक हिंदू राणी व तिच्या सोबत दोन लहान मुले आहेत, असे चित्रण आहे. या चित्राच्या मागील बाजूस एका चौकटीत नस्तालिक लिपीत लेख लिहिलेला आहे.त्या चौकटीच्या वर नंतरच्या काळात देवनागरीतून **'पातशाहाची आरजी ल्याहावयाची रीत'** असे लिहिलेले आहे. खालील चौकटीत **'अब्दूर रहीम रोशन कलाम'** नावाच्या दरबारी व्यक्तीने दरबारापासून दूर झाल्याने त्याची झालेली वाताहत मांडली आहे व बादशाहास त्याला मदत करण्याची विनंती केलेली आहे.

- **चित्र क्र.३४० :–** हे एक युरोपियन समूह चित्र आहे. या चित्राच्या मागील बाजूस सुलेखनाचा सराव केलेला दिसतो. या सुलेखानाची शैली अकबराच्या फरमानाच्या शैलींशी मिळती जुळती वाटते. या पानावर मध्यभागी ठळक अक्षरांत एक ओळ आहे, त्यांत सुरुवातीला छोट्या अक्षरांत **'सामावत अल–अर्ज'** असे म्हणजे **'आकाश आणि पृथ्वी'** असे लिहिले आहे. कुराण मध्ये 'आकाश आणि पृथ्वीचा स्वामी' (Lord of ) Skies Earth असे वर्णन सहसा आढळून

येते. येथे शिकस्ता लिपीतील संपूर्ण ओळीचा अर्थ म्हणजे मुस्लीम धर्मियांना उद्देशून उपदेश आहे –**'हे मुसलमान, या आकाश आणि पृथ्वी यांमध्ये जर काही महत्त्वाचे असेल, तर ते ईमान आहे'** या अर्थाने होईल.

- **चित्र क्र.४०५:–** हे चित्र एका बसलेल्या फकिराचे आहे, त्यावर त्याचे फरसीतून **'कबीर मुनी'** असे नाव लिहिलेले आहे. या चित्राच्या मागील बाजूस एका चौकटीत तिरक्या ओळींमध्ये फारसीतून लेख आहे. त्याचा अर्थ पुढील प्रमाणे – हा एखादा विनंती अर्ज असावा... **'मी अंबर, फहद याचा मुलगा आणि बाप मोहसीन..'....जमीन दिली हाफीजओटी, त्या संबंधीचा अर्ज.** या लेखाचा चित्राशी काही संबंध दिसून येत नाही.

- **चित्र क्र.९०४:–** या चित्राच्या मागील बाजूस फारसीतून **'तसवीर–ए–सवारी शिकार महाराजा साहू छत्रपती'** असे लिहिलेले आहे.

३) याशिवाय **'हिकायत'** हा एक गद्य व पद्य मिश्र प्रकार येथे नव्याने दिसून येतो –

**चित्र क्र. ३ (एक योगिनी) :–** या चित्राच्या मागील बाजूस शिकस्ता लिपीत लेख लिहिलेला आहे. यातील पहिल्या ३ ओळी या सरळ रेषेत लिहिलेल्या असून त्याखालील ६ ओळी या तिरक्या लिहिलेल्या आहेत. त्यानंतर पुन्हा पुढील ३ ओळी या सरळ रेषेत लिहिलेल्या आहेत. या लेखन प्रकाराला **'हिकायत'** असे म्हणतात. यात १ वा २ परिच्छेदात (paragraphs) कथा असतात आणि अधून मधून काव्याच्या १–२ ओळी असतात. म्हणजेच 'हिकायत' हा लेखन प्रकार हा गद्य आणि काव्य यांचे मिश्रण असते. **या चित्र क्र.३ च्या मागील पानावरील लेख हा प्रसिद्ध इराणी कवि शेख सादीच्या 'हिकायत' मधील एक पान आहे. ते येथे नकल केलेले आहे. याचा कालखंड साधारणपणे १५वे ते १७वे शतक असा असावा.**

४) **सुलेखनकारांची नावे : एकूण ९ नावे.**

मंडळ संग्रहातील बऱ्याच चित्रांच्या मागे फारसीतून सुलेखन केलेले आहे. त्यात त्या त्या सुलेखनकारांची नावेही लिहिलेली दिसून येतात. मात्र संग्रहातील या लेखनांत कुठेच फारसे प्रसिद्ध नसलेले सुलेखनकार दिसतात. त्यामुळे हे सुलेखनकार येथील, म्हणजे स्थानिक प्रदेशांतील असू शकतात. मंडळ संग्रहात **हाकीर 'महमद हुसैन'; 'दौला खान'; 'अब्दुर रहीम अन्बरीन कलाम'; _मीर अली अल कातीब'; 'अब्दुल्लाह'; 'हाफिज नझारात खान'; 'फकीर मोहमद हुसैन'; 'महमद बाकीर उल हुसैनी'; 'आब्देह खलीलुल्ला'** इत्यादी सुलेखनकारांनी केलेले सुलेखन आहे. शिवाय यांतील दोन सुलेखानांमध्ये हे सुलेखन कुठे लिहिलेले आहे, याचा उल्लेख केलेला आहे. उदा. चित्र क्र.७२ च्या मागील बाजूस फा रसी प्रेमकविता असून ती **'काझवीन'** या शहरात **'फकीर मोहम्मद हुसैन'** या सुलेखनकाराने लिहिलेली आहे असे त्यात नमूद केलेले आहे.. 'काझवीन' हे शहर इराणमध्ये असून ती सफाविद राजवंशाची राजधानी होती. तसेच चित्र क्र.३१(ब) याच्या मागे नस्तालिक लिपीमध्ये लेखन केलेले असून त्यात एक २ ओळींचा 'शेर'ही आहे. तसेच त्यात 'अब्दूर रहीम अन्बरीन कलाम', 'मीर अली अल कातीब' व 'दौला खान' या सुलेखनकारांची नावे आहेत. शिवाय एके ठिकाणी **'हे लेखन मुहीयाबाद येथे झालेले आहे'** असा शेराही आहे. औरंगजेबाच्या काळात **'पुणे'** शहरास **'मुहीयाबाद'** हे नाव होते. त्यामुळे हे दोन्ही लेख ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

५) **प्रस्तुत संशोधनात <u>काही कवींची</u> नावे देखील समोर आली आहेत– एकूण ५ नावे.**

- **चित्र क्र.४०४:–** च्या मागे फारसीतून एक काव्य आहे. त्यात होळीच्या सणाचे वर्णन असून त्यात **'कवि प्रकाश'** या त्या काव्याच्या कवीचे नाव लिहिलेले आहे, तर चित्र क्र.९३२ च्या मागील चार ओळींच्या काव्यात– 'रुबाई' मध्ये **'माहवी'** या कवीच्या बहुदा टोपण नावाचा उल्लेख केलेला दिसून येतो. चित्र क्र.३१(अ) आणि चित्र क्र.३१(ब) मधील काव्यं ही १४ व्या शतकातील इराण मधील **'शिराझ'** येथील प्रसिद्ध कवि **'हाफिज'** याची आहेत; तर चित्र

क्र.३३५ मध्ये चित्राच्या चारही बाजूंनी लिहिलेली कविता ही प्रसिद्ध इराणी कवि **'फक्रुद्दीन इराकी'** याची एक प्रसिद्ध कविता आहे.

१) <u>चित्रकारांची नावे</u> : **चित्र क्र.८८** च्या मागील बाजूस फारसी मधून व नंतरच्या काळात मोडी मधून 'अमल–ए–मिर्झा घुलाम अली बेग मुसव्वीर /मन्सूर' असे लिहिलेले आहे. याच्या पुढील बाजूस एका घोड्यावर स्वार असलेल्या सरदाराचे चित्रण आहे. वरील लिखाणातील नावापुढे 'अमल' (म्हणजे 'अमुक एका चित्रकाराने काढलेले चित्र') हा शब्द आलेला आहे. हे चित्र **'मिर्झा घुलाम अली बेग मुसव्वीर/मन्सूर'** या चित्रकाराने काढलेले आहे.तसेच चित्र क्र.३९८ वर खालील बाजूस इंग्रजीतून **'U.N.N-VGIRE'** हे नाव लिहिलेले आहे. हे त्या चित्राच्या चित्रकाराचे नाव आहे. इंग्रजी नावावरून हा चित्रकार खूप अलीकडील काळातील असावा. तसेच हे चित्र अशाच एका जुन्या चित्राची नकल असावी, जी U.N.N-VGIRE या चित्रकाराने केली असावी. त्यावरून आपल्याला अजून एका चित्रकाराचे नाव मिळते. अशाप्रकारे आपल्याला असे सांगता येते की, मंडळाच्या चित्रसंग्रहात दोन चित्रकारांची नावे नव्याने मिळतात.मंडळाच्या संग्रहात या दोन चित्रकारांनी चितारलेली चित्रे आहेत, हे महत्त्वाचे आहे.

## ६) <u>संग्रहाकांची नावे</u>: एकूण ३ नावे.

प्रस्तुत संशोधनात ३–४ चित्रांवर मागील बाजूस बारीक अक्षरात फारसीतून नावे लिहिल्याचे दिसून आले. ती पुढील प्रमाणे–

१) **चित्र क्र.२३ :–** या चित्राच्या मागील बाजूस छोट्या अक्षरांत फारसीतून **'दराई खान'** असे लिहिलेले आहे. त्याच्या वरील बाजूस चौकटीत शिकस्ता लिपीतून लेख लिहिलेला आहे. याच्या पुढील बाजूस एक बादशाहा सरदारास एक भेटवस्तू नजर करीत आहे असे चित्र आहे.

मात्र हा 'दराई खान' नक्की कोण, हे आपल्याला सांगता येत नाही. तो चित्रातील व्यक्ति, बादशहा अथवा त्या चित्राचा संग्राहक असावा. पुढील दोन चित्रांच्या बाबतीतही जवळ जवळ असाच लेखन प्रकार दिसून येतो. त्यामुळे ही चित्रे एकाच संग्रहातील असावीत अशी दाट शक्यता वाटते.

**२) चित्र क्र.७५:–** या चित्राच्या मागील बाजूस फारसीतून **'मौलवी कासीम अली खान'** असे लिहिलेले आहे. त्यावरील चौकटीत गुलदस्त्याचे चित्रण आहे. याच्या पुढील बाजूस पाश्चात्य स्त्रीचे झरोका पद्धतीतील चित्र आहे. त्यामुळे या चित्राचा व मागील नावाचा काही एक संबंध दिसून येत नाही. एकंदरीत या सर्वांवरून हे या चित्राच्या मालकाचे नाव असावे का? की चित्रकाराचे? हे सांगणे कठीण आहे. हा मौलवी नक्की कोण ? आणि याचा ऐतिहासिक संदर्भ मिळणे कठीण आहे.

**३) चित्र क्र.१०८८:–** या चित्राच्या मागील बाजूस चौकोनात फारसीतून **'नजर अली बहादूर'** असे लिहिलेले आहे. पुढील बाजूस आसावरी रागिणीचे चित्र आहे.

चित्र क्र.२३, चित्र क्र.७५ व चित्र क्र.१०८८ या चित्रांच्या मागील बाजूंस असलेल्या नावांपुढे 'अमल' हा शब्द दिसून येत नाही. त्यामुळे ही नावे चित्रकारांची आहेत, वा नाही हे नक्की सांगता येत नाही. तसेच ही नावे सुलेखनकारांचीही असण्याची शक्यता कमी वाटते. कारण वर नमूद केल्याप्रमाणे संग्रहातील इतर फारसी लिखाणातच त्या त्या वा इतर सुलेखनकारांची नावे लिहिण्याची पद्धत दिसून येते. मात्र वर उल्लेखलेल्या चित्रांमागील नावे ही त्या सुलेखनाच्या चौकटींच्या खाली बारीक अक्षरांत लिहिलेली आहेत. ही पद्धत या सर्व चित्रांत एकसारखीच दिसून येते. त्यामुळे ही चित्रे एकाच संग्रहातील असावीत अशी शक्यता दिसते. त्यामुळे कदाचित ही नावे ज्या व्यक्तीस हे चित्र भेट दिले आहे, वा ज्याने दिले आहे त्याचे असू शकते, किंवा संग्राहकाचे असू शकते. चित्र क्र.१०८८ च्या मागील बाजूस 'नजर अली बहादूर' असे लिहिलेले असल्याने या मतास वाव मिळतो.

अशाप्रकारे या संशोधनांतर्गत आपल्याला या चित्रांच्या संग्राहकांची **'दराई खान'; 'मौलवी कासीम अलीखान'** आणि **'नजर अली बहादूर'** अशी ३ नावे आपल्याला मिळतात असे आपण म्हणू शकतो.

**७) <u>रागमाला चित्रांवरील फारसी लेखांचे वाचन</u>:–**

वर नमूद केल्याप्रमाणे मंडळातील चित्रांमागील या फारसी कित्ते आणि काव्यांप्रमाणेच अजून एक मोठ्या प्रमाणावरील फारसी लेखन म्हणजे रागमाला चित्रांवरील शीर्षके व त्यांमागील लिखाण होय. अशी एकूण ५० रागमालाचित्रे आहेत. हे फारसी लेख एकतर त्या चित्रांवरील शीर्षके आहेत, तर काही मागील बाजूस असलेले त्यांचे नाव वा त्यांची वर्णने आहेत. यातील ८ चित्रांच्या वरील बाजूस फारसीतून शीर्षके आहेत आणि त्यांच्या मागील बाजूस त्या रागाच्या प्रहाराचे वर्णन आहे. उदा. ही शीर्षके आणि मागील वर्णन यांचे वाचन केले असता, असे लक्षात आले, की या चित्रांमध्ये प्रत्येक प्रहराची चित्रे काढलेली आहेत असे दिसते. **म्हणजेच त्या त्या प्रहारानुसार गायल्या जाणाऱ्या रागांची ही चित्रे आहेत, हे समजते.** प्रहाराबद्दलची अशा प्रकारची चित्रे मिळणे हे दुर्मीळ आहे. आतापर्यंत रागांवर आधारित रागमाला चित्रे आपणास पहावयास मिळतात. **परंतु प्रत्यक्ष कुठल्या प्रहरी कुठले राग गायले जात, याचे प्रत्यक्ष चित्र आणि वर्णन आपल्याला मंडळातील या चित्रात पाहावयास मिळतात,** हे या चित्रांचे वैशिष्ट्य असून मंडळ संग्रहातील ही दुर्मीळ चित्रे आहेत, असे लक्षात येते. उर्वरित ४२ चित्रांच्या मागील बाजूस देवनागरी आणि त्या खाली फारसीतून रागांची नावे आहेत.

एकंदरीत या सर्वाच्या सारांशावरून असे म्हणता येते, की भाइसं मंडळ संग्रहातील चित्रांच्या मागील फारसी लेखन हे **'कता'** किंवा **'कित्ता'** या प्रकारात मोडत असून मध्ययुगीन कालखंडातील अथवा त्या आधीच्या अनेक प्रसिद्ध फारसी, ऊर्दू कवींच्या लोकप्रिय काव्यांवर आधारित केलेले कलात्मक सुलेखन आहे. त्यातील काही लेख बहुदा **'इराण'** आणि विशेष

म्हणजे **'पुणे'** येथे लिहिले गेले असावे. प्रस्तुत संशोधनात काही कवि, सुलेखनकार व संग्राहाकांची नावे नव्याने समोर आली आहेत. याशिवाय काही काव्यांच्या भाषेसंदर्भात देखील माहिती मिळते. मंडळ संग्रहातील चित्र क्र.९० च्या मागील बाजूस असलेल्या काव्यामध्ये एका स्त्रीच्या सुंदर डोळ्यांचे वर्णन केलेले आहे. या काव्यात शेवटून दुसऱ्या ओळीत **'औरंगजेब बादशहा'**चा उल्लेख केलेला आहे. या काव्यातील इतर शब्द जरी लागत नसले तरी या लिखाणामध्ये औरंगजेबाचे नाव येणे हे आपल्याला नव्याने सापडते. हे काव्य जरी नस्तालिक लिपीत लिहिलेले असले, तरी त्याची भाषा ही उत्तर भारतातील उर्दू असून त्यात स्थानिक ब्रज भाषेतील शब्द आहेत. चित्र क्र.३९२ च्या मागील बाजूस ही नस्तालिक लिपीतून लिहिलेले, मात्र 'अरबी' भाषेतील एक काव्य आहे.

काही ठिकाणी सुलेखन अथवा काव्य ही सरळ ओळींमध्ये न लिहिता, ती तिरकी लिहिलेली दिसतात, ती कशासाठी असावीत? की फक्त सुशोभन हाच त्यामागील उद्देश असावा का? या काव्यांचा भाव चित्रांत येतो का? यातील दोन चित्रांच्या मागील बाजूस पातशाहास विनंती अर्ज लिहिल्याचे नमुने येथे दिसून येतात. मात्र त्यांचा व त्यांमागील चित्रांचा संबंध आहे का? किंवा कोणीतरी कधी काळी एखादा अर्ज लिहिला असेल आणि नंतरच्या काळात हाच कागद कुणीतरी चित्र काढण्यास वापरला असेल का? असा प्रश्न पडतो. काही चित्रांत मागे गुलदस्त्यांचे चित्रण आहे. तेव्हा अशी चित्रे सुशोभानासाठी काढली गेली असावीत का? या चित्रांच्या मागील कित्ते एका ठराविक पद्धतीच्या चौकटींतच लिहीलेले दिसतात. त्यांना कडेने वेलपत्तीची किनार आहे. काही चित्रांच्या चौकटींत व या काव्याच्या चौकटींत साम्य दिसते. त्यामुळे एक तर ही चित्रे आणि काव्य लेखन एकाच वेळी केले असावे. म्हणजेच चित्र काढताना काव्याचा देखील विचार केला असावा असे दिसते. परंतु काव्याचा संदर्भ येथे लागत नाही. अशा चित्रांत एका बाजूला काव्य आणि त्याच्या मागच्या बाजूला सुंदर चित्र दिसते. अशी अनेक चित्रे आपल्याला या संग्रहात पाहावयास मिळतात. तर काही चित्रांमध्ये चित्राची चौकट आणि मागील लेखन यांच्या चौकटींमध्ये काहीच साम्य दिसत नाही. वा काही लेखनांना

चौकटीच नाहीत. अशावेळी एक तर आधीच एखादे चित्र काढलेला कागद नंतरच्या काळात सुलेखनासाठी वापरला गेला असावा. किंवा याच्याच अगदी उलट, पूर्वी एखाद्या सुलेखन केलेला कागद नंतर चित्र काढण्यासाठी वापरला गेला असावा. मंडळ संग्राहात अशा प्रकारचीही चित्रे दिसून येतात. मात्र या सर्वांमध्ये एक मात्र निश्चित सांगता येते. की या चित्रांमध्ये आणि त्यामागील लेखनामध्ये काहीही संबंध दिसून येत नाही.

भारत इतिहास संशोधक मंडळा'तील मागील प्रकरणातून सविस्तरपणे नोंद केलेला असा चित्र संग्रह आहे. यात लघुचित्रे, प्रिंटस् व इतर चित्रे आहेत. इतिहासाचा अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा संग्रह असल्याने त्याचा सविस्तर अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## प्रकरण ५

# संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारसी

भाइस मंडळ संग्रहात जमविलेल्या नानाविध लघुचित्रे वेगवेगळ्या अंगांनी अध्ययन करता येते. या संग्रहात कुठल्याही एकाच विषयावर चित्रे नाहीत, तर त्यांमध्ये वेगवेगळे विषय आहेत. यात लघुचित्रांच्या प्रसिद्ध चित्रशैली देखील आहेत. तात्पर्याने मंडळ संग्रहात भारताच्या विविध भागांतील म्हणजे उत्तर हिंदुस्थान पासून ते दख्खनी भागांतील, राजस्थान ते अगदी ओरिसा पर्यंतच्या अनेक दुर्मीळ चित्रांचा संग्रह आपणास पाहावयास मिळतो. या संग्रहात लघुचित्रांत आधीची म्हणता येतील अशी काही मुघलचित्रे देखील आहेत. त्यांत जहांगीर, शहाजहान कालीन लोकप्रिय विषयांवरील चित्रे दिसतात. मुघल सम्राटांची काही व्यक्तिचित्रे अतिशय उत्कृष्ट आहेत. तसेच त्यांच्या दरबारी मंडळी, सरदार यांची अनेक दुर्मीळ व एकमेवाद्वितीय व्यक्तिचित्रे आहेत. त्यात समूह चित्रे, काही झरोका चित्रे,पशू–पक्षी, प्राण्यांची चित्रेही आहेत.

दख्खनी चित्रांमधील सर्वांत आधीची 'तारिफ –इ–हुसेनशाही'ची चित्रे, तसेच विजापूरच्या चित्रांत १७ व्या शतकाच्या मध्यात तयार झालेली काही चित्रे उदा. चांदबिबी, दख्खनचे पाच बादशहा, योगिनी अशी काही उत्तम चित्रे देखील आहेत. हीच गोष्ट गोवळकोंडा व हैद्राबादशैलीच्या चित्रांच्या बाबतीतही आहे. यात अनेक उत्तम दर्जाची व्यक्तिचित्रे व समूह चित्रे आहेत. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे भाइसं मंडळ संग्रहात मराठा चित्रशैलीच्या चित्रांचे अनेक उत्तम नमुने इथे दिसतात. तसेच या संग्रहात जैन तीर्थंकरांची २३ दुर्मीळ चित्रे देखील आहेत. संग्रहातील काही मुघल तसेच दख्खनी कलमाची चित्रे त्यांतील सफाईदारपणा, रंगसंगती, चित्रांचे संयोजन तसेच त्यात केलेले तपशीलवार चित्रण व सोनेरी रंगाचा वापर यांवरून त्यातील काही चित्रे ही एकमेव व दुर्मिळ आहेत.

भाइसं मंडळ संग्रहात धार्मिक विषयांवरील, पौराणिक कथांवरील – जसे रामायण, भागवत पुराण, दशावतार, कृष्णलीला इत्यादी तसेच इतर दैनंदिन विषयांवरील चित्रेही आहेत. याशिवाय

तालचित्रे, ऋतूंची चित्रे, बारामासांची चित्रे इत्यादी तसेच चिनी पद्धतीची भरत कामातील नाविन्यपूर्ण चित्रेही आहेत. तसेच यांत तुर्को–पर्शियन शैलीतील चित्रे असून, त्यातील एकावर तर इराणच्या बादशाहाचे चित्र असलेले पोस्टाचे तिकीटही (postal stamp) चिटकवलेले आहे. या संग्रहात दुर्मिळ अशी युरोपियन प्रिंट्स देखील आहेत.

भाइसं मंडळातील सर्व चित्रांचा अभ्यास करताना भारतातील अनेक चित्रशैलींचा आढावा घेता येतो. कारण भारतातील जवळ जवळ सर्वच शैलींची प्रातिनिधिक चित्रे मंडळ संग्रहात दिसून येतात. मंडळ संग्रहातील ही चित्रे मध्ययुगीन चित्रकलेच्या वेगवेगळ्या काळाच्या टप्प्यांची साक्ष देतात. या चित्रांतून पाश्चात्य प्रभाव व काही छापील चित्रे यांतून स्थानिक चित्रकलेचे बदलते स्वरूप देखील दिसून येते.

भाइसं मंडळामध्ये १२८७ चित्रे आहेत. त्या सर्वांचे आपण वेगवेगळ्या पद्धतीने जे काही विश्लेषण केलेले आहे, त्याच्या निष्कर्षामध्ये अनेक बाबी आपल्याला मांडता येतात. त्या खालील प्रमाणे –

- प्रस्तुत संशोधनांतर्गत वरील एकूण १२८७ चित्रांतून ११० चित्रे नव्याने ओळख आणि समाविष्ट होत आहेत. त्यांत काही ऐतिहासिक स्त्री व पुरुष व्यक्तिचित्रे आहेत, तर काही समूह चित्रांतील ऐतिहासिक व्यक्ति, बारा मास चित्रे, झरोका चित्रे आहेत. यातील काही चित्रांची नोंद पूर्वसूरींनी केलेली आहे. मात्र त्यांतील तपशील पुन्हा एकदा तपासल्यानंतर या चित्रांची पुन्हा नव्याने ओळख समोर आली आहे. या चित्रांबद्दल 'प्रकरण ४.३' मध्ये सविस्तर माहिती आलेली आहेच. नव्याने समाविष्ट झालेली चित्रे थोडक्यात पुढील प्रमाणे –

१. **ऐतिहासिक पुरुष व्यक्तिचित्रे – एकूण ९ चित्रे.**

यातील ९ पुरुष व्यक्तिरेखा नव्याने ओळखलेल्या आहेत.

१) रावजगराम (चित्र क्र.२०)

२) सटवाजी जाधव (चित्र क्र.७९)

३) पिलाजीराव जाधव (चित्र क्र.८१)

४) रावसाहेब पेशवे (चित्र क्र.४३४)

५) सुलतान परवेझ मिर्झा– शहजादा दारा शिकोहचा सासरा (चित्र क्र.६४३)

६) पहिले बाजीराव पेशवे (चित्र क्र.६८३). त्यातील व्यक्तिरेखा ही पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या जास्त जवळ जाणारी वाटते.

७) महाराजा माधोसिंह–जयपूर (चित्र क्र.९१४)

८) शाह अब्बास १ला – इराणचा सुलतान (चित्र क्र.९३२)

९) सुलतान परवेझ मिर्झा– शहजादा दारा शिकोहचा सासरा (चित्र क्र.१०२८)

मंडळ संग्रहात सटवाजी जाधव यांचे एक चित्र आहे, त्यात चित्र क्र.७९ या चित्राची नवीन भर पडलेली आहे. तर पिलाजीराव जाधव यांची दोन चित्रे आहेत. त्यांत चित्र क्र.८१ या अजून एका चित्राची गणना करता येऊ शकते.

**२. ऐतिहासिक स्त्री व्यक्तिचित्रे – एकूण ४ चित्रे**

यातील ३ चित्रे ही एकाच स्त्री व्यक्तिरेखेची आहेत.

१) नूरजहान (चित्र क्र.७०)

२) नूरजहान (चित्र क्र.३०९)

३) नूरजहान (चित्र क्र.५७४).

४) ताराबाई (चित्र क्र.५८२) (एक दख्खनी स्त्री)

**३. समूह चित्रांतील ऐतिहासिक व्यक्तिचित्रे –एकूण ६ चित्रे**

१) एक मुस्लीम धर्मगुरू व त्याचे १० अनुयायी(?) (चित्र क्र.३१ब)

२) हैदराबादचा निजाम अली खान आसफ जाह–२रा व त्याचा मंत्री अरीस्तू जाह (चित्र क्र.८२)

३) पाच दख्खनी बादशहा (चित्र क्र.३१८)

४) हैदराबादचा निजाम अली खान आसफ जाह–२रा व त्याचा मंत्री अरीस्तू जाह (चित्र क्र.३९६)

५) खुसरो आणि शिरीन (चित्र क्र.३९९)

६) इब्राहीम आदिलशहा २रा (जगतगुरू)– विजापूरचा बादशहा (चित्र क्र. ९२५)

मंडळ संग्रहात इब्राहीम आदिलशहाची २ चित्रे आहेत, त्यात चित्र क्र. ९२५ या अजून एका चित्राची गणना करता येईल.

**४. झरोका चित्रे –एकूण ४ चित्रे**

यात ४ झरोका चित्रे नव्याने ओळखण्यात आलेली आहेत, जी ऐतिहासिक स्त्री चित्रांमध्येसुद्धा आलेली आहेत.

१)नूरजहान (चित्र क्र.७०)

२)नूरजहान (चित्र क्र.३०९)

३)हातावर छोटा पक्षी घेतलेली स्त्री (चित्र क्र.५३४)

४)नूरजहान (चित्र क्र.५७४).

**५. युरोपियन व्यक्ति –एकूण ५ चित्रे**

१)ख्रिस्तजन्म (चित्रक्र.५२७)

२)जेम्स–२रा (चित्र क्र.७१०)

३)जोसेफ , माता मेरी व बाल येशू (चित्र क्र.७११)

४)एक ख्रिश्चन नन (चित्र क्र.७३१)

५)विल्यमकॉक्स (चित्रक्र.८८३)

**६. प्रसंग चित्रे :**

**अ) शिकारदृश्ये– एकूण ६ चित्रे**

१) एक तरुण मुघलबादशहा शिकार करताना (जहांगीर?) (चित्र क्र.३१६)

२) भिल्ल जोडपे काळविटाची शिकार करीत आहेत. (चित्र क्र.३८३)

३) छत्रपती शाहू महाराजांचा शिकारखाना (चित्र क्र. ९०२)

४) छत्रपती शाहू महाराजांचा शिकारखाना (चित्र क्र.९०३)

५) छत्रपती शाहू महाराजांचा शिकारखाना (चित्र क्र.९०४)

६) भिल्ल जोडपे काळविटाची शिकार करीत आहेत आणि मागे एका बादशहाचा शिकारखाना (चित्र क्र.११७५)

**आ) दरबारी दृश्ये–एकूण २ चित्रे**

१) जहांगीर बादशहाचा दरबार (चित्र क्र.१२१०)

२) हैदराबादचा निजामअली खान आसफ जाह–२रा व त्याचा मंत्री अरीस्तू जाह (चित्र क्र.१२२१)

**इ) स्नान–शृंगार करणाऱ्या स्त्रिया – १ चित्र.**

१) कन्हाबेगम (चित्र क्र.४०४)

**७. योगी, योगिनी व सुफी संत–एकूण ३ चित्रे**

१) एक मुस्लीम धर्मगुरू व त्याचे १० अनुयायी (?) (चित्रक्र.३१ब). हे चित्र समूह चित्रात आलेले आहे.

२) कबीरमुनी (चित्र क्र.४०५)

३) एक योगिनी व तिच्या सख्या (चित्रक्र.६१०)

४) एक मुस्लीम धर्मगुरू सुलतान इब्राहीम इब्न अधम, बल्ख (?) (चित्रक्र.१२६०)

**८. देवी–देवता व अवतार चित्रे –एकूण ५ चित्रे**

या संचामधील ४ चित्रांची नोंद मंडळ सूचित केलेली आहे, मात्र येथे त्या चित्रांचा विस्तृतपणे अभ्यास केला असता, त्यातून या चित्रांबद्दल काही नवीन माहिती समोर आलेली आहे. तर ५वे चित्र; चित्र क्र.१०३७ हे चित्र नव्याने समाविष्ट केले गेले आहे. ही चित्रे पुढीलप्रमाणे–

१) हंसवाहिनी सरस्वती (चित्र क्र.७)

२) जगन्नाथपुरी पटचित्र (चित्र क्र.४९८)

३) शिवपार्वती विवाह (चित्र क्र.८६३)

४) श्रीराम (चित्र क्र.८७५)

५) शरभावतार (चित्र क्र.१०३७)

**९. दशावतार – १ चित्र**

या संचातील एक चित्र नव्याने समाविष्ट झालेले आहे ते म्हणजे-

१) कल्की अवताराचे चित्र (?) (चित्र क्र.१०३१)

**१०.रागमाला – एकूण २२ चित्रे**

मंडळ सूचित उर्वरित २२ रागचित्रांची नोंद दिसून येत नाही. ही रागचित्रे पुढील प्रमाणे –

१) राग श्री (चित्र क्र.१२७९)

२) राग मेघमल्हार (चित्र क्र.१२८३)

३) रागिणी पटमंजिरी (चित्र क्र.१२६५)

४) रागिणी ललित (चित्र क्र.१२६६)

५) रागिणी मालकंस (चित्र क्र.१२६७)

६) रागिणी मालश्री (चित्र क्र.१२६९)

७) रागिणी रामकली (चित्र क्र.१२७०)

८) रागिणी गुणकली (चित्र क्र.१२७१)

९) रागिणी बिलावल (चित्र क्र.१२७२)

१०) रागिणी देवगांधारी (चित्र क्र.१२७३)

११) रागिणी मधुमाधवी (चित्र क्र.१२७४)

१२) रागिणी धनासरी (चित्र क्र.१२७५)

१३) रागिणी बसंत (चित्र क्र.१२७६)

१४) रागिणी वैराडी (चित्र क्र.१२७७)

१५) रागिणी पुरवी (चित्र क्र.१२७८)

१६) रागिणी पंचम (चित्र क्र.१२८०)

१७) रागिणी आसावरी (चित्र क्र.१२८१)

१८) रागिणी बंगालनी (चित्र क्र.१२८२)

१९) रागिणी सेत मल्हार (चित्र क्र.१२८४)

२०) रागिणी गुजरी (चित्र क्र.१२८५)

२१) रागिणी गौड मल्हार (चित्र क्र.१२८६)

२२) रागिणी ककुभ (चित्र क्र.१२८७)

**११. बारा मास – एकूण ५ चित्रे**

भाइसं मंडळ सूचीतील नोंद नसलेल्या ५ बारा मास चित्रांची नव्याने ओळख झालेली आहे. ती पुढीलप्रमाणे–

१) बैसाषमास (चित्रक्र.१२३०)

२) ज्येष्ठमास (चित्रक्र.१२३१)

३) आषाढमास (चित्रक्र.१२३२)

४) मार्गशीर्षमास (चित्रक्र.१२३५)

५) माहामास (चित्रक्र.१२३७)

**१२. हैद्राबाद–गोवळकोंडा चित्रे – एकूण ८ चित्रे**

या प्रकारातील काही चित्रे दरबार दृश्ये व समूह व झरोका चित्रांमध्येही आलेली आहेत. त्या व्यतिरिक्त यातील काही वेगळ्या विषयांवरील चित्रे पुढीलप्रमाणे –

१) विरहिणी राजकन्या (चित्र क्र.१६९)

२) हातात फुलांचा गुच्छ घेतलेल्या स्त्रियांची चित्रे (चित्र क्र.५३१, ५३२, ८१६, १०६०, १०६१, १०६२ आणि १०६३).

**१३. तंत्रपद्धती :**

**स्याह कलम–एकूण ७ चित्रे**

१) महादजी शिंदे (चित्र क्र.८२)

२) युरोपियन समूह चित्र (चित्र क्र.३४०)

३) रावसाहेब पेशवे (चित्र क्र.४३४)

४) श्रीराम सिंहासनावर बसलेले (चित्र क्र.४८६)

५) श्रीराम (चित्र क्र.४९६)

६) एका झाडाखाली उभी असलेली स्त्री (चित्र क्र.७०४)

७) हत्तींची जलक्रीडा (चित्र क्र.८६०)

**नीम कलम–एकूण १२ चित्रे**

१) एकसरदार गायन वादन ऐकत आहे (चित्र क्र.१६)

२) राव जगराम (चित्र क्र.२०)

३) मोटा राजा (चित्र क्र.२७)

४) एक युरोपियन स्त्री; समोर एक युरोपियन पुरुष गुडघे टेकून बसलेला (चित्रक्र.४४)

५) आकाशात वाद्य वाजविणारे देवदूत (चित्रक्र.५१)

६) दुसरे बाजीराव पेशवे (चित्रक्र.८६)

७) साधूंचा समूह (चित्रक्र.९२)

८) एक हिंदूराणी; सोबत दोन लहान मुले (चित्र क्र.३३५)

९) ख्रिस्त जन्म (चित्र क्र.५२७)

१०) हुक्का ओढत बसलेली एक स्त्री (चित्र क्र.६९४)

१०) जोसेफ , माता मेरी व बाळ येशू (?) (चित्र क्र.७११)

११) इब्राहीम आदिलशहा २ रा – विजापूर (चित्र क्र.९२५)

**मसविदा / आराखडा– एकूण ५ चित्रे**

१) सवाई माधवराव–हरिपंत फडके व महादजी शिंदे (चित्र क्र.१३)

२) हैदराबादचा निजाम अली खान आसफ जाह–२रा व त्याचा मंत्री अरीस्तू जाह (चित्र क्र.८२)

३) मंचकावर बसलेली एक स्त्री (चित्र क्र.६३०)

४) गंगाधर शास्त्री पटवर्धन (चित्र क्र.६३९)

५) प्राणीचित्रे (चित्र क्र.८६२)

## १४. ख्रिस्त धर्मावर व युरोपियन विषयांवर आधारित चित्रे –एकूण ५ चित्रे

या प्रकारच्या चित्रांत ख्रिस्त धर्मावर आधारित २ चित्रे आहेत –बायबल मधील कथांवर आधारित एकाच चित्रात निरनिराळ्या कथांचे चित्रण केलेले आहे. (चित्र क्र.५०८); तर दुसरे चित्र हे ईळींरपपळर ढीराश्रिळपस`प ींहश इरवसशी`ष डींर्शीींळींळेप ङ्मरींशी शीर्षकावर आधारित चित्र आहे. (चित्र क्र.११०८). यानंतर २ चित्रं ही डेपवेप एींशपळपस ऊेशीीशी' या युरोपियन मासिकातील छापील चित्रे आहेत. आणि शेवटचे चित्र हे ब्रिटीश अधिकारी_सर आयर कूट' याच्या स्मरणार्थ बांधलेल्या स्मारकशीलेचे आहे. (चित्र क्र.८८६).१ ऑगस्ट १७९० रोजी प्रकाशित झालेल्या 'एीशिरिप चरसरूळपश' चे हे मुखपृष्ठ आहे.

अशी एकूण ११० चित्रे या अभ्यासांतर्गत नव्याने मंडळ संग्रहात समाविष्ट होऊ शकतात.

या व्यतिरिक्त मंडळ संग्रहात अनेक देवीदेवता चित्रे आहेत. त्यातील अनेक लहान आकारांतील चित्रे ही देव्हाऱ्यांच्या वरील महिरपिंमध्ये लावली जात असावीत, हे प्रकरण १ मध्ये नमूद केलेले आहेच. तशाच प्रकारे झरोका चित्रांमध्ये अनेक आकाराने लहान लहान चित्रे आहेत. त्यांमध्ये बरीचशी चित्रे फक्त बाजू बदलून अगदी एकसारखी आहेत. काही चित्रांत मागील बाजूंस गुलदस्त्यांचे चित्रण आहे. तेव्हा ही चित्रे सुशोभनासाठी महिरपींमधील चौकटींमध्ये लावली जात असावीत का ? जी दोन्ही बाजूंनी पण पाहता यावीत हा त्यामागील उद्देश असावा का ? त्यातून काही व्यक्तिचित्रे व सुशोभन चित्रे पाहता यावीत, हा उद्देश होता का? असे अनेक प्रश्न येथे पडतात. अशा पद्धतीचे महिरापिंचे सुशोभन सध्या वाई – मेणवली वगैरे ठिकाणी दिसून येते. अशा पद्धतीचा महिरपी चित्रांचा संग्रह मंडळ संग्रहात समाविष्ट करता येईल.

शिकार दृश्यांच्या चित्रांमध्ये काही वैशिष्ट्यपूर्ण चित्रे दिसून येतात. यात छत्रपती शाहू महाराजांच्या शिकारखान्याची ३ चित्रे आहेत. या तीनही चित्रांतील लवाजमा– त्यांतील व्यक्तिरेखा, रंगसंगती, चित्र संयोजन हे अगदी एक सारखेच आहेत. त्यामुळे ही तिन्ही चित्रे एकाच संचातील असावीत. मंडळ संग्रहातील यापूर्वी ओळखलेले छत्रपती शाहू महाराजांचे एक चित्र आहे. त्यासारखीच ही ही चित्रे आहेत. यातील चित्र क्र.९०४ च्या मागील बाजूस **'तसवीर ए**

**सवारी शिकार महाराजा साहू छत्रपती'** असे फारसी मधून आणि त्याखाली देवनागरीतून लिहिलेले आहे. त्यामुळे ही चित्रे छत्रपती शाहू महाराजांशी निगडीत आहेत. या चित्रांत प्रत्यक्ष छत्रपती शाहू महाराजांचे चित्र जरी नसले, तरी त्यांच्या शिकारखान्याचे शिकारीला जात असतानाचे हे चित्र आहे, जे दुर्मिळ आहे. विशेष म्हणजे या चित्रांत काही सैन्य हे पांढऱ्या पोशाखात चितारलेले दिसते, तर इतर सैन्य ज्यांच्या हातात पिंजरा वा ससाणा पक्षी आहे, तसेच हाकारे हे हिरव्या रंगाच्या कपड्यात दिसतात. यावरून शिकारीला जाताना शिकारखान्यातील लोकांचा खास पोशाख असल्याचे दिसते. मंडळ संग्रहातील शिकारींच्या इतर चित्रांमधून देखील असे पोशाख घातलेले लोकं चितारलेले दिसतात. चित्र क्र ९०२ आणि चित्र क्र ९०३ या दोन वेगवेगळ्या चित्रांत दोन घोडे दिसतात, पण त्यांवर स्वार नाहीत. त्यांच्याबरोबर लवाजमा दिसतो. त्यांच्या हातात राहूट्यांच्या, तंबूच्या गुंडाळ्या दिसतात. ही तीनही चित्रे एकाच मोठ्या चित्राचा भाग असावीत. या चित्रांचा मधला भाग कापला गेल्यामुळे हे संपूर्ण चित्र कसे असावे हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे या चित्रात शिकारीला कोणी दोन मोठ्या असामी आहेत का ? की त्यांची भेट आहे? हे कळत नाही. पण एकंदरीत हे शिकारीचे चित्र असावे हे नक्की. कारण त्यातील हिरव्या रंगाच्या पोशाखातील हाकारे, त्यांच्या हातातील पिंजरे, ससाणे इत्यादी तपशील या विधानाची साक्ष देतात. या चित्रांमध्ये प्रत्यक्ष छत्रपती शाहू महाराज दिसत नाहीत. मात्र त्यामागील लेखात त्यांचा उल्लेख आहे. त्यामुळे ही चित्रे छत्रपती शाहू महाराजांशी संबंधित आहेत, हे समजते.

भाइसं मंडळातील चित्रांच्या वर आपल्याला साधारण चार प्रकारचे लेख दिसतात. फारसी, मोडी, देवनागरी आणि इंग्रजी. या चित्रांच्या समोरील वा मागील बाजूंस अशा प्रकारचे लेखन दिसते. त्यात त्या त्या चित्रांची शीर्षके अथवा व्यक्तिनाम, काव्यं, त्यांचे वर्णन अथवा त्यांच्या चित्रकार वा संग्राहाकांची नावे इत्यादी स्वरूपात हे लेखन केलेले दिसते. ते पुढीलप्रमाणे–

**अ) फारसी लेख :** मंडळ संग्रहातील काही चित्रांवर त्या त्या व्यक्तिरेखांची चित्रांच्या वरती वा मागे फारसीतून नावे आहेत. अशी बरीच चित्रे मंडळ संग्रहात आहेत. प्रस्तुत संशोधनात उर्वरित ३९ व्यक्तिचित्रांच्या नावांचे व चित्रांच्या मागील कित्ते वा काव्यांचे आणि लेखांचे वाचन नव्याने करण्यात आलेले आहे. तसेच रागमाला चित्रांतील एकूण ५० चित्रांवरील शिर्षके वा त्यांच्या मागील बाजूंस असलेल्या फारसी लेखनांचेही वाचन करण्यात आले. यातून काही व्यक्तिनामं, काव्यं, त्यांचे कवि, सुलेखनकार, चित्रकार वा त्या चित्राचे वर्णन तसेच रागचित्रांत त्या त्या रागांच्या प्रहरांचे वर्णन याबद्दलची माहिती नव्याने समोर आली. या सर्व फारसी वाचना बद्दल 'प्रकरण ४.३) ड) फारसी वाचन' यांमध्ये सविस्तरपणे वर्णन आलेले आहेच. ही चित्रे पुढीलप्रमाणे आहेत – एकूण ८५.

१) **फारसी शीर्षके (व्यक्तिनाम) :** एकूण १० चित्रे.

- 'राव जगराम' (चित्र क्र.२० )
- 'भैरव'(चित्र क्र. २०)
- 'लोहांगमल्ल' (चित्र क्र.३९४)
- 'तसवीर कन्हा बेगम' (चित्र क्र.४०४)
- 'तसवीर–ए–कबीर मुनी' (चित्र क्र.४०५)
- 'असद खान लारी' (चित्र क्र.९२२)
- 'साहिब–ए आदिलखान पादशाह–ए बिजापूर'(एक आदिलशहा) (चित्र क्र..९२५)
- 'झेब–उन्निसा बेगम'(चित्र क्र..१००६)
- शाह आलम बादशहा (चित्र क्र..११६०)
- 'रंभावती' (चित्र क्र.११९४)

**२) फारसी काव्यं : एकूण १५ चित्रे.**

मंडळ संग्रहातील फारसी काव्यं ही 'नस्तालिक' आणि 'शिकस्ता' या दोन्ही लिपींमध्ये लिहिलेली दिसून येतात. यातील काही काव्यं ही चित्राच्या समोरील बाजूस चित्राच्या कडेने असलेल्या 'हशिया'च्या बाजूने आणि मागील बाजूंस सुशोभित चौकटींमध्ये लिहिलेली दिसतात. यांत त्या काळातील वा आधीच्या काळातील काही प्रसिद्ध इराणी कवींच्या कविता, गझल यावरही सुलेखन केलेले आहे. यावरून या काव्यांची नंतरच्या काळापर्यंत म्हणजे १७व्या–१९व्या शतकांतही त्यांची लोकप्रियता टिकून असल्याचे दिसते. ह्या कविता म्हणजे सुफी परंपरेप्रमाणे द्विअर्थी काव्यं म्हणता येतील. म्हणजे वाचताना या कविता प्रेमकविता दिसतात– मात्र काही वेळेस यांत प्रेयसीला/ आपल्या 'प्रिय'ला, म्हणजे 'अल्लाह'ला (divine love) उद्देशून ही काव्यं केलेली दिसतात. या संग्रहात अशी काव्यं जास्त आहेत. ही काव्यं बऱ्याचदा सुशोभनासाठी तिरप्या ओळींमध्ये लिहिलेली आहेत. त्या भोवती सोनेरी रंगांत अलंकरण केलेलेही दिसून येते.

**३) फारसी लेख : एकूण ७ चित्रे.**

मंडळ संग्रहातील या फारसी वाचनात चित्रांच्या मागील बाजूंस काव्यांच्या बरोबरीनेच फारसी लेखही लिहिल्याचे दिसते. हे लेख बऱ्याच ठिकाणी **'शिकस्ता'** लिपीत लिहिलेली असून त्यातील काही **'नस्तालिक'** लिपीतही आहेत. यांचे लेखन हे साधे – सरळ आहे. त्यांत सुशोभन केलेले दिसत नाही. या सर्व लेखांचे स्वैर भाषांतर करण्यात आलेले असून 'प्रकरण ४.३ ड) फारसी वाचन' यामध्ये त्यांचे सविस्तर वर्णन दिलेले आहे. संग्रहातील चित्रांवरील हे लेख वेगवेगळ्या प्रकारचे आहेत– त्यात काही एखाद्या बादशहाच्या वा बड्या अधिकाऱ्याचे स्तुतीपर वर्णन आहे., तर कधी एखादा वडीलधारी लहानास उपदेशपर सल्ला – 'नसिहत' देत आहे. एका लेखात मुस्लीम धर्मियांना उद्देशून

उपदेश आहे, तर १–२ विनंती अर्ज पण लिहिल्याचे दिसते. तसेच एका चित्राच्या मागील बाजूस '**तसवीर–ए–सवारी शिकार महाराजा साहू छत्रपती**' असे फारसीतून लिहिलेले आहे. जे, त्या चित्राचा छत्रपती शाहू महाराजांशी त्याचा संबंध दर्शविते..

यातील २–३ चित्रांवर 'शिकस्ता' लिपीतील लेख त्यांच्या किचकट वळणांमुळे वा त्यातील अक्षरे पुसली गेली असल्याने त्यांचे वाचन करणे तसे अशक्य आहे.

**४) 'हिकायत' : १ चित्र.**

